# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

तात्त्विक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.)साठी
सादर केलेला संशोधन प्रबंध

संशोधन प्रबंधाचा विषय

# मार्क्स-आंबेडकर समन्वयवाद आणि समकालीन राजकारण

(विशेष संदर्भ : जातिव्यवस्था, स्त्रीप्रश्न, रोजगार आणि शिक्षण)


**❁संशोधक❁**

**संजय पंढरीनाथगायकवाड**

(एम.ए.,बी.एड.,एम.फिल.)
स.भू.बा. उर्फ अप्पासाहेब जेधे
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,पुणे - २.

**❁मार्गदर्शक❁**

**प्रा. डॉ. दत्तात्रय चंद्रकांत वाबळे**

(एम.ए.,एम.फिल.,पीएच.डी.)
राज्यशास्त्र विभागप्रमुख,
साहेबराव शंकरराव ढमढेरे महाविद्यालय,
तळेगाव ढमढेरे, पुणे.


जानेवारी २०१६

# टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

## ✻ मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र ✻

प्रमाणित करण्यात येते की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी संजय पंढरीनाथ गायकवाड ह्यांनी 'मार्क्स आंबेडकर समन्वयवाद आणि समकालीन राजकारण' (विशेष संदर्भ : जातिव्यवस्था, स्त्रीप्रश्न, रोजगार आणि शिक्षण) ह्या विषयावरील संशोधन प्रबंधाचे काम माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेले आहे.

सदर संशोधन प्रबंधामध्ये त्यांनी नमूद केलेली माहिती व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहेत.

मार्गदर्शक,

डॉ. दत्तात्रय चं. वाबळे

## टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे

# ❋ संशोधकाचे प्रतिज्ञापत्र ❋

मी संजय पंढरीनाथ गायकवाड असे लिहून देतो की, ‘मार्क्स आंबेडकर समन्वयवाद आणि समकालीन राजकारण’ (विशेष संदर्भ : जातिव्यवस्था, स्त्रीप्रश्न, रोजगार आणि शिक्षण) हा माझा स्वत:चा शोधप्रबंध असून ह्या संशोधन प्रबंधातील माहिती मूळ संदर्भातून संकलित केली असून, तिचा योग्य त्या ठिकाणी तसा उल्लेख केलेला आहे. प्रस्तुत शोधप्रबंध भारतात किंवा भारताबाहेर कोणत्याही विद्यापीठाला सादर केलेला नाही.

सदर शोधप्रबंधामध्ये नमूद केलेली माहिती आणि संशोधनात्मक विधाने ही मी स्वत: अभ्यासून घेतलेली असून, ह्या शोधप्रबंधाव्यतिरिक्त सदर माहितीचा कोठेही उपयोग केलेला नाही.

ठिकाण : पुणे

दिनांक : / ०१/२०१६ संशोधक

(संजय पंढरीनाथगायकवाड)

## ✻अर्पणपत्रिका✻

आयुष्यभर गरिबी धकाधकीच्या आणि ताण-तणावाच्या जीवनशैलीत आपलं जीवन जगत जगत, नव्या जोमानं जातिपातीच्या मर्यादा ओलांडून, आम्हा भावंडांचे शिक्षण थांबू नये, व आम्ही कर्तृत्वाच्या सर्व मर्यादा ओलांडून, यशाला कवेत घेण्यासाठी शेतात उन्हा तान्हाचा, वाऱ्यापावसाचा तडाखा झेलत आमच्यामध्ये 'बाबासाहेबांना' शोधत आपली मान धरणीला ठेवणारी माझी आई वेणूबाई आणि वडील पंढरीनाथ माणकू गायकवाड ह्यांच्या चरणी अर्पण...

# ।। ऋणनिर्देश ।।

प्रस्तुत शोधप्रबंध माझे मार्गदर्शक डॉ. दत्तात्रय वाबळे ह्यांच्या मार्गदर्शनाचेच फलित होत आहे. आदरणीय वाबळेसरांनी आपला बहुमोल वेळ खर्च करून मला माझ्या शोधप्रबंधाचे कार्य पूर्ण करण्याचे काम तळमळीने करून घेतले. प्रथमत: मी विद्यार्थी ह्या नात्याने डॉ. दत्तात्रय वाबळे ह्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

शोधप्रबंधाचे काम करताना अनेक व्यक्तींनी मला प्रोत्साहन दिले. त्या व्यक्तींमध्ये आमचे प्राचार्य डॉ. शशांक पोळ ह्यांचा उल्लेख केला पाहिजे. तसेच मा. एम.के. सातव सर ह्यांचा उल्लेख करणे महत्त्वाचे मानतो. डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी वेळोवेळी संशोधन प्रगतीबाबत विचारणा करून तसेच अत्यंत दुर्मिळ ग्रंथ उपलब्ध होण्याचे स्त्रोत सांगितले व त्यांच्यामुळे विविध लेखकांना व चळवळीतील कार्यकर्त्यांना भेटण्याचे मार्ग मोकळे झाले, त्यामुळे त्यांचा मी व्यक्तिश: आभारी आहे.

संशोधन कार्य चालू असताना माझी आई वेणूबाई आणि माझे वडील पंढरीनाथ माणकू गायकवाडह्यांच्या वृद्धत्वाच्या काळात त्यांना माझी उणीव भासणार नाही, अशी माझी भक्कम बाजू सांभाळणारा माझा लहान भाऊ धनेश व त्याच्या कुटुंबाचे विशेष आभार मानतो. माझ्या आई आणि वडिलांचा ३-४ महिन्याच्या अंतराने मृत्यू झाला. ह्या दु:खद प्रसंगातून बाहेर काढून माझे मानसिक स्वास्थ्य बिघडू न देता मरगळलेल्या संशोधन कार्यात पुन्हा जीव ओतण्याचे आणि धीर देण्याचे काम माझी पत्नी ॲड. मंदा ह्यांनी त्यांच्या कामाचा व्याप सांभाळून केले आहे. चर्चेद्वारे एखादा मुद्दा अत्यंत सोप्या भाषेत मांडणी करून तडीस नेण्यापर्यंत आग्रह धरला, त्यांच्या सहज स्वाभाविक आविष्कारामुळे मला संशोधनाची उमेद मिळाली. ह्यामध्ये जय आणि मंदार ह्यांच्या अभ्यासात अनेकवेळा अडथळेही आले, अडचणीच्या वेळी सर्वांच्याच सहकार्यामुळे हे अनमोल लेखनकार्य आज पूर्णत्वास आले आहे.

श्री. शिवाजी मराठा सोसायटी पुणे २ च्या सर्व पदाधिकाऱ्यांनी नेहमीच संशोधन कार्यास प्रेरणा दिली. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ग्रंथालय, जेधे महाविद्यालयाचे ग्रंथालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र, सुगावा प्रकाशन पुणे, ऑल इंडिया लोकल सेल्फ गव्हर्नमेंट कोथरूडह्या आणि इतर संस्था व ग्रंथालयांकडून नेहमीच सहकार्य मिळाले.

मला माझ्या संशोधन कार्यात प्रेरणा, सहकार्य आणि व्यक्तिश: मदत करणाऱ्यांमध्ये डॉ. अलिम वकील, डॉ. शंकर चव्हाण, प्रा. प्रकाश पवार, डॉ. सतीश भोसले, प्रा. महेंद्र कांबळे, प्रा. कल्पना गावडे, डॉ. महालक्ष्मी मोराळे, श्री. व सौ. डी.के. गायकवाड, गोसावी सर, श्री. व सौ. प्रा. कुमार सुरवसे, ॲड. राजेश नितनवरे, मनिषा भोसले, आयु. बाळासाहेब व सुवर्णा रूपवते, ताई बनसोडे, अपेक्षा रूपवते, ज्योती व प्रकाश संगारे, श्री. व सौ. प्रा. गोडगे, पंचशीला खंडारे, लक्ष्मीताई वाघमारे, प्रा. रूपकमल भोसले, प्रा. शशिकांत तिकोटे, प्रा. अनिल मधाळे, प्रा.एम.जी. गुंजाळ, प्रा. एम. डी. रेवगडे, प्रा. अशोक राहिंज, अशोक पानसरे, अण्णा टेमगिरे, ॲड. सुनील दिघे, डॉ. आशुतोष देशमुख, ॲड. बी.पी. शिंपी, ॲड. विनोद तायडे, शिवाजीभाई व केरूभाई पटेल ह्यांचा उल्लेख करणे माझे कर्तव्य ठरते,ह्या सर्वांचा मी आभारी आहे.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. माणिक सोनवणे ह्यांनी तसेच गरवारे महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शरद घोडके ह्यांनी कोणतेही आढेओढे न घेता मदत केली. माझ्या महाविद्यालयाच्या कला शाखेतील प्रा. प्रतिमा परदेशी ह्यांच्याशी अनेकवेळा चर्चा करून संकल्पना समजून घेतल्या आणि माझे सहकारी प्रा. पी.डी.गायकवाड, प्रा. डॉ. पाचारणे, प्रा. डॉ. रेटवडे, प्रा. डॉ. पाटील, प्रा. डॉ. जगताप, प्रा. आरेकर, प्रा. देठे, प्रा. इंगळे, प्रा. चव्हाण, प्रा. शिशुपाल ह्या सहकाऱ्यांशी माझ्या संशोधन विषयावर वेळोवेळी चर्चा झाली.माजी प्राचार्य म.ना.कांबळे ह्यांनी संशोधन करण्याला परवानगी व प्रेरणा दिली. तसेच वाणिज्य विभागातील सर्व प्राध्यापक व महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने वेळोवेळी मदत केली, त्यामुळे त्या सर्वांच्या ऋणात राहणे मला आवडेल.

श्रीमती. शिंदे ज्योती ह्यांनी सदर प्रबंध टंकलेखनाचे काम करण्यात मोलाचा वाटा उचलला आणि मा. प्रा. डॉ. शशिकांत साळवे, बी.डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव ह्यांनी आपला बहुमूल्य वेळ खर्च करून मुद्रित शोधनाचे काम करण्यात मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

गायकवाड संजय पंढरीनाथ

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरणाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | संशोधन पद्धती | १ - २९ |
| २. | मार्क्स-आंबेडकर समन्वयाचा आढावा व समकालीन राजकारणातील समस्या | ३० - ५८ |
| ३. | मार्क्स-आंबेडकर समन्वय आणि जातिव्यवस्थेची चिकित्सा | ५९ - १०५ |
| ४. | मार्क्स-आंबेडकर समन्वयी परिप्रेक्ष्यातून स्त्री प्रश्नांची चिकित्सा | १०६ - १५५ |
| ५. | मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांच्या दृष्टिकोनातून रोजगारविषयक प्रश्नांची चर्चा | १५६ - १९५ |
| ६. | मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांच्या परिप्रेक्ष्यातून शिक्षणविषक प्रश्नांची चिकित्सा | १९६ - २२८ |
| ७. | निष्कर्ष व शिफारशी | २२९ - २४३ |
| | संदर्भग्रंसूची | २४४ - २६२ |

प्रकरण पहिले

# संशोधन पद्धती

१.० प्रस्तावना

१.१ विषयाची निवड

१.२ संशोधन विषयाचे महत्त्व

१.३ संशोधनाची उद्दिष्टे

१.४ गृहीतके

१.५ संशोधनाची पद्धती

१.६ सैद्धांतिक पार्श्वभूमी

१.७ संशोधन साहित्याचा आढावा

१.८ संशोधनाच्या मर्यादा व समस्या

१.९ प्रकरणात्मक मांडणी

# प्रकरण पहिले

# संशोधन पद्धती

## १.० प्रस्तावना

कार्ल मार्क्सच्या समकालीन जागतिक स्वरूपाच्या समस्यांमध्ये राज्यक्रांती, औद्योगिक क्रांती ह्यासारख्या कारणांमुळे मोठी भर पडत गेली. वर्णभेद, वर्गीय संरचना ह्या समस्यांचे स्वरूप जागतिक होते. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचा कालावधी वेगवेगळा होता. कार्लमार्क्सचे तत्त्वज्ञान जागतिक स्वरूपाचे होते. तुलनेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्त्वज्ञान त्यांच्या समकालीन युगात राष्ट्रीय पातळीवरील होते. मार्क्स-आंबेडकर ह्यांच्या समकालीन समस्या आणि सद्यकालीन जागतिक व राष्ट्रीय समस्यांचा विचार करता आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती बदलली. परंतु त्यांच्या समकालीन आणि सद्यकालीन समस्यांच्या स्वरूपात फारसा फरक पडला नाही. वर्ग आणि जात बाबतच्या समस्या आजही तेवढ्याच तीव्रतेने दिसून येतात.

भारतापुढे शेजारील देशांशी सीमातंटे, घुसखोरी, वाढता दहशतवाद, पर्यावरण प्रदूषण, जागतिकीकरण, उदारीकरण, आंतरराष्ट्रीय नव आर्थिक धोरण ह्यासारख्या बहिर्गत समस्या व आव्हाने मोठ्या प्रमाणात आहेत. भारतीय समाजात ग्रामीण विकास शेतकऱ्यांची आत्महत्त्या, पाणी प्रश्न, दुष्काळ, दारिद्र्य, ऊर्जा, जंगलतोड, वाढती लोकसंख्या, भ्रष्टाचार, विवेकशून्य

राजकारण, सामाजिक भेदभाव, जातीची उतरंड, स्त्रियांची अवहेलना, श्रमिकांच्या अनंत समस्या, शैक्षणिक अधोगती या सारख्या अंतर्गत समस्यांची शृंखला भारताला व भारतीय सामाजिक, राजकीय, आर्थिक विकासाला मोठ्या प्रमाणात अडथळा बनत आहेत.

दलित समाज, नेते व कार्यकर्ते तसेच समर्थक यांनी भारतीय समाजातील जातिव्यवस्थेबाबतची समस्या सोडविण्यासाठी धर्मांतर हा उपाय शोधला आणि मार्क्सवाद्यांनी आर्थिक परिवर्तन हा उपाय शोधला. मात्र ह्या दोन्ही मांडणीतून ठोस कार्यक्रम पुढे आला नाही. डॉ. रावसाहेब कसबे[१] ह्यांच्या मते, मार्क्सवाद्यांच्या मांडणीमुळे श्रमिकांची हवाबंद विभागणी झाली. वंशपरंपरागत किंवा माणसा-माणसातील जन्माधिष्ठित फरक ह्यामुळेच ही अवस्था निर्माण झाली. एकूणच जातिव्यवस्था, स्त्रीप्रश्न, रोजगार आणि शिक्षण ह्यासारख्या समस्या सोडविताना कार्यकर्ते, लेखक, नेते, चळवळी, वैचारिक संप्रदाय ह्यांच्यापुढे मोठा वैचारिक संभ्रम निर्माण झाला आहे. भारतीय समाजातील विशिष्ठ समस्या घेऊनच चळवळींची निर्मिती झाली आहे. भारताअंतर्गत सामाजिक, आर्थिक व राजकीय समस्या आणि आव्हानांची सोडवणूक करण्यासाठी ह्या चळवळींपुढे ठोस असा विचार, कार्यक्रम आणि त्याला अनुसरून अनुकूल कृतीची उणीव आहे. ह्या संभ्रमावस्थेला मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी चळवळीही अपवाद नाही. कारण ह्या चळवळींना मिळालेल्या अनुयायांची आपल्या चळवळी प्रती असणारी भूमिका कट्टर नाही.

### १.१ विषयाची निवड :

भारतीय समाजव्यवस्थेबाबत चिंतन करताना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय परिवर्तनासाठी उपस्थित असणारी कोणतीही एक विचारसरणी उपयोगी नाही, हे अनेक वेळा अनुभवाने सिद्ध झाले आहे. मार्क्स-आंबेडकरांच्या समकालीन समस्या भारतात आजही सुटू शकल्या नाहीत. सद्यकाळातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थिती बदललेली आहे. समस्यांत त्या सुटण्याऐवजी आणखी भर पडत चालली आहे. वस्तुस्थितीचा विचार करता

भारतात मार्क्सवादापलीकडे जाऊन जातिव्यवस्था विचारात घेतल्याशिवाय भारतीय समाज व राजकारण समजणे अवघड आहे. मार्क्सवादी तसेच आंबेडकरवादी विचारवंत, कार्यकर्ते आणि समर्थक हे आजपर्यंत एकमेकांना दोष देत आहेत. त्यांनी आपापल्या विचारसरणीतील पूर्ण शुद्ध स्वरूपातील विचारांवर भर न देता आवश्यक तेवढ्या भागावर भर दिला. यातून सामाजिक प्रदूषण निर्माण झाले. दोन्ही विचारसरणींच्या समर्थकांमधील संकुचित व कर्मठपणा परिवर्तनाला मर्यादा ठरली.

मार्क्सवादी लेखन साहित्य व चळवळींची निर्मिती तसेच आंबेडकरवादी दलित बहुजनांच्या चळवळी व लिखाण अंतिमत: मानवमुक्तीसाठी मांडले गेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे गौतम बुद्धांचे अनुयायी असून त्यांनी मांडलेली 'दु:ख' ही संकल्पना आणि मार्क्सने मांडलेली 'पिळवणूक' ही संकल्पना एकसारख्या भूमिकेतून मांडलेल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कार्ल मार्क्सवर टीका केली. परंतु त्यांना बहिष्कृत मानले नाही. उलट त्यांचे वैचारिक योगदान मान्य केले आहे. व्यवहारात आंबेडकरवादी ह्या समर्थनाचा आपापल्या सोयीने अर्थ लावतात आणि कोणत्याही विचारसरणीला आंधळे प्रचारक मिळाले तर त्या विचारसरणीचा ऱ्हास होतो. ह्याला मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी विचारसरणीही अपवाद नाही.

सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी जात आणि वर्गाचे प्रश्न सुटणे महत्त्वाचे आहे. फक्त मार्क्सवादी अथवा फक्त आंबेडकरवादी ह्या समस्या सोडवूशकत नाहीत. मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांचे सर्वांगिण चिंतन झाले आणि विचारवंत, कार्यकर्ते, राजकीय पक्ष, संघटना, दबावगट इत्यादींचा वैचारिक संभ्रम दूर करण्यासाठी प्रयत्न झाले तर ह्यातून मार्ग काढता येईल. मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांचा अभ्यास करताना तत्कालीन वर्ग जात ह्याविषयी समस्यांचे चिंतन करावे लागते. समकालीन समस्यांमुळे राजकारणात प्रचंड घडामोडी झाल्या. सद्यकालीन समस्यांचे स्वरूप हे मार्क्स-आंबेडकरांच्या समकालीन समस्यांच्या स्वरूपांप्रमाणेच आहे,

समाजात आजही वर्ग आणि जातिच्या समस्यांमुळे समाज विकासात मोठा अडथळा निर्माण होत आहे. एकूणच मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांची आज नितांत गरज असल्याने हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

**१.२संशोधन विषयाचे महत्त्व :**

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारांमुळे मोठी सामाजिक क्रांती झाली. दोघेही चळवळींचे निर्माते होते. त्यांनी त्या-त्या काळात सामान्यत: वर्ग आणि जातीच्या शोषणाला विरोध करणारी भूमिका घेतली ह्यातूनच त्यांना सामाजिक मान्यता मिळाली. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रत्यक्ष संघर्षातून पुढे आले आहेत. केवळ अभ्यासिकेमध्ये बसून त्यांच्या तत्त्वज्ञानाची मांडणी झाली नाही. तर ह्या दोन्ही विचारवंतांना मोठा अनुयायी वर्गही लाभला आहे. त्यांच्या विचारातून आर्थिक, सामाजिक क्रांती झाली. परंतु त्यांच्या अनुयायांनी त्यांच्या मूळच्या विचारांची मोडतोड केली. आपणास हव्या असणाऱ्या तेवढ्याच तत्त्वज्ञानाचा अर्थ स्वत:ला अनुकूल असणारा अर्थ लावला. त्यामुळे मार्क्सच्या विचारांना आंतरराष्ट्रीय पातळीवर फारसे यश संपादन करता आले नाही. ठरावीक देशातच तो यशस्वी झाला. भारतीय समाजामध्ये आंबेडकरवादाला मोठा अडथळा निर्माण झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अनुयायांमध्ये कर्मठपणा आणि संकुचितपणा आला. ह्यामुळे जातिव्यवस्था, वर्गव्यवस्था नष्ट होऊ शकली नाही. स्त्रियांच्या समस्या सोडविता आल्या नाही. श्रमिकांबद्दल ठोस असा कृती कार्यक्रम मिळाला नाही. १९९० नंतरचे नवीन आर्थिक धोरण राबविले जात असताना त्यातून निर्माण होणाऱ्या समस्यांचे निराकरण करता आले नाही.

मार्क्सवादी-आंबेडकरवादी चळवळींमधील वैचारिक शुद्धता टिकून न राहिल्याने वरील प्रश्न व समस्या सोडविण्याची कुवत कोणत्याही एका विचारसरणीत राहिली नाही. एका विचारसरणीला दुसऱ्या कोणत्याही विचारसरणीतील तत्त्वज्ञानाचा आधार घ्यावाच लागतो. उदा.

भारतात जातिव्यवस्था प्रबळ आहे. परंतु ह्या जातींमध्ये अनेक वर्ग निर्माण झाले आहेत. त्यामुळे जातींचा अभ्यास करताना वर्गाचा अभ्यास आपोआप करावाच लागतो. जातींचा विचार आंबेडकरी विचारसरणी करते तर वर्गांचा विचार मार्क्सवादी विचारसरणी करते.

सामाजिक प्रश्नांचा गुंता, वैचारिक संभ्रमावस्था ह्यावर उपाय शोधताना मार्क्सवादी व आंबेडकरवादी विचारसरणींना एकत्र आणता येईल. ह्यामुळे वर्ग आणि जातिविषयक समस्या सोडविता येतील. मार्क्स-आंबेडकरांच्या वैचारिक समन्वय हा फक्त वैचारिक न राहता ह्यावरून मोठी सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रांती घडवून आणता येईल. तसेच समकालीन आणि सद्यकालीन जातिव्यवस्था, स्त्रीसमस्या, रोजगार आणि शिक्षण यांबरोबरच भारतापुढील सर्व आव्हानांना सामोरे जाता येईल. मार्क्स व आंबेडकर ह्यांच्या विचारांचा समन्वय साधला तर निर्माण होणारा समाज मार्क्सवादी अथवा आंबेडकरवादी राहणार नाही तर तो समन्वयवादी राहील. मार्क्स-आंबेडकरांना एकत्र आणून समाज परिवर्तन करणे, समाजाला एक नवा विचार देऊन आदर्श उभा करणे सहज शक्य होईल. त्यामुळे प्रस्तुत संशोधन विषय महत्त्वाचा ठरतो.

मार्क्स-आंबेडकरवादी विचारांचा समन्वय झाल्याने समाज वास्तवाला भिडणाऱ्या तत्त्वज्ञानाची मांडणी होत आहे. ह्या तत्त्वज्ञानाने भारतातील सामाजिक, आर्थिक आणि राजकीय समस्यांची सोडवणूक करण्याची क्षमता निर्माण केली आहे. मार्क्सवादाबरोबरच आंबेडकरवादाचा विचार केल्याने आंबेडकरवादाला वैश्विकता निर्माण झाली आहे. जागतिकीकरणाचे आव्हान ओढवून वर्ग, जातींचे प्रश्न सोडविण्यासाठी मार्क्स-आंबेडकरांचा वैचारिक समन्वय अंतिम उपाय ठरला आहे. ही सामाजिक व राजकीय गरज आहे.

### १.३ संशोधनाची उद्दिष्टे :

१. मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

२. मार्क्स-आंबेडकर समन्वयी परिप्रेक्ष्यातून समकालीन राजकारणाचा आढावा घेणे.

३. मार्क्स-आंबेकडर समन्वयी दृष्टिकोनातून जातिव्यवस्थेची चिकित्सा करणे.

४. मार्क्स-आंबेडकर समन्वयी परिप्रेक्ष्यातून स्त्री प्रश्नांची चिकित्सा करणे.

५. मार्क्स-आंबेडकर समन्वय आणि रोजगाराचा प्रश्न ह्यांचा संबंध तपासणे.

६. मार्क्स-आंबेडकर समन्वयी दृष्टिकोनातून शिक्षणविषयक समस्यांचे विश्लेषण करणे.

७. मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांची परिवर्तनवादी दृष्टिकोनातून चिकित्सा करणे.

**१.४ गृहीतके :**

१. मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांना निश्चित अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

२. समकालीन राजकारणात अनेक नवनवीन समस्या निर्माण होत आहेत.

३. समकालीन राजकारणात जातिव्यवस्थेची समस्या अधिक जटिल बनत चालली आहे.

४. 'स्त्री' प्रश्नांची दखल घेतल्याशिवाय कोणतीही विचारसरणी पूर्णत्वाकडे जात नाही.

५. मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचार रोजगार व श्रमिकांच्या प्रश्नांकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहतो.

६. शिक्षणविषयक समस्यांवर उपाययोजना म्हणून मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचार उपयुक्त ठरतील.

७. मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचार परिवर्तन घडवून आणू शकतात.

**१.५ संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनात माहिती संकलन करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोत ह्यांचा उपयोग केला आहे.

**अ)प्राथमिक स्त्रोत:**प्रस्तुत संशोधनासाठी कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी स्वत: लिहिलेल्या संदर्भग्रंथांचा उपयोग केला आहे. तसेच त्यांच्या विचारांचा अभ्यास केलेल्या विचारवंत व अभ्यासकांशी चर्चा करून माहिती मिळवली आहे.

**ब)दुय्यम स्त्रोत** :दुय्यम स्त्रोतामध्ये संशोधन विषयाशी संबंधित संदर्भग्रंथ, पुस्तके, मासिके, प्रकाशित भाषणे, वर्तमानपत्रातील लेख, पुस्तक परीक्षणे इत्यादींचा उपयोग केला आहे. तसेच समन्वयाबाबत सत्यता जाणून घेण्यासाठी अधिकृत वेबसाईटचाही वापर केला आहे.

प्रस्तुत शोधप्रबंधात विश्लेषणात्मक, युक्तिवादात्मक आणि निदानात्मक संशोधन पद्धतींचा वापर केलेला आहे.

**१.६ सैद्धांतिक पार्श्वभूमी :**

सामाजिक, राजकीय प्रश्नांची उकल करण्याचे महत्त्वाचे काम विचारसरणी व तिचे तत्त्वज्ञान करीत असते. काळानुरूप अनेक सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. त्या सोडविण्याची क्षमता मार्क्सवादामध्ये आहे की, आंबेडकरवादामध्ये आहे, हा प्रश्न अनेकांना पडलेला आहे.

समकालीन जातिप्रश्न, स्त्रियांच्या समस्या, श्रमिकांच्या समस्या, शिक्षणविषयक समस्या सोडविण्यासाठी मार्क्सवाद किंवा आंबेडकरवाद ह्यापैकी एका विचाराचा उपयोग करण्याऐवजी त्यांच्या समन्वयी विचारांचा उपयोग होईल काय? ह्याचा शोध घेणे, हा प्रस्तुत संशोधनाचा अंतिम उद्देश आहे. जागतिकीकरणाच्या प्रवाहात जातिव्यवस्था आणि वर्गव्यवस्थेचे प्रश्न अधिक गंभीर बनले आहेत. हे वास्तव ओळखून काही अभ्यासकांनी मार्क्सवाद व आंबेडकरवादाचे विश्लेषण केले आहे. तसेच त्यांच्या विचारांची समन्वयी चिकित्सा केली आहे. त्यात डॉ. रावसाहेब कसबे ह्यांचे नाव अग्रस्थानी आहे. युरोपातील भांडवलवाद व औद्योगिक क्रांतीमुळे विकासासाठी चालना मिळाली. त्याचबरोबर भांडवलदारांकडून श्रमिक वर्गाची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होऊ लागली आणि सामान्य माणूस हा दु:खी आणि दरिद्री होत गेला, कार्ल मार्क्स ह्या परिस्थितीला 'पिळवणूक'म्हणतो. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा हा आरंभबिंदू मानला जातो. कार्ल मार्क्सची संपूर्ण मांडणी ही समाजातील 'आहेरे' आणि 'नाहीरे' वर्गाबाबत

आहे. त्याने संपत्ती हे वर्ग संघर्षाचे मूळ मानले. संपत्तीच्या आधारे मालक वर्ग व कारखानदार वर्ग हे श्रमिक वर्गाची पिळवणूक करतात, हा आधार मानून त्यांनी आपले संपूर्ण तत्त्वज्ञान मांडले आहे. बुद्धाने सुद्धा ह्या जगात 'दु:ख आहे', असे मान्य केले आहे. परंतु त्यांनी पिळवणूक शब्द वापरला नाही. अशाच पद्धतीचे विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या तत्त्वज्ञानातून पिळवणूक म्हणजेच दु:ख आहे, हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे व बुद्धांच्या कालानुषंगिक एक नवा अर्थ, एक नवे समर्थ विश्लेषण मांडण्याची त्यांना गरज वाटली. ह्या गरजेतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या "बुद्ध आणि त्यांचा धम्म" चा जन्म झाला.[२] ही सैद्धांतिक बाजू लक्षात घेऊन सदर संशोधन विषयाबाबत मांडणी केलेली आहे.

मार्क्सवादाने वर्गाचा आणि आंबेडकरवादाने जातीचा अभ्यास, विश्लेषण व चिंतन केलेले आहे. भारतामध्ये प्रत्येक जातीत उद्दिष्टानुसार विविध वर्ग निर्माण झाले आहेत. त्यामुळे जातिव्यवस्था, स्त्रीप्रश्न, रोजगार आणि शिक्षण याबाबतीत मार्क्स-आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाचा समन्वय साधला तर ह्यातून समन्वयवादी ही नवीन विचारसरणी निर्माण होते आणि ही विचारसरणी सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्रांती करते. ह्या सैद्धांतिक पार्श्वभूमीआधारे प्रस्तुत संशोधनाची रूपरेषा ठरविली आहे व संशोधन केले आहे.

## १.७ संशोधन साहित्याचा आढावा :

मार्क्स-आंबेडकरवादी समन्वयी विचारातून समाजव्यवहाराला अनुकूल चालना मिळाली आहे.[३] दोन्ही विचारवंतांच्या संयुक्तिक विचारामुळे मार्क्सवादी आणि आंबेडकरवादीही संतप्त होतात. मात्र आज दोन्हीही विचारांचे समर्थक कट्टर राहिले नाही. त्यामुळेच आजच्या चळवळींपुढे मोठे गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. ह्या चळवळींना समन्वयी विचार मार्गदर्शक ठरणारा आहे.

प्रस्तुत संशोधनविषयाचा अभ्यास करण्यापूर्वी इतर संशोधक, अभ्यासक ह्यांनी विषयाशी पूरक केलेल्या संशोधनसाहित्याचा अभ्यास करून आढावा घेतला आहे, तो पुढील प्रमाणे होय.

१) जगताप संजय श्रीकांत ह्यांनी एप्रिल २०१० मध्ये टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे ह्यांनी 'दलित समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्थितीचा अभ्यास'हा पीएच.डी. साठी डॉ. शरद घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रबंध सादर केला. ह्या प्रबंधामध्ये भारतीय समाजव्यवस्था ही जातिव्यवस्थेवर आधारलेली आहे. जातींमध्ये अनेक वर्ग निर्माण झाले आहेत. त्यामुळेच दलितांमध्ये एकरूपता दिसून येत नाही, व त्यांच्यात समन्वयाचा अभाव आढळतो, ह्या स्वरूपाची मांडणी केलेली आहे.[४]

२) सांकृत्यायन राहुल आणि इतर लेखकांनी लिहिलेले 'बुद्धविचार : मार्क्सवादी दृष्टिक्षेप'ह्या पुस्तकाला डॉ. तेलतुंबडे आनंद ह्यांनी प्रस्तावना लिहिली. पहिली आवृत्ती १९७३ मध्ये प्रकाशित झाली. २०११ डिसेंबर चौथी आवृत्ती प्रकाशित झाली. ह्या पुस्तकात चार लेख असून या लेखांत भगवान गौतम बुद्धांचा भौतिकवाद बुद्धांचे तत्त्वज्ञान सांगितले, आणि त्यांच्या विचारांचे पैलुंवर प्रकाश टाकला. भगवान बुद्ध मानवतावादाच्या कल्याणासाठी ऐहिक पातळीवरून प्रयत्न करतात, तर मार्क्स प्रत्यक्ष कृतीला प्राधान्यक्रम देतात. मार्क्सवादी परिप्रेक्ष्यातून बुद्धांच्या विचारांचे मूल्यमापन प्रस्तुत ग्रंथात केलेले आहे. ह्यात भगवान बुद्धांच्या कृतिशीलतेवर टीका केलेली आहे.[५]

३) कसबे रावसाहेब ह्यांनी 'मार्क्स आणि आंबेडकर' हा ग्रंथ ऑगस्ट १९८५ सालीलिहिला. ह्या पुस्तकाची २००६ मध्ये दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली. सुगावा प्रकाशन पुणे द्वारा प्रकाशित ग्रंथात लेखक डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी ग्रंथाचे तीन भाग केले आहेत. दुसऱ्या आवृत्तीला नवीन प्रस्तावना जोडली आहे. प्रस्तावनेत सोविएत रशियाबद्दल डॉ. आंबेडकरांचा दृष्टिकोन काय होता? समाजवादी अर्थव्यवस्था अपयशी का झाली? आणि आज बौद्ध धर्माचे स्थान काय आहे? ह्यासंबंधीचे विश्लेषण करून पहिल्या भागात दलित चळवळीची पार्श्वभूमी

त्यातून अस्पृश्यांच्या नेतृत्त्वाचा उदय कसा झाला? स्वतंत्र भारतापुढे कोणकोणती आव्हाने आहेत. ह्याबाबतचे विश्लेषण केलेले आहे. धर्मांतराबाबतच्या विश्लेषणात आंबेडकरांनंतर बौद्ध धर्माला कसे स्वरूप प्राप्त झाले, ह्याचा उल्लेख केलेला आहे. तिसऱ्या भागामध्ये कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांची तौलनिक स्थितीचे विश्लेषण केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची साम्यवादासंबंधीची भूमिका काय होती. मार्क्सवादाबाबत त्यांनी जे प्रश्न उभे केले, त्याबाबत समन्वयाकडे प्रवास कसा गेला. आधुनिक भारतात सद्यस्थितीत ज्या समस्या आहेत, त्या समस्यांकडे कार्ल मार्क्सची विचारसरणी कशी पाहते, व मार्क्स-आंबेडकर विचारांच्या समन्वयामुळे भारतीय समाजाच्या समस्यांची सोडवणूक कशी करता येईल. ह्याबाबतची उपाययोजना समाजासमोर आणली.[६]

४) डॉ. मुरुगकर लता यांनी ‘दलित पँथर चळवळ’ नावाचे पुस्तक लिहून ते सुगावा प्रकाशनाने १९९५ मध्ये प्रकाशित केले आहे. ह्या पुस्तकात दलित पँथरची ऐतिहासिक पार्श्वभूमी, उदय, घटक, दलित साहित्य व दलित पँथर चळवळ, चळवळीतील महत्त्वाच्या घटना अशी प्रकरणांची मांडणी केलेली आहे. नामदेव ढसाळ यांनी दलित शब्द व्यापक अर्थाने वापरला. अनुसूचित जाती, आदिवासी भूमिहीन मजूर आणि आर्थिकदृष्ट्या शोषित हे सर्व दलित आहेत ह्या व्यापक अर्थाने मांडणी केली आहे.[७]

५) बर्न्स एमिल,‘मार्क्सवाद म्हणजे काय?’लोकवाङ्मय गृह, मुंबई,अनुवाद सरला कारखानीस जून २०११ मध्ये १२ वी आवृत्ती ह्यामध्ये भांडवलशाहीच्या उदयाची मीमांसा, समाजवादाचा विकास, भांडवलशाहीचा ऱ्हास, शास्त्रीय विवेचन, चळवळीचा मार्ग व कार्यक्षम ह्याबाबत मांडणी केलेली आहे.[८]

“आजच्या जगात अनेकांना जी दु:खे ज्या यातना सहन कराव्या लागतात, त्यातून मानवजातीला कायमचे मुक्त करण्यासाठी आणि अधिक उच्च प्रकारच्या समाजात सर्व स्त्री-पुरुषांना स्वत:चा पूर्ण विकास करून घेता यावा, म्हणून मदतीसाठी मार्क्सवादाचा उपयोग

करता येईल आणि केला जावा." अशा स्वरूपाचे विचार मांडले आहेत. तसेच 'भूस्वामी' व 'भूदास' ह्या वर्गाविषयीचे विश्लेषण आहे. भांडवलदार वर्गाने सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने सत्ता काढून घेतली, ह्याबाबत वास्तव दर्शविले आहे. उपयुक्तता मूल्य, नफा, विनिमय मूल्य, भांडवल ह्या संकल्पना आणि प्रकरण ५ मध्ये वर्ग संघर्ष व राज्यसत्ता ह्यांच्या बाबतीतील विश्लेषण आहे.[९]

६) परदेशी प्रतिमा, 'योद्धा जनसत्याग्रही दादासाहेब गायकवाड'ह्या पुस्तकात माणूसपण सिद्ध करण्यासाठी जमलेले हजारो कष्टकरी, दलित स्त्री-पुरुष एकीकडे तर दुसरीकडे कनिष्ठ जातींना सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठेचा कोणताच अधिकार नाही, याबाबतचे विश्लेषण केले.[१०]

७) मोरे दिनेश,'मनुवाद्यांना घटना का बदलावी वाटते?' ह्या पुस्तकात पन्नास वर्षात देशाची उन्नती झाली नाही काय? अशा शीर्षकाखाली सामाजिक व राजकीय प्रगतीचा आलेख मांडला आहे. शैक्षणिक समस्यांचा उल्लेख करताना ह्या परिस्थितीत राज्यघटनेला जबाबदार धरता येणार नाही. शिक्षणसंस्था वाढल्या, पण घटनेची उद्दिष्टे अजूनही सफल होत नाही, ह्याबाबतची खंत लेखकाने व्यक्त केली आहे.[११]

८) डोळस अविनाश, 'आंबेडकरी चळवळ परिवर्तनाचे संदर्भ' सुगावा प्रकाशन पुणे, १९९५ ह्या ग्रंथात सामाजिक परिवर्तनाबाबतचा उहापोह लेखकाने केला आहे. समस्यांकडे आंबेडकरी दृष्टिकोनातून पाहिले आहे. आंबेडकरी चळवळीच्या भविष्याबाबत वर्णन केले आहे, उपाययोजना सांगितल्या आहे. सांस्कृतिक परिवर्तनामध्ये जयंती उत्सव कसे साजरे केले जातात. औद्योगिक प्रगतीमुळे ऐहिक सुखावर काय परिणाम होतो, ह्याविषयी उल्लेख केला आहे. विविध साखर कारखानदारांचा संदर्भ देऊन ते परिवर्तनाची कास का सोडतात, ह्याविषयी आंबेडकरी दृष्टिकोन सांगितला. जात आणि वर्ग म्हणजेच विचारप्रणालीच्या परिभाषेत आंबेडकरवाद आणि मार्क्सवादाचा संदर्भ त्यांनी समाजसुधारणेशी जोडला आहे.

संजय पवार ह्यांच्या बरोबरच इतर नाटककारांचा संदर्भ देऊन स्त्रियांच्या स्थितीवर प्रकाश टाकला आहे, हे करताना देखील परिवर्तन ह्या दृष्टीने विचार केला आहे.[१२]

९) सुमंत यशवंत व पुंडे द.दि. 'महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार'प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००६ ह्या पुस्तकात जात हा मध्यवर्ती घटक विचारात घेऊन जातीबाबत महाराष्ट्रात काय स्थिती आहे.ह्याबाबत २० लेखकांनी आपले लेख विविध दृष्टिकोनातून लिहिले आहेत. महाराष्ट्रात जातीबाबत विविध पद्धतींनी विचारमंथन झाले, विविध काळात झाले डॉ. आंबेडकरांनी जातिसंस्थेमुळे माणूस कसा पिचला तर कारखानदारांच्या मुळे कामगार कसा पिळला जाऊ लागला ह्या विषयी विविध लेखकांचे दृष्टिकोन काय आहेत, हे समजते.[१३]

विविध लेखांमध्ये समाािजक तणाव निर्माण होण्याची कारणे, सामाजिक सुधारणा व सामाजिक उद्रेक निर्माण होताना जातिसंस्थेने कसा परिणामकारक प्रभाव टाकला, याविषयी मते नोंदविली आहेत. शरद पाटील यांच्या सारख्या अभ्यासकाने जातिव्यवस्था विकासातील टप्पे सांगताना स्त्री सत्ता, चातुर्वर्ण्य पद्धत, जातिव्यवस्था ह्यांचे विश्लेषण करताना स्वातंत्र्यकालीन जाति-वर्ग व्यवस्थांचे वर्णन केले. मार्क्सवाद-फुले व आंबेडकरवादाच्या समन्वयाबाबतच्या मूल्यमापनात डावी चळवळच वर्ग आणि जातिव्यवस्था नष्ट करेल, अशी आशा व्यक्त केली.[१४]

१०) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिहिलेले 'बुद्ध की कार्ल मार्क्स'ह्या पुस्तकाचा मराठी अनुवाद शिंदे गौतम यांनी केला. याच पुस्तकाची दुसरी आवृत्ती सुगावा प्रकाशन पुणे ह्यांनी २००२ मध्ये प्रकाशित केली. ह्यात मार्क्स आणि बुद्ध ह्यांची तुलना केली आहे. बुद्धांची तत्त्वप्रणाली काय होती. त्रिपिटकाच्या वाचनातून जी तत्त्वे पुढे आली, ह्या तत्त्वांविषयी विश्लेषण, मार्क्सची वाचनातून जी तत्त्वे पुढे आली. ह्या तत्त्वांविषयी विश्लेषण, मार्क्सची तत्त्वप्रणाली, बुद्ध आणि मार्क्स ह्यांच्यातील तुलना केलेली आहे.[१५]

११) रणसुभे विलास ह्यांनी ‘जात-वर्ग व परिवर्तनाचा लढा’ ह्या शीर्षकाखाली लोकवाङ्मय गृह मुंबई द्वारा प्रकाशित श्रमिक प्रतिष्ठान कोल्हापूर द्वारा आयोजित कॉ. अविनाश पानसरे स्मृती व्याख्यानमालेच्या २००७ च्या व्याख्यानाचे संकलन करून २००८ मध्ये संपादित ग्रंथ प्रकाशित केला. ह्या ग्रंथात भारतीय राजकारणात जे आंतरबाह्य बदल होतात, त्यावर जात, वर्ग स्वरूपानुसार कसे परिवर्तन होते. राजकीय सत्ता आणि जात. जातीच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहणाऱ्यांनी वर्गाकडे लक्ष दिले नाही. जातिव्यवस्थेचा ढाचा मोडण्यासाठी शिक्षणाची चळवळ उभी राहिली पाहिजे, ह्या संदर्भात मांडणी करण्यात आली आहे.[१६]

१२) गायकवाड सुधाकर ‘डॉ. रावसाहेब कसबे एक मूल्यमापन’सुमेध प्रकाशन, पुणे,२००७ ह्या पुस्तिकेत लेखकाने डॉ. कसबेंच्या विचारांचे म्हणजे मार्क्स-आंबेडकर समन्वयाचे सूत्र घेऊन त्यांचे व्यक्तिमत्त्व उलगडण्याचा प्रयत्न केला आहे.[१७]

१३) कसबे रावसाहेब ह्यांची ‘शिक्षणाची आव्हाने’ ही पुस्तिका त्यांनी २००२ मध्ये प्रकाशित केली आहे. सुगावा प्रकाशन पुणे यांनी प्रकाशित केलेल्या पुस्तिकेत लेखकाने अशी मांडणी केली की, आजच्या स्थितीत जातीच्या मुद्यावरून अतिशय अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले आहे. ते वातावरण शिक्षक आणि शिक्षण क्षेत्र करू शकते. विधायक वळण लावण्यासाठी समाजपरिवर्तन करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी साधन आहे. ज्ञान आणि व्यवहार ह्यांची सांगड घालावी लागेल, ह्याचे महत्त्वाचे कारण भारतातील उच्च जाती वर्गासाठी आपली भांडवलदार मंडळी नवी शिक्षणव्यवस्था स्थापण्याची योजना आखीत आहेत. ह्या सर्व मुद्यांचा उहापोह केलेला आहे.[१८]

१४) गायकवाड संजय,‘डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स-आंबेडकरांचा वैचारिक समन्वय’टिळक महाराष्ट्र विद्यापीठाला एम.फिल. पदवीसाठी सादर केलेला शोधनिबंध (२००९). एकूण सहा प्रकरणांत विभागला असून त्यांनी मार्क्स-आंबेडकर

समन्वयाच्या विषयावर डॉ. रावसाहेब कसबे ह्यांची मुलाखत घेतली आहे. त्यांच्या विचारांत मार्क्स-आंबेडकर समन्वय कुठे कुठे दिसतो ह्याबाबतचे परीक्षण नोंदविले आहे.[१९]

१५) पाटील शरद, 'मार्क्सवाद : फुले-आंबेडकरवाद' सुगावा प्रकाशन पुणे द्वारे १९९३ साली प्रकाशित केला. हा एक लेखांचा संग्रह असून मार्क्सवाद-फुलेवाद आणि आंबेडकरवाद ह्याबाबतची एक नवीन अन्वेषण पद्धतीची उभारणी केलेली आहे. कट्टर मार्क्सवादी व आंबेडकरवादी म्हणवून घेणाऱ्यांना ह्या ग्रंथातून योग्य मार्ग सापडतो. कामगार आणि शेतकरी वर्गात पडलेली फूट, जातींच्या एकजुटीची ही फक्त चळवळ आहे. मात्र कार्य नाही. वर्गीय एकजूट ही कालबाह्य ठरलेली आहे. ह्या सर्व पार्श्वभूमीवर मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ह्यात समन्वयासाठी वेगळी अन्वेषण पद्धती शोधण्यासाठी कॉ. शरद पाटील यांनी ह्या ग्रंथातून प्रयत्न केला आहे.[२०]

१६) परदेशी प्रतिमा यांनी 'डॉ. आंबेडकर आणि स्त्री मुक्ती' ही पुस्तिका लिहून दिग्नाग प्रकाशन पुणे ह्यांनी २००३ मध्ये प्रकाशित केली आहे. आंबेडकरवादाचे राजकारण करताना स्त्रीमुक्तीच्या प्रश्नावर कोणतीच भूमिका घेतली जात नाही. ज्या चळवळींनी स्त्री प्रश्न घेतला त्यांना पाश्चिमात्त्य पद्धतीला तोंड द्यावे लागले आहे. धार्मिक चौकट अडथळा ठरून डॉ. बाबासाहेबांचे स्त्रियांबाबतच्या विचारांचे चिंतन ह्या पुस्तिकेत केले आहे.[२१]

१७) कांबळे उत्तम ह्यांनी 'रावसाहेब कसबे ह्यांचे क्रांतिकारी चिंतन' हे पुस्तक लिहून सुगावा प्रकाशन पुणे, ह्यांनी प्रकाशित केले आहे. (२००६) हे पुस्तक म्हणजे मुलाखतीवर आधारित असून जातीच्या विळख्यात माणसाला अडकविणारी व्यवस्था इथल्या बहुतेकांना जखमी करते. अनेकविध प्रश्न विचारून डॉ. कसबेंचे मत, विचार जाणून घेण्याचा प्रयत्न लेखकांनी केला, त्यामध्ये जागतिक पातळीवरील प्रश्न, वैचारिक हेवेदावे, विचारप्रणालीतील विसंगती मार्क्स-आंबेडकरांच्या विचारांचा समन्वय अशा विविधांगी स्वरूपाची चर्चा केली आहे.[२२]

१८) कऱ्हाडे सदा ह्यांचे, 'मार्क्सवाद, बुद्धवाद आणि आंबेडकरवाद' हे पुस्तक लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद ह्यांनी २०१० मध्ये प्रकाशित केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या समाजपरिवर्तनाचा ढाचा व प्रेरणा काय होती. ती लढाई त्यांनी मानव मुक्तीसाठी, कशी वापरली, साम्यवाद आणि मार्क्सवादाला अभिप्रेत असलेली मानवी हक्कांची संकल्पना तसेच मार्क्सवादी विचारप्रणालीची कास न सोडता पोथी निष्ठतेतून मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी ह्यांना बाहेर काढण्यास ह्या ग्रंथाने मार्गदर्शन केले आहे. वर्गलढ्यातून कामगारांची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी मार्क्सला 'राजकीय क्रांती' तर दु:खाचे निर्मूलन करण्यासाठी बुद्धांना 'धार्मिक क्रांती' अभिप्रेत होती. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना 'सामाजिक क्रांती' अभिप्रेत होती, हा फरक लक्षात घ्यावा लागतो.[२३]

१९) चौसाळकर अशोक ह्यांनी 'मार्क्सवाद-उत्तरमार्क्सवाद' हे पुस्तक लिहिले. प्रतिमा प्रकाशन पुणे, ह्यांनी २०१० मध्ये सदरचे पुस्तक प्रकाशित केले. सदरच्या पुस्तकात मार्क्सवादी विचार नवमार्क्सवादी विचार आणि त्यांचे विश्लेषण केले आहे. भारतातील समाजवाद, स्वातंत्र्य, समता, भारतीय संस्कृती ह्या बाबतची मीमांसा केली आहे.[२४]

२०) पाटील शरद ह्यांनी 'प्रिमिटीव्ह कम्युनिझम, मातृसत्ता-स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद' हे पुस्तक लिहिले. मावळाई प्रकाशन शिरूर जि. पुणे ह्यांनी प्रकाशित केले. (२०१२) सदरच्या ग्रंथात तत्कालीन स्त्रीचे अधिकार, मातृसत्ताक पद्धत व ह्या पद्धतीतील सूक्ष्म अभ्यास लेखकाने मांडला. अस्पृश्यता व जातिव्यवस्था ह्या दोन्ही बाजू अविभाज्य आहे. जातिव्यवस्था नष्ट केली तरच अस्पृश्यता नष्ट होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या म्हणण्याचा अर्थ व विश्लेषण त्यांनी केले. जातिव्यवस्था, उदय, विकास व अंत याबाबत फुले-आंबेडकरवाद विश्लेषण त्यांनी केले आणि भांडवलवादी विकासाने जातिव्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल घडवून आणले. ह्या बाबतचे प्राचीन आणि

आधुनिक संदर्भ देऊन तसेच शासनाची आकडेवारी देऊन एक वेगळ्या पद्धतीची मांडणी केली.[२५]

२१) बनसोड भीमराव ह्यांनी 'मार्क्सवादी दृष्टीतून साम्राज्यवाद व जाती-व्यवस्था' हे पुस्तक लिहिले. सुगावा प्रक़ाशन ह्यांनी ते २०१२ मध्ये प्रकाशित केले. ह्या पुस्तकात जातिव्यवस्थेसंबंधीचा दृष्टिकोन व्यक्त केला आहे. जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठीचा योग्य मार्ग शोधण्याची आवश्यकता आहे. जातीचे प्रकटीकरण न करता हा प्रश्न सुटावा, वर्णव्यवस्थेच्या नंतरच जातिव्यवस्थेचा प्रश्न उभा राहिला. ब्रिटिशांच्या आगमनानंतर ह्यात प्रामुख्याने बदल झाला. जातिव्यवस्थेच्या विनाशासाठी उत्पादन संबंध बदलणे आवश्यक आहे. ह्यासाठी समाजाअंतर्गत शक्तींचा शोध घेणे आवश्यक आहे, इत्यादी संबंधीचा सविस्तर उल्लेख आढळतो.[२६]

२२) परदेशी प्रतिमा यांनी 'जात आणि स्त्री शोषण हिंदू कोडबील ते ऑनर फिलींग' ही पुस्तिका लिहिली व दिग्नाग प्रकाशन ह्यांनी ती प्रकशित केली. ह्या पुस्तिकेत लेखिकेने स्त्री-शोषणाच्या विविध मार्गांचा उल्लेख करून स्त्रियांच्या व्यक्तित्वावर, मनावर आणि शरीरावरही ताबा मिळविला. एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हिंसा व त्याची तीव्रता जनगणनेचा संदर्भ देऊन स्पष्ट केली. हिंदू कोड बीलच्या संघर्षापासून ते अगदी अलीकडे निर्माण झालेल्या ऑनर किलींगच्या प्रश्नांची सविस्तर चर्चा ह्या पुस्तिकेत करण्यात आली.[२७]

वरील अभ्यासकांनी मार्क्स व आंबेडकर ह्यांच्या विविध विचारांची चर्चा केली आहे. तसेच त्यांच्या समन्वयवादी विचारांची सैध्दांतिक पार्श्वभूमी तयार केली आहे. प्रस्तुत संशोधन विषयात मार्क्स-आंबेडकर समन्वयवादी विचारातून आजचे प्रश्न सोडविण्यासाठी कशी मदत होऊ शकते. म्हणून हे संशोधन इतरांनी केलेल्या संशोधनाचे पुढचे पाऊल आहे. हे ह्या संशोधनाचे वेगळेपण आहे.

**१.८ संशोधनाच्या मर्यादा :**

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या दोन्ही युगपुरुषांचे विचार वेगवेगळ्या दिशांना जाणारे आहेत. भारतात अगदी मोजके विचारवंत आहेत की, त्यांचे योगदान दलित चळवळींना लाभले आणि मार्क्सवादी चळवळींनाही लाभले. ह्यामध्ये डॉ. रावसाहेब कसबे, कॉ. शरद पाटील, कॉ. रणजित परदेशी, इत्यादीचा समावेश करता येईल. त्यांच्या वैचारिक मांडणीतून मार्क्स-आंबेडकर यांच्यातील दरी कमी करून समन्वय साधणारा मार्ग दिसला मार्क्सवाद आणि आंबेडकरवादाचा समान दुवा म्हणजे माणसाचा उत्कर्ष होय. दोन्ही विचारसरणीच्या मूलभूत तत्त्वाज्ञानात फरक आहे. त्यांचे उद्दिष्टे एक असून त्यांचे मार्ग वेगवेगळे आहेत.

भारतातील दलितांनी मार्क्सवादाबाबत आणि मार्क्सवाद्यांनी दलितांबाबत आपापले विचार घट्ट करून ठेवलेले आहेत. ह्या मर्यादेमुळे वैचारिक प्रगतीही कुंठित झाली आहे.भारतीय सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तन होऊन विचारवंत नेते, कार्यकर्ते तसेच समर्थक ह्यांना मार्गदर्शन करणारी पूर्णत: शुद्ध स्वरूपाची एकही विचारसरणी आज दिसून येत नाही आणि ज्या विचारसरणीचे अस्तित्व आहे. त्यांना अनुयायी चांगले मिळाले नाही ते आपापल्या विचारसरणींचे पक्के समर्थक नाहीत. ह्यामुळे निवडणुकीसारख्या प्रसंगी आपला मूळचा विचार सोडून अगदी विरुद्ध विचारसरणीच्या राजकीय पक्षात सामील होण्याचे प्रमाण अलीकडे वाढत चालले आहे. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ह्या दोन्ही बाबतीत हीच स्थिती दिसून येते. त्यामुळे ह्या मर्यादेचा विचार करावाच लागतो.

सामाजिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी फक्त एक आणि एकच विचारसरणी स्वीकारली तर समस्या सुटण्याऐवजी गुंतागुंत अधिक होत जाईल. समाजहिताबाबत शंका निर्माण होते. मार्क्सवादी तत्त्वज्ञान वर्ग आर्थिक घटक इत्यादींचा विचार करते, आंबेडकरवादी तत्त्वज्ञान जात आणि सामाजिक घटकांचा अभ्यास करते. भारतात सामाजिक समस्या सोडविताना ह्या दोन्ही तत्त्वज्ञानांना हार मानावी लागली आहे.

मार्क्स आंबेडकर ह्यांच्या विचारांचा समन्वय साधून ह्यातून तिसरा विचार निर्माण होतो. तिसरा विचार हाच समन्वयवाद होय. समाज समन्वयी विचारांचा पाईक झाला तर हा समाज आंबेडकरवादीही राहणार नाही आणि मार्क्सवादी राहणार नाही तो समान फक्त समन्वयवादी राहील आणि याद्वारे झालेली क्रांती शाश्वत राहील. ज्या विचारवंतांनी समन्वयवादाचे आव्हान स्वीकारले त्यांनी व्यवहारात त्यांचे काय पडसाद उमटतील, ह्याबाबत चिंतन पुरेसे केलेले नाही. ही ह्या संशोधनाची मर्यादा आहे.

**१.९प्रकरणात्मक मांडणी :**

मार्क्स-आंबेडकर समन्वयवाद आणि समकालीन राजकारण (विशेष संदर्भ : जातिव्यवस्था, स्त्रीप्रश्न, रोजगार आणि शिक्षण) या संशोधन विषयाची सात प्रकरणांमध्ये मांडणी केली आहे. त्यांची चर्चा सारांश रूपाने खालीलप्रमाणे :

**प्रकरण पहिले : 'संशोधन पद्धती'**

ह्या प्रकरणातसंशोधन विषयासंबंधी प्रस्तावना, विषयाची निवड, संशोधन विषयाचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, संशोधन पद्धती व प्रकार, सैद्धांतिक पार्श्वभूमी,संशोधन साहित्याचा आढावा, संशोधनाच्या मर्यादा आणि समस्या शेवटी प्रकरणात्मक मांडणी ह्याबाबतचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे.

मार्क्स व आंबेडकर ह्या महामानवांच्या समकालीन समस्यांचा विचार केल्यास वर्ग आणि जात, आर्थिक व सामाजिक समस्यांची शृंखलाच दिसून येते. त्यांच्या काळातील समस्या सद्यस्थितीत सुद्धा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात प्रचंड खळबळ निर्माण करत आहेत. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने विचारसरणींची निर्मिती झाली आणि वर्ग, जाती, बद्दलच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न झाला. परंतु दोन्हीही विचारसरणी सामाजिक समस्या सोडविण्यात अयशस्वी झाल्या आहेत. समाज विकासाच्या प्रक्रियेत ह्या दोन्ही

विचारसरणीतील काही तत्त्वज्ञान एकत्र केले तर नक्कीच उपाय ठरू शकेल व दोन्ही विचारसरणींमधून निर्माण झालेला समन्वयी विचार हा स्वतंत्र असून जी व्यक्ती समन्वयी असेल तो मार्क्सवादीही राहणार नाही आणि आंबेडकरवादीही असणार नाही.

प्रस्तूत प्रबंधामध्ये जातिव्यवस्था, स्त्री-प्रश्न, रोजगार आणि शिक्षण ह्या प्रश्नांचा विचार केला आहे. नवआर्थिक धोरणांचा परिणाम होऊन ह्या आणि इतर अनेक समस्यांचे स्वरूप बदलून गेले मात्र फक्त मार्क्सवाद अथवा फक्त आंबेडकरवाद ह्या समस्यांचे निराकरण करू शकत नाही. दोन्ही विचारांचा समन्वय साधून सदरच्या सामाजिक समस्या सोडविता येतील ही सैद्धांतिक पार्श्वभूमी गृहित धरून संशोधनाची उद्दिष्टे व गृहीतक े निश्चित केली आहेत. संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोत वापरले आहेत. अधिकृत वेबसाईटचा वापरही केला असून समन्वयी विचारांबाबत संशोधन साहित्याची उपलब्धता व समन्वयी विचारांचे पुरस्कर्ते फारच थोडे विचारवंत आहेत.

मार्क्सवादाला भारतात प्रस्तुत होण्यासाठी जातींचा विचार करावाच लागेल आणि आंबेडकरवादाला वैश्विक पातळीवर सिद्धता मिळण्यासाठी वर्गाचा विचार करावाच लागेल. समन्वयवादात मात्र एकत्रित ह्या दोन्ही संकल्पनांचा विचार केला आहे व हाच मार्क्स-आंबेडकरांचा वैचारिक समन्वयी विचार वर्ग, जाती, स्त्री-प्रश्न, श्रमिक आणि शैक्षणिक इत्यादी समस्यांवर उपाय ठरला आहे. ह्यासाठी पहिल्या प्रकरणात तांत्रिक मांडणी केली आहे.

**प्रकरण दुसरे :'मार्क्स-आंबेडकर समन्वयाचा आढावा व समकालीन राजकारणातील समस्या'**

ह्या प्रकरणात समन्वयाचा अर्थ व स्वरूप, मार्क्स-आंबेडकर समन्वयाची पार्श्वभूमी, भगवान गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स, कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारांचा समन्वय, समकालीन राजकारणातील समस्या इत्यादी मुद्यांची सविस्तर चर्चा केलेली आहे.

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारांना प्रमाण मानून दोन वेगवेगळ्या विचारसरणींची निर्मिती झाली आहे. ह्या दोन्ही विचारसरणी एकमेकांच्या जवळ

येणाऱ्या नाहीत. समकालीन तसेच सद्यकालीन सामाजिक स्थिती पाहता ह्या विचारांचे समर्थक आपापल्या भूमिकेशी कट्टर किंवा एकसंध नाहीत. ह्या प्रकरणात केले आहे. दोन्ही विचारांचा समन्वय साधून दोन्हींमधून तिसरी व वेगळी अशी विचारसरणी निर्माण होते व ती सामाजिक समस्यांची सोडवणूक करते. समन्वयवादाचा शास्त्रीय अर्थ सांगितला असून समन्वयाची पार्श्वभूमी सांगितली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे गौतम बुद्धांच्या विचारांचे अनुयायी असल्याने बौद्ध धर्म आणि मार्क्सचे तत्त्वज्ञान ह्यामध्ये नेमका फरक काय आहे. तसेच कोणकोणत्या बाबतीत तफावत दिसून येते. समकालीन राजकारणात कोणकोणत्या समस्या परिणामकारक ठरत आहेत. त्या समस्या समन्वयाच्या मार्गाने कशा सुटू शकतील, ह्याबाबत सविस्तर विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात केलेले आहे.

**प्रकरण तिसरे :'मार्क्स-आंबेडकर समन्वय आणि जातिव्यवस्थेची चिकित्सा'**

ह्या प्रकरणात जातिव्यवस्था ह्या संकल्पनेबाबत सविस्तर चर्चा केली आहे. सामंतप्रथाक समाजव्यवस्थेतून जातिव्यवस्था कशी दृढ झाली. वर्णव्यवस्था, व्यवसायावरून जातिनिर्मिती ब्रिटीशकाळ, स्वातंत्र्योत्तर काळ, सद्यकालीन परिस्थिती इ. मुद्दे सविस्तर मांडले आहेत. ब्रिटिश काळात भारतातील जातिव्यवस्था मोडून काढण्यासाठी काही समाजसुधारक पुढे आले. ब्रिटिश काळ जाती मोडण्यास अनुकूल होता. स्वातंत्र्योत्तर काळात जाती प्रश्नाला अपेक्षेपेक्षा जास्त महत्त्व प्राप्त झाले आणि एकाच जातीत अनेक वर्गांची निर्मिती झाली. भारताने १९९० नंतर नव्या आर्थिक धोरणांचा स्वीकार केल्याने कनिष्ठ जातींनाच जास्त फटका बसला. भांडवली अर्थव्यवस्थेने ग्रामीण भागातील बहुजन जातींचा विचारच केला नाही. मध्यंतरी मिश्र अर्थव्यवस्थेमुळे भांडवलदार अधिक सबळ झाले व उच्चजातींकडेच नेतृत्त्व गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समकालीन स्थितीतून जातीयता संपविण्यासाठी विविध उपाय सांगितले मात्र औद्योगिक क्रांतीमुळे खेडी ओस पडली शहरात आलेला कामगार कारखानदारांकडून पिळला जाऊ लागला, समाज गरीब-श्रीमंत गटात विभागला गेला. भारतातील काही जाती सत्ताधारी

बनल्या कनिष्ठ जाती मजूर व दरिद्री बनल्या. भारतातील कामगाराला जातही असते,ह्याबाबत कार्ल मार्क्सने मात्र विचार केला नाही.

गरिबी नष्ट करण्यासाठी उत्पादनाची मालकी राज्याकडे असावी, असे तत्त्वज्ञान मांडले मात्र इथल्या जाती नष्ट करण्यासाठी कोणताही उपाय कार्ल मार्क्सने सांगितला नाही. कार्लमार्क्सची अन्वेषण पद्धती आणि भारतीय समाजव्यवस्था ह्याबाबत सखोल चिंतन केले आहे. जातिव्यवस्थेबद्दल मार्क्स-आंबेडकरी विचारांचा संदर्भ घेतला आहे. कार्ल मार्क्सने भारताच्या बाबत दिलेल्या संदर्भात पाया आणि इमला ह्यात गल्लत केली आहे. भारतात उत्पादन प्रक्रियेतही जात गुंतलेली आहे. हे विसरून चालणार नाही. भारतीय समाज जातीबरोबरच वर्गावरही आधारित आले. म्हणून समन्वय वादी विचार उपयुक्त आहे. मार्क्स-आंबेडकर समन्वयवादी विचार कर्मठ कम्युनिस्टांना आणि सनातनी दलितांना न पटणारा आहे. भारतीय राजकीय पक्ष आणि सामाजिक चळवळींचा पाया ह्याच कारणामुळे डळमळीत झाला आहे. त्यांच्यात सामाजिक व आर्थिक आव्हाने पेलण्याची ताकद राहिली नाही.जातिव्यवस्थेसारख्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी मार्क्स-आंबेडकरांच्या विचारांचा आधार घ्यावा लागतो.

**प्रकरण चौथे:'मार्क्स-आंबेडकर समन्वयी पेरिप्रेक्ष्यातून स्त्री-प्रश्नांची चिकित्सा'**

ह्या प्रकरणात स्त्री समस्यांचे स्वरूप, मार्क्सवादी दृष्टिकोन आणि स्त्री, आंबेडकरवाद आणि स्त्री, समकालीन स्त्रीप्रश्न आणि भारतीय समाजव्यवस्था, समन्वयी परिप्रेक्ष्यातून स्त्री प्रश्नांची चिकित्सा, भारतीय स्त्री आणि समन्वयी विचार ह्या मुद्यांची चिकित्सा केली आहे.

राजकारणात स्त्रियांचा वापर हा स्वार्थासाठी करून घेतला जातो. परिणामी त्यांच्या समस्या कमी होण्याऐवजी कालानुक्रमे वाढतच चालल्या आहेत. ह्यावरून ब्राह्मणशाही, भांडवलशाही आणि पुरुषसत्ता ह्या तीन शोषण करणाऱ्या संस्था किती प्रभावी ठरत आहेत, व मनुस्मृती सारख्या संहिता समाजातील अर्धशक्तीस कशा घातक ठरत आहेत, हे लक्षात येते.

प्राचीन भारतीय व्यवस्थेत अनार्य व काळ्या स्त्रियांची विटंबना होत असे. ऋग्वेदातील दानसुक्ती सुक्तानुसार वधू म्हणजे बळजबरीने नेली जाणारी स्त्री दासी असा अर्थ होय. स्त्री फक्त रखेल व उपभोगासाठी असेल असा उल्लेख सापडतो. बौद्धकाळात स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार होता. त्यांना निर्भयपणे चर्चा करण्याचा अधिकार थेरीगाथेत आहे. महाभारताच्या समकाळात मातृप्रधान कुटुंब होते. नंतरच्या काळात एकपती पत्नी पद्धतीचा स्वीकार झाल्याने अखिल पुरुषजातीला दु:ख झाले, ह्याबाबतचे पुरावे पहावयास मिळतात. देवदासी संस्था धार्मिक संदर्भ देताना पुरुष देवांच्या अस्तित्वाला प्राधान्य देणे, ह्यातून एक नवी अन्वेषण पद्धती अस्तित्वात आली.

पुरुषसत्ताक पद्धतीमध्ये स्त्रियांचे स्थान नेहमीच दुय्यम राहिले आहे. स्त्रियांचा स्वतंत्र गट असून त्यांचे प्रश्न स्वतंत्रपणे त्यांनी सोडवावेत ह्यातून स्त्रियांबाबतचा सम्यक विचार मागे पडतो. स्त्रियांना अनेक भूमिकांतून जावे लागते. स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी पुरुषाऐवजी स्त्रियाच पुढे आल्या आहेत,इत्यादीबाबतची चर्चा ह्या प्रकरणात केली आहे.

जगात शोषण व पिळवणूक आहे, हा सिद्धांत मांडताना कार्ल मार्क्स स्त्री शोषणाला आणि पिळवणुकीला प्राधान्य देत नाही. उलट स्त्री सुद्धा कामगार असू शकते,ह्या कल्पनेपलीकडचे लिखाण त्यांनी केले. त्यांच्या विचारांमध्ये फक्त पुरुषांचाच विचार आहे. स्त्री कामगार आणि पुरुष कामगार असा विचार मार्क्सने केला नाही. आंबेडकरवादाने मात्र नवनिर्मितीची सिद्धता फक्त स्त्री वर्गाला असते. तिची योग्यता, प्रतिष्ठा, प्रभाव आणि स्त्रियांची क्षमता ह्या सर्वांगीण अभ्यासाचा उल्लेख व कृती केली आहे.

सामाजिकदृष्ट्या उन्नतीसाठी भारतात कोणतीही एक विचारसरणी अपुरी पडत आहे. मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांमुळे स्वातंत्र्य, समता, आत्मविकास, तसेच स्त्रियांना मानवी जीवनाची

सर्व अंगे प्राप्त करून घेता येतात. समन्वयवाद औद्योगिकरणानंतर महिलांचे प्रश्न आपोआप सुटतील ह्या कार्लमार्क्सच्या विचाराला विरोध करतो.

**प्रकरण पाचवे :'मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांच्या दृष्टिकोनातून रोजगार विषयक प्रश्नांची चर्चा'**

ह्या प्रकरणात रोजगार संकल्पना आणि पार्श्वभूमी, युरोपीय व भारतीय रोजगार स्थितीची चर्चा, मार्क्सवाद आणि रोजगार, कार्ल मार्क्सने श्रमिकांच्या शोषणाबद्दल केलेली मांडणी व विश्लेषण, आंबेडकरवाद आणि रोजगार, मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांच्या दृष्टिकोनातून रोजगार विषयक प्रश्नांची चर्चा इत्यादी मुद्यांच्या आधारे चर्चा केली आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये रोजगार हा शब्द श्रमिक ह्या अर्थाने वापरला आहे. मार्क्सवादी विचाराने कामगार क्रांतीचा सिद्धांत मांडताना स्त्री वर्गाला गृहीत धरले आहे. स्त्री वर्गाचा स्वतंत्रपणे विचार केला नाही. आंबेडकरवादाने कामगारांमधील लिंगभावाचा विचार केला आहे. कामगारांमधील श्रमविभागणी जातिआधारावर कशी होते म्हणजेच माणूस ज्या ज्या कारणांमुळे विभागाला त्या सर्व बाबींचा समावेश केला.

युरोपीय व भारतीय कामगार स्थिती, नववसाहतवादी धोरण, मजुरांचे अस्तित्व, वर्ग व्यवस्थेचे स्थान याबरोबरच श्रमिकांच्या शोषणाबद्दल कार्ल मार्क्सने केलेली मांडणी, आंबेडकरवादाने श्रमिकांच्या समस्यांमध्ये कष्टकरी वर्गाचे ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही कसे शत्रू आहेत ह्याचे स्पष्टीकरण दिले आहे. डॉ. आंबेडकरांनी जातीयता व अस्पृश्यतेचा संदर्भ गुलामगिरीशी जोडला. कामगारशाहीचा आधार लोकशाहीच असावा हा विचार मांडून सामाजिक न्यायाच्या दृष्टीने कामगार वर्गाकडे पाहिले. स्त्री कामागरांच्या उद्धाराची र्चा आंबेडकरवादाने केली.

थोडक्यात, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतात कामगारांचे विभाजन केले आहे आर्थिक लढ्याबरोबर जातीचे लढे जोपर्यंत लढले जाणार नाही तोपर्यंत परिवर्तन होणारच नाही आणि

सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिवर्तनासाठी मार्क्स-आंबेडकर समन्वयवाद प्रभावी साधन ठरतो.

**प्रकरण सहावे :'मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांच्या परिप्रेक्ष्यातून शिक्षणविषयक प्रश्नांची चिकित्सा'**

ह्या प्रकरणामध्ये शिक्षणाचे महत्त्व, पारंपरिक व भारतीय शिक्षण, कार्ल मार्क्स आणि शिक्षण, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन, मार्क्स-आंबेडकर समन्वयवादी विचार आणि शिक्षणविषयक समस्यांची चर्चा ह्या मुद्यांच्या आधारे केलेली आहे.

ह्या प्रकरणात शिक्षणविषयक प्रश्नांची चिकित्सा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन, शिक्षणातून मिळणाऱ्या ज्ञानाचा उपयोग समाजाच्या भवितव्यासाठी कसा होऊ शकतो, ह्याविषयीच्या धोरणांची चर्चा आणि भवितव्य ह्याबाबतचे विश्लेषण केले. सामाजिक न्यायाची जाणीव शिक्षणामुळे येऊ शकते. भारतीय चातुवर्ण्य परंपरेत शिक्षण हे ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी होती. स्त्रियांना तर शिक्षणाची सर्व क्षेत्रे बंदच होती. ह्या सर्व परिस्थितीचा भारतीय समाजव्यवस्थेवर कसा परिणाम झाला आणि ह्यातून कोणकोणत्या प्रश्नांची शृंखला पुढे आली, ह्याबाबतचे चिंतन केले.

कार्ल मार्क्सने कामगारांनी फक्त उत्पादनाचे काम करावे, त्यांची प्रगती होण्यासाठी ज्ञान आत्मसात करावे का? याबाबतचे स्पष्ट उल्लेख जरी दिसून येत नसले तरीही 'नाहीरे' वर्गाला ज्ञान मिळाले तर आजच्या काळातील अनेक समस्या सुटू शकतील. माणसाच्या मूलभूत गरजा पूर्ण होण्यासाठी शिक्षण ही अत्यंत महत्त्वाची बाब आहे. भारतीय माणसापासून जात वेगळी होत नाही, त्याची कारणमीमांसा आपणास शिक्षणामध्ये दिसून येते. शिक्षण हे परिवर्तनाचे अत्यंत प्रभावी साधन आहे. सद्यस्थितीत भांडवलशाही व्यवस्थेत समाजातील प्रत्येक घटकाला शिक्षण,

ज्ञान मिळाले तर माणसाची सर्वांगीण प्रगती होईल. याबाबतचे सविस्तर चिंतन सदरच्या प्रकरणामध्ये केलेले आहे.

**प्रकरण सातवे : 'निष्कर्ष व शिफारशी'**

ह्या प्रकरणाच्या प्रस्तावनेत मार्क्स-आंबेडकर समन्वयवाद व त्याबाबत विविध संशोधक, अभ्यासकांनी केलेल्या मांडणीचा सारांश स्पष्ट केला आहे. तसेच संशोधनामध्ये निश्चित केलेल्यागृहीतकांची पडताळणी केलेली आहे. संशोधन प्रबंधात विषयाशी केलेली मांडणी व विश्लेषणात निघालेले प्रमुख निष्कर्ष मांडले आहेत. तसेच आजच्या शोषित वर्गाचे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या शिफारशी सुचविल्या आहेत.

**संदर्भटीपा:**


१. कसबे रावसाहेब, 'आंबेडकर आणि मार्क्स', सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६, पृ.क्र. ३५८

२. उ.नि.सा., पृ.क्र. २८४

३. ढमाले किशोर ह्यांचेबरोबर प्रत्यक्ष झालेली चर्चा.

४. जगताप संजय, श्रीकांत, दलित समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय स्थितीचा अभ्यास (संदर्भ : पुणे शहरातील दलितांच्या स्थितीचा अभ्यास), अप्रकाशित, पीएच.डी. प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, एप्रिल २०१०.

५. सांकृत्यायन राहूल आणि इतर लेखकांनी लिहिलेले 'बुद्ध विचार : मार्क्सवादी दृष्टिक्षेप', लोकवाङ्मयगृह मुंबई, चौथी आवृत्ती, २०११

६. कसबे रावसाहेब, उ.नि.सा..

७. मुरूगकर लता, 'दलित पँथर चळवळ', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९५, पृ.क्र. २२-२३

८. कारखानीस सरला, (अनु.) 'मार्क्सवाद म्हणजे काय?', लोकवाङ्मय गृह मुंबई, जून २०११, १२ आ. पृ.क्र. २१

९. उ.नि.सा., १२ आ. पृ.क्र. ३६

१०. परदेशी प्रतिमा, 'योद्धा जनसत्याग्रही दादासाहेब गायकवाड', दिग्नाग प्रकाशन, पुणे, २००२, पृ.क्र. ७

११. मोरे दिनेश, 'मनुवाद्यांना घटना का बदलावी वाटते?', सुमेध प्रकाशन, बारामती, प्र.आ., २००१, पृ.क्र. ३०-४६

१२. डोळस अविनाश, 'आंबेडकरी चळवळ परिवर्तनाचे संदर्भ', सुगावा प्रकाशन, पुणे १९९५, पृ.क्र. ४१, ५५ आणि ७७

१३. सुमंत यशवंत (संपा.) पुंडे, 'महाराष्ट्रातील जाती संस्थाविषयक विचार', प्रतिमा प्रकाशन पुणे, २००६, पृ. क्र. १७५ व ३१९

१४. सुमंत यशवंत आणि पुंडे द.दि., 'महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार', प्रतिमा प्रकाशन पुणे, १९८८, पृ.क्र. १५६

१५. शिंदे गौतम,'बुद्ध की कार्ल मार्क्स', सुगावा प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती २००२, पृ.क्र.८

१६. रणसुभे विलास, 'जात-वर्ग व परिवर्तनाचा लढा', लोकवाङ्मय गृह मुंबई, २००८, पृ.क्र. ७४-७५

१७. गायकवाड सुधाकर, 'डॉ. रावसाहेब कसबे एक मूल्यमापन', सुमेध प्रकाशन, पुणे, २००७, पृ.क्र. ५

१८. कसबे रावसाहेब,'शिक्षणाची आव्हाने',सुगावा प्रकाशन पुणे, २००२, पृ.क्र. ४-५

१९. गायकवाड संजय,'डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स-आंबेडकरांचा वैचारिक समन्वय'अप्रकाशित, एम.फिल. प्रबंध २००९

२०. पाटील शरद,'मार्क्सवाद:फुले-आंबेडकरवाद', सुगावा प्रकाशन पुणे, १९९३, पृ.क्र. १८८

२१. परदेशी प्रतिमा,'डॉ- आंबेडकर आणि स्त्री मुक्ती', दिग्नाग प्रकाशन पुणे, २००३, पृ.क्र. २२

२२. कांबळे उत्तम, 'रावसाहेब कसबे यांचे क्रांतिकारी चिंतन', सुगावा प्रकाशन पुणे,२००६, पृ.क्र. २४ - २५

२३. कऱ्हाडे सदा, 'मार्क्सवाद, बुद्धवाद आणि आंबेडकरवाद', लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, २०१०

२४. चौसाळकर अशोक, 'मार्क्सवाद-उत्तरमार्क्सवाद', प्रतिमा प्रकाशन पुणे, २००८,पृ. क्र. ४८

२५. पाटील शरद, 'प्रिमिटीव्ह कम्युनिझम, मातृसत्ता-स्त्रीसत्ता आणि भारतीय समाजवाद' मावळाई प्रकाशन शिरूर जि. पुणे,२०१२, पृ.क्र. ७

२६. बनसोड भीमराव,‘मार्क्सवादी दृष्टीतून साम्राज्यवाद व जाती-व्यवस्था’, सुगावा प्रक़ाशन, पुणे,२०१२

२७. परदेशी प्रतिमा,‘जात आणि स्त्री शोषण हिंदू कोडबील ते ऑनर फिलींग’,दिग्नाग प्रकाशन, पुणे, २०१३, पृ.क्र. १३

प्रकरण दुसरे

# मार्क्स-आंबेडकर समन्वयाचा आढावा व समकालीन राजकारणातील समस्या

२.० प्रस्तावना

२.१ समन्वय : अर्थ, व्याख्या व स्वरूप

२.२ मार्क्स - आंबेडकर समन्वयाची पार्श्वभूमी

२.३ भगवान गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स

२.४ कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारांचा समन्वय

२.५ समकालीन राजकारणातील समस्या

प्रकरण दुसरे

# मार्क्स-आंबेडकर समन्वयाचा आढावा व समकालीन राजकारणातील समस्या

## २.० प्रस्तावना

प्रत्येक नवीनशतकात नवनवीन कालसुसंगत विचार जन्माला येतात.नवीन आणि जुन्या पिढींच्या विचारांच्या संघर्षातच त्यातून नवीन विचार पुढे येतो. आज अनेक विचारवंतांच्या विचारांना आणि तत्त्वज्ञानाला आधारभूत मानून अनेक नवनवीन विचारांचा जन्म झाल्याचे दिसते. समकालीन राजकारणाचा अभ्यास करताना व प्रत्यक्ष चळवळीमध्ये काम करताना आपणास असे लक्षात येतेकी, ह्या विचारसरणीचा आजपूर्णत: शुद्ध स्वरूपात अभ्यास दिसून येत नाही. विचारसरणीची अंमलबजावणी शुद्ध स्वरूपात होणे अवघड असल्यामुळेच त्यावर कार्यक्षेत्रात, राजकारणात आणि समाजकारणात प्रत्यक्ष वावरणाऱ्या कार्यकर्त्यांनी, राजकारणी नेतृत्वांनी, तसेच चळवळीतील सैनिकांनी मात्र उपाय शोधून काढला आहे, तो उपाय म्हणजे वेगवेगळ्या विचारसरणींमध्ये फायद्याची चांगली आणि सामाजिक समस्या सोडविता येणाऱ्या तत्त्वांची सांगड घालून समस्यांचे निराकरण करणे होय.

समकालीन राजकारण आणि समाजकारणात आंबेडकरवादी आणि मार्क्सवादी तत्त्वज्ञान व चळवळींबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स ह्या दोन्ही महापुरुषांना प्रमाण मानून परस्परांपासून दोन प्रवाह निर्माण झालेले आहेत. दोन वेगवेगळ्या चळवळी निर्माण झालेल्या आहेत. ह्या दोन्ही चळवळींची उद्दिष्टे समान आहेत. मात्र त्यांचे मार्ग भिन्न आहेत.ह्या दोन्ही चळवळी आपापल्या विचारसरणींशी कट्टर नाहीत. कडव्या

नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारांना अनुयायी, प्रचारक मिळाले, त्यांनी स्वत:ला आंबेडकरवादी म्हणवून घेतले. मार्क्सवादाच्या बाबतीतही फारसे वेगळे नाही.[१] मार्क्सवादाला आंधळे प्रचारक व समर्थक मिळाले व त्यांनी आपल्याला मार्क्सवादी म्हणवून घेतले म्हणून असे म्हटले गेले की, तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात एखाद्या विचारसरणीला जर आंधळे प्रचारक व समर्थक मिळाले तर तो त्या संबधित विचारप्रणालाच नव्हे तर अखिल मानव जातीलाच तो धोका ठरतो.

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या दोन्हीही विभूती फक्त विचारवंत नव्हत्या तर प्रत्यक्षात ते चळवळींचे निर्मातेही होते. तसेच ते दोन्हीही समाजसुधारक असून समकालीन युगात देखील समाजमनात कायमचे स्थान करून राहिले आहेत. दोघांमुळेही समाजात राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात क्रांती झालेली आहे. दोघांच्याही बाबतीत असे दिसून येते की, दोघेही आपापल्या विचारांचे पक्के समर्थक आहेत. दोघांच्याही विचारांवर आधारित काही संघटना, दबावगटव राजकीय पक्षांची निर्मिती झाली आहे. दोन्ही विचारवंत वेगवेगळ्या मार्गाने जाणारे असल्याने तसेच विचारप्रणाली विषयी राजकारण व समाजकारणात शुद्धता न राहिल्यामुळे कार्यकर्ते, सुधारक, नेते, अनुयायी, प्रचारक, समर्थक व मार्गदर्शक दिशाहीन झालेले आहेत. अशा काळात मार्क्स-आंबेडकरांच्या समन्वयाचा विचार मांडण्याचा महाराष्ट्रातील थोर विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी अत्यंत धाडसी प्रयत्न केला. १९८५ मध्ये त्यांनी‘आंबेडकर आणि मार्क्स’ हा ग्रंथ लिहिला. सामाजिक उत्थानाच्या काळात आंबेडकरी दलितांचा कम्युनिस्ट विरोधाचा काळ तसेच वैचारिकतेबरोबरच मानसिक बदलाचा तो काळ होता. अशा काळात डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी समन्वयी विचार मांडण्याचा धाडसी प्रयत्न केला. त्यांच्या मते डावी आणि दलित चळवळ ह्यांनी एकमेकांना आपले शत्रू न मानता दोघांनी एकमेकांच्या सहकार्याने आपापले सामर्थ्य विस्तारावे म्हणजे भारतातील सामाजिक व राजकीय जीवनात क्रांतिकारक परिवर्तन घडून येईल.ह्यावरून हे स्पष्ट होते की, डॉ. रावसाहेब कसबे हे साम्यवादाचे तत्त्वज्ञ आहेत.[२] कॉम्रेड शरद पाटील ह्यांनी डॉ. रावसाहेब कसबे यांना आपले

वैचारिक गुरू मानले आहे. डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी जो समन्वयी विचार मांडला, त्याला सैद्धांतिक मांडणीत साचेबंद करण्याचे काम कॉ. शरद पाटील यांनी केले आहे.[३] आज भांडवलशाहीने नवे रूप धारण केले आहे. राजकीय व्यवस्थेवरही आक्रमण केले आहे. भांडवलशाहीच्या आक्रमक पावित्र्यामुळे साम्यवादी व्यवस्था विकलांग होत चालली आहे. ह्याबरोबरच बौद्ध धर्म ऱ्हास पावत चालला आहे. ह्या दोन्ही परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी आज नव्या चिंतनाची आवश्यकता आहे. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ह्याबाबत संयुक्तिक पद्धतीने विचार करून समन्वयी तत्त्वज्ञान मांडणारे विचारवंत महाराष्ट्रामध्ये अगदी मोजकेच आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्लमार्क्स ह्या दोन्हीही महापुरुषांना प्रमाण मानून परस्परांपासून वेगवेगळे दोन विचारप्रवाह निर्माण झालेले आहेत. आज भारतीय समाजजीवनाचा अभ्यास व चिंतन केले तर अस्पृश्यता, वर्णव्यवस्था, स्त्रियांचे सामाजिक स्थान, रोजगार, जातिव्यवस्था इत्यादींचा कळीचे प्रश्न म्हणून अभ्यास करावा लागतो. जागतिकीकरणात हे सर्व प्रश्न गंभीर बनले आहेत. ते सोडविण्यासाठी भांडवलशाही व्यवस्थेत भांडवलदार व श्रीमंत वर्ग आपल्या संपत्तीच्या जोरावर श्रमिक वर्गाची पिळवणूक करतो. परिणामी सामान्य श्रमिक माणूस दु:खी आणि दरिद्री होतो. कार्लमार्क्स ह्या परिस्थितीला पिळवणूक म्हणतो. पिळवणुकीतून बाहेर येण्यासाठी मार्क्स खासगी संपत्ती असूच नये, हा उपाय सुचवितात. अतिरिक्त मूल्यावर फक्त श्रीमंताचीच मालकी न राहता ते सर्वांच्या मालकीचे असले पाहिजे आणि हे होण्यासाठी राज्याची मालकी कामगार वर्गाकडे असावी.[४] कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा हा आरंभबिंदू मानला जातो. भगवान गौतम बुद्धांनी देखील ह्या जगात दु:ख आहे असे मान्य केले आहे. परंतु त्यांनी पिळवणूक हा शब्द वापरला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या तत्त्वज्ञानातून पिळवणूक म्हणजेच दु:ख आहे, हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे व बुद्धांचा कालानुषंगिक एक नवा अर्थ, एक नवे समर्थ विश्लेषण मांडण्याची गरज त्यांना वाटत होती. ह्या गरजेतून पुढे "बुद्ध आणि त्यांचा धम्म" चा जन्म झाला, असे म्हटले जाते.

## २.१ समन्वय : अर्थ,व्याख्या व स्वरूप :

दोन वेगवेगळ्या विचारसरणींमधून काही घटकांचे एकत्रीकरण करून, त्यातील अनेक घटकांची गोळाबेरीज केली म्हणजे समन्वय साधला आणि नवविचारसरणीची निर्मिती केली. एवढा संकुचित अर्थ समन्वयी विचारांचा नाही. समन्वयी विचारसरणी ही संकल्पना अगदी अलीकडच्या काळातील असल्याने समाज जीवन जगण्याच्या पार्श्वभूमीतून व सामाजिक गरजेतून समन्वयी विचार पुढे आला आहे. आजही उदयोन्मुख विचारवंत, कार्यकर्ते आपापल्या परीने समन्वयाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करत आहेत.

- **ज्येष्ठ विचारवंत म. पू. रेगे ह्यांच्या मते...**

‘‘मूळच्याच विचारसरणीतून निवडलेला घटक एका वेगळ्या, एकात्म विचारसरणीत जेव्हा सुसंगतपणे नांदू लागतो आणि तिच्यात सहभागी होतो. तेव्हा हे साधण्यासाठी त्याच्या मूळ आशयाला एवढी भूरळ घालावी लागलेली असते की ते त्याचे मूळचे स्वरूप जवळजवळ हरवून गेलेले असते.’’(फेब्रुवारी १९८०, नवभारताच्या संपादकीयमध्ये केलेले मे.पू. रेगे ह्यांचे लिखाण)

- **डॉ. रावसाहेब कसबे :**

‘‘जातिअंतासाठी प्रयत्न करणारी दलित चळवळ आणि दारिद्र्याचा अंत करणारी मार्क्सवादी चळवळ एकमेकांच्या जवळ येऊन जाती आणि वर्ग नष्ट करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करतात तेव्हा ह्या परिस्थितीतून जो विचार पुढे येतो त्याला समन्वयी विचार म्हणता येईल.’’(दि. २० मार्च २००९ रोजी डॉ. रावसाहेब कसबे ह्यांची घेतलेली मुलाखत)

➢ **कॉ. किशोर ढमाले :**

"दलित चळवळ आणि कम्युनिस्ट चळवळ तात्त्विक आणि व्यावहारिक बाबतीत जात आणि वर्ग यावर मार्ग काढण्यासाठी जेव्हा व्यामिश्र भूमिका घेतात ह्यातून जो विचार पुढे येतो तो समन्वयी विचार होय." (दि. २८/३/२००९ रोजी घेतलेल्या मुलाखतीवरून)

➢ **कॉ. रणजित परदेशी**

"जाती-वर्गाचे प्रश्न एकत्रित अभ्यासणारी विचारसरणी म्हणजे समन्वयवादी विचारसरणी होय."(दि. ९/३/२००९ रोजी कॉ. रणजित परदेशी ह्यांची घेतलेली मुलाखत)

पारंपरिक सामाजिक व्यवस्थेत परिवर्तन करण्यासाठी आणि जात वर्गाचे प्रश्न सोडविण्यासाठी केवळ मार्क्सवादी अथवा केवळ आंबेडकरवादी पद्धती उपयोगात आणून चालणार नाही. समकालीन व सद्यकालीन स्थितीतील विविध समस्यांबरोबर जातिव्यवस्था, स्त्री-प्रश्न, रोजगार आणि शिक्षण ह्यासारख्या समस्यांचे चिंतन करून भारतीय समाज व राजकारण समजणे अवघड आहे.

भारतात मार्क्सवादापलिकडे जाऊन जातिव्यवस्था विचारात घ्यावी ह्या विचाराने समकालीन व सद्यकालीन स्थितीत जोम धरला आहे. ही समन्वयाची भूमिका स्वीकारणाऱ्या विचारक आणि विश्लेषकांनी मांडलेल्या तत्त्वज्ञानाला समन्वयवादी तत्त्वज्ञान म्हणता येईल.

- समन्वय (ना) : जुळणी, तर्कशुद्धता, ताळमेळ, मिलाफ (स्वाभाविक क्रम)
- समन्वय करणे : जुळणी करणे, ताळमेळ घालणे, समायोजन करणे.
  (मराठी पर्यायी शब्दांचा कोश लेखक मो. वि. भाटवडेकर साधना प्रकाशन पुणे प.आ. २५ मार्च २०००)

- **समवाय** : **संयोग, संबंध, समागम**
- **समवाय** : sequence, assemblage, collection, intimate and constatnt relation **अनुक्रम, मेल, मिलन, मिश्रण, समूह, जमाव**
- **समवायीकरण** : An inseparable relation

भारतीय समाजासंदर्भात जातिव्यवस्थेच्या प्रश्नांचीजेथे चर्चा येते, तेथे आंबेडकरवाद येतो. समन्वयी विचारवंत सामाजिक संघटना व चळवळी जेव्हा जातीचा प्रश्न घेऊन पुढे येतात, तेव्हा आंबेडकर विरुद्ध मार्क्स अशी चिकित्सा सुरू होते. ह्या चिकित्सेबाबत महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी आंबेडकर आणि मार्क्स ह्या ग्रंथात सविस्तर कारणमीमांसा केलेली आहे.[५] ह्या ग्रंथामुळे समन्वयी विचाराला प्रोत्साहन मिळाले व नवीन एक विचार चर्चेत आला.

सामाजिक चळवळींच्या बाबतीत १९६० चे दशक महत्त्वाचे मानले जाते. सामाजिक, आर्थिक चळवळींच्या बाबतीत असे म्हणता येईल की, कम्युनिस्ट चळवळी आणि दलित चळवळी १९६० पूर्वी वेगवेगळ्या होत्या. एवढेच नव्हे तर त्या एकमेकांना शत्रू मानत होत्या. आधुनिक काळात विविध सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्न सोडवायचे असतील तर समकालीन युगात दलित आणि मार्क्सवादी चळवळी कशावर उभ्या आहेत, हे पहावे लागते. जातीयतेचा, अस्पृश्यतेचा, रोजगार, शिक्षण आणि स्त्रियांचे प्रश्न सोडवायचे असतील तर कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारांचा पाया समजून घ्यावाच लागतो. ह्या दोघांनीही मूलभूत मानलेल्या घटकांचा विसर पडू देता कामा नाही. कारण आज प्रत्येक जातीत एक नवा वर्ग जन्माला आला आहे.[६] समन्वयी विचारवंतांच्या मते दलितांच्या संपूर्ण चळवळी आर्थिक पायावर जोपर्यंत उभ्या राहत नाही, तोपर्यंत सामाजिक परिवर्तन होणे अपेक्षित नाही. १९५६ च्या सुमारास बहुजन समाज हितसंबंध आणि आकांक्षामुळे संघटित होता. नेत्यांमध्ये

स्पर्धा नव्हती, नंतर मात्र बहुजन समाजाचे विघटन होण्याची प्रक्रिया वेग घेत होती, असे दिसून येते १९६४-६५ मध्ये दादासाहेब गायकवाड हे डॉ. बाबासाहेबांनंतरचे खऱ्या अर्थाने मासलिडर बनले. बॅरिस्टर खोब्रागडे हे राज्यसभेवर आणि रा. सू. गवई हे विधानपरिषदेवर गेले. बी.सी. कांबळे ह्यांचे विधिमंडळातील काम तर दीर्घ काळ स्मरणात राहील, असेच होते. राजा ढाले, नामदेव ढसाळ हे विद्रोही लेखक काही कमी ताकदीचे नव्हते. नामांतराचाच लढा दीर्घकाळ लढविणारे रामदास आठवलेही गतिमान व चिवट असे नेते म्हणून पुढे आले. प्रा. जोगेंद्र कवाडे निष्ठावान तर ॲड. प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर रिपब्लिकन पक्षाचा जनाधार वाढविणारे होय. हे सर्व जरी खरे असले तरी बहुजन समाजाच्या समस्या का वाढत चालल्या ह्याची कारणमीमांसा आपण करावयास हवी. ही कारणमीमांसा करत असताना समन्वयवाद पुढे येतो. मार्क्स-आंबेडकरह्यांच्या वैचारिक समन्वयाची उपयुक्तता समजते, आणि म्हणूनच मार्क्स-आंबेडकर समन्वयवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी महत्त्वाची ठरते.

## २.२ मार्क्स-आंबेडकर समन्वयची पार्श्वभूमी :

दलित चळवळींच्या निमित्ताने जे जे नेतृत्व पुढे आले, त्या नेतृत्वाने तरुणांना सामावून घेण्यास टाळाटाळ केली. परिणामी दलित पँथरच्या रूपाने नवीन नेतृत्व उदयास आले आणि त्यांनी स्वत:ला आंबेडकरवादी म्हणवून घेतले. ज्या नेतृत्वाने जाती ऐवजी वर्ग स्वीकारला ह्या नेतृत्वाला मार्क्सवादी म्हटले जाऊ लागले. रिपब्लिकन पक्ष आणि दलित पँथरह्यांच्या अंतर्गत जात आणि वर्ग ह्या मुद्यांवरून मतभेद निर्माण झाले, हे ह्यात महत्त्वाचे आहे.

१५ नोव्हेंबर १९५६ पासून काठमांडू येथे जागतिक बौद्ध भ्रातृसंघाची चौथी परिषद सुरू झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे ह्यापरिषदेला एक प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. २० नोव्हेंबर १९५६ रोजी ते बौद्ध धर्मातील अहिंसा ह्या विषयावर भाषण देणार होते. परंतु देशी-परदेशी प्रतिनिधींच्या आग्रहामुळे त्यांनी ‘बौद्ध धम्म व साम्यवाद’ह्या विषयावर भाषण केले.

दलित समाजात मार्क्स आणि मार्क्सवादाबाबत चुकीच्या समजुती प्रसारित करण्यासाठी ह्या भाषणाचा संदर्भ मुक्तपणे नेहमीच देण्यात येतो, मग बुद्ध स्वीकारावा की मार्क्स स्वीकारावा, हा प्रश्न उपस्थित केला जातो. कार्ल मार्क्स एक नव्या अर्थशास्त्रीय पद्धतीचा शिल्पकार तर दुसऱ्या बाजूस भगवान गौतम बुद्ध एका धर्माचा संस्थापक परंतु ह्या दोन्हींची तुलना अभ्यासण्याचे कारण म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गौतम बुद्धाबरोबर कार्ल मार्क्स देखील अभ्यासला, आणि दोन्ही तत्त्वज्ञानांतून साम्य दर्शविणारे दुवे शोधून काढले. भारतामधील मार्क्सवाद्यांनी देखील आपापले पूर्वग्रह मागे टाकून बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. त्यांची भूमिका नेमकी काय होती, हे समजून घेतले. त्रिपिटकाचा आधार घेऊन्न बुद्धाच्या तत्त्वप्रणालीमध्ये स्वतंत्र समाजासाठी धर्म आवश्यक मानला गेला आहे. कार्लमार्क्सला वैज्ञानिक समाजवादी मानले गेले. यांची तुलना करताना दु:खाचे कारण वर्गकलह आहे.[७] ह्यासारखे मुद्दे पुढे येतात. जग हे दु:खाने भरलेले आहे, आणि हे दु:खाचे कारण दूर करण्यासाठी गौतम बुद्धांनी पंचशील आचरण करण्याचा आग्रह धरला. भाषा वेगळी आहे. परंतु अर्थ तोच आहे. जर दु:खाचा अर्थ पिळवणूक असा घेतला, तर बुद्ध व मार्क्स ह्यांमध्ये अंतर नाही.[८] १९८०च्या दशकात उदयास आलेल्या दलित पँथरची जी विचारधारा होती, त्यामध्ये आंबेडकर विरुद्ध मार्क्स जाती विरुद्ध वर्ग असे दोन प्रवाह तयार झाले. मे-जून १९७५ च्या समाजप्रबोधन पत्रिकेमध्ये,‘दलित चळवळीचे भवितव्य’ह्या विषयावरच्या लेखात डॉ. रावसाहेब कसबे अशी मांडणी करतात की, दलितांचे प्रश्न सोडविण्यासाठी मार्क्सवादी अर्थशास्त्र स्वीकारले पाहिजे. तसेच जून १९७६ च्या त्याच अंकात त्यांनी,‘डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराचे स्वरूप’ह्या शीर्षकाखाली त्यांनी व्यक्ती व समाज ह्यांचे मार्क्सवादाच्या दृष्टिकोनातून काय संबंध आहे,ह्यावर प्रकाश टाकला आहे. त्यामुळेच डॉ. कसबे फक्त मार्क्स-आंबेडकरांचा समन्वय करणारे राहिले नाहीत, तर स्वतंत्र विचारांचे (समन्वयी) ते एक तत्त्वज्ञ झाले आहेत. त्यांनी ज्या काळात ‘आंबेडकर आणि मार्क्स’ हा ग्रंथ लिहिला तो काळ सामाजिक चळवळीच्या उत्थानाचाकाळ होता. त्यावेळी मार्क्स-आंबेडकरांच्या समन्वयाचा

विचार मांडण्याचा त्यांनी सर्वप्रथम प्रयत्न केला. दलित चळवळ आणि डावी चळवळ यांनी एकमेकांतर्गत शत्रू बनण्यापेक्षा एकमेकांच्या सहकार्याने आपले सामर्थ्य विस्तारत रहावे आणि भारतात सामाजिक व राजकीय परिवर्तन घडवून आणावे, असा त्यांचा उद्देश होता. भारतीय इतिहासाचे आकलन ह्या दृष्टीने डॉ. शरद पाटील ह्यांच्याकडून झालेले आहे आणि ह्या अन्वेषण पद्धतीला मार्क्सवादी-फुले-आंबेडकरवादी अन्वेषण पद्धती म्हटले गेले.[९]

डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी'रानडे, गांधी आणि जीना' हा ग्रंथ लिहून इतिहासविषयक दृष्टिकोन मांडला. कार्ल मार्क्स ह्यांनीही इतिहासविषयक दृष्टिकोन मांडलेला आहे. त्यांच्या मते इतिहास हा आर्थिक शक्तीचा परिणाम आहे. आंबेडकरांच्या मते मार्क्सच्या म्हणण्यात सत्यांश असला तरी त्यांचे म्हणणे पूर्ण सत्य नाही. मार्क्सने व्यक्तीऐवजी व्यक्तिनिरपेक्ष शक्तींना इतिहास निर्मितीत स्थान दिलेले आहे, ते चूक आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते इतिहासनिर्मित व्यक्तिनिरपेक्ष शक्तींना निर्णायक स्थान असते, हे कोणीही नाकारू शकत नाही. परंतु व्यक्तिनिरपेक्ष शक्तीचा परिणाम हा माणसावर अवलंबून असतो, हे सुद्धा मान्य केले पाहिजे.[१०]

बौद्ध धर्माचा अभ्यास करताना डॉ. आंबेडकरांनी धर्माकडे पाहण्याचा सामाजिक दृष्टिकोन ठेवला आहे. त्यांच्या धर्म संकल्पनेमध्ये वर्गावर्गाच्या संबंधाऐवजी व्यक्ती-व्यक्तीतील संबंधांना प्राधान्य दिले आहे.[११] शेड्यूल कास्टफेडरेशनच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो अहवाल घटना समितीला दिला त्यात त्यांनी व्यक्ती व समाज ह्यांचा विचार दोन परस्पर विरुद्ध टोकांवर उभे राहून केला. लोकशाही आणि समाजवाद ह्यांना एकत्र आणण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी त्याच काळात प्रयत्नही केला होता.[१२] लोकशाही व समाजवाद ह्या दोन परस्पर विरुद्ध तत्त्वप्रणाली मानल्या जात होत्या. त्यांना एकत्रित बांधले पाहिजे, तरच सामाजिक, राजकीय व आर्थिक प्रश्नांचा गुंता सुटू शकेन. ह्यासाठी डॉ. आंबेडकरांनी जी योजना आखली होती, त्यावर मात्र चर्चा होऊ शकली नाही. मार्क्स-आंबेडकरसमन्वयी विचारांचा ऐतिहासिक आढावा लक्षात घेताना वरील गोष्टीकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. साम्यवादाची सुरुवात ह्या

जगात पिळवणूक आहे,ह्या सिद्धांतापासून होते. श्रीमंत माणूस गरिबांची पिळवणूक करतो. त्यामुळे गरीब हा अधिक गरीब होतो. ह्यालाच मार्क्स पिळवणूक म्हणतो. ह्यावर उपाय म्हणून खासगी संपत्ती नष्ट करावी आणि ह्यावर सर्वांची मालकी असावी असे झाले पाहिजे आणि हे होण्यासाठी राज्याची मालकी कामगार वर्गाकडे असावी.[१३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या लिखाणातून, तत्त्वज्ञानातून पिळवणूक म्हणजे दु:ख हे स्पष्टकरण्याचा प्रयत्न केला आहे व बुद्धांचा कालानुषंगिक एक नवा अर्थ एक नवे समर्थ विश्लेषण मांडण्याची त्यांना गरज वाटत होती.[१४]ह्या गरजेतून बाबासाहेबांच्या,'बुद्ध आणि त्यांचा धम्म' चा जन्म झाला. २० नोव्हेंबर १९५६ रोजीच्या बौद्ध धम्म व साम्यवाद ह्या विषयावर जे भाषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले ते उत्स्फूर्त भाषण होते. त्या भाषणात ते म्हणतात,

The work Dukkha, no doubt has been interpreted to mean rebirth the round of life, that is Dukkha, I do not agree with that, I think there are a lot of places in Buddhist Literature where the Buddha has used the word Dukkha in the sense of proverty. Therefore so for as the foundation is concerned, there is a really no difference at all.[15]

बौद्ध तत्त्वज्ञानातील दु:खाचा अर्थ आणि मार्क्सच्या तत्त्वज्ञानातील दारिद्र्याचा अर्थ एकाच अर्थाने वापरला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या मते बुद्ध आणि मार्क्स ह्यांच्या विचारांचा मूलाधार एकच आहे, तर बौद्ध धर्मीयांनी कार्लमार्क्सकडे जाण्याचे कारण काय? तरीही ज्यांना कार्ल मार्क्सचे आकर्षण आहे, त्यांनी बुद्धांच्या धम्म चक्रप्रवर्तन सुत्ताचा अभ्यास करावा, बुद्ध काय म्हणतो, हे समजावून घ्यावे. बौद्ध भिक्खू संघाचे नियम साम्यवादी रशियापेक्षाही कडक आहेत. साम्यवादातील खासगी मालमत्तेसंबंधीचे नियम विनयपिटकातही सापडतात. खासगी मालकी नष्ट करण्यात काही चुका असल्या तरी खासगी मालमत्ता नष्ट करू इच्छिणाऱ्यांच्या

मार्गात बौद्ध धर्म अडसर म्हणून उभा राहणार नाही कारण त्याने ह्यापूर्वी बौद्ध भिक्खूसंघासारख्या संघटनेत ह्या तत्त्वाला मान्यता दिलेली आहे.[१६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते मार्क्सवादामध्ये साम्यवादाच्या निर्मितीसाठी हिंसेचा अवलंब केला जातो. तर दुसऱ्या बाजूला मानसिक परिवर्तन, नैतिक शिकवण, प्रेम ह्या साधनांच्या साह्याने बुद्ध आपल्या विरोधकांना जिंकतो. थोडक्यात साम्यवादाचे ध्येय गाठण्यासाठी बौद्ध धर्म हा एक मार्ग आहे. संपूर्ण जगाचा चेहरामोहरा बदलायचा असेल तर बुद्धांची शिकवणच अनुसरली पाहिजे. खरे तर समाजातून निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करण्याचा आग्रह डॉ. आंबेडकर धरतात. डॉ. रावसाहेब कसबे आपल्या 'आंबेडकर आणि मार्क्स' मध्ये सामाजिक सुधारणांपूर्वी आर्थिक सुधारणा यशस्वी होईल काय, असा प्रश्न उपस्थित करतात. समाजवादी, साम्यवादी विचार स्वीकारणाऱ्यांना फक्त आर्थिक विचार करून चालणार नाही. राजकीय व आर्थिक सुधारणा करण्यासाठी जातिव्यवस्था नष्ट करावी लागेल.[१७]

**२.३भगवान गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स :**

भगवान बुद्ध ह्यांचे विचार : धन्याने नोकर चाकरांना पुढीलप्रमाणे वागवावे, त्याने त्यांच्या सामर्थ्याप्रमाणे त्यांना काम द्यावे. अन्न व मजुरी द्यावी ते आजारी पडले असताना त्यांची शुश्रूषा करावी. असाधारण स्वादिष्ट पक्वान्ने त्यांनी वाटून खावी. वेळ पडेल तेव्हा त्यांना रजा द्यावी. कारण नोकर चाकर हे धन्यावर प्रेम करतात. ते त्याच्यापूर्वी उठतात, आणि त्यांच्या नंतर झोपतात. त्यांना जे द्याल त्यात ते समाधान मानतात. ते आपले काम चोख बजावतात, आणि त्यांची कीर्ती सर्वत्र वाढवितात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स ह्या दोन्ही महापुरुषांच्या विचारांना प्रमाण मानून दोन वेगवेगळे विचार प्रवाह निर्माण झाले, असले तरी डॉ. आंबेडकरांनी भ. गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान प्रमाण मानले आहे, वरील संदर्भानुसार बुद्धांचे तत्त्वज्ञान आणि कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान

हे एकमेकांच्या जवळ आल्याचे दिसते. मार्क्सने मालक आणि मजूर ह्यांच्या संबंधावर खूप मोठे लिखाण केले आहे. कामगारांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी काय उपाय योजना आखावी, ह्या संबंधी मोठे ग्रंथ लिहिले. भ. बुद्धांच्या विचारांत देखील धनी आणि नोकर, नोकरांना सोयी सवलती, त्यांचे कर्तव्य उन्मादी विषयी विचार मांडले आहेत म्हणजे मार्क्स आणि बुद्ध ह्यांचा समन्वय झालेला आहे. समकालीन युगात बुद्धांच्या व्याख्यानांमधून सुद्धा मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा आशय असलेला दिसतो, हे अधोरेखित करावे लागते, कारण आज अखिल मानवजात सामूहिक आत्महत्येकडे जात असताना ह्या संकटातून मार्क्स-बुद्ध समन्वयी तत्त्वज्ञान उपाय होऊ शकतो. ह्याबरोबरच बुद्धांनी पारंपरिक कर्म सिद्धांत नाकारला आहे. भारतातील जातींचा विचार केला तर, असे दिसते की विशिष्ट जाती धनिक बनल्या ह्या श्रमिक वर्गावर नेहमीच अन्याय करीत आहेत. आपल्यावर होणारा अन्याय पूर्वजन्मीचे फळ आहे, असे समजून कनिष्ठ जाती कोणताही विद्रोह करीत नाही, तो अन्याय सहन करीत जाणे, हा जणू काही पलायनवादच आहे. भ. बुद्धांनी मात्र पारंपरिक कर्मसिद्धांत हा व्यक्तिकेंद्रित असल्याने खूप अडचणी निर्माण होतात. ह्यावर भ. बुद्ध व्यक्ती जे कर्म करते, त्याच्यासाठी व्यक्तिगत व सामाजिक असे दोन्ही अंश जबाबदार असतात, असे सांगतात. व्यक्तीचे कर्तव्य व्यक्तीबरोबरच सामाजिकही असते.[१८]

भारतात कनिष्ठ जाती वरिष्ठ जातींचा अन्याय सहन करते, तसाच धनिकांचा अन्याय श्रमिक सहन करतात.कार्ल मार्क्सने 'वर्ग' आणि डॉ. आंबेडकरांनी 'जात' ह्या घटकाचा विचार व चिंतन केले. कॉ.गोविंद पानसरे ह्यांनी आपल्या 'मार्क्सवादाची तोंडओळख'ह्या ग्रंथात समाजाच्या ठरावीक अवस्थेमध्ये एका विशिष्ट पद्धतीने सारख्या पद्धतीने जीवन जगणारा समाजाचा एक विभाग म्हणजे वर्ग, अशी वर्गाची व्याख्या केली आहे.[१९] सरंजाम वर्ग हा धनिक वर्ग आहे. तोच पिळवणूक करतो. जातीची व्याख्या करता येणे मात्र अवघड आहे, कारण जातीच्या वर्णनावरून जात समजावून घेता येते. जात आणि श्रम विभागणीचा अत्यंत जवळचा संबंध आहे. जात हा

बंदिस्त वर्ग आहे, हा उत्पादनाच्या साधनांचा मालक नाही, हेही तितकेच सत्य आहे. जात ही आज सामाजिक व्यवस्थेचा भाग आहे. तसेच जात ही पारंपरिक तर वर्ग ही आधुनिक संकल्पना बनली आहे. अर्थव्यवस्थेचा विचार केला तर, आज अर्थव्यवस्थाही जातिरचनेवरच आधारित आहे. पंडित नेहरूंनी अंमलात आणलेल्या नवीन धोरणांमधून नवीन इकॉनॉमी ही एखाद्या व्यक्तीची जात कोणती आहे, हे पाहात नाही हे स्पष्ट झाले. ह्याची पार्श्वभूमी लक्षात घेता सामाजिक व्यवस्थेतील तळातील जातींना काहीच फायदा झाला नाही. जातीवर आधारित श्रम ह्याचा विचार करता मध्यम वर्गाची निर्मिती झाली. रजनी कोठारींच्या मते, 'जात' हे एक राजकीय संघटनांचे साधन बनते व ह्यामुळे जातीचे राजकीयीकरण होताना दिसते. भारतातील विचारवंतांनी जातिसंस्थेचा विचार केला आहे.

मार्क्स आणि बुद्ध ह्या दोन्ही विभूतींचे हिंसा विषयीचे विचार वेगवेगळे दिसून येते. मालक व मजूर, धनिक व कष्टकरी ह्यांचे संबंध हिंसेवर आधारित दिसून येतात, म्हणजे क्रांती होण्यासाठी मार्क्स हिंसेचे समर्थन करताना दिसतो, तसे विचार मात्र बुद्धांच्या विचारात दिसत नाही. ख्रिश्चन धर्मात बाप्तिस्मा, इस्लाम धर्मात सुंता ह्या धर्मदीक्षा सांगितल्या आहेत, तशी कोणतीही धर्मदीक्षा बुद्धाने त्यांच्या गृहस्थ उपासकांकरिता सांगितली नाही. कॉ. शरद पाटील ह्यांनी जातिव्यवस्था विकासातील ऐतिहासिक टप्पे ह्या लेखात स्पष्ट म्हणतात की, ख्रिश्चन व मुस्लीम हे धर्म ज्याप्रमाणे तत्कालीन सामंत प्रथाक वर्गव्यवस्था आणायला कारणीभूत झाले त्याप्रमाणे बौद्ध धर्म भारतीय सामंत प्रथाक क्रांती करायला कालबाह्य वर्णव्यवस्थेऐवजी कालसंमत व प्रागतिक जातिव्यवस्था आणायला कारणीभूत झाला. वर्णव्यवस्था वा जातिव्यवस्था ह्या वर्ग व्यवस्थेची भारतीय रूपे होती, हे लक्षात घेतले म्हणजे बुद्धाने भारतीय जातिव्यवस्था अबाधित ठेवली. हा दुसऱ्या टोकाचा आरोप गैरलागू ठरतो.[२०]

वर्ग ह्या संकल्पनेचा आधार घेऊन मार्क्सने आपले विचार विविध ग्रंथांत व्यक्त केले, व पुढे त्यावर आधारित अशा चळवळीही उभ्या राहिल्या त्या आजही दिसत आहे. तर जात ह्या

संकल्पनेच्या आधारावर आंबेडकरी तत्त्वज्ञान उभे राहिले. पुढे ती स्वतंत्र चळवळ व ज्ञानशाखा अभ्यासविषय बनली. बुद्ध जातिप्रथेच्या संकल्पनेला कसे विरोध करत होते, हे ह्यावरून अधिक स्पष्ट होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भ. बुद्धांचे विचार अवगत केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला तथागत गौतम बुद्धाचा मानवतावादी सत्धम्म अणुयुद्धाच्या उंबरठ्यावर असलेल्या जगाला शांतीचा मार्ग दाखविण्यासाठी समर्थ आहे.

खरे तर देशात जातिव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्यांची संख्या आज वाढत आहे. हे टाळण्यासाठी व भारताची लोकशाही बलवत्तर होण्यासाठी मार्क्स-आंबेडकर विचारांचा समन्वय आवश्यक आहे. ह्या समन्वयामध्ये कॉ. शरद पाटील, डॉ. कसबे, म. फुलेंची भर टाकतात अर्थात हेही आवश्यकच आहे. वर्ग-जातिव्यवस्था नष्ट केल्याशिवाय लोकशाही यशस्वी होणार नाही, ह्या विचारास आणखी पुष्टी मिळते. मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी एकत्र आल्याशिवाय भारतीय जनतेचा उद्धार होणार नाही, आणि हे धाडस समन्वयवादात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध परिषदेमध्ये, 'बुद्ध की कार्ल मार्क्स' ह्या विषयावर भाषण दिले. हे भाषण मार्क्स-आंबेडकर समन्वयी दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान व मार्क्सचे तत्त्वज्ञान हे दोन्हीही आदर्श तत्त्वज्ञाने मानली जातात. ह्या तत्त्वज्ञानात असलेले साम्य व भेदविषयक विवेचन बाबासाहेबांनी आपल्या भाषणात केले आहे. तसेच बौद्ध तत्त्वज्ञान व मार्क्सवाद किंवा साम्यवाद ह्यातील वैशिष्ट्येपूर्ण मुद्यांची मांडणी केली आहे. साम्यवादी तत्त्वज्ञानाचे मूळ असे आहे की, ह्या जगात धनिकांकडून गरिबांची पिळवणूक होते. धनिकांना संपत्तीची हाव आहे, त्यांना अधिकाधिक मालमत्ता हवी आहे. ह्यासाठी जनसमुदायास गुलाम करीत आहेत. ही गुलामगिरी शेवटी यातना, दु:ख व गरिबी ह्यांच्या निर्मितीस कारणीभूत होत आहे. हेच मार्क्सवादाच्या प्रारंभाचे मूळ आहे. मजूर किंवा कामगारांच्या श्रमातून उत्पादित झालेले अतिरिक्त धन स्वत:च घेणारा मालक बनतो. कामगार घाम गाळून उत्पादन वाढवितो, व ह्यापासून मालक हा अतिरिक्त धन मिळवितो. ह्या धनावर कामगारांचा कोणताच अधिकार राहात

नाही. त्याला त्यातून हिस्साही मिळत नाही. परिणामत: अतिरिक्त धन मालकच बळकावतो. ह्या परिस्थितीला कार्ल मार्क्स पिळवणूक शब्द वापरतो. ह्या पिळवणुकीवर उपाय सांगताना कार्ल मार्क्स वैयक्तिक मालमत्तेवर प्रतिबंध घातला जावा, हा उपाय सूचवितो. व्यक्तिश: कोणीही मालमत्ता बाळगू नये, किंवा धनसंचय करू नये. मार्क्सच्या मतानुसार अतिरिक्त धनावर कामगारांचा अधिकार असावा, व हे राज्यसुद्धा कामगारांचेच असावे. ह्या ठिकाणी कार्ल मार्क्स कामगारांच्या हुकूमशाहीचा सिद्धांत प्रस्थापित करतात, असे दिसते. कामगार वर्गाची हुकूमशाही ह्याचा अर्थ असा करतो की, शासन हे शोषिकांचे म्हणजे कामगारांची पिळवणूक करणारांचे नसावे, तर कामगारांचे राज्य असावे. मार्क्सच्या विचारानुसार कामगारांच्या पिळवणुकीचा विरोध करण्यासाठी उत्पादनापासून प्राप्त होणारी संपत्ती राज्याने आपल्या मालकीची करावयास पाहिजे. सर्व जमिनी राज्याच्या मालकीच्या असाव्यात. साऱ्या उद्योगधंद्यावर केवळ राज्याचीच मालकी/अधिकार असावा, असे असेल तर व्यक्तिगत मालकी नष्ट होऊन धनिक हुकूमशाही गाजविणार नाही. तसेच मजुरांच्या श्रम शक्तीने निर्माण केलेल्या उत्पादित वस्तूवरील अतिरिक्त फायद्याचा लाभ त्या मालकास होणार नाही, व मजुरांचीही पिळवणूक होणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी, 'बुद्ध की कार्ल मार्क्स' ह्या भाषणात साम्यवाद जी जीवनप्रणाली सांगतो, त्या जीवनप्रणालीपेक्षा बौद्ध धम्माने सांगितलेली जीवनप्रणाली उत्कृष्ट व सरस आहे, हे स्पष्ट करते. बौद्ध तत्त्वज्ञान व मार्क्सचे तत्त्वज्ञान ह्या दोन्ही तत्त्वज्ञानात गरिबी संदर्भात कमालीचे साम्य आहे. बुद्धाने २५०० वर्षापूर्वी मार्क्सने सांगितलेले तत्त्वज्ञान सांगून ठेवले होते. बुद्धाने म्हटले, जगात दु:ख आहे. बुद्धाने कार्ल मार्क्स प्रमाणे पिळवणूक हा शब्द वापरला नाही. मात्र पिळवणुकीमधून जे दु:ख, दैन्य निर्माण होते. त्याच दु:खाची कल्पना देऊन बुद्धाने आपल्या तत्त्वज्ञानाची व धम्माची उभारणी केली. जगात दु:ख आहे हे सत्य आहे, असे सांगून बुद्धाने दु:खाची परिभाषा निरनिराळ्या अर्थाने केली. दु:ख म्हणजे पुनर्जन्म, दु:ख म्हणजे जीवन मरणाचा फेरा असा अर्थ बुद्धाने सांगितला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र येथे

नापसंती दर्शविली आहे.[२१] अर्थात बाबासाहेबांच्या ह्या म्हणण्याचा अर्थ आंबेडकरी विचारांचे अनुयायी त्यांच्या सोईने लावताना दिसतात. दु:ख हा शब्द दारिद्र्य, गरिबी ह्या अर्थाने उपयोगात आणला गेला, असल्याचे बौद्ध वाङ्मयात दिसून येते. बौद्ध तत्त्वज्ञानाचा पाया व मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा पाया ह्यात फरक दिसत नाही. तरी कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा पाया हा नवीन नाही. बौद्धांना ह्यासाठी कार्ल मार्क्सचे दार ठोठावण्याची गरज नाही. बुद्धाने तो पाया केव्हाचाच अगदी उत्तम प्रकारे प्रस्थापित करून ठेवला आहे. 'धम्मचक्र प्रवर्तन सुत्त' मध्ये याबाबतचा स्पष्ट उल्लेख आढळतो. मनुष्य यातना दु:खांनी पिडलेला असतो ही मानवी जीवनाची वास्तविकता असली तरी बुद्धाने आपल्या तत्त्वज्ञानाची किंवा धम्माची उभारणी ईश्वर, आत्मा अशा बाबींवर केव्हाच केली नाही. यामुळेच मार्क्सने सांगितलेले तत्त्वज्ञान हे गौतम बुद्धांनी २५०० वर्षापूर्वी सांगून ठेवले होते, या विचारास पुष्टी मिळते.[२२]

व्यक्तिगत मालकी हक्काच्या बाबतीत बुद्धांची विचारसरणी काय होती, हे त्यांच्या बौद्ध भिक्खूसंघाच्या विचारातून दिसते. कोणत्याही बौद्ध भिक्खूने खासगी मालमत्ता बाळगू नये. केवळ सात वस्तू, उदा. एक वस्तरा, एक लोटा, एक भिक्षापात्र, तीन चिवरे आणि एक सुई जवळ बाळगण्यास अनुमती दिली. कार्ल मार्क्सच्या साम्यवादाच्या मूळ गाभ्यामध्ये खासगी मालमत्ता असू नये, असे जर सांगितले असेल तर विनयपिटकातील बौद्ध भिक्खूंसाठी सांगितलेले कडक निर्बंध साम्यवादाच्या आड येत नाही. बौद्ध भिक्खूसंघाची निर्मिती करताना बुद्धाने काही सवलती मान्य केल्या, त्या वरील प्रमाणे होय. आजच्या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा संदर्भ बुद्धांच्या लोकशाहीवर आधारलेल्या धम्मात दिसून येतो, हे ह्या ठिकाणी अधिक स्पष्ट होते. एखाद्यास खासगी मालमत्ता बाळगण्याची इच्छा असेल, तर बौद्ध धम्म आड येत नाही. साम्यवाद प्रस्थापित करण्यासाठी साम्यवाद्यांचा मार्ग हिंसात्मक मार्ग आहे. मात्र बौद्ध धम्म प्रेम, आपुलकीने लोकांची मने जिंकावे, ह्यावर भर देतो. बौद्ध तत्त्वज्ञान प्रस्थापिण्यासाठी बुद्धाला रक्तपात मान्य नाही. हिंसा मान्य नाही. इथे भगवान बुद्ध आणि कार्ल मार्क्स ह्यांच्या तत्त्वज्ञानाचा

मार्ग अलग दिसतो. मार्क्सवाद तत्त्वज्ञानाने हिंसा, अत्याचारी मार्ग स्वीकारला आहे. मजूर वर्गाची हुकूमशाही रक्तपाताने प्रस्थापित करण्यास मार्क्सवादी तत्त्वज्ञान मान्यता देतो, तर बुद्धाचे तत्त्वज्ञान भयापोटी कोणतीच विचारसरणी मूळ धरू शकत नाही ह्यावर विश्वास ठेवते. ह्यावरून स्पष्ट होते की, बुद्ध हा लोकशाहीचा पुरस्कर्ता होता. बुद्ध तत्त्वज्ञान व मार्क्सचे तत्त्वज्ञान २५०० वर्षांचे अंतर असले तरी मार्क्सवादाला जे अभिप्रेत आहेत, बुद्धाने अगोदरच सांगून ठेवले होते. दोघांचा उद्देश समान असला तरी त्यांचे मार्ग भिन्न आहेत. समकालीन विविध सामाजिक समस्यांचा विचार करताना दोन्ही तत्त्वज्ञान एकत्रित समजावून घ्यावे लागते. समन्वयवादाच्या विचारसरणीतून प्रश्नांची सोडवणूक शक्य होईल.

### २.४कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारांचा समन्वय :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अनुयायी वर्ग मोठा असला तरी ह्या विचारांच्या विविध सांप्रदायांनी मूळ आंबेडकरवादी विचारांची मोडतोड चालविली आहे. चळवळीचे भांडवल म्हणून त्यांनी आंबेडकरवादाचा वापर करून घेतला. म्हणून असे म्हणावे लागते, की ज्या विचाराचे प्रचारक आंधळे, पोटभरू असतात, ते विचार मानवतेला शाप ठरतो. कॉम्रेड किशोर ढमालेह्यांचे बरोबर चर्चा करताना त्यांनी सांगितले की, आंबेडकरी चळवळीने जे जे प्रश्न लढ्यासाठी घेतले त्या लढ्यात त्यावेळी कम्युनिस्ट उतरले नाहीत. कम्युनिस्टांच्या नाकर्तेपणाचा हा परिणाम आहे. झापडबंद वर्गवादाला डॉ. आंबेडकरांनी विरोध केला, पण कम्युनिस्टांनी त्याकडे दुर्लक्ष केले, त्यामुळेच कम्युनिस्ट चळवळ कुंठित झाली व आंबेडकरवादाच्या विरोधात प्रचार सुरू केला. डॉ. आंबेडकरांना समाजातील जातीयता नष्टच करावयाची असल्याने त्यांनी अनेक सामाजिक आंदोलने उभी केली. वरिष्ठ जातीच्या जाचाला ते कंटाळले होते. कार्ल मार्क्सचा लढा वर्गाचा तर डॉ. आंबेडकरांचा जातीचा कार्लमार्क्सनेखासगी मालकी नष्ट करण्यासाठी, कष्टकऱ्यांचे दु:ख संपविण्यासाठी साम्यवादी तत्त्वज्ञान निर्माण केले. या तत्त्वज्ञानाने केवळ वर्ग ऐवजी जात समस्या बाबत भूमिका घेणे महत्त्वाचे आहे.[२३]

आज मार्क्सवादी फक्त वर्गापूरता आणि आंबेडकरवादी फक्त जातिपूरता विचार करणार असेल तर त्या विचारापासून उदयास आलेल्या चळवळींचा अंत झाल्याशिवाय राहणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९२४ पासून भारतीय अस्पृश्य वर्गाचे नेतृत्व करीत होते. भारतातील अस्पृश्यवर्ग शोषित,पीडित होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी Buddha or Karl Marxह्या निबंधात बुद्ध आणि मार्क्सची तुलना केली आहे. ते म्हणतात, आपली सर्वसाधारणपणे अशी समजूत असते की, बुद्ध आणि मार्क्स ही तर परस्पर दोन टोके आहेत. एकाने जडतत्त्वाला प्राधान्य देऊन विचार केला, तर दुसऱ्याने विचारांचा आधारच जडतत्त्व मानला. एकाने व्यक्तीच्या मुक्तीचा मार्ग सांगितला तर दुसऱ्याने समाजमुक्तीचा मार्ग सांगितला. एकाला प्राथमिक गणसमाजातील लोकशाहीचे आकर्षण होते तर दुसरा राज्यच विसरून जाण्याचे स्वप्न पहात होता. एकानेमानवी मनाचा विविधांगांनी शोध घेऊन मनाची मलिनता नष्ट करण्यासाठी ध्यानाचा मार्ग सांगितला तर दुसऱ्याने मनाला जडतत्त्वाची अनुषंगिक उत्पत्ती(बाय प्रॉडक्ट) मानले. एकाने आयुष्यभर धर्मप्रचार केला तर दुसऱ्याने धर्माला अफूची गोळी मानले. हा परस्पर विरोध अधिक लांबविता येऊ शकतो. अशा ह्या परस्पर विरुद्ध दोन टोकांचा एकत्रित विचार करण्याचे धाडस बाबासाहेबांनी केले. ह्याचाच अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ह्या दोघांकडे बघण्याची दृष्टी परंपरेपेक्षा वेगळी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते बुद्ध मार्क्सपासून वेगळा नाही, तर त्यांच्यात साधर्म्य आढळते बुद्ध आणि मार्क्स ह्यांची भाषा वेगवेगळी तरी अर्थ मात्र एकच आहे. व्यवहारात मतभिन्नता होती, म्हणून साधनांची भिन्नता स्पष्ट केली आहे. मार्क्सवाद हिंसा आणि कामगार वर्गाची हुकूमशाही ह्या दोन्ही गोष्टी साम्यवादाच्या प्रस्थापनेसाठी आवश्यक मानतात. डॉ. रावसाहेब कसबे आपल्या आंबेडकर आणि मार्क्स मध्ये म्हणतात, भांडवलशाहीच्या आक्रमक पावित्र्यामुळे विकलांग होत चाललेली साम्यवादी व्यवस्था आणि ऱ्हास पावत असलेला बौद्ध धर्मह्या दोघांना आधार देण्यासाठी आणि त्यांच्यात नवचैतन्य निर्माण करण्यासाठी आज नव्या चिंतनाची आवश्यकता आहे. दलित चळवळीच्या सुरू झालेल्या समीक्षेच्या प्रतिमेतच

आंबेडकरांच्या बरोबर कार्ल मार्क्सचेही नाव पुढे आले. रिपब्लिकन पक्षाचे नेते जातींच्या किल्ल्यातच सुरक्षित राहणे पसंत करीत असल्यामुळे ते वर्गीय भूमिकेच्या विरुद्ध होते. परंतु पॅंथरची भूमिका वर्गीय बनली अशी टीका झाली, कारण एका बाजूला दलित पॅंथर आणि दुसऱ्या बाजूला रिपब्लिकन गट अशी परिस्थिती होती. जातिसंस्थेच्या उगम विकासासंबंधी १९१६ साली जे मार्क्सवादी विश्लेषण केले गेले, ह्याचा अर्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुरुवातीला मार्क्सवादी होते असा जर कोणी काढला तरतो विपर्यस्त होईल. फक्त परिस्थितीच्या मूल्यमापनासाठी मार्क्सवादी दृष्टीच्या उपयोगाचे महत्त्व आहे. कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाचे सुप्त आकर्षण आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनात भारतीय कम्युनिस्टांच्या विरोधात जाऊनही टवटवीत राहिले आहे. डॉ. कसबेंनी, 'आंबेडकर आणि मार्क्स'ह्या ग्रंथात स्पष्ट असे म्हटले आहे की,[२४] डॉ.आंबेडकर मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद पूर्णपणे नाकारताना कधीच दिसत नाहीत. डॉ.कसबे मार्क्सच्या 'दास कॅपिटल' चा संदर्भ देऊन म्हणतात, 'कार्ल मार्क्सने फ्रेडरिक एजल्सशी केलेल्या पत्रव्यवहारात भारतासंबंधीचे आणि भारतापुढील प्रश्नासंबंधीचे अनेक संदर्भ आहेत.' म्हणजेच एका बाजूला आंबेडकरवाद्यांच्या मते भारतीय जाती ह्या केवळ धर्मांतरानेजातील, अशी मांडणी पुढे आली, तर दुसऱ्या बाजूला भारतातील जाती केवळ आर्थिक परिवर्तनाने जातील, अशी मांडणी डाव्या चळवळीने केली.

इमला आणि पाया ह्यांच्या परिभाषेतच बोलायचे झाले तर मार्क्सवाद्यांनी जात वास्तवास इमला तर आर्थिक संबंधास पाया मानले, परंतु भारतीय उत्पादन प्रक्रियेत जात गुंतलेली असल्यामुळे किंबहुना ती उत्पादन शक्तीत रूपांतरित झालेली असल्याने तिला इमला मानता येणार नाही. व्यवहारवादाचा विचार करता मार्क्स-आंबेडकर समन्वयवादाचा विचार पुढे आला. समन्वयातूनच मार्क्सवादामुळे आंबेडकरवादाला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले.

आंबेडकर आणि मार्क्स यांचा एकत्रित विचार कर्मठ कम्युनिस्टांना आणि सनातनी दलितांना संतप्त करणारा आहे. परंतु समन्वयी विचारवंतांच्या मते हे दोघेही पूर्ण कर्मठ किंवा पूर्ण सनातनी राहिलेले नाहीत. भारतासमोर आज 'स्त्री, रोजगार, शिक्षण' इत्यादी प्रश्न उभे आहेत. महत्त्वाचे म्हणजे १९६०-७० या दशकात उजव्या व डाव्या चळवळींमध्ये मोठी गोंधळाची स्थिती निर्माण झालेली होती. डाव्या आणि उजव्यांमधील संघर्षाचे मूळ शोधताना मात्र मार्क्स आणि आंबेडकर ह्या दोन्ही तत्त्वज्ञांचा आधार घ्यावाच लागतो.[२५] यातूनच समन्वयाचा विचार पुढे येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कार्लमार्क्सच्या वैचारिक योगदानावर भाष्य करताना ते सुरुवातीला स्वीकारले. परंतु त्यावर नंतर टीकाही केली. पाश्चिमात्त्य बौद्ध राष्ट्रातील समाज मार्क्सला आपला मुक्तिदाता मानतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काठमांडूच्या भाषणात बुद्ध आणि मार्क्स ह्यांची तुलना करून मार्क्सवादाबाबत वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले. कॉम्रेड शरद पाटिल ह्यांनी 'मार्क्सवाद फुले आंबेडकरवादाची' मांडणी केली. तत्पूर्वी डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी मार्क्स-आंबेडकरवादासंबंधी विचार मांडले.[२६] १९७१ साली महाड येथे झालेल्या बौद्ध साहित्य सभेने साहित्य संमेलनात मार्क्स-आंबेडकर विचारांच्या समन्वयाची सर्वप्रथम मांडणी करण्यात आली.

जागतिक पातळीवर मार्क्सवाद आणि भारतीयांच्या बाबतीत आंबेडकरवादाने शोषित वर्गाच्या बाजूने भूमिका घेतली. मार्क्सवादामुळे आंबेडकरवादाला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले आहे. जागतिक प्रक्रिया वर्गाशी संबंधित असून भारतीय समाज जातिसंस्थेत अडकून पडला आहे. जागतिकीकरणाचे आव्हान पेलण्याचे सामर्थ्य मार्क्स-आंबेडकर समन्वयवादात दिसून येते. कारण जागतिकीकरणात स्वीकारलेली धोरणे जनतेच्या इच्छेच्या आणि आकांक्षेच्या बाहेरील आहेत. कार्ल मार्क्स आणि डॉ. आंबेडकरांचे विचार एकत्र केले, तरह्या परिस्थितीमध्ये नवी साधने वापरून आव्हाने पेलता येतील. स्त्रीप्रश्न, रोजगाराचा प्रश्न, जातीचे प्रश्न ह्यासारख्या

नवीन आव्हानांच्या बाबतीत भारतीय राजकीय पक्षांचा पाया डळमळीत झालेला दिसून येतो. हे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्याकडे कोणताही ठोस असा कार्यक्रम राहिलेला नाही. त्यामुळे वर्गीय व जातीय प्रश्नांची सांगडघालणे आवश्यक ठरते. कम्युनिस्टांना दोष देऊन दलित चळवळींचे भले होणार नाही. मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी चळवळी ह्या परिवर्तनवादी स्वरूपाच्या आहेत. माणूस आणि समाजाबाबतच्या चिंतनाला एक नवे क्रांतिकारी वळण देणारा हा काळ आहे.

समन्वयवादाचे अभ्यासक प्रा. डॉ. रणजित परदेशी ह्यांच्याशी प्रत्यक्ष झालेल्या चर्चेतून भारतीय जातींमध्ये अनेक वर्ग तयार झाले आहेत. हे आजचे वास्तव आहे. डॉ. आंबेडकरांना देखील राजकीय क्रांती व्हावी, असे वाटते. भारतामध्ये समाजातील कामगार वर्गाला डाव्या शक्तींपासून बाजूला काढण्यासाठी कॉंग्रेस, शिवसेना इत्यादींनी प्रयत्न केले मात्र समन्वयवादाच्या प्रसारामुळे वेळोवेळी आंबेडकरांचे समाजशास्त्र आणि मार्क्सचे अर्थशास्त्र ह्यांचा सुरेख मेळ घातला,अशा स्वरूपाचे चिंतन पुढे आले आहे.

‘कास्ट इन इंडिया’, ‘ॲनहिलेशन ऑफ कास्ट’ आणि ‘कम्युनिस्ट मेनिफेस्टो’ह्यांचे तौलनिक वाचन करताना सर्वात जास्त गोंधळ उडतो. कारण कम्युनिस्टमेनिफेस्टोमध्ये मार्क्स भांडवलशाही विरुद्ध आक्रमक बनतो. परंतु भारतीय जातिसंदर्भातील चर्चेत तो आक्रमकपणा वांझोटा ठरतो. भारतात भांडवलशाही आकार घेत असताना एकाच जातीत अनेक वर्ग निर्माण होताना दिसतात. ह्या परिस्थितीमध्ये मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचार उपयुक्त ठरतो. युरोपियन युवकांनी मार्क्सला आपला मुक्तिदाता मानले. बाबासाहेबांनादेखील बुद्धाची तुलना मार्क्सबरोबर करणे उचित वाटले.[२७] बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध आणि मार्क्स ह्यांच्यात तुलना केली. त्यामुळे मार्क्सवादाबद्दल आणि बौद्ध धर्माबद्दल त्यांच्या अनुयायांचा वैचारिक गोंधळ झाला होता तो कमी झाला.अनुयायांच्या बाबतीत कट्टर मार्क्सवादी अथवा कट्टर आंबेडकरवादी कोणी असण्याची शक्यता नाहीच. रावसाहेब कसबे ह्यांचे ‘क्रांतिकारी चिंतन’ह्या उत्तम कांबळे ह्यांनी स्पष्ट केले की,

शहरातील दलित डाव्या चळवळीत भाग घेत नाहीत,म्हणून डावी चळवळ खेड्यातील दलितांकडे दुर्लक्ष करते. शहरातील दलित डाव्या चळवळीच्या विरुद्ध जातात म्हणून डावे खेड्यातील दलित चळवळीतील कार्यकर्त्याला उभेही करीत नाहीत. हे दुष्टचक्र भेदण्याचे सामर्थ्य मार्क्सचे विचार आणि आंबेडकरांची दृष्टी ह्यांच्या समन्वयी शक्तीतच आहे.[२८] ह्या आकलनावरून बाबासाहेबांची श्रमिकाबद्दलची, डाव्या चळवळीबद्दलची भूमिका आणि मार्क्सची भूमिका साम्यदर्शक आहे. सुधारणावादी चळवळींनी समन्वयी विचार समजूनघेणेआवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनात मार्क्सवादाचे आकर्षण राहिले आहे. वर्ग समन्वयाच्या भूमिकेशिवाय चळवळींचा विकास होणे शक्य नाही. दलित चळवळीच्या परिवर्तनवादी विकास प्रक्रियेस मार्क्सवादाची जोड देणे, आवश्यक आहे. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या भूमिकांविषयी चिंतन केले असता, वादविवादाचेअनेक मुद्दे समोर येतात. असे असले तरी त्यांच्यातील समन्वयी शक्तीत क्रांतीची बीजे आहेत.

भारतात स्त्री प्रश्न, रोजगार आणि जात वास्तव हे प्रश्न आज कळीचे समजले जातात. जेथे जातीचा संदर्भ येतो, तेथे आंबेडकरवाद येतो. समन्वयवाद्यांच्या मते मार्क्सवादाने ह्या प्रश्नावर भूमिका घ्यावी.जातीचा प्रश्न सोडवायला गेला, तर वर्ग प्रबळ होतात. म्हणून जाती अंताची चळवळ करणारी दलित चळवळ आणि दारिद्र्याचा अंत करणारी मार्क्सवादी चळवळ ह्या एकमेकांच्या जवळ आल्या तर जात आणि वर्गाचा लढा पुढे जाईल.

“बुद्धविचार : मार्क्सवादी दृष्टिक्षेप”ह्या ग्रंथाचे लेखक राहुल सांकृत्यायन, देवी प्रसाद चट्टोपाध्याय, वाय. बलराममूर्ती, रामविलास शर्मा ह्यांनी मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ह्यांच्या समन्वयासंबंधी आपला दृष्टिकोन मांडला आहे. २०११ साली ह्या ग्रंथाची चौथी आवृत्ती प्रकाशित झाली.ह्या आवृत्तीच्या निमित्ताने डॉ. आनंद तेलतुंबडे ह्यांनी नवीन प्रस्तावना लिहिली आहे, त्यात त्यांनी वर्णन केले की, समन्वयवादाला आकलनात बौद्ध धर्म व मार्क्सवाद ह्यातील संबंधाविषयी जी चर्चा केली जाते, त्यामुळे मोठा गोंधळ निर्माण होतो. दोन्ही विचारसरणींमध्ये

जवळजवळ २५ शतकांचे अंतर आहे. ह्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. मानवमुक्तीच्या परिप्रेक्ष्यातून बौद्ध धर्माचा तत्त्वाशय मार्क्सवादाशी जुळतो, असे आढळते. समाजात राहणारा माणूस हा मार्क्सच्या सिद्धांताचा केंद्रबिंदू आहे. बुद्धासाठी एकटा माणूस हाच महत्त्वाचा दिसतो. मार्क्सवादाप्रमाणे बुद्धालासुद्धा माणूस त्याच्या सामाजिकच नव्हे तर वैश्विक संबंधासहच अभिप्रेत असला तरी त्याला तो त्या स्वरूपात गवसला नाही. अशा परिस्थितीत एकट्या माणसावर त्याने स्वयं परिवर्तनातून वैश्विक परिवर्तनाची जबाबदारी टाकलेली दिसत असली तरी, त्याचे सामाजिक राजकीय संबंध नाकरलेले नाहीत.[२९]

मार्क्सवाद आणि बौद्ध धर्म ही दोन्ही कृतिशील तत्त्वज्ञाने आहेत. त्यांच्या मानवतावादाच्या विशिष्टपरिप्रेक्ष्याप्रमाणे ती विशिष्ट कृतीचा पुरस्कार करतात. मार्क्स आपल्या ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांतानुसार सामाजिक राजकीय कृतीचा पुरस्कारकरतो. बुद्ध जरी अशा कृतीला जर तो मानवी कल्याणासाठी पूरक असेल तर, अमान्य करत नसला तरी तो मानवी मुक्तीची संकल्पना ऐहिक पातळीवरून आध्यात्मिक पातळीवर घेऊन जातो.

**२.५ समकालीन राजकारणातील समस्या :**

समाजाचे संपूर्ण जीवन हे आर्थिक हेतूने प्रेरित झाले आहे, असे मार्क्सवादी तत्त्वज्ञ मानतात. दुसऱ्या बाजूला संपूर्ण समाज हा जाती-वर्गच्या उतरंडीवर आधारित आहे. असे आंबेडकरवादी तत्त्वज्ञ मानतात. दोन्ही विचारांतून सामाजिक प्रश्न सुटण्याची शक्यता खूपच कमी आहे. मार्क्सवादी तत्त्वज्ञान वैश्विक पातळीवर पोहोचले. मात्र भारतात ते पूर्णत: यशस्वी झाले नाही. कारण भारतातील समस्यांचा उहापोह ह्या तत्त्वप्रणालीत दिसून येत नाही. भारतातील जातिसंस्थेचा संदर्भ मार्क्सच्या विचारांत नाही, आणि भारतीय समाज हा जाती व्यवस्थेवरच उभा आहे, हे ही नाकारता येत नाही. स्त्री वर्गावर तर कमालीची अस्पृश्यता लादण्यात आली. टाकाऊ काम तिला करावे लागते. स्त्री शोषणात आणखी भर टाकणारा

महत्त्वाचा घटक म्हणजे पुरुषसत्ताक पद्धती ह्या पद्धतीमुळे स्त्रीला आणखी गुलाम बनविले जात आहे. हिंदू कोड बिलापासून ते ऑनर किलींगपर्यंतचा काळ लक्षात घेतल्यास स्त्री कधी स्वतंत्र, स्वावलंबी दिसून येत नाही. ह्या अवस्थेला सामाजिक परिस्थिती कारणीभूत ठरत आहे. 'स्त्री' प्रश्नांची गंभीर दखल घेण्यामध्ये अस्तित्वात असणारी विचारसरणी उपयुक्त ठरत नाही. सामाजिक चळवळीकडून देखील स्त्री समस्यांची सोडवणूक होत नाही. जातिव्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी व सोडवणूक करण्यासाठी आंबेडकरी तत्त्वज्ञान पुढे आलेले असले तरी इतिहासात तेही पूर्णत: यशस्वी झालेले नाही. आंबेडकरवादी विचारवंत नेते, कार्यकर्ते व विचारसरणीमध्ये शुद्धता राहिली नाही. कारण ते स्वत:ला आंबेडकरवादी मानत असले तरी त्यांची कृती मधूनच मार्क्सवादासारख्या इतर काही विचारांकडे आकर्षित होते. सर्वच विचारसरणींमध्ये प्रभावी घटकांची दखल घेतली जाते. भारतातील कनिष्ठ जातींची दखल समाजाकडून ह्याच कारणांमुळे घेतली गेली नाही. जातींमध्ये आज नवनवे वर्ग निर्माण झालेले असल्यानेही ही समस्या सुटू शकत नाही. कामगारांची अवस्था बिकट होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मार्क्सवादी सिद्धांतानुसार कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान कामगारांचा दर्जा समान नाही. जातींच्या संदर्भ देऊन कामांचे वाटप होते. भारतात कोणते काम कोणत्या जातीतील माणसाने करावे हे समाजाने निश्चित करून टाकले आहे. कामगार वर्गाचे प्रश्न सोडविण्यासाठी त्या कोणत्या जातीतील नेत्याने नेतृत्व घेतले. ह्यावर खूप मोठ्या प्रमाणावर अवलंबून असते. मार्क्सने तर स्त्रीवर्गाच्या कामगार वर्गात घेतलेच नाही. आंबेडकरवादाचे स्त्री वर्गाचे अस्तित्व मान्य केले. परंतु कामगार स्त्रीचे प्रश्न सुखात ही विचारसरणी देखील अपयशी ठरली आहे. स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने हे सर्व प्रश्न अधिक गंभीर स्वरूपाचे बनले आहे. पिळवणुकीचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहे. समकालीन राजकारणामध्ये जात, स्त्री, शिक्षण, रोजगार इत्यादी प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी कोणतीही एक विचारसरणी अपुरी पडू लागली आहे.

संदर्भटीपा:


१. गायकवाड संजय, 'डॉ. रावसाहेब कसबे यांच्या विचारातील मार्क्स-आंबेडकरांचा वैचारिक समन्वय', टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे, एम. फील. पदवीसाठी सादर केलेला शोधनिबंध, एप्रिल २००९, पृ. क्र. १५

२. कसबे रावसाहेब, 'आंबेडकर आणि मार्क्स', सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६, पृ.क्र. ३४४ ते ३५०

३. पाटील शरद, 'मार्क्सवाद : फुले-आंबेडकर', सुगावा प्रकाशन, पुणे, सप्टे. १९९३, पृ.क्र. १२९ ते १३४

४. मिलीबंद राल्फ, 'मार्क्सीझम ॲण्ड पॉलिटिक्स', आकार बुक्स, पहिली आवृत्ती (भारत), २००६, पृ.क्र. २३

५. कसबे रावसाहेब, 'आंबेडकर आणि मार्क्स', सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६, पृ.क्र. २४३ ते ३७१

६. परदेशी रणजीत, ह्यांचेबरोबर झालेली प्रत्यक्ष चर्चा.

७. कसबे रावसाहेब, 'आंबेडकर आणि मार्क्स', सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६, पृ.क्र. २८४

८. शिंदे गौतम,'डॉ. बाबासाहेब आंबेडकर', पृ.क्र. ८

९. पाटील शरद, 'मार्क्सवाद : फुले-आंबेडकर', सुगावा प्रकाशन, पुणे, सप्टे. १९९३, पृ.क्र. १२९ ते १४५

१०. आंबेडकर बाबासाहेब, 'रानडे, गांधी आणि जीना', नेहा प्रकाशन, नागपूर, ऑक्टो. २००२, पृ. क्र. ४५

११. पाटील निरंजन (संकलन व संपा.), ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची बौद्ध धम्मावरील भाषणे’, प्रज्ञा बोधी साहित्य प्रकाशन, ठाणे, तिसरी आवृत्ती, २०१०, पृ. क्र. ७३,७४

१२. मुठाळ राम,‘भारतीय आणि पाश्चिमात्त्य विचार’, अंशुल पब्लिकेशन नागपूर, पृ.क्र. १११, ११२

१३. मेढी शिरीष (अनु.), ‘हेन्रीच मायकेल (मूळ लेखक), कार्ल मार्क्स लिखित कॅपिटल या ग्रंथाचा परिचय’, सामाजिक विज्ञान केंद्र, ठाणे, २०१३, पृ.क्र. १८६, १८७

१४. कसबे रावसाहेब, ‘आंबेडकर आणि मार्क्स’, सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६, पृ.क्र. २७७

१५. Ambedkar Babasaheb, Dr. Babasaheb Ambedkar writing and speeches, तिसरा खंड, महाराष्ट्र शासन १९८७

१६. कोसंबी धर्मानंद, ‘बुद्ध, धर्म आणि संघ’, रघुवंशी प्रकाशन, मुंबई, पृ.क्र. ५५ते५६

१७. कसबे रावसाहेब, ‘आंबेडकर आणि मार्क्स’, सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६, पृ.क्र. ३५१

१८. बंदिष्टे डी.डी., ‘गौतम बुद्धांचा धम्मच जगाला वाचवू शकेल’, एक्सप्रेस पब्लिशिंग हाउस, कोल्हापूर, मे. २०१०, पृ. क्र. ११९

१९. पानसरे गोविंद, ‘मार्क्सवादाची तोंडओळख’, श्रमिक प्रकाशन, कोल्हापूर, पृ. क्र. १११

२०. सुमंत यशवंत व पुंडे (संपा.), ‘महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९८८, पृ. क्र. ३१५

२१. पाटील निरंजन, ‘डॉ. बाबासाहेबांची बौद्ध धर्मावरील भाषणे’, प्रज्ञाबोधी साहित्य प्रकाशन, ठाणे, ३ री आवृत्ती, २०१०, पृ.क्र. १०२

२२. कुबेर वा.ना., 'आधुनिक भारताचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर', प्रकाशन विभाग माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार १९८५, पहिली आवृत्ती, पृ.क्र. ७९, ८०

२३. ढमाले किशोर ह्यांचे बरोबर प्रत्यक्ष झालेली चर्चा

२४. कसबे रावसाहेब, 'आंबेडकर आणि मार्क्स', सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६, पृ.क्र. ३२४

२५. वैद्य भाई ह्यांचेबरोबर प्रत्यक्ष झालेल्या चर्चेवरून

२६. पाटील शरद, 'मार्क्सवाद : फुले, आंबेडकर', सुगावा प्रकाशन, पुणे, १९९३, पृ. क्र. ७,८

२७. कसबे रावसाहेब ह्यांचेबरोबर झालेली प्रत्यक्ष चर्चा

२८. कसबे रावसाहेब ह्यांचेबरोबर झालेली प्रत्यक्ष चर्चा

२९. सांकृत्यायन, चट्टोपाध्याय, बलराममूर्ती, शर्मा'बुद्धविचार:मार्क्सवादी दृष्टिक्षेप', लोकवाङ्मयगृह, मुंबई, चौथी आवृत्ती, २०११, पृ.क्र. ५ ते १६

प्रकरण तिसरे

# मार्क्स-आंबेडकर समन्वय आणि जातिव्यवस्थेची चिकित्सा

३.० प्रस्तावना

३.१ जातिव्यवस्था एक संकल्पना

३.२ जातिव्यवस्था आणि ब्रिटिश काळ

३.३ जातिव्यवस्था आणि स्वातंत्र्योत्तर काळ

३.४ जातिव्यवस्थेच्या परिप्रेक्ष्यातून सद्यकालीन सामाजिक आणि राजकीय विश्लेषण

३.४. १) कार्ल मार्क्स आणि जातिव्यवस्था

२) कार्ल मार्क्सची अन्वेषण पद्धती व भारतीय समाजव्यवस्था

३) कार्ल मार्क्सचे तत्त्वचिंतन

४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जातिव्यवस्था

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतातील जातिव्यवस्थेची मूलभूत समस्या

६) पाया आणि ईमला

३.५ मार्क्स-आंबेडकर समन्वयाच्या दृष्टिक्षेपातून जातिव्यवस्थेची चर्चा

१) समाजाचे बौद्ध तत्त्वज्ञानासंबंधी विश्लेषण

२) समन्वयवाद आणि भारतीय जातिव्यवस्था

प्रकरण तिसरे

# मार्क्स-आंबेडकर समन्वय आणि जातिव्यवस्थेची चिकित्सा

## ३.० प्रस्तावना:

भारतीय समाजरचनेचा मूळ आधार जात व धर्म आहे. ज्यांना जातीचे चटके भोगावे व सहन करावे लागले, त्यांनी कधीही जात टाकण्याचा प्रयत्न केला नाही. एवढेच नव्हे तर जात ही परमेश्वर निर्मित आहे, असे मानून ती सांभाळण्याचा खटाटोप केलेला आहे. पुढे जाऊन जातीचे नियम मोडणे म्हणजे "अधर्म" मानले गेले. जात ही ईश्वरनिर्मित नसून ती मानवनिर्मित आहे, हे सर्वप्रथम गौतम बुद्धांनी वैज्ञानिक आधाराने सिद्ध केले. जातिव्यवस्था निर्माण केली नसून ती मनूच्याही अगोदर अस्तित्वात होती. तो फक्त जातीचा समर्थक होता,मनुने जातीला तत्त्वज्ञानाचे रूप दिले. प्रचलित जातिव्यवस्थेला त्याने संहितेचे रूप दिले व जातिधर्माचा प्रचार केला.[१] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील विषमतेचा समाजशास्त्रीय अभ्यास केला. त्यांनी भारतातील जाती, त्यांचा उगम आणि विकास हा निबंध कोलंबिया विद्यापीठात १९१३ साली सादर केला. जातिभेद निर्मूलन हा निबंध डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी १९३५ साली लाहोरच्या जातपात-तोडक मंडळाच्या संमेलनात सादर केला. ह्या दोन्ही निबंधाचे एकत्रीकरण १९४४ ला हिंदूंची जातिप्रथा व ती मोडण्याचा मार्ग ह्या नावाने प्रसिद्ध झाले. अस्पृश्य मूळचे कोण? व ते अस्पृश्य कसे बनले? हा ग्रंथ त्यांनी प्रसिद्ध केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ह्या संशोधनामुळे भारतीय समाजाच्या समाजशास्त्रीय अभ्यासाचा पाया घातला गेला. त्यानंतर दास-

शूद्रांची गुलामगिरी हा ग्रंथ दोन खंडातून १९८२ आणि १९८७ मध्ये शरद पाटील ह्यांनी वर्णव्यवस्था व जातिव्यवस्था हे विषय घेऊन्न लिहिला. तसेच १९९३ मध्ये जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व ह्यानंतर २००३ मध्ये जात्यान्तक भांडवलदारी लोकशाही क्रांती व तिची समाजवादी पूर्ती प्रसिद्ध केले, मात्र डी.डी. कोसंबी, देवीप्रसाद चटोपाध्याय, प्र.रा. देशमुख आदी विचारकांनी मते मांडली त्यावरून असेच स्पष्ट होते की जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था विषयी सामाजिक विषमतेच्या समाजशास्त्रीय संशोधनाचे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनाच जाते. “जातिव्यवस्थेची सुरुवात नेमकी कशी आणि कधी झाली,ह्याचे बिनचूक उत्तर मिळणे कठीण आहे. जातिव्यवस्था ही वर्णव्यवस्थेनंतरची व्यवस्था आहे. प्राचीन स्त्रीप्रधान मातृवंशक गणव्यवस्थेपासून आर्याच्या वसाहतीमधील चातुर्वर्ण्यव्यवस्थेपर्यंत अनेक टप्प्यांतून जातिव्यवस्थेची पार्श्वभूमी विकसित होत आली. वर्णप्रथेच्या मावळतीत जातिप्रथेची उगवती आहे.”[२] तरीही अनार्यांच्या वसाहतीत शूद्र वर्ण नव्हता. शूद्र वर्ण आर्यांनी वस्ती केलेल्या जनपदांपुरताच मर्यादित होता. ब्राह्मण जनपदांमध्ये, वा जेथे सापेक्षत: वरचढ मातृवंशक कृषक समाजांनी आर्यांना समजावून घेतले होते. तेथे शूद्र वर्ण नव्हता.[३] म्हणजे जातिव्यवस्थेचा मूळ पाया जो शूद्र वर्ण त्याची निर्मिती अनार्याच्या वसाहतीत झालेली नाही. सिंधू समाजव्यवस्थेच्या ढाच्यात आर्य चातुर्वर्ण्यव्यवस्थेला अनुरूप असे बदल करण्यात आलेले आहेत.[४] बुद्धाने वर्णव्यवस्थेला विरोध केला, पण त्याचबरोबर जातींचा जन्म सुरू झाला. समाजव्यवस्था ही प्रवाहित असते, त्या प्रवाहाबरोबरच सामाजिक व्यवस्थेची निर्मिती होत असल्यामुळे जातिव्यवस्थेच्या जन्माचा विशिष्ट बिंदू शोधणे कठीण बनते.[५]

### ३.१जातिव्यवस्था एक संकल्पना :

भारतात समाजव्यवस्था ही इतर देशांतील समाजव्यवस्थेप्रमाणेच प्रवाहित आहे आणि ह्या प्रवाहाबरोबरच सामाजिक व्यवस्थेची निर्मिती देखील झालेली असल्यामुळे जातिव्यवस्थेच्या

संशोधकांमध्ये भर पडत चालली आहे. भारताबाहेर जातिव्यवस्था अस्तित्वात नसल्याने जातिव्यवस्थेची सुरुवात नेमकी कशी झाली. ह्याबाबत संभ्रम निर्माण होतो, असे असले तरी जाती हा शब्द जातिव्यवस्थेच्या अर्थी प्रथम फक्त बौद्ध विनयपिटकात (इसवी पूर्व ६ वे शतक) वापरलेला आहे.[६] वैदिक साहित्यात तो केवळ कात्यायन श्रोत सूत्रात आलेला आहे, पण तेथे कुल वा गोत्र ह्या अर्थी वापरलेला आहे. ह्यावरून हे स्पष्ट होते की, जातिसंस्था बुद्धपूर्व काळात म्हणजे वैदिक समाजात नव्हती. संबंध बुद्धपूर्व काळातील भारतीय समाजात केवळ वर्ण हीच संस्था होती.[७]विविध विचारवंतांनी जातींच्या निर्मितीवर प्रकाश टाकला. बुद्धकाळात म्हणजे इसवी पूर्व सुमारे ६०० ते ३०० च्या सुमारास धंद्यांवरून जातींची निर्मिती झाल्याचे दिसते. धर्मसूत्रांच्या निर्मितीबरोबर प्रकटपणे जातिव्यवस्थेची निर्मिती सुरू झाली. विविध धंदे करणाऱ्या गणांची त्यांच्या धंद्याच्या नावाने ओळख सुरू झाली.वैदिक धर्मसूत्रातील जातीबद्दलची माहिती पाहिल्यानंतर सर्वसाधारणपणे जातिव्यवस्था सामंतप्रथाक समाजव्यवस्थेतून दृढ झाली असल्याचे दिसून येते.

सामंतप्रथा बुद्धकाळापासून सुरू झाली. लहान लहान दासगण नवीन त्यांच्या धंद्यावरून ओळखले जाऊ लागले, अशी धंद्यावरून जातीची निर्मिती सुरू झाली.[८]डॉ. सुमंत मुरंजन ह्यांच्या मते जातिसंस्था ही पुरोहित वर्ग वर्चस्वामुळेच आतापर्यंत हजारो वर्षे स्थिरावली. मात्र वर्णाची निर्मिती स्त्री सत्तेत झाली. आर्याच्या वसाहतीत वर्णव्यवस्थेचा विकास झाला. वर्णव्यवस्थेच्या पोटातच दासप्रथेचा उगम होऊन त्यातून जातींची निर्मिती झाली. वेगवेगळे गण दास-कर्मकर बनले. गणातून श्रेणी व नंतर जाती असे संक्रमण होऊन जातींची निर्मिती झाली. दा.ध. कोसंबी यांनी असे स्पष्ट केले की, श्रेणीवरून जाती व व्यवसायांची नावे स्पष्ट होतात. त्यावरून त्यांची उत्पत्ती गणातून झाली हे स्पष्ट होते. जातिव्यवस्थेचा संघर्ष हा मानवी इतिहासातील एक अद्वितीय संघर्ष आहे.ह्या संघर्षातून भारतात एका वेगळ्या तत्त्वज्ञानाची निर्मिती झाल्याचे दिसते. जातिविकासाचा शेवटआपणास अस्पृश्यतेमध्ये दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या

'भारतातील जाती त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास' या पुस्तकात जातीबाबत विविध विद्वानांच्या व्याख्यांचा संदर्भ घेतला आहे, तो खालीलप्रमाणे :

१. **फ्रेंच विद्वान सेनार्ट -**'तीव्र वांशिक आधारावर एक घनिष्ठ संघटित संस्था, विशिष्ट पारंपरिक आणि स्वतंत्र संघटनांनी युक्त ज्यामध्ये एक प्रमुख पंचायत असते. ज्यांच्या बैठकी वारंवार भरतात, काही उत्सवाप्रसंगी मेळे भरविण्यात येतात. जगातील सर्व लोकांचा एकसारखा व्यवसाय असलेला ज्यांचे संबंध केवळ रोटी-बेटी आधारावर असलेला जातीत व्यक्तींची मर्यादा जातीनियमांनी ठरवून दिलेली व वेळप्रसंगी नियम मोडणाऱ्यांना शिक्षा आणि बहिष्कारसुद्धा घडवून आणणारा सक्षम असलेला समाज त्यातही जातिनियमांबाबत कठोर असलेला समूह' म्हणजे जात होय.
२. **नेसफिल्ड -** जात म्हणजे जमातीचा एक वर्ग जो अन्य कुठल्याही वर्गाशी कसल्याही प्रकारचा संबंध नाकारता आणि आपल्या स्वत:च्या जमातीतील लोकांव्यतिरिक्त अन्य कुणाशीही सोयरीक करू शकत नाही वा खानपान करू शकत नाही.
३. **सर एच. रिजले -** जाती म्हणजे कुटुंब किंवा कुटुंबाचे मिळून बनलेले संघटन. सामायिक नाव असलेले विशिष्ट व्यवसायाशी संबंधित असलेले एखाद्या दैवी किंवा पौराणिक पितरांचे वंशज असल्याचा दावा करणारे आणि वंशपरंपरागत व्यवसाय अनुसरण करणारे एकजिनसी लोक म्हणजे जात होय.
४. **डॉ. केतकर -** जात ही केवळ त्याच समूहात जन्माला आले त्यांची मिळून बनत असते व कठोर सामाजिक नियमांनी व्यक्तीला समाजाबाहेर विवाह करण्यास सदस्यांना सक्त मनाई असते.[९]

वरील व्याख्यांचा अभ्यास व परीक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केल्यानंतर ते या मतापर्यंत आले की, सदरच्या व्याख्या परिपूर्ण नाही, कारण जातींच्या घडणीविषयाचा उल्लेख

स्पष्टपणे केलेला नाही.त्यांच्या मते सजातीय (गटांतर्गत) विवाह प्रथेचे गोत्रबाह्य विवाह करण्याच्या रूढींवर मिळविलेला विजय म्हणजे जातींची निर्मिती होय. सजातीय विवाहपद्धती हे जातीचे मुख्य वैशिष्ट्ये त्यांनी मानले. मनूने जातीची संहिता निर्मिलेली नव्हती आणि तो तसे करूही शकत नव्हता. मनूच्याही फार आधीपासून जात अस्तित्वात होती. तो तिचा मात्र पुरस्कर्ता होता आणि म्हणूनच त्याने तिला तात्त्विक रूप दिले.[१०]भारतातील पुरातन काळातील हिंदू समाज ब्राह्मण किंवा पुरोहित, क्षत्रिय किंवा सैनिक वर्ग, वैश्य अथवा व्यापारिक वर्ग आणि शूद्र अथवा श्रमिक वर्ग ह्या चार वर्गामध्ये विभाजित झाला. श्रम विभागणीमुळे वेगवेगळ्या जातींमध्ये समाज विभागला. हे वर्ग बंदिस्त होऊन त्यांच्यात जातींची निर्मिती झाली.

ब्रिटिश राजवटीमुळे वर्गीय समाज निर्माण झाला. जातिबद्ध समाजरचनेमुळे जातिनिर्मूलनाचा विचार उच्च जातींच्या हितसंबंधांना धक्का पोहोचविणारा होता. मुळात जाती निर्मूलनाचा विचार अब्राह्मणी परंपरेतून पुढे आला. ब्राह्मणी परंपरेतून जाण्याऐवजी विचारांच्या पातळीवर जाती मीमांसा झाली. ह्या विचारालाच पुरोगामी विचार म्हटले जाते. मात्र त्याच्या विचारात क्रांतिकारी पणा दिसून येत नव्हता. जातिभेद निर्मूलनाचा कार्यक्रम त्यांनी राष्ट्रवादी बनविला होता. जातिसंस्था ही नेहमी बदलत गेली. भारतामध्ये जाती ह्या पक्क्या बनत गेल्या कारण जात ही हिंदू धर्माप्रमाणे परिदृढ होती. सामाजिक स्तर यातून समजतात.

## ३.२ जातिव्यवस्था आणि ब्रिटिश काळ :

भारतीय समाज जातींच्या उतरंडीवर उभा आहे. विषमतेचा पाया ह्या समाजास लाभल्याने सर्व जातींना समान स्थान व समान अधिकार दिलेले नाहीत.[११]गेली अनेक वर्षाचा इतिहास पाहिला तर असे दिसते की, संत महात्म्यांनी ह्या समाजामध्ये वैचारिक क्रांती घडून येण्यासाठी आटोकाट प्रयत्न केले. समाजामध्ये विषमता नष्ट करून समता स्वीकारण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

भारत देशाचा विचार करता असे दिसते की, सर्व जाती धर्माचे संत भारतात होऊन गेले. उदा. तुकाराम, नामदेव, ज्ञानेश्वर, एकनाथ, चोखामेळा, गोराकुंभार, जनाबाई, सावतामाळी, सेना न्हावी, इ. ब्राह्मण संत एकनाथ महाराच्या घरी जेवल्याचेही उदाहरण ह्याच देशाचे आहे. ह्यातून माणसामाणसात काही फरक नाही हा विचार रुजविण्याचा प्रयत्न केला.मात्र जातीयतेत गुरफटलेला भारतीय समाज हजारो वर्षे ह्या पारंपरिक चाकोरीतून किंचितही बदल न होता विषमतेच्या पायावर व्यवहार करीत आहे.गेल्या तीनशे वर्षापासून भारतीय समाज इंग्रज, पोर्तुगीज व फ्रेंच ह्यांच्या संपर्कात आला. युरोपियन समाजाच्या समतेच्या व्यवहारातून आपल्या समाजात नव्या जाणिवा निर्माण होऊलागल्या. विषम समाजरचनेचे तोटे व समान समाजरचनेचे फायदे प्रत्यक्ष अनुभवातून आपल्याला समजू लागले. त्यातून नवा प्रबोधनाचा काळ सुरू झाला. त्याची सुरुवात शिवाजी महाराजांपासूनझाली[१२] असे असले तरी पेशव्यांचीसंपूर्ण राज्यव्यवस्था मनुस्मृतीवर आधारित अशी होती. इंग्रज राजवटीच्यामुळे दलित, बहुजनांच्या मनात मोठी आशा निर्माण झाली. इंग्रजांच्या आगमनामुळे धर्माधिष्ठित सत्तेला हादरे बसू लागले. त्यामुळे श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव नष्ट होणार होता. लोकशाहीची रुजवणूक होणार होती.[१३]ब्रिटिश काळात १९१३ मध्ये भारतातील अनेक प्रांतात शिक्षणाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी शासनाकडून आर्थिक मदत देऊ केली.त्यांनी जाती-जमाती व मुस्लिमांच्या शैक्षणिक हिताचे धोरण स्वीकारले. हिंदुस्थान हा विविध जातीजमातींचा देश असून सर्व जाती जमाती सामाजिक आणि आर्थिक स्थिती बाबत असमान आहेत. ही परिस्थिती सुधारण्यासाठी काही वर्गास विशेष सवलती देणे आवश्यक आहे. समाजातील जाती संरचनेतील सर्वाधिक कनिष्ठ स्तरावर ज्या जाती आहेत, त्यांना विशेष सवलती देणे आवश्यक आहे. असे धोरण ब्रिटिशांनी स्वीकारले. ह्यावरून असे स्पष्ट होते की, मनुवादी पुरस्कृत शासनापेक्षा ब्रिटिश काळ हा जातिव्यवस्था मोडण्यासाठी अनुकूल होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या नेतृत्वाखाली मुंबई प्रांतिक असेंब्लीवर १० जानेवारी १९३८ साली एक मोर्चा नेण्यात आला होता. त्या मोर्चात भाषण करताना ते म्हणतात की,

कष्टाळू लोकांची संघटना करावयाची झाल्यास त्यात जातिभेद धर्मभेद ह्यांना मुळीच थारा देता कामा नये. पुढे ते म्हणतात, खरे पाहिजे तर जगात फक्त दोनच जाती आहेत. पहिली श्रीमंताची व दुसरी गरिबांची. ह्याशिवाय तिसरा वर्ग म्हटला म्हणजे मध्यम वर्ग होय.[१४] ह्याही पुढे जाऊन ब्रिटिशकाळात त्यांनी राज्यसमाजवादाचा पुरस्कार करून जातीपातीचा विचार मांडून भारतातील जातिव्यवस्था मोडून आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासवर्गीयांनाविकसित करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या अनेक समाजसुधारकांनी प्रयत्न केले आहेत. भारतातील जातिव्यवस्था मोडून त्याजागी जातिविहीन समाज निर्मितीचे स्वप्न अनेक समाज सुधारकांनी पाहिले. ह्या स्वप्नांची पूर्तता स्वातंत्र्योत्तर काळात विविध संघटना, संस्था, दबावगट, हितसंबंधी गट, राजकीय पक्ष इत्यादींची उभारणी करून त्यांच्यामार्फत जातिव्यवस्थेविरुद्ध जोरदार संघर्ष सुरू केलेला आहे. अशा क्रांतिकारक समाजसुधारकांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज, म. फुले हे समाजसुधारक आघाडीवर होते.

## ३.३ जातिव्यवस्था आणि स्वातंत्र्योत्तर काळ

भारतातील विविध विचारवंतांनी फार पूर्वीपासून भारतीय जातिसंस्थेचा विचार केलेला आहे. साधारणत: १८५० पासून जातिसंबंधी सातत्याने विचार मंथन होत राहिले आहे. भारतीय दलितांनी ब्रिटिशांना जी मदत केली, त्यामागे ब्रिटिश भारतातील जातीयता संपवतील अशी अपेक्षा ठेवली होती आणि स्वातंत्र्योत्तर काळ तरी खऱ्या स्वातंत्र्याचा असेल अशीही अपेक्षा होती. लोकहितवादी, महात्मा फुले, राजाराम शास्त्री भागवत, इतिहासाचार्य वि.का. राजवाडे, महर्षी वि.रा. शिंदे, प्रा. श्री. म. माटे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. इरावती कर्वे, डी.डी. कोसंबी, कॉ. शरद पाटील इ. विचारवंतांनी जातिसंस्थेसंबंधात भरपूर चिकित्सा केली आहे. महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार या १९८८ साली प्रकाशित झालेल्या ग्रंथात अनेक विचारवंतांनी भारतातील जातीसंस्था नष्ट करण्याबाबत मांडलेले विचार महत्त्वपूर्ण ठरतात.[१५]

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात सामाजिक सुधारणा आणि राजकीय स्वातंत्र्य ह्या संदर्भात विचार मांडले गेले. आपापल्या गटांनी भारतातील स्वातंत्र्योत्तर काळातील जातिव्यवस्थाविषयक भूमिका घेतल्याचे अनेक पुरावे आज इतिहास देतो. स्वातंत्र्योत्तर काळात, श्री.म.माटे ह्यांच्यासारख्या विचारवंताना महात्मा गांधीजींनी जातिसंस्थेबाबत जे विचार मांडले, अस्पृश्यतेविषयक जे विचार मांडले ते पटले नव्हते अर्थात महात्मा गांधीजींच्या अस्पृश्यताविषयक विचाराला अध्यात्माची व धर्मविचाराची बैठक असल्यानेच हा प्रश्न निर्माण झाला. महात्मा फुलेंनी तर जातिसंस्थेवर प्रहारच केला. ईश्वर कल्पना नाकारून त्यांनी निर्मिकाची संकल्पना मांडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदूची ईश्वर कल्पना नाकारली आहे आणि बौद्ध तत्त्वज्ञानाचा आश्रय घेतला.

हिंदुधर्माने ईश्वर ही संकल्पना मानून व्यक्तीच्या जीवनाच्या दोऱ्या ईश्वराच्या हाती दिल्या. तसेच जाती ह्या ईश्वरनिर्मित आहेत असे सांगून व्यक्तीला जन्मत:च जातीच्या चौकटीत बंदिस्त करून टाकले. व्यक्तीला अशा दुहेरी कैचीत जेरबंद करणारा धर्म म्हणून डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर केले.[१६]

भारतात स्वातंत्र्योत्तरकाळात देखील जाती प्रश्नाला अपेक्षेपेक्षा जास्त महत्त्व प्राप्त झाले.जातिव्यवस्था ही हिंदू धर्माचीच निमिर्ती आहे, बहुजन शिक्षित ही परिस्थिती बदलण्यास कितपत पुढे येतो ह्याबद्दल शंका निर्माण होते. आताच्या नवीन औद्योगिक धोरणाचे परिणाम असे दिसून येतात की, समाजामध्ये कनिष्ट, मध्यम आणि  वरीष्ठ असे वर्ग निर्माण झाले आहेत. दलित समाजातील ८० टक्के जनता ही ग्रामीण विभागातून शेतीवर मोलमजुरी करून शेतमजुरांचे कष्टकरी शेतकरी म्हणून गरीब शेतकऱ्याचे जीवन जगत आहे. तसेच ह्या समाजापैकी जे लोक खेडी सोडून शहरात उदरनिर्वाहासाठी आले आहेत हे शहरातील वीटभट्ट्यांवर, बांधकामावर, स्लॅब टाकणे, ठिकठिकाणी हमाली करणे, नगरपालिका, महानगरपालिकेतून साफसफाईची कामे करणे इत्यादी अंगमेहनतीची कामे करून निरनिराळ्या झोपडपट्ट्यांत जीवन जगत आहेत.[१७]

ही सर्व परिस्थिती का निर्माण झाली ह्याबाबत विश्लेषण करावयाचे झाल्यास आपणास असे लक्षात येते की, स्वातंत्र्य चळवळीशी समांतरपणे चालू असलेल्या जातिव्यवस्थेच्या दलित चळवळीच्या मूल्यमापनाबद्दल गंभीर अशा चुका झालेल्या दिसतात. दहा टक्के लोकांनी आपला विकास केला. केंद्रात व राज्यात फार मोठा काळ कॉंग्रेसच्या राजवटी होत्या. ह्यांनी ज्या ज्या नव आर्थिक धोरणांचा स्वीकारव अवलंब केला ह्याचा सर्वात मोठा फटका कनिष्ठ जातीलाच बसला आहे. आर्थिक व औद्योगिक मंदीचा फटका ज्या वर्गाला बसला तो वर्ग ह्याचे खापर कनिष्ठ जातीतील समाजावर फोडतो आहे. अशा परिस्थितीत शासनाच्या फसव्या धोरणामुळेच समाजातील इतरही कष्टकरी समाज विभागाचे बेकारी, शेतीविषयक आणि जातिविषयक प्रश्न निर्माण झाले आहेत. शासनाला नेतृत्वाच्या अपरिपक्वतेमुळे जातिव्यवस्थेसारखे प्रश्न स्वातंत्र्योत्तर भारतात परिणामकारकपणे सोडविले जात नाही, हे अग्रक्रमाने लक्षात घ्यावे लागते. ह्यात आलेले किंवा येत असलेले अपयशाचे कारण फक्त दलित वर्गच आहे असा आभास इथला राज्यकर्ता वर्ग निर्माण करण्यात यशस्वी झाला आहे. अशा वातावरणात विदर्भातील खैरलांजी नावाच्या खेड्यातील सवर्णांनी पाच एकर जमिनीच्या तुकड्यावर स्वावलंबी जीवन जगण्याचा प्रयत्न करणाऱ्या भैयालाल भोतमांगे ह्यांच्या पत्नी व मुलींची गावातून नग्न धिंड काढून चावडीवर सामूहिक बलात्कार करून मायलेकींसह त्यांच्या दोन्ही मुलांना अमानुषपणे ठार करून त्यांची प्रेते कॅनॉलमध्ये फेकून दिली. मिडियाने मात्र समाजाच्या उच्चभ्रू वर्गातील स्त्रियांवर झालेल्या अन्यायाला जशी वाचा फोडली, तशी ह्या मायलेकींच्या बलात्कार व हत्याकांडाला फोडली नाही. स्वातंत्र्योत्तर काळात अशा परिस्थितीत असंतोष व्यक्त करायचाच नाही अशी स्थिती निर्माण केली. ह्यासाठी तळातल्या जातीतील माणसानेच यावर उपाय शोधला तो असा की, आपापल्या जातीचा, कष्टकऱ्यांचा एक स्वतंत्र वर्ग किंवा गट निर्माण करून राज्यकर्त्यां विरुद्ध उभा करायचा. जातीयतेसारखा प्रश्नसुद्धा भांडवली राज्यकर्त्यांनी घेतलेल्या धोरणातून निर्माण झाले आहेत. हे सद्यस्थितीतील दलित, तळागाळातल्या, कष्टकरी समाजाला समजले आहे.

नवीन आर्थिक व औद्योगिक धोरणामुळे तसेच सरकारच्या शैक्षणिक धोरणामुळे गरीब व दलितांना शिक्षण घेणे पूर्वीपेक्षा कठीण झाले आहे. खासगी क्षेत्रात राखीव जागा असण्याला गुणवत्तेच्या कारणामुळे जातीयवादी व कारखानदारांकडून तीव्र विरोध केला जात आहे. शासनाच्या ह्या अन्यायी धोरणामुळे ग्रामीण भागातील बहुजन समाजात तीव्र असंतोष पसरला आहे. गायरान पोट भरण्यासाठी जेव्हा दलित मागतो, तेव्हा त्याला आजही गावाबाहेर हुसकावून देतात. ग्रामीण भागात उपासमार होण्याऐवजी तो शहरात येतो, कागद गोळा करणे, काचा, पत्रा गोळा करणे, गवंडीकाम, स्वच्छता साफसफाईचे गलिच्छकाम करतो. एवढेच नव्हे तर चोऱ्या-माऱ्या करण्याची वेळही त्यांच्यावर येते गावकुसाबाहेर असणाऱ्या जाती, समाज गटावर असा अन्याय सातत्याने चालू आहे. भारतीय माणसाच्या मनावर स्वातंत्र्योत्तर काळात जातिसंस्थेने ताबाच मिळविला आहे. भारतीय समाजव्यवस्थेमध्ये अनेक वर्षापासून जातिसंस्था कार्यरत असून जातिसंस्थेने कधी जात तर कधी धर्माचा आधार घेतलेला आहे. काळानुसार जातिसंस्थेने हे आधार बदलल्याचे चित्र दिसते. वैज्ञानिकता आणि जागतिकीकरणाने सुरुवातीला जातीने पुनर्जन्म, पूर्वजन्म इ. सारख्या कल्पनेचा जोआधार घेतला होता तो आधार तसेच व्यवसायावरून जातिव्यवस्था ठरविण्याची जी परिस्थिती होती ती जागतिकीकरणामुळे बदलत चालली आहे. म्हणजेच स्वातंत्र्योत्तर काळात जात आणि व्यवसाय ह्यांचे संबंध बदलत जात आहेत.

समाजप्रबोधन संस्थेच्या वतीने दि. २२ ऑगस्ट १९९९ रोजी अर्थबोध पुणे, ह्या संस्थेच्या सभागृहामध्ये जातिसंस्थेचे बदलते आधार ह्या विषयावर परिसंवाद आयोजित केला होता. ह्या परिसंवादामध्ये प्रा. डॉ. स.ह.देशपांडे, प्रा. डॉ. सुहास पळशीकर, प्रा. डॉ. राजेंद्र व्होरा, प्रा.नितीन बिरमल, प्रा. डॉ. राजेश्वरी देशपांडे ह्यांनी आपापले निबंध सादर केले. ते निबंध जातिसंस्थेचे बदलते आधार ह्या नावाने प्रकाशित झाले आहे. (२००२) त्यातील काही मतमतांतरे, परीक्षण ह्यांचा सारांशरूपाने पुढीलप्रमाणे सांगता येईल. जातिसंस्थेचे आधार कालानुक्रमे कसे बदलत गेले हे ह्या परिसंवादातून अधिक स्पष्ट झाले.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९८४ पर्यंत नेहरुप्रणीत मिश्र अर्थव्यवस्थेचे प्रारूप कार्यरत होते. समाजवादी उद्दिष्टे साध्य करण्याकरिता ही व्यवस्था स्वीकारली असली तरी शहरी अर्थव्यवस्थेतील भांडवलदारांना संरक्षण व ग्रामीण अभिजन जातींकरता आर्थिक विकास ह्याकरता भांडवल पुरविणे असे त्यामागे कारण असावे असे दिसते. सरकारी नियंत्रणाखाली महत्त्वाची उत्पादनक्षेत्रे होती. वाहतूक, आरोग्य व शिक्षण ही सेवाक्षेत्रे देखील सरकारी नियंत्रणाखाली होती. ह्या मिश्र अर्थव्यवस्थेचा परिणाम म्हणजे उत्पादन क्षेत्रात संरक्षण मिळाल्याने भांडवलदार अधिक सबळझाले. ग्रामीण भागातील शेतीची मालकी असणाऱ्या जाती हरितक्रांतीमधून मूबलक व स्वस्त पाणीपुरवठा, वीजपुरवठा, बी-बियाणे, खते, औषधे, ग्रामविकासासाठी अनुदाने व योजना ह्यामुळे आर्थिक दृष्टीने अधिक सबळ झाल्या. राजकीय सत्ता ज्यांच्या हाती असल्याने शेतीक्षेत्राला पतपुरवठा, शेतीमालाच्या किंमतीची हमी ह्यामुळे कुठल्याही स्पर्धेला तोंड न देता, त्याचा नफा सुरू राहिला. कापूस एकाधिकार योजना तोट्यात असून चालू राहिली. शेतकरी जाती व व्यापारी दोघेही नफा कमवीत होते. ह्या नफ्यापासून ग्रामीण भागातील कनिष्ठजातीमधील अल्पभूधारक वंचित राहिला. हा शेतकरी पावसाच्या पाण्यावर अन्नधान्याचे उत्पादन करीत राहिला व कालांतरानेशेतमजूर म्हणून काम करू लागला. महाराष्ट्रात रोजगार हमीवर काम करणारे मजूर, शेतमजूर, अल्पभूधारक, शेतकरी, साखर कारखान्यांवर काम करणारे ऊसतोडणीकामगार ह्यांचा आर्थिक स्तर खालचा आहे. तसेच ते कनिष्ठ जातीमधील आहेत हे दिसून येते.[१८]

मिश्र अर्थव्यवस्थेचा परिणाम असा झाला की, उच्च जातीलाच समाजाचे नेतृत्व करायची संधी मिळाली. बहुजन समाजाकडे जमिनीची मालकी नसल्यामुळे भांडवलदारांचाच फायदा जास्त झाला. जातिअंतर्गत नवा वर्ग निर्माण झाला असेही म्हटले जाते की, जातिव्यवस्था मोडकळीस आली असली तरी जात मात्र शिल्लक राहिली आहे. जागतिकीकरणाचे वारे सुरू झाले आणि आर्थिक बदल व विषम समाजव्यवस्था हा वाद उभा राहिला. भारतीय

समाजव्यवस्थेबाबत असेही निरीक्षण आहे की जातिसंस्थेने भांडवलशाहीशी आणि मिश्र अर्थव्यवस्थेशी निरनिराळ्या पातळ्यांवर आपले नाते जुळवून घेतले आहे. म्हणून जागतिकीकरणाविरुद्धचा संघर्षाचा भाग म्हणून जातिप्रश्नाचीही दखल घेऊनच राजकीय डावपेच आखावे लागतील. स्वातंत्र्योत्तर काळात नागरी समाजाची जडण घडणही विसकळीत झालेली आहे, असे दिसते. विषमतेवर, जातीय द्वेषावर धर्म-कर्मकांडअंधश्रद्धा ह्या विविध पैलूंवर अवलंबून राहून लोकशाही मूल्यांचा स्वीकार केलेला दिसून येतो. भारतीय राज्य व्यवस्थेला नागरी समाज घडविता आला नाही. कारण जातिव्यवस्था मोडीत काढण्यासाठी नागरी समाज व्यवस्थित पाहिजे आणि आपल्याकडे त्याच बाबींची उणीव आहे. जातिअंतर्गत वर्ग मोडीत काढण्यासाठी विविध सामाजिक चळवळींची मदत घ्यावी लागणार आहे. कोठारी रजनी ह्यांच्या मते, येथून पुढील काळात जातिअंताचे राजकारण घडवताना सामाजिक चळवळींनी आपली राज्यसंस्थेविषयक भूमिका देखील एकवार तपासून पहायला हवी. कल्याणकारी, लोकशाही राज्याकडून असणाऱ्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने येथील सामाजिक चळवळी राज्यसंस्थेच्या भूमिकेविषयी निराश झालेल्या दिसतात, असे असले तरी मोठमोठी शहरे वसली, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खेड्यांऐवजी शहरात जातिव्यवस्था मोडण्यासाठी अनुकूल परिस्थिती लवकर निर्माण होईल, अशा आशयाचे विचार मांडले[१९] प्रा. डॉ. राजेंद्र व्होरा यांच्या मते, शहरीकरणामुळे जात जाते असे म्हटले जाते, पण हे खरे दिसत नाही.[२०] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते ग्रामीण भागात जातीयता जोपासण्याचे प्रमाण अधिक आहे. जातिव्यवस्थेमुळे माणसाला माणूस म्हणून जगणे मुश्कील होते. आजही अनेक क्षेत्रात ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातही समाजकारणात, अर्थकारणात आणि राजकारणातही जातिसंस्था टिकूनआहे. डॉ. व्होरांच्या मते जातिसंस्था चिवट आहे. स्वत:चे अस्तित्व कायम ठेवण्यासाठी बदलत्या परिस्थितीला प्रतिसाद देत ती बदलते आहे. शिक्षण हाच ह्यावर उपाय आहे असे असले तरीही शिक्षणाचे प्रमाण सर्व जातीत समान नाही. एकूणच भारतीय राजकारणात जातीचे स्थान अव्वलच आहे असे म्हणावे

लागते. स्वातंत्र्योत्तर काळात काही जाती समूहांना सत्तेत मोठा वाटा मिळतो, तर काही जाती समूहांना सत्तेच्या जवळपासही पोहोचता येत नाही. राजकीय प्रक्रिया घडताना मागे पाहिल्या प्रमाणे समाजरचना, आर्थिक संबंध आणि नागरीकरण ह्यासारख्या विविध घटकांचा परिणाम होतो.

राज्याच्या पातळीवर मराठा वर्चस्व निर्माण करताना त्यामागे राष्ट्रीय राजकारणाविषयी एक गृहीतक होते. कॉंग्रेस पक्षात अखिल भारतीय नेतृत्त्व (नेहरू) आणि स्थानिक वर्चस्वशाली हितसंबंध ह्यांचे परस्परावलंबित्त्व होते नेहरू हे राष्ट्रीय पातळीवरचे नेते असल्यामुळे त्यांच्याशिवाय स्थानिक नेतृत्त्वाला वैधता मिळणे अवघड होते. मात्र नेहरूंचे पक्षसंघटनेवर नियंत्रण नव्हते.[२१] स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणात जातिव्यवस्थेची भूमिका पाहत असताना राष्ट्रीय पातळीबरोबरच राज्य आणि स्थानिक पातळीवरील राजकारणाचाही प्रभाव कसा आहे,ह्याबाबत विचार करावा लागतो. १९९० च्या दशकात प्रामुख्याने मराठा नेतृत्वात महाराष्ट्रात फूट पडली, ही बाब आणि राष्ट्रीय राजकारणातील नेतृत्वाबाबत पेच निर्माण झाला होता. १९८० नंतरच्या काळात मराठा महासंघ जास्त क्रियाशील बनली तिने देखील कट्टर जातीयवादी भूमिका घेऊन मराठा हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लेखन आणि विविध आंदोलनामुळे दलित समाजही जागृत झाला. संपूर्ण भारतीय दलितांवर त्यांचा प्रभाव पडला व अस्पृश्य समजल्या गेलेल्या समाजाने संघटित होऊन आपापल्या अधिकारासाठी जागृक झाले. दलित समाजाचे नेतृत्व करणाऱ्या विविध राजकीय संघटना अस्तित्वात आल्या असल्या तरी त्यामध्ये मोठ्या प्रमाणात फूट पडली. एका बाजूला ही फूट आणि दुसऱ्या बाजूला कॉंग्रेस पक्ष विरोधी भूमिका यामुळे ही अडचण निर्माण झाली. नंतर पक्षीय राजकारण, आर्थिक स्तरीकरण, समाज परिवर्तनासाठी नेतृत्वाचा प्रश्न, प्रादेशिक वेगळेपणा, मराठा-कुणबी जातिसमूह, शेतकरी जाती, अनुसूचित जाती-जमाती, पांढरपेशा जाती ह्याबाबत सोयीचे राजकारण सुरू झाले. ह्यामध्ये सुद्धा एक उतरंड बनली आहे. आपापल्या गटांतर्गत प्रत्येक जात

आपल्या सानिध्यातील जातीशी सामाजिक श्रेष्ठत्वासाठी चुरस निर्माण करते व तशी स्वातंत्र्योत्तर भारतात चुरस निर्माण झाली आहे. डॉ. तेलतुंबडे आनंद यांनी‘साम्राज्यवाद आणि जात’ ह्या विषयावर व्याख्यान दिले (१३मार्च, २००८) ह्या व्याख्यानामध्ये आपले विचार मांडताना म्हटले की, साधारणपणे जाती संस्था हिंदू धर्मशास्त्रांवर आधारित दिसते. ह्यावरून तिचे निर्मूलन हिंदू धर्मशास्त्रांच्या नाशाशिवाय होऊ शकणार नाही.[२२]असा विचार जातिविरोधी चळवळीमधून उद्‌भवला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हाच विचार त्यांच्या ‘ऐनाहिलेशन ऑफ कास्टस्’ मध्ये विस्तृतपणे मांडून धर्मांतराच्या त्यांच्या निर्णयाला विश्लेषणात्मक आधार दिला. ९ मे १९१६ रोजी अमेरिकेतील न्यूयार्क राज्यातील कोलंबिया विद्यापीठात ‘जाती’ह्या विषयावर निबंध लिहिला व वाचला त्याचा संदर्भ घेताना बाबासाहेबांनी स्पष्टपणे म्हटले की, भारतात जोपर्यंत जात अस्तित्वात आहे तोवर हिंदू हे मिश्रविवाह करणार नाहीत आणि त्यांनी जर पृथ्वीवरील इतर प्रदेशांत स्थलांतर केले तर भारतीय जात ही एक वैश्विक समस्या बनेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, जात हा एक बंदिस्त वर्ग आहे. परंतु असा वर्ग कोणी तयार केला? बाबासाहेब त्याचे उत्तर, तो ब्राह्मणांनी तयार केला व इतर जातींनी ब्राह्मण वर्गाचे अनुकरण करून आपापल्या जाती निर्माण केल्या असे देतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणाच्या तिसऱ्या भागात जातिव्यवस्थेची संपूर्ण भारतभर प्रसार व वाढ कशी झाली ह्याबाबत विश्लेषण करतात. भारतातील जाती कार्यात्मक व व्यावसायिक मानणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मुळीच न पटणारे होते. त्याऐवजी ब्राह्मण वर्गाने स्वत:चा वर्ग बंदिस्त केल्यावर इतरही वर्ग आपोआप बंदिस्त झाले, सांस्कृतिक घटकाचे छोट्या तुकड्यांमध्ये विभाजन होऊन अनुकरण व बहिष्कार ह्यामुळे वर्गाच्या जाती बनल्या.

स्वातंत्र्योत्तर भारतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे वरीलप्रमाणे विचार मांडले ते आजच्या समाजालाही लागू होतात. एका अर्थाने भारतीय माणसे भारताबाहेरील देशात जर गेले तर तेथेही जातींची निर्मिती ते करतील. आंतरजातीय विवाहांमुळे वरील परिस्थिती सुधारण्यास

मदत होईल अशी उपाययोजना बाबासाहेब सुचवितात, अशी तत्कालीन उपाययोजना आजही उपयुक्त आहे म्हणून असे म्हटले जाते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सर्व ग्रंथांमध्ये 'ऐनाहिलेशन ऑफ कास्टस्' हा सर्वात मूलभूत व महत्त्वाचा ग्रंथ आहे. हिन्दू समाजव्यवस्था श्रेणीबद्ध असमानतेवर आधारलेली आहे, असे त्यांनी दाखवून दिले. परिणामी प्रत्येक जात ही इतर जातींच्या तुलनेत उच्च तरी आहे किंवा कनिष्ठ तरी आहे. म्हणून उच्च व पिळवणूक करणाऱ्या जातींच्या विरोधात उठाव करण्यासाठी ध्रुवीकरण होऊ शकले नाही.[२३] स्वातंत्र्योत्तर भारतात डॉ. बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे जोपर्यंत जात जाणार नाही तोपर्यंत अस्पृश्यता नष्ट होणार नाही. हे जळजळीत वास्तव आजच्या समाजात साकारलेले दिसते. ज्या गोष्टींमुळे समाज एकवटला जात नाही. एकात्म होऊ शकत नाही अशा गोष्टीस हिन्दू समाज स्वीकारत नाही. ह्यामुळेच तर भारताला अनेक बाबतीत हार खावी लागते.

स्वातंत्र्योत्तर भारताच्या उन्नतीत आड येणारी जात मोडल्याशिवाय स्वतंत्र भारत मोकळा श्वास घेता येणार नाही. १० ते १२ कोटी अस्पृश्य हिमालयाला देखील सुरुंग लाऊ शकतील इतक्याप्रचंड ताकदीचा वापर करून प्रतिकार करतील. या ताकदीचा राज्यकर्ता वर्ग सदूपयोगासाठीकरून घेताना दिसत नाही. समाज जीवनात निरपेक्ष कर्तव्य बुद्धीने प्रयत्न केले तर जातिव्यवस्था मोडायला वेळ लागणार नाही. त्यासाठी मनुवाद्यांची मानसिकता बदलायला हवी जातिव्यवस्थेचा राक्षस गाडण्यासाठी केवळ संघर्ष नव्हे तर समाजात जागृती निर्माण केली पाहिजे आणि जागृती करण्यांमध्ये अस्पृश्यांतील शिक्षित वर्ग कमी पडतो आहे. अस्पृश्य असूनही अस्पृश्यांच्या चळवळीत सहभागी न होणाऱ्या वर्गाचीच आज एक जात झाली आहे. स्वातंत्र्यानंतर बदललेल्या परिस्थितीची जाणीव ठेवून सर्वांगीण उन्नती समोर ठेवून आपापले हक्क प्रस्थापित करण्याकरिता जातिव्यवस्थेसारख्या गुलामगिरीच्या पद्धती नष्ट करुन गलिच्छ चालीरीतींना मूठमाती द्यायला हवी. जुलुमाविरुद्ध बंड पुकारून शिक्षण पुरेसे मिळायला हवे. भारताचे संरक्षण, विकास व भरभराट विशिष्ट जातीपुरते नसून संपूर्ण जनतेशी संबंधित असले

पाहिजे. स्वराज्यात अस्पृश्य जनतेला समान हक्काने राहता आले पाहिले. मतदानासंबंधी आजची परिस्थिती समाधानकारक नाही. ह्याबाबतीत फक्त श्रीमतांना व मध्यम वर्गांना आपला मतदानाचा हक्क प्रस्थापित करता येतो. गरीब, श्रमजीवी संख्या शेकडा ९० टक्के आहे. त्यांना आपल्या हितसंबंधाच्या प्रश्नांबाबत सरकारच्या तोंडाकडे पाहावे लागते व त्यामुळे परावलंबी राहावे लागते आणि म्हणून भावी स्वराज्यात ही अपमानास्पद परिस्थिती नष्ट व्हावी म्हणून सार्वत्रिक मतदान पद्धतीच्या योजनेची मागणी केली.[२४] स्वातंत्र्योत्तर काळात प्रत्येक जातीतील प्रत्येक माणसाला मतदानाचा हक्क देताना भेदभाव केला जाऊ नये. परंतु आज आर्थिक चणचणीमुळे राजकारणात उतरायला अस्पृश्य वर्ग घाबरतो. आजचा अस्पृश्य प्रतिनिधी हा बहुसंख्याकांच्या दबावाखाली येऊन कायदेमंडळ निर्णयप्रक्रियेत अल्पसंख्यांकच राहतो. आर्थिक व राजकीय स्वरूपाचे ठराव मंजूर करुन ते प्रत्यक्ष अंमलात आणण्यासाठी अस्पृश्यांत भांडणे लावून मजा पाहणाऱ्या हितशत्रूंच्या खेळी लक्षात घेतल्या पाहिजेत. कारण अस्पृश्यता ही जगातील सर्व गुलामगिरीपेक्षा भयंकर व विदारक स्वरूपाची आहे. तसेच संविधानाच्या सरनाम्यामध्ये सांगितल्यानुसार बंधुभावाचे तत्त्व जोपर्यंत जोपासावे जाणार नाही तोपर्यंत स्वराज्याला खरा अर्थ उरणार नाही.

### ३.४जातिव्यवस्थेच्यापरिप्रेक्ष्यातून सद्यकालीन सामाजिक आणि राजकीय विश्लेषण :

#### १. कार्ल मार्क्स आणि जातिव्यवस्था :

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी आपापल्या विचार व कृतीतून इतिहास घडविला आहे. दोन्हीही महापुरुष त्या त्या काळाचे अपत्ये आहेत. इतिहास लढाई लढत नाही. जिवंत माणसे लढतात. म्हणूनच जिवंत माणसेच इतिहासाची निर्मातेही असतात. माणसांमुळेच इतिहास घडतो. असे म्हटले जाते की, हे संपूर्ण विश्व मनुष्यकेंद्री आहे. यामुळे भारतात जेही काही घडायचे आहे ते माणसांसाठीच होईल. माणूस हाच केंद्र राहील. आपल्याकडे माणूस हा साधन म्हणून गणला गेला. धर्म, देव आणि राष्ट्रह्या तीन गोष्टी माणसासाठी आहेत.

मात्र असे न होता ह्या तिन्ही गोष्टींसाठी माणूस अशी परिस्थिती निर्माण केली गेली. माणसाला गौणत्त्व आले आणि विकास खुंटला. दलित सुद्धा माणूसच आहे. ह्याबरोबर मजूर हा सुद्धा माणूसच आहे आणि ह्याच घटकांना भारतीय समाजाने मुख्य प्रवाहाबरोबर टाकल्याने संपूर्ण समाज ढवळून निघाला. ब्रिटिश भारतात जे आले ते व्यापारी धोरण घेऊन, परंतु भारतीय आर्थिक स्थिती पाहिल्यानंतर भारताला Re-prodective Countryबनविणे आवश्यक आहे ह्याचे त्यांना महत्त्व पटले. त्यांना भारतात आर्थिक विकासाला भारतीय अर्थव्यवस्थेला वेग आला. भारतातील अतिरिक्त उत्पादन ब्रिटिशांच्या माध्यमातून जगाच्या नजरेत भरले. बाजार भरायला सुरुवात झाली. अतिरिक्त उत्पादन बाजारात विक्रीस आले आणि यामुळे भारतात एक नवीन वर्ग निर्माण झाला. भारतीय माणूस जो जातीय होता तो आता वर्गीय बनला.

१८५३ मध्ये ‘‘Tribun’’मध्ये कार्ल मार्क्स ह्यांनी एक लेखनमाला लिहिली. ह्या लिखाणात भारत हा देश अविकसित का राहिला याची चर्चा केली. ह्या लेखमालेतून त्यांनी सांगितले की, भारत हा देश निसर्गाचा गुलाम आहे म्हणून तो प्रगती करू शकत नाही. स्वत:चा विकास करत असताना त्याने निसर्गाशी संघर्ष केला, हस्तक्षेप केला परंतु माणूस हा निसर्गाचाच गुलाम बनला.

डॉ. रावसाहेब कसबे ह्यांच्या मते, ब्रिटिश आर्मीत अनेक जातीचे लोक होते. ह्यांनी जेव्हा दुसऱ्या देशाला भेट दिली तेव्हा स्वदेशाबद्दल जाणीव झाली. ह्याच स्वजाणिवेतून आंबेडकरी चळवळींचा जन्म झाला. बिटिश आर्मीने दलित समाजाला आत्मभान दिले असे म्हटले जाते. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत ह्या देशात जातिसंस्था आहे तोपर्यंत हा देश राष्ट्र बनू शकत नाही.

कार्ल मार्क्स आणि जातिव्यवस्था ह्यांचा संदर्भ लक्षात घेता त्यांना अनेक देशात वेगवेगळ्या कारणांमुळे प्रवास करावा लागला. प्रत्येक देशात त्यांनी तेथील कामगारांची अवस्था

पाहिली. औद्योगिक क्रांतीमुळे खेडी ओस पडत चालली होती. शहरांमध्ये गर्दी वाढल्याने अनेक सामाजिक प्रश्न निर्माण झाले. शहरी समाज गरीब आणि श्रीमंत अशा गटांमध्ये विभागला. कामगारांच्या ह्या दयनीय अवस्थेचा परिणाम मार्क्सच्या विचारावर झालेला दिसतो. कार्ल मार्क्सने केवळ विचार मांडून न थांबता प्रत्यक्ष कृती करण्यालाही प्राधान्य दिले. जगात शोषण आहे. श्रीमंतांच्या हातात मालमत्ता असल्याने ते गरीबांचे शोषण करतात. गुलामगिरीमुळे गरिबांना दारिद्र्याला तोंड द्यावे लागते. भारतातील संदर्भ लक्षात घेता भारत आणि जात हे समीकरण नाकारता येत नाही. कार्ल मार्क्सने भारताच्या संदर्भात आपल्या मित्राशी जो जो पत्रव्यवहार केला त्या पत्रव्यवहारात भारतीय जातींचा स्पष्टपणे उल्लेख केलेला दिसून येत नाही. भारतातील केवळ एका वर्गाचे (कामगार वर्ग) शोषण होते. त्यामुळे राज्यसत्ता ही देखील विशिष्ट वर्गाच्या हातातच दिसून येते. कार्ल मार्क्सने भारतीय समाजामध्ये जाती आहेत. ह्याचा विचार केलेला नाही. फक्त गरीब, कामगार या वर्गांचा 'नाहीरे'ह्या वर्गात समावेश केला. त्यांच्या मते भारतातील गरीबी नष्ट करण्यासाठी उत्पादन साधनांची मालकी राज्याकडे असणे आवश्यक होते. ह्यात कार्ल मार्क्सने हिंसा ही गृहीत धरली होती. भारतीय समाजामध्ये जात हा घटक प्रभावी असून तो घटक वेगवेगळ्या वर्गात विभागला जातो. उदा. कनिष्ठ, मध्यम आणि वरिष्ठ अशी सामाजिक स्थिती दिसून येते. भारतीय कामगाराला जात चिकटलेली आहे. म्हणून तो गरीब आहे. भारतामध्ये कोणत्या माणसाने कोणते काम करावे ह्याचाही विचार भारतीय समाजातील वर्णव्यवस्थेत दिसून येतो. भारतामध्ये ब्राह्मण आणि क्षत्रिय ह्यांना धनिक वर्ग मानले जाते. हा वर्ग कनिष्ठ जातीतील माणसाचे नेहमीच पिळवणूक करीत आला आहे. कार्ल मार्क्सने स्पष्टपणे जातीचा संदर्भ घेतला नसला तरी मानवमुक्तीचा मार्ग सांगितला आहे. म्हणून असे म्हटले जाते की, भारतात वर्गापेक्षा जात हा प्रभावी घटक ठरला आहे.

**२. कार्ल मार्क्सची अन्वेषण पद्धती व भारतीय समाजव्यवस्था :**

कार्ल मार्क्सने राज्यव्यवस्थेवर सिद्धांत मांडणी केली. राज्यव्यवस्थेतील एक नवीन कल्पना शोधली. तसेच एका नव्या अर्थव्यवस्थेचा तो शिल्पकार मानला जातो. भगवान गौतम बुद्ध एका धर्माचा संस्थापक की ज्याचा राजकारणाशी संबंध नाही. दोन्हीही विभूतींचा कालखंड वेगळा, त्यांची विचारसरणी वेगवेगळी आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दोन्हीही तत्त्वज्ञानांचा अभ्यास केला. दोन्हीही विचारवंत अभ्यासले, दोघांच्याही विचारांकडे ते आकर्षित झाले, दोहोंमधील तुलना करताना साम्य भेद सांगितले व त्यांनी सरते शेवटी म्हटले की, मार्क्सवाद्यांनी आपली पूर्वग्रहदूषित मते बाजूला सारून भगवान बुद्धांच्या मतांचा अभ्यास करावा. मार्क्सवाद आणि बुद्धवाद तसेच आंबेडकरवाद मानवी प्रगतीकडे कोणत्या नजरेतून पाहतो, हे महत्त्वाचे आहे. भगवान गौतम बुद्ध, कार्ल मार्क्स आणि नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या काळाचा विचार केला तर आजच्या सामाजिक समस्यांची उकल कोणते तत्त्वज्ञान करेल, ही बाब महत्त्वाची आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर अलीकडच्या काळातील विचारवंत आहेत. त्यांनी मार्क्सवादाचा अभ्यास केला. त्यांच्या मते, बुद्धवादाच्या मार्गातून मार्क्सवादाचा प्रवास होतो. म्हणून डॉ. आंबेडकरांनी मार्क्सवादाचे पाईक होण्याऐवजी बुद्धवादाचे समर्थक होणे पसंत केले. बुद्धवाद आणि मार्क्सवादाच्या तुलनेत आंबेडकरवादाला जागतिक मान्यता मिळाली नाही, हे मान्य करावे लागते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाला अद्याप जागतिक मान्यता मिळाली नाही. पण आंबेडकरवादाला दुहेरी अडसर आहेत. डॉ. बाबासाहेब ज्या काळात व ज्या भूमीत कार्यरत होते, तो काळ वर्णश्रेष्ठतेचा अभिजनाच्या अहंगडाचा होता. ती भूमी जाती-पोटजातीच्या, परस्परांविषयीच्या तिरस्कार तुच्छतेच्या फुत्कारांनी, दूषित झालेली होती.[२५]

१९६० ते ७० च्या दशकात भारतात जी वैचारिक मांडणी केली गेली त्यामध्ये असे दिसते की, मार्क्सवादी चळवळ आणि आंबेडकरवादी चळवळ या दोन्हीही आपापल्या परीने स्वतंत्र

मार्गाने चालत होत्या. ह्या महापुरुषांच्या नावाने दोन वेगवेगळया विचारसरणी निर्माण झाल्या आहेत. प्रत्यक्ष चळवळी निर्माण झाल्या. दोघांमुळेही समाजात क्रांती झाली. दोन्ही विचारवंतांचा काळ वेगवेगळा असला तरी ह्या सर्व घडामोडी झाल्या आहेत.

**३. कार्ल मार्क्सचे तत्त्वचिंतन :**

कार्लमार्क्सच्या तत्त्वचिंतनाची सुरुवात वास्तवातील माणसापासून झालेली आहे. माणसाने आपल्या शरीररचनेच्या मर्यादेत आपल्या चरितार्थाची साधने स्वत:च निर्माण केली. म्हणजेच अप्रत्यक्षपणे आपल्या भौतिक जीवनाची निर्मिती केली. मार्क्सने माणूस आणि समाज ह्यांच्याविषयी त्यांच्या इकॉनॉमिक ॲण्ड पोलिटीकल मॅन्युस्क्रिप्ट पासून ते नंतरच्या कॅपिटल पर्यंतच्या लिखाणात मत व्यक्त केले आहे. त्या लिखाणाचा आणि वैचारिक मांडणीचा सारांश असा की, माणूस हा त्याच्या स्वत:च्या इतिहासाचा आणि स्वत:चाही निर्माता आहे. मार्क्सवादी चिंतनाची सुरुवात एंजल्स आणि स्वत: मार्क्स फ्रान्समध्ये त्यांनी कामगारांची दयनीय अवस्था पाहिल्यानंतर सुरू झाली. कारखाने हे शोषणाचे केंद्र बनले. कामगारांची पिळवणूक वाढली. कामगार वर्गाच्या चळवळी दडपून टाकायला सुरुवात झाली. भांडवलदारांच्या पाठिंब्यावर उभे राहिले सरकारने दडपशाही सुरू केली. ह्यातूनच कामगार वर्गाच्या दैन्याला वाचा फोडण्यासाठी मार्क्सवादी तत्त्वज्ञान निर्माण झाले. कमी मजुरी देऊन कामगारांची पिळवणूक करणे, त्यांचे श्रम कमी मोबदला देऊन विकत घेणे ह्यासाठी भारतातही साधारणत: १९२० नंतर अशा चळवळी सुरू झाल्या. जागतिक पातळीवरील परिस्थिती आणि भारतातील परिस्थिती ह्यात मोठे अंतर होते. जागतिक पातळीवर कामगार वर्ग आणि कारखानदार वर्ग म्हणजे ‘धनिक’ आणि ‘श्रमिक’ह्यालाच अनुक्रमे ‘आहेरे’ आणि ‘नाहीरे’ वर्ग म्हटले गेले म्हणजेच पिळवणूक करणारा वर्ग निर्माण झाला नि पिळवणूक होणारा वर्ग निर्माण झाला. भारतामध्ये मात्र आर्थिक कारणावरून वर्ग निर्माण झाले नाही तर भारतात परिस्थिती थोडी वेगळी होती. भारतातील वर्ग आणि इतर देशातील वर्ग

ह्यामध्ये फरक असा होता की, भारतात प्रत्येक जातीचा वर्ग बनला होता. मार्क्सने जातिअंतर्गत वर्गाचा विचार केला नाही. कार्ल मार्क्स वर्गाचा विचार करतो, मात्र जाती बद्दल काहीच बोलत नाही.

ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्ग भारतामध्ये धनिक वर्ग मानला जातो. भांडवलदार वर्ग मानला जातो. भारतीय स्वरूपात वरिष्ठ जाती इतर जातींची पिळवणूक करतात. भारतीय राजकारणात जे राजकीय पक्ष कृतिशील आहेत त्यात मार्क्सवादी पक्षांचाही समावेश आहे. मात्र जेथे जातींचा संबंध येतो, तेथे मात्र ते अलिप्ततेची भूमिका घेताना दिसतात. जातीची समस्या भारतभर जाणवते. जातींमध्ये उपजाती-पोटजाती आणि तेवढेच वर्ग दिसून येतात. कार्ल मार्क्सचा लढा वर्गलढा आहे आणि आंबेडकरवादाचा अभ्यासविषय जात आहे.[२६]

भारतातील जातीयता रद्द करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक आंदोलने केले, संघर्ष केला. जातिसंस्थेचे उच्चाटन करण्याचे त्यांचे ध्येय होते आणि भारतात मार्क्सवादाबद्दल असे दिसून येते की, जेथे जातीचा प्रश्न निर्माण होतो तेथून ते पळ काढतात. जाती प्रश्नाला मार्क्सवाद्यांनी कधीच प्राधान्य दिले नाही. कनिष्ठ जाती ह्या वरिष्ट जातींच्या छळाला कंटाळल्या होत्या. ही जातीयता नष्ट करून संपूर्ण जग समानतेच्या पायावर उभे करून आदर्श बनविण्याचे स्वप्न आंबेडकरवादाचे होते. शोषणमुक्त सुखी जग निर्माण करण्याच्या उपायांचा इतिहास मार्क्स व एंजल्स ह्यांनी अभ्यासला, चिंतन केले. कष्टकऱ्यांचे दु:ख संपविण्यासाठी कारखानदारांनची व जमीनदारांची खासगी मालकी संपली पाहिजे. त्यासाठी कष्टकऱ्यांच्या हातात सत्ता येणे आवश्यक आहे. ह्या जाणिवेतूनच साम्यवादाचे तत्त्वज्ञान जन्माला आले.

डॉ. रावसाहेब कसबे ह्यांच्या मते कम्युनिस्टांनी आणि मार्क्सवाद्यांनी नवीन पद्धतीने विचार करायला सुरुवात करायला हवी. समाजवादी चळवळीतील नेते सत्तेच्या स्वप्नात मशगूल आहेत. ह्या मार्क्सवादी तत्त्वज्ञानाला एक समर्थ राजकीय संकल्पना मानले जाते. ज्याप्रमाणे

आंबेडकरवाद ह्या राजकीय संकल्पनेने समाजातील जातीयतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्न केले, त्याप्रमाणेच मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने केवळ 'वर्ग' महत्त्वाचे न मानता 'जात' ही महत्त्वाची मानली पाहिजे.[२७]

भारतातील अस्पृश्य वर्ग हा खऱ्या अर्थाने शोषित आणि पीडित होता. शोषित समाजाला पिळवणुकीतून बाहेर काढण्यासाठी एक साधन म्हणून मार्क्सवाद उपयुक्त पडू शकत होता परंतु तसे झाले नाही. अस्पृश्यतेचा म्हणजेच जातीच्या प्रश्नात मार्क्सवाद्यांनी कधी रस दाखविला नाही. डॉ. आंबेडकरांचा Budha or Karl Marx हा निबंध ह्या निमित्ताने महत्त्वाचा वाटतो. ह्यात दोन्हींची तुलना केलेली आहे. ते म्हणतात, आपली सर्वसाधारण अशी समजूत असते की, बुद्ध आणि मार्क्स ही तर परस्पर दोन टोके. एकाने जडतत्त्वाला प्राधान्य देऊन विचार केला. दुसऱ्याने आपल्या विचारांचा आधारच जडतत्त्व मानले. एकाने व्यक्तीच्या मुक्तीचा मार्ग सांगितला तर दुसऱ्याने समाजमुक्तीचा. एकाला प्राथमिक गणसमाजातील लोकशाहीचे आकर्षण होते तर दुसरा राज्यच विरून जाण्याचे स्वप्न पाहत होता. एकाने मानवी मनाचा विविधांगांनी शोध घेऊन मनाची मलिनता नष्ट करण्यासाठी ध्यानाचा मार्ग सांगितला तर दुसऱ्याने मनाला जडतत्त्वाची अनुषंगिक उत्पत्ती मानले. एकाने आयुष्यभर धम्म प्रचार केला तर दुसऱ्याने धर्माला अफूची गोळी मानले. हा परस्पर विरोध अधिक लांबविता येईल. अशा ह्या परस्पर विरुद्ध टोकांचा एकत्रित विचार करण्याचे धाडस डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले. त्यानंतर महाराष्ट्रात डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी केले.

भगवान गौतम बुद्ध आणि कार्ल मार्क्स ह्यांच्यात साधनांमध्ये भिन्नता दिसून येते. कार्ल मार्क्स हे हिंसा आणि कामगारवर्गाची हुकूमशाही ह्या दोन गोष्टी साम्यवादाच्या प्रस्थापनेसाठी आवश्यक मानतात. परंतु डॉ. कसबे यांनी आपल्या आंबेडकर आणि मार्क्स मध्ये स्पष्ट करतात की, आंबेडकर बुद्धाच्या साम्यवादाचा जितका सूक्ष्मपणे उलगडा करून सांगतात तितका मार्क्सचा सांगत नाही. पुढे असेही दिसते की साम्यवादामध्ये हिंसेला महत्त्व दिल्याने बुद्धाचे तत्त्वज्ञान ह्या

मार्गाने जाणारे नाही हे स्पष्टपणे जाणवते. बळाचा वापर काढून घेतला तर साम्यवादी व्यवस्थेचे संरक्षण फक्त धर्मच करू शकेन आणि कम्युनिस्ट तर धर्माला प्रचंड विरोध करतात.

जात आणि वर्ग ह्या मुद्यांवरून आंबेडकरवादी आणि मार्क्सवाद यामध्ये विवाद आहे. मार्क्सवाद आपले सर्व सिद्धांत जगाबद्दलच्या भौतिकवादी विचारांवर आधारतो. जोपर्यंत मानवी समाजाची वर्गामध्ये विभागणी कायम आहे. तोपर्यंत वर्गलढे व राज्यसंस्था इतिहासात कायम राहतील आणि जेथे नफा हेच अंतिम उद्दिष्ट असते, तेथे अराजक निर्माण होतेच. समाजवाद ही साम्यवादाच्या अगोदरची पायरी आहे. ह्या अवस्थेत जो काम करणार नाही त्याला खायला मिळणार नाही, प्रत्येकाकडून त्याच्या 'शक्तीनुसार' आणि प्रत्येकाला त्याच्या 'गरजेनुसार'ह्या तत्त्वाचा जेव्हा आपण विचार करू तेव्हा साम्यवादाचे समाजवादापासून आलेले वेगळेपण स्पष्ट होऊ लागते.

मार्क्सवाद्यांनी १९२१ मध्ये भारतीय साम्यवादी पक्षाची स्थापना केली. आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या भांडवलशाही वर्चस्वाचा मुकाबला आंतरराष्ट्रीय साम्यवादी चळवळीच्या मदतीनेच केला जाऊ शकेल. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या काँग्रेस चळवळीशी कसे संबंध ठेवावेत ह्यासंबंधी वेळोवेळी साम्यवादी नेत्यांत मतभेद झाले आहेत. भारतातील सामाजिक स्तरांचे सर्वांगीण शोषण हे विषय साम्यवाद्यांच्या कार्यक्रम पत्रिकेवर त्याकाळी तरी ठळकपणे आलेच नव्हते. शंकरराव देव ह्यांच्यापासून ते जयप्रकाश नारायण ह्यांच्या पर्यंतच्या सर्वच समाजवाद्यांनी सामाजिक समस्यांच्या विशेषत: आर्थिक सामाजिक विषमता आणि अस्पृश्यता जातिसंस्थेबाबतचे प्रश्न, गुंतागुंत सोडवणुकीसाठी मार्क्सवाद आणि गांधीवाद ह्यांच्यातील व्यूहनीतीचा समन्वय घालण्याची गरज स्पष्ट केली. दलित मागासवर्गीय बहुजनांच्या दृष्टीने समाजवादी चळवळ कायम शहरी-ब्राह्मणी मध्यमवर्गीयच राहिली आहे.

### ४. **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि जातिव्यवस्था :**

विविध स्तरांवरील समाजाची एकत्र जगण्याची प्रवृत्ती ही नैसर्गिक आहे, असे दिसून येते. भारतीय समाज म्हणजेच भारतीय जाती ह्या एकत्र राहत असून भौगोलिक दृष्टिकोनातून भारत हा देश आहे. परंतु भारतीय समाज हा खऱ्या अर्थाने एकात्म नसल्याने भारत हा देश आहे का? यासारखे अनेक प्रश्न निर्माण होतात. भारतीय समाज देश बनू शकणार नाही. जातिसंस्था हे इतिहासाने निर्माण केलेले दु:ख आहे. इतिहासामध्ये जातींचा अभ्यास खूप मोठ्या प्रमाणावर केला गेला मात्र जातींच्या निर्मितीविषयीचा विचार कोणी करत नाही.[२८] डॉ. राबसाहेब कसबे ह्यांच्या मते, जात ही एकटी किंवा सुटी नसते. जात ही समूहातच अस्तित्वात येते. ती इतर जातींशी संबंधित असते जातींचे परस्पर संबंध शोधल्याशिवाय हे कळणार नाही. राज्यनिर्मितीसाठी समाज वर्गीय झाला पाहिजे ही अट होती. म्हणून कुठलाही समाज हा सुरुवातीच्या काळात वर्गीय असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पाश्चिमात्त्य जगाशी संवाद साधणारा भारत निर्माण करावयाचा होता. असा सर्वोच्च समाज निर्मितीत अस्पृश्यता हा एक अडथळा होता आणि अस्पृश्यता नष्ट करणं हे ध्येय डॉ. बाबासाहेबांना गाठायचं होतं. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अगोदर डॉ. राजेंद्रप्रसादांना जो कच्चा मसुदा दिला गेला त्यात भारतीय समाजाचा आणि भारतीय राज्यघटनेचा आत्मा किंवा पाया हा खेडेगाव असावे, असा उल्लेख होता. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे नाकारण्याचं धैर्य दाखवलं त्यांच्या मते आपल्या भारतातील खेडी म्हणजे अज्ञानाची गुहा आहे आणि जाती संस्थेचे आगर आहे. त्याच्याऐवजी माणसाला राज्यघटनेचा पाया बनविले पाहिजे. भारत आणि भारतीय जातिव्यवस्था समजण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे १९१६ चे ‘कास्ट इन इंडिया’ आणि ‘ॲनिहिलेशन ऑफ कास्ट’ (१९३५) हे दोन ग्रंथांचे अवलोकन करणे आवश्यक आहे. डॉ. यशवंत सुमंत ह्यांनी समतालक्ष्यी मुक्तिदायी राजकारणाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रणीत ‘ॲनिहिलेशन ऑफ कास्ट’ ह्या ग्रंथाचे आकलन ह्या शीर्षकाचे आर्टिकल लिहिले. त्यांनी ही मांडणी केली. त्यातूनडॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जातिव्यवस्थेबाबतची भूमिका स्पष्ट होते. पंजाबमध्ये

जातपात तोडक मंडळ नावाची सवर्ण हिंदू सुधारकांची संघटना जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी कार्यरत होती. १९३६ साली लाहोर येथे संपन्न होणाऱ्या ह्या संघटनेच्या वार्षिक परिषदेचे अध्यक्ष म्हणून सदर संघटनेने डॉ. आंबेडकरांना निमंत्रित केले होते. सदरचे भाषण त्यांना अत्यंत जहाल वाटले. कोणतीही तडजोड न स्वीकारता डॉ. आंबेडकरांनी हे भाषण रद्द केले व नंतर ते मुंबईत प्रसिद्ध केले.त्यांनी दलित राजकारणाची कोंडी फोडण्यासाठी कोणती उपाययोजना सूचविली.तत्कालीन सामाजिक आणि राजकीय परिस्थितीचा विचार करता असे दिसते की, एका बाजूला जातीय तत्त्वावर भारतीय समाजात फूट पाडणरे वसाहतवादी सरकार, तर दुसरीकडे हिन्दू समाजातील कर्मठ सवर्णांचा अस्पृश्यता निवारण्यास असलेला विरोध म. गांधींनी अस्पृश्यता निवारणाचा प्रश्न हाती घेतला तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांना जागृत करण्याचे काम सुरू केलेले होते.[२९] अनेक संघटना जात-धर्मावर आधारित राजकारण करत होत्या. विविध नेते आपापल्या जातींना राजकीय सुधारणांचे फायदे जास्त मिळावेत ह्या उद्देशाने जाती-जातींतून नवनेतृत्व उदयास आले होते. भांडवलदार, सुशिक्षित आणि मध्यमवर्ग ह्यासाठी निर्माण झाला. प्रत्यक्षात राजकारणाचा जातीय पाया या सर्वांचेच हितसंबंध जतन करीत होता. ह्यामुळे जातीपातीचे मूलभूत प्रश्न सुटण्याची शक्यता मावळत चालली होती. जातीप्रश्न घेऊन्न कोणाचाच अजेंडा पुढे आला नाही. 'ॲनिहिलेशन ऑफ कास्ट' च्या निमित्ताने ह्या प्रश्नाला तोंड फुटले. शोषितांचे हितसंबंध जपणे, वंचितांच्या वर्गीय हितसंबंध जपणे व ह्यासाठी संसदीय राजकारण ह्यासाठी अनुकूल करणे, मनुवादी धर्माच्या चौकटीबाहेर समाजाला काढून स्वातंत्र्य, समता आणि बंधुभावाच्या आधारावर हा भारतीय समाज उभा करण्यासाठी समाजाला लागलेली जातीयतेची कीड संपविणे हे स्वतंत्र मजूर पक्ष उभा करून वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्रयत्न केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भारतातील जातिव्यवस्था आणि श्रमविभागणी हे मान्य नव्हते. ते म्हणतात की, श्रमिकांची विभागणी होते,भारतीय जात जन्मावर आधारित

आहे.माणसाच्या वाट्याला येणारे काम हे जन्मावर आधारितच निश्चित झाले. भारतात तर काही जाती ही एक श्रेणीबद्ध विषमतेची रचना आहे. (A System of Graded Inequality)वंशशुद्धी न राहिल्याने वंशशुद्धित्वाची रचना म्हणूनही जातीकडे पाहता येत नाही. भारतीयांचे सामाजिक जीवन जातीमुळे संकुचित झाले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून मानवी समतेसाठी अथक परिश्रम केले. त्या परिश्रमांची नोंद अवश्य घ्यावी लागेल. शैक्षणिक भेदभाव, भौतिक व आर्थिक पिळवणूक, मंदिरांमध्ये प्रवेश बंदी, सार्वजनिक पाणवठ्यावर बंदी, गावांच्या संपत्तीत वाटा नाकारणे, धार्मिक भेदभाव, हिंसा इत्यादी बाबत हजारो वर्षांपासून अनुसूचित जाती-जमातीवर अन्याय होत आहे. जातिव्यवस्था केवळ एक समस्याच नाही तर जातिव्यवस्थेने सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक इ. सर्वच क्षेत्रात समस्या निर्माण केल्या आहेत[३०] म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, जातिव्यवस्था ही समस्या निर्माण करणारी एक व्यवस्था आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीव्यवस्थेचे विश्लेषण करून त्यांच्यालिखाणात जातीच्या समस्येचे अत्यंत बारकाईने अभ्यास केला व जातीच्या विविध परिणामांची चर्चा केली आहे. जातिव्यवस्थेला सामाजिक व धार्मिक मान्यता आहे हे डॉ. आंबेडकरांनी अनेक ठिकाणी स्पष्ट केले आहे आणि यामुळेच जातीची समस्या सुटू शकली नाही. उलट जातिव्यवस्था अधिक मजबूत होत गेली आहे. जाती मोडण्याचा खरा उपाय म्हणजे आंतरजातीय विवाह होय. भारतीय धर्माने लोकांना गुलाम, दास्य बनविले त्यामुळे सहजासहजी आंतरजातीय विवाह घडून येणारनाही. धर्म ग्रंथावरील विश्वास आणि जातीच्या तटबंदी मोडीत काढल्याशिवाय हे सर्व शक्य होणार नाही. परंतु परंपरावादी समाज हा अडथळा ठरतो आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर स्पष्ट म्हटले की, जोपर्यंत सामाजिक आणि आर्थिक लोकशाही निर्माण होत नाही तोपर्यंत राजकीय लोकशाहीला काहीही अर्थ उरत नाही.

भारतीय लोकांवर हिंदुत्वाचा प्रचंड पगडा आहे. त्यामुळे तो जात ह्या घटकाशी बांधिल होतो. आपण पुरोगामी विचारांचा प्रसार केला, तर जात नष्ट करण्याचा प्रयत्न करु शकतो, आपण महापुरुषांच्या विचारांचा प्रसार योग्य पद्धतीने केला नाही. त्यांचा उपयोग फक्त मतांचा जोगवा मागण्यापुरताच केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनंतर जाती अंताचा मुद्दा एकाही भारतातील राजकीय नेत्याने हाती घेतला नाही. उलट जातीच्या मतांसाठी फायदा घेऊन जात टिकविण्याचे काम भारतीय राजकारण्यांनी केले आहे. स्वत:ला डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी म्हणवणाऱ्या नेत्यांनीही जातिअंताच्या लढाईचा मुद्दा हाती घेतला नाही.[३१] आज स्वत:ला आंबेडकरवादी म्हणवून होणारे अनेक अनुयायी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराला प्रामाणिक राहिले नाहीत. त्यांच्यात संकुचित वृत्ती निर्माण होऊन राजकीय संघटन, आघाड्या, दबावगट करण्यातच ते धन्य मानतात. भारतातील जातिव्यवस्थेसारखी व्यवस्था अन्य कोणत्या देशात आढळून येत नाही आणि ती लोकांच्या सहकार्याशिवाय टिकलेली नाही.

जातिसंस्थेने समाजजीवनावर भयंकर परिणाम केलेले आहेत. जोपर्यंत भारतात जातिसंस्था आहे. तोपर्यंत येथे आंतरजातीय विवाह होणे शक्य नाही. झाले तरी ते यशस्वी होईलच असे नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिव्यवस्थेवर सविस्तर मांडणी केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतात वर्ग बंदिस्त झाले आणि अन्य देशात ते झाले नाहीत. जात आणि वर्ग हे एकमेकांचे शेजारी असून जात हा एक बंदिस्त वर्ग आहे.डॉ. आंबेडकरांनी जातींची चर्चा करताना वर्गाला महत्त्वाचे स्थान दिले आणि जातीचा जन्मदाता वर्ग मानला.[३२]

जोपर्यंत जातींचे अस्तित्व आहे तोपर्यंत मानसांतील सुप्त शक्तींना वाटा मोकळ्या होणार नाही खेड्यांचे शहरीकरण आज होणे आवश्यक आहे. तरच डॉ. बाबासाहेबांनी सांगितलेल्या उपाययोजना अंमलात येतील. ब्रिटिश हे भारतात आल्यामुळे ह्या स्थितीत थोडा फरक झाला आहे. कारण ते आल्याने इथल्या भौतिक परिस्थितीत फरक पडला. कनिष्ठ मानल्या गेलेल्या जातींना नवीन आर्थिक क्षेत्रे खुली झाली. साहित्यक्षेत्र, नाटक-सिनेमा इत्यादी माध्यमांमार्फत

जाती बद्दलची मांडणी एकांगी केली गेली. अस्पृश्य नायक, नायिकांचे पात्र हीन पद्धतींनी दाखविले अथवा साकारले. स्वातंत्र्योत्तर काळात दलित प्रश्न हाताळण्यामध्ये कथा-कादंबऱ्या, नाटक, नाटीका, चित्रपटडॉक्युमेंटरी मधून दलितांची बाजू मांडताना त्यांची उपेक्षा केली. आत्मसन्मान, धर्म व लोकशाहीच्या नावाखाली चाललेल्या फसवणुकीपासून त्याला सावध रहावे लागेल.[३३] आज भारतात सांस्कृतिक क्षेत्रावरही प्रभावशाली समुदायांचा कब्जा झालेला आहे. भांडवलशाही व बाजार व्यवस्थेच्या विस्तारामुळे आधुनिक काळात अपेक्षित विकास झाला नाही. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रावरही ह्याचा मोठा परिणाम होतो आहे. जातिजातींमध्ये शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात वेगळ्या प्रकारचे संबंध पक्के होतात. दलितांनी शेती करू नये, विशिष्ट पोषाख करावा, गावात त्यांनी एखादे हॉटेल सुरू केले, तर त्यावर सार्वजनिक बहिष्कार टाकला जातो. त्यांच्याबरोबर बेटी व्यवहार तर सोडा परंतु रोटी व्यवहारसुद्धा करणे अपशकुनी मानले जाते. २१ व्या शतकातही अशी वैशिष्टे जाती टिकवून ठेवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्योत्तर काळात जातीच्या प्रश्नाने राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ठळक ठसा उमटवलेला आहे.

भारतातल्या दलित, पीडित अत्याचारित मागासलेल्या समूहाला संघटित करून त्याचे व्यापक परिवर्तनवादाचे राजकारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीकेले. त्याला त्यांनी संसदीय राजकारणाची आणि भगावन गौतम बुद्धांच्या धम्माची जोड दिली. त्यांना मागासलेल्या जात समूहांच्या शोषणमुक्तीच्या राजकारणाची सुस्पष्टता होती. आजच्या काळात मात्र नेतृत्व करणाऱ्यांमध्ये त्याचा अभाव आहे आणि ह्याच गोष्टीचा परिणाम राजकारणावर होताना दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना राजकीय पक्ष उभा करून राजकारणाची दिशा दिली होती. मात्र आंबेडकरवादी उत्तराधिकाऱ्यांनी इतर राजकीय पक्षांमध्ये जाऊन स्वत:ची राजकीय, सामाजिक आत्महत्याच करून घेतली. आजच्या दलित नेत्यानं जनतेचा विश्वास गमावला.

ह्याचा परिणाम असा झाला की, भारताच्या राजकीय प्रक्रियेत सर्व पातळीवर जात हा घटक प्रभाव टाकतो आहे.

जातिव्यवस्थेच्या परिप्रेक्ष्यातून सद्यकालीन सामाजिक आणि राजकीय विश्लेषण करताना आपणास बाबासाहेबांनी व्यक्तिपूजेला विरोध केल्याचे दिसते. रानडे, गांधी आणि जिना ह्या ग्रंथात त्यांनी स्पष्टपणे व्यक्तिपूजा आणि व्यक्ती महात्म्य ह्या गोष्टींना विरोध केला. त्यामुळे आजच्या समाजाने बाबासाहेबांच्या विचारांना अधिक महत्त्व देणे गरजेचे आहे. त्यांच्या अनुयायांनी केवळ जयंत्या साजऱ्या न करता त्यांच्या विचारांवर आधारित सम्यक कृती कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. जातिविहीन व वर्गविहीन समाज निर्मितीच्या दृष्टीने राजकारण व समाजकारण करणे गरजेचे आहे. राजकारणामध्ये धर्माचा हस्तक्षेप मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. ह्या सर्व बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

**५. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारतातील जातिव्यवस्थेची मूलभूत समस्या :**

२००० किंवा २५०० वर्षापूर्वी भगवान गौतम बुद्धांनी जे सांगितले ह्याकडे लक्ष दिले तर आपणास समजते की, जगात दु:ख आहे. शोषण हा शब्द त्यांनी वापरला नाही. पण ज्याला दु:ख म्हणतात, त्याच्यावरच त्याने आपल्या धर्माची उभारणी केली जगात दु:ख आहे ह्यात संशयच नाही की, दु:ख ह्या शब्दांना भिन्नभिन्न अर्थ लावला गेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, बौद्ध वाङमयात अनेक ठिकाणी बुद्धाने दु:ख हा शब्द दारिद्र्य ह्या अर्थाने वापरला आहे. बहुजन लोक हाल अपेष्टात, दु:खात जगतात तेव्हा मार्क्सच्या जन्मापूर्वी सुमारे २५०० वर्षे आधीच बौद्ध धर्माने पुरेसा मार्क्सवाद किंवा साम्यवाद सांगितला आहे.[३४] मार्क्सने सांगितले की, शोषण नष्ट करण्यासाठी उत्पादन साधनांची मालकी राज्याकडे असली पाहिजे. तसेच साम्यवाद आणण्यासाठी कार्ल मार्क्सने किंवा साम्यवादाने हिंसेचा आणि विरोधकांता ठार मारण्याचा आहे. (बुद्ध आणि मार्क्स ह्यांच्यात मूलभूत भेद इथेच आहे.) लोकांना प्रवृत्त करण्याचा मन वळवून,

नैतिक शिकवणुकीने आणि प्रेमाने प्रवृत्त करण्याचा मार्ग बुद्धांनी सांगितला. सत्ता किंवा हिंसा करून नाही तर प्रेमाने जग जिंकता येते. साम्यवाद हिंसा स्वीकारल्याने लवकर जय मिळवू शकतो, म्हणून असेही म्हटले जाते की, बुद्धाचा मार्ग लांबच आहे आणि मार्क्सचा मार्ग जवळचा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तर म्हणतात की, जवळचा मार्ग अधिक घातक ठरतो. मजूरवर्गाची हुकूमशाही किती वर्षे राहणार याबाबत मार्क्सकडे कोणतेही उत्तर नाही. ते एवढेच सांगतात की, हुकूमशाही आपोआपच नष्ट होईल म्हणजे साम्यवादी व्यवस्थाही जबरदस्तीवर आधारलेली आहे. रशियानेसुद्धा स्वेच्छेने साम्यवादी व्यवस्था स्वीकारली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर दलित चळवळीचे विश्लेषण सुरू झाल्याने खरे तर डॉ. आंबेडकरांच्या बरोबर कार्ल मार्क्सचे नाव भारतात घेतले गेले. भारतातील परिस्थितीने हे नाव घेण्यास भाग पाडले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सामाजिक पुनर्रचनेचे स्वप्न त्यांच्या कृतीतूनही दिसून येते. परंतु दलित दलित पँथर, मासमूव्हमेंट, मुक्तिसेना ह्यांच्या आंदोलनातून मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृतीत आणि उक्तीत विसंगती आहे, ह्यामुळे त्यांचा संताप आंदोलनातून अभिव्यक्त झाला आहे.[३५] आंबेडकरवादी माणूस आपले हितसंबंध स्पष्ट करण्यासाठी अथवा साध्य करण्यासाठी मार्क्सवादी साधने वापरतो ह्यावर खरे चिंतन झाले पाहिजे. बौद्ध धर्म आणि साम्यवाद ह्या मुख्य विषयाची मांडणी करताना डॉ. आंबेडकरांनी साम्यवादाला सिद्धांतापासूनच केली हे ह्या ठिकाणी मुद्दामच लक्षात घ्यावे लागेल.

### ६. पाया आणि इमला :

मार्क्सवादी विचारांचा संदर्भ भारतासाठी आर्थिक पेक्षा सामाजिकच जास्त आहे. जातिसंस्थेच्या उगम-विकासासंबंधी १९१६ साली जे मार्क्सवादी विश्लेषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले त्यांच्या ह्या विश्लेषणामुळे त्यांना टीकाकारांनी ‘मार्क्सवादी‘ म्हटले. परंतु

ह्याचा अर्थ डॉ. आंबेडकर सुरूवातीला मार्क्सवादी होते असा काढला तर विपर्यास्त होईल. कार्ल मार्क्स आणि मार्क्सवादाचे सुप्त आकर्षण आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनात भारतीय कम्युनिस्टांच्या विरोधात जाऊनही टवटवीत राहिले आहे कारण मार्क्सवादी तत्त्वज्ञान जातिसंस्थेचा विचारच करीत नाही.[३६]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध आणि त्यांचा धम्म च्या चौथ्या भागात चर्चा केली आहे की, भारतातील सामान्य विचारी माणसाच्या मनात मार्क्सबद्दल एक गृहीतक घट्ट बसलेले आहे ते म्हणजे कार्ल मार्क्सने भारतापुढील प्रश्नांसंबंधी अजिबात विचार केलेला नाही. परंतु डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी 'दास कॅपिटल' चा संदर्भ घेऊन मार्क्स व एंजल्स ह्यांच्यातील पत्रव्यवहारात भारतापुढील प्रश्नासंबंधी अनेक संदर्भ घेतले आहेत. एका बाजूला दलितांच्या मते भारतीय जाती ह्या केवळ धर्मांतराने जातील अशी मांडणी पुढे आली तर दुसऱ्या बाजूला भारतातील जाती केवळ आर्थिक परिवर्तनाने जातील अशी मांडणी डाव्या चळवळींना केली ह्यांनी जन्माधिष्ठित श्रमविभागणी म्हणजे जात असा विचार समोर ठेवूनच विचार मांडले.

१९२४ पासून खऱ्या अर्थाने दलित चळवळ सुरू झाली. ह्या चळवळीचा विकास होत असताना मार्क्सवादाने ह्या चळवळीकडे दुर्लक्ष केले. ह्याचे कारण असे की, मार्क्सवाद्यांनी जात हा इमला मानला व समाजाचा आर्थिक पाया बदलला की इमला आपोआप तुटेल, असा सिद्धांत मांडला. भारतीय परिस्थिती समजून घेताना डॉ. कसबे म्हणतात की, दोन प्रमुख चुका अशा झाल्या की, पाया बदलला की इमला आपोआप बदलतो हा त्यांचा समजच चुकीचा होता. पाया बदलला तरी इमल्याचे अनेक अवशेष तसेच शिल्लक राहतात व ते जाणीवपूर्वक नष्ट करावे लागतात. भारतीय उत्पादन प्रक्रियेत जात गुंतलेली असल्यामुळे किंबहुना ती उत्पादन शक्तीत रूपांतरित झालेली असल्यामुळे तिला इमला मानता येणार नाही. समाजातील समुदायात सांस्कृतिक पोकळी भरून काढण्यासाठी इमल्यावर भर देऊन समाज प्रबोधनाची व क्रांतीनंतर करावयाच्या जाणीवपूर्वक कृतीची सुरुवात आताच करावी लागेल असा विचार आणि डॉ.

आंबेडकरांची दृष्टी त्यांच्या समन्वयी शक्तीत प्रचंड शक्ती आहे. शक्तीचा उपयोग केला तरच आंबेडकरी चळवळीला जातीच्या कोशातून बाहेर पडण्याचे सामर्थ्य येईल.[३७]

## ३.५) मार्क्स-आंबेडकर समन्वयाच्या दृष्टीक्षेपातून जातिव्यवस्थेची चर्चा :

मार्क्सवादी तत्त्वज्ञान आणि बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान ही दोन्हीही तत्त्वज्ञाने अभ्यासली तर असे दिसून येते की, ह्या दोन्ही विचारांमुळे जग बदलले जगामध्ये बदल घडवून आणण्याची ताकद ह्या तत्त्वज्ञानांमध्ये आहे. दोन्हीही तत्त्वज्ञाने कृतिशील आहेत. दोन्ही तत्त्वज्ञानांना एकत्रित आणून त्यातून समन्वयवाद साधला जातो. समन्वयवाद आजच्या सामाजिक आणि व्यक्तिगत पातळीवरील प्रश्नांची सोडवणूक करतो, ह्या विषयी चिंतन करणारे विचारवंत भारतामध्ये खूप कमी आहेत. ज्या थोड्या विचारवंतांनी वरील दोन दृष्टिकोन एकत्रित बांधण्याचे काम केले, त्यामध्ये अलीकडच्या काळात डॉ. रावसाहेब कसबे ह्यांचे नाव घेतले जाते. व्यवहारातून मार्क्स-आंबेडकरांच्या वैचारिक समन्वयाचा विचार पुढे आला. तसेच समन्वयाच्या विचारातून व्यवहाराला चालना मिळते आणि तेच मार्क्स-आंबेडकर समन्वयवादाबाबत घडले आहे, असेही म्हटले जाते की समन्वयवादामुळे आंबेडकरवादाला वैश्विक स्वरूप प्राप्त झाले.

मार्क्स-आंबेडकरांच्या विचारांचा समन्वय ही संकल्पनाच काही विचारकांना, अभ्यासकांना न पटणारी, न रुचणारी अशी आहे. भारतीय समाजामध्ये कम्युनिस्टांमधीलकर्मठ तसेच दलितांमधील सनातनी ह्या दोन्हीही घटकांना हा समन्वयी विचार पटणारा नाही. बुद्धिनिष्ठतेच्या जोरावर, विज्ञाननिष्ठतेच्या आधारावर आणि मानवी अधिष्ठानाच्या पातळीवर जावून दोन्ही विचारप्रणालीमध्ये साम्य आढळून येते. आधुनिक काळात भारतीय समाजव्यवस्था जातीबरोबरच वर्गावरही आधारित आहे. तसेच डावे आणि उजवे ह्यांच्यातील संघर्षाचे मूळ शोधत असताना आपणास मार्क्स आणि आंबेडकर ह्या दोन्ही तत्त्वचिंतकांचा विचार करावा लागतो.

भारतात दलितोद्धारक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शोषित घटकांसाठी जी आंदोलने केली, जे मौलिक विचार मांडले, जे अनेक ग्रंथ लिहिले ह्यांतून आणि सरतेशेवटी केलेल्या धर्मांतरामुळे तसेच त्यांनी मार्क्सवादावर वेळोवेळी केलेल्या वक्तव्याने मार्क्स-आंबेडकर विचारांच्या समन्वयवादाची चाहूल लागली. डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी 'आंबेडकर आणि मार्क्स'ह्या ग्रंथात जात आणि धर्म म्हणजे पाया आणि इमला ह्यांचा विचार करताना. ह्या दृष्टिकोनातून विचार करतात की जात ही भारतीय समाजाचा पाया आहे आणि शहरी भागातील कामगारांचे व्यक्तिगत जीवनाचे प्रश्न मूल: पायाशी संबंधित नसतात. त्यांचे प्रश्न इमल्याशी म्हणजे धर्माशी संबंधित असतात. ग्रामीण भागातील चित्र उलट आहे. ते म्हणतात, शहरातील दलित डाव्या चळवळीत भाग घेत नाहीत. म्हणून डावी चळवळीच्या विरुद्धजातात म्हणून खेड्यातील दलित चळवळीतील कार्यकर्त्याला उभेही करीत नाहीत असे हे एक दृष्टचक्र भेदण्याचे सामर्थ्य मार्क्सचे विचार आणि आंबेडकरांची दृष्टी ह्यांच्या समन्वयी शक्तीतच आहे.[३८]असे असले तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्क्सवादाच्या संदर्भातून बाहेर येत नाहीत. डॉ. आंबेडकर कम्युनिस्टांना विरोध करतात कारण ते जातीचा विचार करीत नाहीत.

महाराष्ट्रातील ज्येष्ठ विचारवंत कॉ. रणजित परदेशी ह्यांच्या मते, आज मार्क्सवाद-फुले-आंबेडकरवाद ह्या विचारांची पुनर्मांडणी करणे आवश्यक आहे. कॉ. शरद पाटील यांनी देखील मार्क्स-फुले-आंबेडकरांच्या विचारांची तुलना केली परंतु शरद पाटलांच्या ह्या विचारांचे गुरू डॉ. रावसाहेब कसबे हेच आहेत.[३९]

भारतातील सामाजिक परिस्थितीचा, जातवास्तवाचा विचार करताना मार्क्सवादाची जोड दलित चळवळीला मिळावी, ह्या सिद्धांताची पार्श्वभूमी डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी १९७१ साली मांडली आणि नंतर त्यांचा १९८५ साली 'आंबेडकर आणि मार्क्स'हा ग्रंथ प्रकाशित झाला. मार्क्स-आंबेडकरांच्या नावाने सुरू असलेल्या विरुद्धपातळीत कर्मठपणा दिसून येतो. परंतु ह्या

कर्मठपणातून मुक्त असलेल्या क्रियाशील तरुण मनांवर त्याचा परिणाम होत आहे. जागतिकीकरणाचे आव्हान आपल्या समोर आहे आणि ह्या जागतिकीकरणामध्ये जी धोरणे ठरविली जातील ती धोरणे जनतेच्या इच्छा आणि कक्षेच्या बाहेरील असतील आणि ही सर्व आव्हाने पेलण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कार्ल मार्क्स ह्यांचेच विचार उपयुक्त होतील असे समन्वयी विचारवंत मानतात. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे विचार एकत्र केले तरच ह्या परिस्थितीमध्ये नवी साधने वापरून आव्हाने पेलता येतील. आज भारतातील बहुंताश राजकीय पक्षांचा पाया डळमळीत झाला आहे. राजकीय पक्षांना कोणत्याही प्रकारची तात्त्विक बैठक राहिली नाही. देशापुढील नवीन सामाजिक आर्थिक आव्हाने पैलण्याची ताकद कमी होत आहे. अशा ह्या बदललेल्या परिस्थितीचा विचार करता मार्क्स-आंबेडकरांच्या विचारांचा समन्वय साधून भारताला सक्षम असा आधार देता येतो.

**१) समाजाचे बौद्ध तत्त्वज्ञानासंबंधी विश्लेषण :**

मार्क्सच्या तत्त्वज्ञानात माणसाच्या आर्थिक शोषणाचा विचार केला गेला. ह्याउलट बौद्ध तत्त्वज्ञानात त्याच्या सर्वांगीण अवलंबनत्वाचाच सर्वंकष विचार सामावलेला आहे. दुसरे, बौद्ध तत्त्वज्ञान माणसाच्या पलीकडे कुठल्याही शक्तीला आध्यात्मिक असो वा भौतिक-साफ नकार देते. ह्याचा अर्थ माणूस जरी दिलेल्या परिस्थितीमध्ये जन्माला आला आणि राहत असला तरी ती परिस्थिती त्याला मुक्तीप्राप्तीपासून रोखू शकत नाही. बौद्ध तत्त्वज्ञान हेही मानते की, सामान्य माणसाच्या मुक्तीप्राप्तीच्या आकांक्षा आर्थिक वंचितपणामुळे रोखल्या जातात आणि त्यामुळे त्याने त्यांच्यावर मात करायला हवी. ह्याप्रमाणे बौद्ध तत्त्वज्ञान समाजवादी परिस्थितीचा पुरस्कार करताना दिसते. समाजवाद काही मूलभूत बौद्ध तत्त्वप्रणालीची अनिवार्य निष्पत्ती नाही. पण जोवर तो माणसाच्या आर्थिक गुलामगिरीला घालवतो आणि उच्च तर मुक्तीचा मार्ग सुकर करतो. तोवर तो त्याला संयुक्तिकच ठरतो.[४०] सर्व पातळीवर बौद्ध धर्म हा भांडवलशाहीच्या विरुद्ध आहे असे दिसते. बौद्ध धर्मातील कर्मही संकल्पना माणसाच्या मुक्तीच्या अवस्थांवर प्रकाश टाकते.

कार्ल मार्क्सने तर माणसाच्या विकासाबाबत विरोध विकास तत्त्व सांगताना माणसाची मुक्ती ही सरळमार्गाने होत नसून ती नागमोडी वळणातून होती. त्यातही त्याने अवस्थांचे वर्णन केले आहे. बौद्ध धर्मानुसार माणूस हा आर्थिक दुर्मिळतेतून नव्हे तर मानसिक आणि सामाजिक गरजा ह्यातील अस्वस्थता यामुळे मुक्त नसतो. दुसऱ्या बाजूला मार्क्स म्हणतो की, माणूस त्याची सामाजिक व आर्थिक परिस्थिती बनवत नाही. उलट तो त्या परिस्थितीचे अपत्य असतो. कार्ल मार्क्स परिस्थितीचे कारण आर्थिक मानतो तर बुद्ध आर्थिक बरोबरच इतरही स्त्रोताचा विचार करतो असे म्हणता येईल. बौद्ध धर्माचा उदय हा भारतीय विचारांच्या इतिहासात एक महत्त्वाची घटना ठरते. बुद्धाचा सारा कल मानवी अस्तित्वाचे गूढ उकलण्याकडेच नव्हता तर त्या आधारे संपूर्ण जगात परिवर्तन घडवून आणण्याचा होता. दुसऱ्या बाजूला समाजात राहणारा माणूस हा मार्क्सच्या सिद्धांताचा केंद्रबिंदू आहे.

मार्क्सवाद आणि बौद्ध तत्त्वज्ञान दोन्हीही कृतिशील आहेत. मार्क्स ऐतिहासिक भौतिकवादी सिद्धांतानुसार सामाजिक-राजकीय कृतींचा पुरस्कार करतो तर बुद्ध मानव मुक्तीची संकल्पना ऐहिक पातळीवरून आध्यात्मिक पातळीवर घेऊन जातो. म्हणजे बुद्ध आणि मार्क्स दोघेही कृतीला प्राधान्य देतात. अनित्य, दु:ख व अनत्त या बौद्ध संकल्पना आणि परात्मभावाची संकल्पना ह्यांच्याशी सांगड घालतात.

बौद्ध तत्त्वज्ञान अभ्यासणाऱ्यास मार्क्सचे तत्त्वज्ञान समजणे सोपे जाते, कारण मार्क्सवादाचा प्रवास बौद्ध तत्त्वज्ञानातूनच जातो. परंतु बौद्ध मात्र आधुनिक काळातील नव्हता म्हणूनच त्यांचे वर्गीय स्वरूपही मार्क्स जसे सांगतो, तसे ठरविता येणार नाही.

**२) समन्वयवाद आणि भारतीय जातिव्यवस्था :**

भारतीय समाजामध्ये जातिवास्तव नाकारता येत नाही. भारतीय माणूस आपले जीवन सुकर, आदर्शमय बनविण्यासाठी नेहमीच धडपड करत असतो. त्यामध्ये खालची जात वरची

जात, श्रेष्ठ-कनिष्ठता, ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा भेदभाव मोठ्या प्रमाणावर दिसतो. ह्या भेदभावामुळे एक परिणाम असा झाला की, जातीमुळे एकगठ्ठा मतातून सत्ता मिळविण्याचा मार्ग मोकळा झाला. सत्ता मिळाल्याने प्रत्येक जातीला अस्तित्व निर्माण झाले. मात्र नंतरच्या काळात आरक्षणासाठी जाती-जातींमध्ये स्पर्धा सुरू झाली. अगदी अलीकडे मराठा आरक्षण, मुस्लीम आरक्षण धनगर आरक्षण याबाबतीतही असेच दिसते. प्रत्येक जातीने आपापला फायदा पाहण्याच्या खटाटोपामधून ती जात वर्गात रूपांतर कशी होते ह्याचा अंदाजही घेता येत नाही. शहरीकरण अलीकडे वाढत चालले आहे,खेड्यातील समाज शहराकडे किमान रोजगार मिळेल ह्या आशेवर शहरात आला. शहरामध्ये नवनवीन रोजगारामुळे आणि उत्पादनाच्या प्रक्रियेमध्ये माणूस स्वत:ला अधिक सक्रिय करत असताना जाती जातीतील भींती नाहीशा करण्याचा प्रयत्न करू लागला. जात आणि वर्गाचा लढा हा प्राचीन काळापासून सुरू आहे. परंतु जागतिकीकरणाचा स्वीकार केल्यापासून त्यात मोठे बदल झाल्याचे दिसते. जातीचा आणि वर्गाचा लढा हा गौतम बुद्धांपासून अगदी त्यांच्याही पूर्वीपासून ते फुले-आंबेडकरांपर्यंत ह्या लढ्यात सातत्य दिसून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीचा उगम आणि विकास याविषयी सखोल चिंतन केले. त्यानंतरही डॉ. सदानंद मोरे, महर्षी शिंदे, उत्तम कांबळे, डॉ. रावसाहेब कसबे, इ. अलीकडच्या विचारकांनी ह्या विषयावर विचार मांडले. डॉ. कसबे म्हणतात वर्ग कसे बंदिस्त होतात हे समजून घेतल्याशिवाय जाती कशा निर्माण होतात हे समजणार नाही. तर डॉ. सुंमत ह्यांनी असा आरोप केला की, जातीच्या अंगाने विचार करणाऱ्यांनी वर्गाकडे लक्ष दिले नाही आणि वर्गाच्या बाजूने विचार करणाऱ्यांनी जातींच्या प्रश्नाकडे लक्ष दिले नाही. अशी गोंधळांची स्थिती निर्माण झाली. आंबेडकरवादी विचारक व समर्थकांना वाटते, मार्क्सवाद्यांनी जातीचा प्रश्न घेतला नाही आणि मार्क्सवादी तत्त्वचिंतकांनी भारतातील जातीयता समजून न घेता विचार मांडले व कृती केली असा आरोप-प्रत्यारोप सुरू आहे.

कॉ. शरद पाटील ह्यांच्या मते जातिसंस्था ही शासन-शोषणाची भौतिक संस्था आहे. जातींना इमला मानून  उपाययोजना करता येत नाही. हे मार्क्सवादी लक्षात घेत नाही व विचार करत नाही . डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातिसंस्थेबाबत भौतिक आधार काय आहेत ह्याबाबत सविस्तर विश्लेषण करतात.कॉ. शरद पाटील जाती व्यवस्थेच्या नातेगोते संबंधांना भौतिक मानतात. जातीमुळे फक्त श्रम विभागणी होत नाही तर श्रमिकांचीच विभागणी होते असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मत नोंदवितात. हे स्पष्ट करण्यासाठी उदाहरण देतात की, महार वतन म्हणजे गुलामगिरीचा जाहीरनामाच आहे. मेलेले ढोर ओढणे, मयताचे निरोप सांगणे, गावाची सफाई, संरक्षण, शेतमजुरी अशी टाकाऊ कामे महाराजांच्या वाट्याला आली.ह्या कामांमुळे महार समाज हा मुख्य प्रवाहातून बाहेर पडला. एवढेच नव्हे तर कोणत्या हमालाने कोणती कामे करावी,ह्यांचीही यादी बाबासाहेबांनी दिली. जातींचा अंत होण्यासाठी ज्या चळवळी उभ्या राहिल्या, त्यामुळे भारतात जातीबद्दलची अस्मिता निर्माण होऊन जातिसंस्था अधिक मजबूत झाल्याची उदाहरणे भारतात दिसून येतात. अगदी त्याच प्रकारची स्थिती वर्गाबाबतीतही दिसून येते. वर्ग अंताच्या चळवळीला आंबेडकरवादाने नेहमीच दुय्यम ठरविले आहे. त्यांनी जाती अंतालाच प्राधान्य दिले आहे. प्रा. नलिनी पंडित ह्यांनी तर जाती चळवळी या फुटीरवादी व प्रतिगामी असतात तर वर्ग आधारित चळवळी शोषितांना संघटित करणाऱ्या व पुरोगामी असतात, असा निष्कर्ष काढला. अगदी विचारवंतांच्या या वैचारिक गोंधळामुळे, विरोधाभासामुळे जात आणि वर्ग ह्याबाबतच्या समस्या आणखी गंभीर होत चालल्या आहेत. जागतिकीकरण, औद्योगिकरण स्वीकारणाऱ्या भारतासारख्या देशात जातिव्यवस्थेअंतर्गत वर्गांची निर्मिती झाली आहे हे यावरून स्पष्ट झाले होते. १९३८ साली जो कामगार संप केला गेला त्यातील दलितांना कामगार वर्गात समाविष्ट करावे यासाठी प्रयत्न केला. म्हणूनच कॉ. शरद पाटील यांनी आपले मत नोंदविले की, एकांगी जातिसंघर्ष व एकांगी वर्गसंघर्ष भारतीय समाजक्रांतीचा प्रश्न सोडवू शकत नाही.[४१]

भारतात वर्गोन्नतीचा मार्गही जात्योन्नतीतूनच पुढे जातो. जातिव्यवस्थाक शोषणामुळे जातीय जाणीव व जात्योन्नतीचा मार्ग अग्रेसर होत राहतो. अशा स्थितीमुळे जात्यंताच्या व वर्गांताच्या लढ्याचे पेच अधिक तीव्र होत जातात. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर भांडवली साम्राज्यवादी शोषण सर्वदूर सर्वंकषपणे कर्म करीत आहे. जातिव्यवस्थाक उत्पादन पद्धतीला मागे टाकून भांडवली उत्पादन पद्धती भारतात मध्यवर्ती बनली असली तरी जातिव्यवस्थाक शोषणाच्या तऱ्हा आजही टिकून आहेत. भांडवलशाहीमध्ये वैश्विकरणाची प्रवृत्ती असते. भांडवलशाही श्रमविभागणी श्रमाचे व श्रमपद्धतीचे एकवर्तीकरण करत असते. अशा परिस्थितीतही भारतामध्ये जातीच्या आधारावर श्रम कौशल्य व श्रमातील सहभाग ठरविला जातो. जातिविषयक उत्पादन व विनिमय संबंधातील दडपणुकीतून श्रम काढून घेण्याची रीत आजही कार्य करताना आढळते. उतरंडीच्या रचनेनुसार श्रम व मोबदला ठरवला जातो. उतरंडीची विषमता व शोषण या तत्त्वाचा आर्थिक रचनेवरील प्रभाव टिकून आहे. जागतिकीकरणाच्या काळातही भारतातील सरंजामी जातिव्यवस्थेच्या दडपणुकीच्या तंत्राचा वापर अजूनही टिकून आहे.[४२] जातिअंताच्या प्रयत्नातून जात उन्नतीचा मार्ग स्वीकारला जातो. श्रमविभागणीचे आणि श्रम पद्धतीचे एकत्रीकरण आपणास भांडवलशाहीमध्ये दिसते. सनातनी भारतीय माणसाच्या मनातून जोपर्यंत जात जाणार नाही तोपर्यंत त्याची अधोगतीच राहणार आहे. जागतिकीकरणामुळे मात्र जुनी संस्कृती मोडून काढण्यास मदत होत आहे. जातीच्या निर्मितीची शास्त्रीय कारणे जोपर्यंत माहिती होणार नाही तोपर्यंत तिच्या नाशासाठी काय करावयाचे हे समजणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कार्लमार्क्स आणि भगवान बुद्ध ह्यांची तुलना केली. त्याच आधारावर डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी देखील १९८५ मध्ये आंबेडकर आणि मार्क्स लिहून त्यांना अभिप्रेत असलेला समाजवाद आणि समन्वयवाद मांडला. भगवान गौतम बुद्धांनी जे विचार मांडले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी जाती-वर्गाबाबतची जी संकल्पना सविस्तर विशद केली. त्यानंतर भारतातील दादासाहेब गायकवाड, शरद पाटील, रावसाहेब कसबे इ. विचारवंतांनी भूमिका विशद केली. त्यावरून असे

स्पष्ट होते की, मार्क्स आणि आंबेडकर ह्यांची तुलना करून विरोधाभासाचे मुद्दे बाजूला ठेवून कट्टर मार्क्सवादी आणि कट्टर आंबेडकरवाद्यांनी एकत्र येऊन जाती संस्थेचे उच्चाटन करण्याचा मुख्य कार्यक्रम हाती घेतला तर जातीचा नायनाटहोईल.

कार्लमार्क्स ह्यांनी जागतिक स्थिती समोर ठेवून वर्गाबाबत विचार स्पष्ट केले, पिळवणुकीबाबतचे धोरण सांगितले. भांडवलदार आणि श्रमिक ह्यांच्यातील संबंध सांगितले. विरोधातून विकास कसा साधला जातो ह्याचे स्पष्टीकरण सांगितले. आर्थिक कारणामुळेच समाजात कलह निर्माण होतो, हे स्पष्ट केले. हे सर्व विचार मांडताना भारतीय समाज वास्तवात जातीमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांचे आकलन पूर्णत: समजून घेतले नाही,जातीबाबत धोरण स्पष्ट केले नाही. भारतीय कामगार जातिव्यवस्थेने ग्रासला आहे. जातिव्यवस्थेमुळे त्याची पिळवणूक होते आहे,तसेच तो जातीमुळे विभागला गेला आहे. श्रमविभागणीमुळे श्रमाच्या विभाजनाबरोबर श्रमिकांचेही विभाजन झाले हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केले. भारतामध्ये प्रत्येक जातीत एक नवा वर्ग उदयास आला आहे. ह्याबाबतचा एकत्रित अभ्यास करावा लागतो आणि तो समन्वय साधने आज काळाची गरज आहे. समाजामधील विविध प्रश्न आणि वरीलप्रमाणे उद्‌भवलेल्या समस्या सोडवावयाच्या तर जात आणि वर्गाचे लढे एकत्रित लढण्याची गरज आहे. जात आणि वर्ग यांचा समन्वय म्हणजेच मार्क्स आणि आंबेडकर यांच्या विचारांचा समन्वय होय.

भारतीय दलित आज दिशाहीन बनलेला आहे. कोणताही माणूस की, जो डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार माननारा आहे. तो आज कट्टर किंवा शुद्ध आंबेडकरवादी राहिला नाही. तो स्वत:ला आंबेडकरवादी मानत असला तरी तो कट्टर दिसत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय माणसाची जी संकल्पना सांगितली, त्याचा आपल्याला अनुकूल असा तो अर्थ काढतो. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी जगण्याची तत्त्वे सांगितली ती तत्त्वे पायदळी तुडविणाऱ्या राजकीयपक्षाचा झेंडा आज दलित पुढाऱ्याच्या हातात दिसतो. सत्तेसाठी वाटेल त्या

विचारसरणींच्या पक्षात प्रवेश करून मूळ आंबेकरवादापासून पलायन करतो आहे. ह्याबाबतचे चिंतन केले तर आपण ह्या मतापर्यंत येऊन थांबतो की, जात आणि वर्ग म्हणजेच पाया आणि इमला ह्याबाबत एकात्म धोरण समाजाला देऊन दोन्ही विचारसरणी बाबत गोंधळाची स्थिती न ठेवता दोन्हीही विचार एकत्र आणून विविध सामाजिक गोंधळाच्या स्थितीवर मात केली पाहिजे. तसेच मार्क्सवाद्यांनीही फक्त वर्गाच्या संकल्पनेत अडकून न राहता जातीबाबत समस्या समजून घेतल्या पाहिजे फक्त वर्ग लढा पुढे न नेता जातीच्यासाठी लढा सुरू केला पाहिजे. कम्युनिष्टांनी जातिसंस्थेचा प्रश्न विचारात घेतल्याशिवाय भारतात क्रांती करणे अशक्य आहे. ते नंतरच्या काळात कॉम्रेड एस.वाय कोल्हटकर, प्रसिद्ध समाजवादी विचारवंत मधू लिमये ह्यांचेबरोबरच इतर कार्यकर्ते व नेते ह्यांना मान्य झाले. डॉ. आंबेडकरांच्या मते ह्या सर्व संशोधकांच्या दृष्टीतून एक महत्त्वाची गोष्ट सुटली होती-त्याच गोष्टीवर डॉ. आंबेडकरांची भर देऊन जाती संस्थेचे कोडे उलगडण्याचा प्रयत्न केला आहे. बाबासाहेबांच्या दृष्टीने जात स्वत:च एक सुटा, स्वतंत्र असा घटक नाही. तर ही संपूर्ण समाजाशी निश्चित स्वरूपाचे संबंध असणारी व ह्या समाजाच्या अंतर्गत एका गटाच्या स्वरूपात अस्तित्वात असणारी गोष्ट आहे. यात एकटी, सुटी किंवा स्वतंत्र अशी कधीही अस्तित्वात असू शकत नाही. ती जात समाजातच अस्तित्वात येते त्यामुळे आपल्याला डॉ. आंबेडकरांच्या जातीच्या उगमाची आणि विकासाची संकल्पना समजून घेताना दोन गोष्टी नीट समजून घ्याव्या लागतील पैकी एक जातींचे संपूर्ण समाजाशी निश्चित स्वरूपाचे संबंध कसे असतात आणि दुसरी समाजाच्या अंतर्गतच एका गटाच्या रूपात जातीच अस्तित्व कसे असते.[४३]

जातीच्या उगमाची चर्चा करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे मत होते की, भारतीय समाज जगातल्या सर्व समाजाप्रमाणे वर्गीय होता. असे असले तरी जगातल्या कुठल्याच समाजात जाती निर्माण झाल्या नाहीत, ही वस्तुस्थिती लक्षात घ्यावी लागते. बाहेरच्या समाजाने

वर्गव्यवस्था खुली ठेवली होती तशी भारतीय स्थिती नाही इतर देशातील ह्या स्थितीला कारण असे होते की, तेथील विवाहसंस्थामुक्त होती. भारतात तसे घडले नाही.

भारतातील दलित चळवळीने सामाजिक विषमतेविरुद्धलढे करण्यात जेवढा पुढाकार घेतला तेवढा आर्थिक विषमतेसाठी घेतला नाही आणि भारतातील मार्क्सवाद्यांनी जेवढा पुढाकार आर्थिक लढे लढण्यासाठी घेतला, तेवढा सामाजिक समता निर्माण करण्यासाठी घेतला नाही. अर्थात ह्या दोघांच्या मानसिकतेमध्ये ह्याचे उत्तर सापडते. ह्या दोन्ही चळवळी ह्याच कारणामुळे विकलांग झाल्या आहेत. जेव्हा दलित समाज आर्थिकदृष्ट्या प्रबळ होईल तेव्हा सामाजिक विषमता नष्ट करण्याचे बळ त्याच्या अंगी येऊ शकेल. डॉ. रावसाहेब कसबे ह्यांच्या मते, दोन्ही चळवळी हातात हात घालून चालल्या पाहिजेत. कर्मवीर दादासाहेब गायकवाडह्यांचा लढा सामाजिक आणि आर्थिक स्वरूपाचाच होता.

स्वातंत्र्योत्तर काळात आणि जागतिकीकरणाच्या युगात भारताला महासत्ता बनविण्याचे स्वप्न पाहणाऱ्या घटकांनी हे लक्षात घेतले पाहिजे की लोकशाहीत संख्येला महत्त्व प्राप्त झाले. बहुसंख्य जातींना राष्ट्रीय संपत्तीत जास्त वाटा द्यावा लागेल. परंतु कल्याणकारी राज्याच्या भूमिकेमुळे कनिष्ठ समाज घटकांना विकासापासून वंचित ठेवता येणार नाही. जातीचा प्रश्न गंभीर तर आहेच परंतु तो राष्ट्रीय देखील आहे. महासत्ता होण्यापूर्वी कोणत्याही समाजाला सामाजिक व आर्थिक न्याय प्राप्त करू घ्यावा लागतो. आपल्याकडे ह्या वादाचा बदनामीसाठी जसा उपयोग केला जातो तसा स्तुती करण्यासाठीही.[४४] खरे सांगायचे तर ह्या दोन्ही गोष्टी निरर्थक आहेत. बदनामी करणाऱ्यांचे हेतूशुद्ध नसतात. तसेच स्तुती करणाऱ्यांचे मन ही निर्हेतूक नसते. याची जाणीव त्यांनाही असते. वास्तविक पाहता कोणीही माणूस पूर्णपणे मार्क्सवादी, आंबेडकरवादी किंवा समाजवादी असण्याची सुतराम शक्यता नाही.असे असले तरी, भारताच्या आजच्या परिस्थितीत समन्वयी विचार लक्षात घेऊन्न आंबेडकरवाद आणि मार्क्सवादाकडे पाहिले पाहिजे.[४५] संपूर्ण जग बदलले आहे. जुने सिद्धांत ढासळले आहेत. विचारवंतांना आपल्याच विचारांची

पुनर्मांडणी करावी लागत आहे. पण प्रश्न मात्र तेच आहेत.[४६] जयंत गडकरी ह्यांनी जागतिकीकरणाचा संदर्भ देऊन असे स्पष्टपणे नोंदवले आहे की, जागतिकीकरणाच्या नव्या पर्वामध्ये गरिबी वाढली नाही. परंतु विषमता नक्कीच जास्त प्रमाणावर वाढली आहे. त्यांच्या कारणांचा अधिक सखोल अभ्यास झाला पाहिजे त्याचे विविध पदर तपासले पाहिजे, बुद्ध की कार्ल मार्क्स ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुस्तिकेचे अनुवादक गौतम शिंदे ह्यांनी आज भारतात विद्यमान असलेली लोकशाही जरी बाबासाहेबांना अभिप्रेत असलेली लोकशाही नसली तरी सनदशीर मार्ग जोवर उपलब्ध आहेत, तोवर रक्तरंजित क्रांतीचा विचार धुडकावून लावला पाहिजे.[४७] म्हणूनच बुद्धाच्या मार्गाची आज देशाला आवश्यकता आहे. जातीव्यवस्थेने ह्या देशातील सर्व धर्मांना पोखरून टाकले आहे, असे मत नोंदवले आहे. ह्या निमित्ताने मार्क्स-आंबेडकर समन्वयवाद आणि समकालीन जातिव्यवस्थेच्या प्रश्नांची चिकित्सा महत्त्वाची व उपयुक्त ठरते.

संदर्भटीपा:

१. आंबेडकर बाबासाहेब, संपूर्ण वाङ्मय खंड - १, पृ.क्र. २९.

२. पाटील शरद, जातिव्यवस्थाक सामंती सेवकत्व, पृ.क्र. ८.

३. उ.नि.सा. पृ.क्र. ११८.

४. उ.नि.सा.  पृ.क्र. ११६.

५. वाघमारे वसंत, जातिव्यवस्था निर्मिती आणि स्वरूप, सुगावा प्रकाशन पुणे, पृ.क्र. २८.

६. पाटील शरद, मार्क्सवाद : फुले-आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, सप्टे. १९९३, पृ.क्र. ७३.

७. उ.नि.सा., पृ.क्र. ७३.

८. वाघमारे वसंत, जातिव्यवस्था निर्मिती आणि स्वरूप, सुगावा प्रकाशन पुणे, पृ.क्र. ३०.

९. आंबेडकर बाबासाहेब, भारतातील जाती त्यांची संरचना, उत्पत्ती आणि विकास, युगसाक्षी प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. ५.

१०. उ.नि.सा.  पृ.क्र. १६.

११. जोशी सु.वि., जातिअंताच्या चळवळीची दशा आणि दिशा, सुगावा प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, पृ. क्र. १०.

१२. उ.नि.सा.,पृ. क्र. १२,१३.

१३. गवळी (गौरव ग्रंथ), नवयुग दि. १३/४१९४७ पृ.क्र. ३८६.

१४. आंबेडकर बाबासाहेब ह्यांचे नेतृत्वाखाली दि. १० जाने. १९३८ रोजी मुंबई प्रांतिक असेंब्ली वर मोर्चापुढे केलेले भाषण.

१५. सुमंत यशवंत व पुंडे (संपा.) महाराष्ट्रातील जातिसंस्थाविषयक विचार, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८८.

१६. उ.नि.सा., पृ.क्र. ११.

१७. बनसोड शिवराम, मार्क्सवादी दृष्टिकोनातून साम्राज्यवाद व जातिव्यवस्था, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.क्र. २०६.

१८. बीरमल नितीन, जातिसंस्थेचे बदलते आधार, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ६०. (निबंध- शोषित जातींना जागतिकीकरणामुळे मुक्तीची संधी)

१९. कोठारी रजनी, स्टेट अगेत्स्ट डेमॉक्रॉसी : इन सर्च ऑफ ह्युमन गव्हर्नन्स् अजेंठा पब्लिशर्स, दिल्ली १९८८.

२०. व्होरा राजेंद्र, समाज प्रबोधन, संस्थाद्वारा आयोजित परिसंवादात मला जात अशी दिसते यावर २२ ऑगस्ट १९९९ रोजी मांडलेले विचार.

२१. पळशीकर सुहास, जात व महाराष्ट्रातील सत्ताकारण, सुगावा प्रकाशन पुणे, १९९८, पृ.क्र. २४.

२२. तुलतुंबडे आनंद, योनी १२ व १३ मार्च २००८ रोजी मोईन, शाकीर स्मृती व्याख्यान २००८, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ येथे दिलेले भाषण.

२३. सोनावणे सुहास (संपा.), ग्रंथकार भीमराव, अनुभव अक्षरधन प्रकाशन, मुंबई पृ.क्र. ७८, ७९.

२४. आंबेडकर बाबासाहेब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भाषणे भाग ड्ढ १ १९२० ते ३६ पृ.क्र. २५१ ते २५३ खंड १८ मुन नरके व इतर (संपा.)

२५. उ.नि.सा., पृ.क्र. ९६, ९७.

२६. कसबे रावसाहेब, 'आंबेडकर आणि मार्क्स', सुगावा प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २००६, पृ.क्र. २७५..

२७. कऱ्हाडे सदा, उ.नि.सा., पृ.क्र. १०.

२८. कसबे रावसाहेब ह्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात डॉ. आंबेडकर अध्यासन येथे १६ जाने. २०१२ रोजी दिलेले भाषण.

२९. सुमंत यशवंत, समाज प्रबोधन पत्रिका वर्ष ४९ क्र. १९४ एप्रिल/जून २०११मधील लेख.

३०. सुरवसे किरण, सक्षम समीक्षा वर्ष १ ले अंक तिसरा, ऑक्टो. ते डिसें. २०१३ मधील लेख पान नं. १८ शैलेश त्रिभुवन (संपा.)

३१. सुकाळे विवेकानंद, यांनी विद्रोही वर्ष ७, अंक - ४, २००९, मधील लेख पृ.क्र. २५.

३२. थोरात पी.बी.(संपा.), अन्वीक्षण त्रैमासिक, जोशी ललित यांची हिंदी सिनेमातील दलित प्रतिमा हा लेख वर्ष ३, अंक ४, एप्रिल ते जुन २०१३.

३३. कसबे रावसाहेब यांनी अन्वीक्षण या त्रैमासिक वर्ष ३ अंक ४ एप्रिल ते जून २०१३ मध्ये लिहिलेला लेख शीर्षक जातीअंत आणि जातीच्या माणसशास्त्राची शक्यता.

३४. कऱ्हाडे सदा, मार्क्सवाद, बुद्धवाद आणि आंबेडकरवाद, लोकसाहित्य प्रकाशन औरंगाबाद, दुसरी आवृत्ती, मे. २०१०, पृ.क्र. ९६, ९७.

३५. कसबे रावसाहेब, उ.नि.सा., पृ.क्र. २८४-३००.

३६. गायकवाड संजय, ह्यांचा एम. फिल. प्रबंध, जुन २००९, शीर्षक डॉ. रावसाहेब कसबे ह्यांच्या विचारातील मार्क्स- आंबेडकरांचा वैचारिक समन्वय, पान नं. ७९.

३७. कसबे रावसाहेब,उ.नि.सा., पृ.क्र. २७१ - ३०७.

३८. उ.नि.सा., पृ.क्र. ३४२ - ३७२.

३९. उ.नि.सा., पृ.क्र. ३६१.

४०. परदेशी रणजीत ह्यांचे महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषद १७ वी परिषद, पुणे येथील अध्यक्षीय भाषण.

४१. सांकृत्यायन चटोपाध्याय, बलराममूर्ती, शर्मा/बुद्धविचार मार्क्सवादी दृष्टिक्षेप, पृ.क्र. ११.

४२. पाटील शरद, मार्क्सवाद : फुले-आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, सप्टे. १९९३, पृ.क्र. ७ते१६.

४३. रणसुभे विलास (संपा.), जात वर्ग व परिवर्तनाचा लढा, लोकवाङ्गृह, मुंबई, ऑगस्ट २००८, पृ.क्र. १२७, उमेश बगाडे यांचा लेख.

४४. रणसुभे विलास (संपा.), जात वर्ग व परिवर्तनाचा लढा, लोकवाङ् गृह, मुंबई, ऑगस्ट २००८, पृ.क्र. ७, कसबे यांचा लेख.

४५. कांबळे उत्तम, रावसाहेब कसबे ह्यांचे क्रांतीकारी चिंतन, सुगावा प्रकाशन, पुणे, जुन २००६, पहिली आवृत्ती, पृ.क्र. ६७.

४६. गायकवाड सुधाकर, डॉ. रावसाहेब कसबे एक मूल्यमापन, सुमेध प्रकाशन पुणे, डिसें. २००७, पहिली आवृत्ती, पृ.क्र. २५.

४७. शिंदे गौतम (अनु.) बुद्ध की कार्ल मार्क्स डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन पुणे, दुसरी आवृत्ती डिसें. २००२, पृ. क्र. ३१.

प्रकरण चौथे

# मार्क्स-आंबेडकर समन्वयी परिप्रेक्ष्यातून स्त्री प्रश्नांची चिकित्सा


४.० स्त्री समस्यांचे स्वरूप

४.१ मार्क्सवादी दृष्टिकोन आणि स्त्री

४.२ आंबेडकरवाद आणि स्त्री

४.४ समकालीन स्त्री प्रश्न आणि भारतीय समाजव्यवसथा

४.३ समन्वयीपरिप्रेक्ष्यातून स्त्री प्रश्नांची चिकित्सा

४.४ भारतीय स्त्री आणि समन्वयी विचार

प्रकरण चौथे

# मार्क्स-आंबेडकर समन्वयीपरिप्रेक्ष्यातून स्त्री प्रश्नांची चिकित्सा

**प्रस्तावना :**

पाश्चिमात्त्य देशांप्रमाणे भारतीय महिला अत्याचार, शोषण आणि अपमान ह्या शापांनी भारतही ग्रस्त आहे. विज्ञानाच्या साह्याने प्रगतीचे अनेक टप्पे गाठूनही ह्या समस्या आपण थांबवू शकलो नाही. आधुनिक शिक्षण घेतलेल्या स्त्रियांच्या जीवनात विभिन्न प्रकारचे मानसिक संघर्ष निर्माण होत आहेत. स्वत:च्या कुटुंबाला हातभार लावण्यासाठी त्यांना जीवनाच्या अनेक क्षेत्रामध्ये पुरुषांबरोबरीनेव्यवसाय किंवा नोकरी करावी लागत आहे. त्यावेळी त्यांना बाहेरच्या जगाशी संघर्ष करावा लागतो. स्त्रीत्वामुळे प्राप्त झालेले विशिष्ट प्रकारचे व्यक्तिमत्त्व घडविण्यासाठी व त्याला आदर्श रूप देण्यासाठी त्या घटकाचा सर्वांगीण विकास होणे महत्त्वाचे आहे. स्त्रियांच्या योगदानाची दखल ही आकस बुद्धीने व एकांगी घेतली जाते. स्त्रीवाद ही एक राजकीय जाणीव बनली असून जागतिकीकरणात स्त्रीला समोर ठेवून राजकारण केलेले आहेत. लिंगभावाचे राजकारण, स्त्री प्रश्नाचे राजकारण इ. स्त्री प्रश्न वेगळा आहे असे भासवून अनेक साहित्य निर्मिती केली आहे. असे असले तरी ब्राह्मणशाही, भांडवलशाही आणि पुरुषसत्ता ह्या तीन शोषण शासनाच्या संस्थांना गुलामीत भारतातील स्त्रिया जखडल्या आहेत. स्त्रियांना माणूसपण नाकारणाऱ्या मनुस्मृती सारख्या संहिता आजही प्रभावी ठरत आहेत. मनुस्मृतीने विवाह, वारसा, विधवा पुनर्विवाह, सहभोजन, स्त्रियांचे आदर्श, स्त्रियांचे समाजातील स्थान ह्याबाबत संहिता, कायदे तयार करून स्त्रियांवर अन्याय केला आहे. भारतीय स्त्रीविषयी दररोज अनेक प्रसार माध्यमांनी विविध दृष्टिकोनातून स्त्री प्रश्न हाताळले आहे. पुरुषसत्ता हे ह्यामधील

महत्त्वाचे कारण आहे. दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, अल्पसंख्य ह्या सर्व गटांनी आपापले प्रश्न सोडवावेत. त्यात दुसरा कोणी सहभाग घेणार नाही.अगदी तसेच कामगारांनी कामगारांचे, स्त्रियांनी स्त्रियांचे प्रश्न सोडवावेत, सामाजिक न्यायाच्या मागणीत हे अपेक्षित नाही, ह्या प्रवृत्तीमुळे समाजव्यवस्थेत भेद निर्माण होतात.

**प्राचीन भारतीय व्यवस्थेत स्त्रियांचे स्थान :**

प्राचीन वाङ्मयात क्वचित प्रसंगी स्त्रियांबद्दल उदार दृष्टिकोन व्यक्त झालेला दिसून येतो. ऋग्वेद काळातील समाजव्यवस्थेतील स्त्रियांना कोणते स्थान होते, ह्याबाबत अनेक वर्णने आली आहेत. सावळ्या वर्णाच्या स्त्रियांना एक विनिमयाची वस्तू म्हणून मानले गेले. अनार्य म्हणजे काळ्या रंगाच्या स्त्रियांच्या विटंबनेची सुरुवात उत्तर वैदिक काळापासून झालेली दिसते. कारण "वधू" या शब्दाचा अर्थ, निदान ऋग्वेदातील "दानसूक्ती" सुक्ताप्रमाणे बळजबरीने नेली जाणारी म्हणूनच दासी अशी स्त्री असा होतो. धर्मसूत्रांच्या काळात तर काळी स्त्री ही केवळ उपभोगासाठीच असते. तिला रखेल म्हणून ठेवावी, परंतु तिच्याशी विवाह मात्र करू नये, असे वसिष्ठ धर्मसूत्र सांगत होते. आपस्तंबी धर्मसूत्राची भूमिकाही त्यापेक्षा फारशी वेगळी नव्हती.[१]

प्राचीन भारतीय स्त्रियांच्या स्थानावर प्रकाश टाकणारे वाङ्मय म्हणून बौद्ध कालखंडातील साहित्य फार महत्त्वाचे आहे. बौद्ध कालखंडातील स्त्रियांच्या स्थितीवर थेरीगाथेत अधिक चांगला प्रकाश पडलेला आहे. ज्ञानप्राप्तीसाठी स्त्रिया बौद्ध भिक्खूंबरोबर निर्भयपणे चर्चा करीत असत आणि निर्वाण प्राप्तीचा मार्ग अनुसरत असत. तत्कालीन पुरुष स्त्रियांच्या ज्ञानप्राप्तीच्या मार्गात अडसर बनल्याचे उदाहरण सापडत नाही. त्या काळात काही गुलाम स्त्रियांना मुक्त केल्याची उदाहरणे आहेत. पुण्णिका आणि पुण्णा ह्या नावाने ओळखली गेलेली भिक्कुणी अनाथपिंडकाच्या पदरी असलेल्या दासाची मुलगी होती.तिला अनाथपिंडकाने मुक्त केल्यामुळेच ती एक अग्रेसर भिक्खुणी बनू शकली.

भारतीय संशोधकांनी महाभारताकडे चिकित्सक दृष्टीने फार उशिरा पाहिले की, स्त्री पुरुषात सरमिसळ लैगिंक संबंध होते, मातृप्रधान कुटुंबपद्धती अस्तित्वात होती. माणसामाणसात भाऊ बहीण, आई आणि मामा ही चार नाती सोडली तर नातीच नव्हती. कारण बाप कोण होता, हे निश्चितपणे सांगत येत नव्हते. व्यासांच्या इतिहास लेखनाचा प्रारंभ प्रजापती संस्थेपासून झालेला असून पितृप्रधान अवस्था त्या काळात उपलब्ध झाली. मानवी विकासक्रमातील इतिहासपूर्व काळात घडलेल्या घटनांचा वैशिष्ट्येपूर्ण अभ्यास करून मानवी विकासक्रमाची संगती लावण्याचे पहिले महत्त्वाचे काम मॉर्गननेच केले. त्याने आपल्यासमोर कुटुंबसंस्थेच्या विकासाचे प्रमुख चार टप्पे ठेवलेले आहेत.त्यात रक्तसंबंधी नातेवाईकांचे कुटुंब(The Consanguine Family), भागीदारी कुटुंबव्यवस्था(Punaluan Family), दांपत्य किंवा युग्मकुटुंब(Pairing family), आणि एकपती-पत्नी कुटुंबपद्धती(Manogamous Family)ह्या चार प्रकारांचा समावेश केला. पुढील काळात माणसाने निर्माण केलेल्या प्रत्येक संस्थेत माणसाचे हे माणूसपण जतन केले गेले. त्याने निर्माण केलेल्या विवाहसंस्था, धर्मसंस्था, शासनसंस्था इ. संस्थेत त्या खुणा जतन केलेल्या दिसतात. तसेच मॉर्गनने इराक्की इंडियन टोळ्यांचा अभ्यास करताना रक्तसंबंधातून निर्माण होणाऱ्या मानवी नात्यांची पद्धती शोधली.[२]

**स्त्री सत्तेचा पराभव :**

माणसाला एकमेकातील नात्यांचा वारसा प्राणिसृष्टीने दिलेला असला तरी विवाहसंस्थेने त्यांना एक नवा अर्थ दिला. जोपर्यंत माणसामाणसातील लैंगिक संबंध त्यांच्या रक्तसंबंधातील व्यक्तीत निर्वेधपणे होत होते आणि ते नैतिक समजले जात होते तोपर्यंत लैंगिक संबंधाबाबत व्यक्तिगत आवडीनिवडीला व्यापक प्रमाणात वाव नव्हता. परंतु पुढे माणूस लैंगिक संबंधाबाबत जसजशी आवड निवड करू लागला तसतशी रक्तसंबंधातील लैंगिक व्यवस्था कोलमडून पडली. परंतु तिचे कोलमडणे मानव जातीला प्रचंड दु:ख देऊन गेले. माणसाच्या मनात अनेक आंदोलने

निर्माण करून गेले.[३] थोडक्यात एकपतीपत्नी पद्धतीचा अवलंब झाल्याने स्त्रीवर इतर पुरुषांनी हक्क सांगणे सोडून देण्याचा विचारपुढे आला.

स्त्री जसजशी अनेकांच्या हक्कापासून मुक्त होण्याचा विचार करू लागली, तसतशी ती गुलामीत अडकत गेली. महाभारताच्या उद्योग पर्वात इष्टान् पुत्रान सास्थ दारान् म्हणजे संकटसमयी आपली पत्नीदेखील मित्राला निर्मळ अंतकरणाने अर्पण करावी, असा उपदेश सनत्सुजात ह्या तपस्वी तत्त्ववेत्याने केलेला आहे. प्राचीन ग्रीक, रोमन काळात स्त्री केवळ कुटुंबाचीच प्रमुख नव्हती, तर ती सामाजिक आणि धार्मिक जीवनाचे कायदे देणारी शक्तीही होती. मातृसत्ताक पद्धतीत मातृहत्या हा मोठा गुन्हा होता. ह्या गुन्ह्याला क्षमा नव्हती. पुढील काळातील परिस्थिती बदलली, माणूस पत्नीच्या मालकीत आणि शेतीच्या मालकीत कोणताही फरक करत नव्हता. भारतात स्त्रीला अपत्यप्राप्तीपर्यंतच्या काळात भाड्याने किंवा गहाण ठेवल्याची उदाहरणे महाभारतात आहेत. जमिनीतील सुपीकता कमी झाली तर जमिनीची उपयुक्तता संपते तशी स्त्रीबीजाबाबत मत होते इथे स्त्री पराभूत झाली. अर्थात ह्या मांडणीला महाभारताचा आधार विचारवंतांनी दिला. राजा हरिश्चंद्राची उदाहरणे देऊन स्त्री पुरुषाच्या खरेदी-विक्रीचे अनेक छोटे मोठे प्रसंग प्राचीन वाङ्मयात सापडतात. तसेच जगातील धर्मांनी आपापल्या मंदिरात देवदासी संस्थेचा विकास करून पुरुषांची सोय भागविली आणि पुढे असेही वर्णन केले की, आजची वेश्यागृहे म्हणजे त्याजुन्या मंदिराचे नवे आणि आकर्षक रूप आहेत.

मातृसत्तेत सर्व स्त्रिया पुरुषांपेक्षा श्रेष्ठ होत्या. विरोध विकासवादाच्या दृष्टिकोनातून मातृसत्ताक व स्त्रीसत्ताक कालखंडाच्या नेणिवेला बंधमुक्त करतात.[४] स्त्रियांनी आद्य शेतीचा शोध लावला व स्त्रिया स्थिर समाजाच्या निर्मात्या ठरल्या आणि त्यामुळेच संस्कृतीचा उदय झाला. भारताचे तत्त्वज्ञान असलेल्या सांख्य निर्मिती कपिला नावाच्या स्त्रीने केली. यज्ञाची कर्ती असलेल्या स्त्रीनेच आद्य भूमितीची रचना केली. मातृदेवता व नियती ह्यांनी देववस्त्रांची निर्मिती केली. पहिल्या विणकामाच्या कलेचा प्रारंभ स्त्रियांपासून होतो. म्हणून एकूण आद्य भारतीय

संस्कृतीची निर्मिती मुख्यत्वे करून तत्कालीन भारतीय स्त्रियांनी केली असा निष्कर्ष काढला जातो.

भारतीय स्त्री ही भारतीय समाजाच्या उदय काळापासून तर आतापर्यंत पितृसत्तेच्या सामाजिक सांस्कृतिक आणि कौटुंबिक व्यवस्थांमध्ये कमी अधिक प्रमाणात कैद राहिलेली आहे. इतिहासाच्या कोणत्याच कालखंडात ती पुरुषांच्या दमन शोषणातून मुक्त राहू शकलेली नाही. स्त्रीप्रधान गणसमाजामध्ये पुरुष वर्गाला धार्मिक व राजकीय अधिकार नव्हते. राष्ट्रदेवी व गणमाता असलेल्या स्त्रीलाच हे अधिकार होते. मावळत्या स्त्री सत्तेचे प्रतीक असलेली सीता विरुद्ध उगवत्या पुरुषसत्तेचा राम यांच्यातील संघर्ष हा रामायणातील पायाभूत संघर्ष आहे. भारतीय स्त्री मुक्तीच्या प्रबोधन चळवळीला विद्रोही सीतेच्या प्रतीकाशी जोडण्याची क्षमता बाळगते. पती रामाने घेतलेल्या चारित्र्याच्या संशयाच्या विरोधात सीता आत्महत्या करते पतिपरायण पतिनिष्ठ सीता याऐवजी विद्रोही सीता आणि परावलंबी सीता असे सीतेचे प्रतीक हे विश्लेषण आपणापुढे आणते. पितृसत्तांक धारणाला हे विश्लेषण धक्का देते आमची प्रतीके समतेची, सीता शंबूक ताटकेची या घोषणेला प्रबोधन चळवळीत पुढे आणले.[४]

सांस्कृतिक संघर्षामध्ये वरील मुद्दा लक्षात घ्यावा लागतो. महाकाव्याचे नामकत्व देताना सांस्कृतिक संदर्भामध्ये ते जाणीवपूर्वक पुरुषाला म्हणजेच रामाला देणे किंवा कृष्णाचे महात्म्य वर्णन करणे ह्यातून नवीन एक अन्वेषण पद्धती जन्माला आली आणि तिचे आजच्या दृष्टीने महत्त्व आहे. "स्त्री पुरुष तुलनाकार, सत्यशोधक" ताराबाई शिंदे ह्यांनी स्त्री-पुरुषांची तुलना करताना जात-पुरुषसत्तांक समाजात निर्माण करण्यात आलेल्या व स्त्रियांना हीन, दुय्यम लेखणाऱ्या सामान्य मताला प्रतिकार करण्याची एक नवीन पद्धत स्वीकारली होती. वेद आणि संस्कृतवर ज्यांची मक्तेदारी होती. त्यांचेच श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक होत होता. मूल्यसंस्कृतीला जनसामान्यांची अधिमान्यता मिळण्यासाठी 'ब्रह्माच्या मुखातून भूदेव' असे

शास्त्रपुराणांनी घोषित केले. ह्यामागे कोणाचे हितसंबंध महत्त्वाचे होते हा प्रश्न निर्माण होतो. बौद्ध तत्त्वज्ञान, संत परंपरा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छ. शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, आदींनी समताधिष्ठित मापदंडासाठी आग्रह धरला.

**४.० स्त्री समस्यांचे स्वरूप** :

समाजातील स्त्री हा गट स्वतंत्रपणे उल्लेखिला जातो. जसे दलित, आदिवासी, भटके-विमुक्त व अल्पसंख्य, स्त्रिया इतर गटामध्ये फक्त पुरुषच असतात आणि स्त्रिया म्हणजे एक एकसंध गट. त्यामुळे स्त्री-समाजाचा सम्यक विचार होणे आवश्यक आहे. आजच्या लेखकांची मांडणी सदोष आहे. कारण प्रत्येक गटाने आपापले प्रश्न सुटे-सुटे सोडवावेत असे स्वरूप निर्माण करण्यात आले आहे. भारतीय समाव्यवस्थेमध्ये जातींमुळे एक भयानक उतरंड निर्माण झाली आणि त्यामुळे अपरिवर्तनीय अशा स्वरूपाची विषमता निर्माण झाली. स्त्री समस्यांचे स्वरूप पहात असताना आपणास जातिव्यवस्थेचे सैद्धांतिक स्वरूप अभ्यासल्याशिवाय पुढे जाता येत नाही. जातींमुळे माणसांची विभागणी झाली. जातींमुळे अधिकारांचीही वाटणी झाली आणि ही वाटणी मात्र असमान अशा स्वरूपाची निर्माण झाली.

जागतिक पातळीचा विचार करता असे दिसून येते की, स्त्री- पुरुष समानतेऐवजी पुरुषसत्तांक पद्धती आहे. स्त्री पुरुषांच्या उतरंडीमध्ये स्त्रियांचे स्थान नेहमीच दुय्यम स्वरूपाचे आहे. भारतात स्त्रियांवर जात टिकविण्याची सक्ती केली जाते. तोच स्त्रीधर्म मानला जातो. तोच तिचा आचार धर्म बनतो. स्त्री समस्यांचे स्वरूप जात टिकविण्याशी संबंधित असून स्त्री गौणत्वाची परंपरा चालूच राहते. मूलींचे शिक्षण, पतीची निवडह्या सर्वात हाच प्रश्न आहे. मुलींचाही एक माणूस म्हणून विकास होत नाही, जाणिवा निर्माण होत नाही. आकांक्षा विस्तारत नाहीत. आकांक्षा निर्माण झाल्या तरी त्या बोथट होतात. आणि या सर्व परिस्थितीमधून स्त्रियांचा, अखिल स्त्री वर्गाचा कोंडमारा होतो.

स्त्रियांचे जगणे आणि मरणे हे कुटुंबाच्या शांतीसाठी, समाजाच्या स्वास्थ्यासाठी असावे लागते अशा स्वरूपाची तिच्यावर सक्ती होते. हे सर्व असताना स्त्रियांच्या विषमतेबद्दल बोलणे, त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबाबत आवाज उठवून दाद मागणे, तसेच सामाजिक न्यायाची मागणी करणे ह्या सर्व बाबी समाजघातक आहेत, असा भास निर्माण करण्यासाठी खटाटोप केला जातो. स्त्रियांनी आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यासाठी आवाज उठविला की आपल्या समाजाची घडी विस्कटते.

साहित्यामध्ये वर्णन केलेल्या स्त्रीला देखील स्वत:चे स्वतंत्र भूमिकानिरपेक्ष व्यक्तिमत्त्व विकसित करता येत नाही. स्त्री एकाच वेळी माता, सखी, दासी इ. भूमिकांत जगत आली आहे. निरनिराळ्या नात्यांमध्ये ती आपली भूमिका बजावते, तरीही समाजाचा तिच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळाच आहे. आई आणि बहीण ह्या भूमिकांमध्ये स्त्रीला सर्वोच्च नेऊन ठेवलेले आढळते. तर लग्नानंतर लगेचच तिच्याकडे सहानुभूतीने पाहण्याच्या दृष्टिकोन बदलून जातो. ती नवीन भूमिकेत जगण्यास प्रारंभ करते. म्हणजेच स्त्री अनेक भूमिकांतून जगताना मात्र ती केवळ व्यक्ती म्हणून कधी जगतच नाही. लोकपरंपरेतील स्त्री प्रतिमा ह्या डॉ. प्रभाकर मांडे यांनी लिहिलेल्या साहित्यात उल्लेख केला की, पितृप्रधान कुटुंबव्यवस्थेत आणि त्यावर आधारित समाजरचनेत पुरुषप्रधानता येते. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत स्त्रीला स्वतंत्र व्यक्तिमत्त्व विकसित करण्यास मुळी वावच नसतो. ती आईबापाची मुलगी, नवऱ्याची बायको ह्याच भूमिकेत प्रामुख्याने जगते. समाजाने पुरुषाची अर्धांगिनी, अशीच तिची प्रतिमा निर्माण केली आहे. ह्यावरून असे दिसते की, प्राचीन काळी समाजजीवनात स्त्रीला महत्त्वाचे स्थान होते. परंतु मध्ययुगात ही स्त्री असुरक्षित झाली. आज स्त्रीला आदराचे, सन्मानाचे स्थान दिले जातेअसाचारित्र्याविषयीचा प्रश्न निर्माण करून रामायण काळात समाजजीवनातील त्यांचा सहभाग नष्ट केला गेला. परकीय राजवटींच्या काळात स्त्रियांच्या संरक्षणाच्या भूमिकेतून समाजात धोरणे निश्चित झाली व तीच प्रचलित झाली.

ग्रामीण भागामध्ये अल्पवयीन मुलींचे विवाह होत होते. त्यावेळी तिला सासरच्या जाचक बंधनात तिला रहावे लागत होते. ह्या सर्व पार्श्वभूमीत तिचे मन आई-वडील-भाऊ-बहीण आदी स्नेहींच्या आठवणीत रेंगाळते ह्याला वाट मोकळी करून देण्यासाठी या स्त्रीया जात्यावर दळताना ओव्यांच्या स्वरूपात आई व इतर नातेवाईकांचे स्मरण करतात. त्यात तिच्या पतीचा जर मृत्यू झाला तर कोणत्याही प्रकारचे कुंकू लावू नये, रंगीत वस्त्र परिधान करू नये, अलंकार घालू नये, एवढ्यावर न थांबता केशवपन केले जाते. पोटी पुत्र नसेल तर तिला निपुत्रिक संबोधिले जाते. मातृत्व हेच स्त्रीच्या जीवनाचे सर्वस्व आहे. त्यातच स्त्रीच्या जीवनाची परिपूर्णता आहे, अशी समाजाची धारणा होती,आहे आणि पुढेही ती तशीच राहील असे समाजशास्त्रज्ञांना वाटते.[५] भारतीय समाजव्यवस्था पुरुषप्रधान असून स्त्रियांचेस्थान गौण मानले. तिच्या वाट्याला दु:ख, कष्ट आलेले असतात. तिला दुसऱ्याचे धनमानून तिचा सामाजिक दर्जा कसाआहे, होता ह्याबाबत ऋग्वेद काळापासून उल्लेख आढळतात.

दक्षिण भारतात आजही मातृप्रधान कुटुंबपद्धती दिसून येते. सांस्कृतिक जीवनात स्त्रिला केंद्रस्थानी मानून परंपरेने चालत आलेल्या सर्व विधी आणि उत्सवात तिचे स्थान महत्त्वाचे मानले जाते. परंतु जागतिकीकरण आणि मुक्त अर्थव्यवस्थेची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून नव्याने वेश्याव्यापारामुळेमहत्त्वाचा प्रश्न निर्माण झाला.आंतरराष्ट्रीय स्तरावर सामाजिक, राजकीय आणि धार्मिक क्षेत्रात ह्या प्रश्नामुळे चिंता व्यक्त केली जात आहे. कुटुंबातील पुरुषांनी स्त्रीशी असलेल्या त्यांच्या नात्याचा संबंध तोडल्याने ती निराधार बनते आणि दारिद्र्य, अत्याचार ह्यांची शिकार बनते. पुरुषांचे वर्चस्व असलेल्या समाजातूनच ह्या वेश्याव्यवसायांची निर्मिती झाली. अहवालाप्रमाणे सुमारे २ते ३ लाख स्त्रिया बँकॉकमध्ये हॉटेल्स आणि मालिश करणाऱ्या केंद्रांमध्ये छुपेपणाने वेश्याव्यवसायात कार्यरत आहेत. काही अहवालानुसार त्यांची संख्या खूपच जास्त आहे. बॅकॉकमध्ये वेश्याव्यवसायावर कायदेशीर बंदी असूनही बँकॉकमध्ये सुमारे १०% स्त्रिया देहविक्रयाच्या धंद्यात गुंतलेल्या आहेत. फिलीपाईन्सचे राजधानीचे शहर असलेल्या मनीला

शहरात जवळजवळ १ लाख स्त्रिया वेश्या व्यवसाय करतात.[५अ] भारतातील हिंदू संस्कृतीने स्त्रियांच्या समस्येकडे सहानुभूतीने पाहण्याऐवजी स्त्रियांचा निषेधच केला आहे. त्यांच्यावर मानसिक गुलामगिरी लादली. मुलगी म्हणजे दारिद्र्याचे व दु:खाचे कारण मानले. मुलांच्या तुलनेत मुलीचे लाड देखील कमी होतात. भारतामध्ये अशा स्त्रियांना उदरनिर्वाहासाठी स्वत:चा देह किंवा श्रम विकण्यापेक्षा दुसरा मार्ग उरला नाही. भारतातील कायदे सुद्धा वेश्यांवर जुलूम करणारे असेच आहेत. काही विचार प्रवाहांच्या मते ह्या व्यवसायाला सुद्धा श्रमप्रतिष्ठा मिळावी कारण देहविक्री करून त्या स्त्रीया आपला उदरनिर्वाह करतात. महाराष्ट्रातील सांगलीमधील संग्राम ह्या स्वयंसेवी संस्थेने अशा स्वरूपाची मागणी केली होती. परंतु त्यांचे म्हणणे एक कपोलकल्पित कल्पना आहे. कारण कायद्याच्या चौकटीत देखील स्वेच्छेने केलेला देहविक्रय आणि बळजबरीने, इच्छेविरुद्ध केलेला देहविक्रय असा भेद करणे निरर्थक ठरते. ताराबाई शिंदे ह्यांनी आपल्या 'स्त्री पुरुष तुलना' ह्या निबंधात हिंदू स्त्री व पुरुषांच्या मानसिकतेचे अत्यंत वास्तव असे वर्णन केले आहे. जाणिवेच्या कक्षेत तो आईला पूज्य मानतो तर अजाणिवेच्या कक्षेत तिचा तिरस्कार करतो. १९६० नंतर भारतामध्ये ह्याबाबतीत आधुनिकतेचे वारे वाहू लागले. स्त्रियांच्या समस्यांबद्दल अनेक कडक कायदे बनविले असले तरी प्रश्न निर्माण होतो. तो मानसिक बदलाच्या स्त्रियांच्या अन्याय, अत्याचार ह्यांच्या विरोधात लढण्यासाठी स्त्रियाच पुढे आल्यात, स्त्रियांच्या चळवळी निर्माण झाल्या व एलिझाबेथ कॅडी स्टॅन्टन ह्या ३२ वर्षाच्या एका स्त्रीने बाजारातील एका ओट्यावर चढून धिटपणे स्वत:चे प्रश्न स्वत:च जाहीरपणे मांडले.[५ब]

मार्क्सवादी विचार प्रवाहांच्या मते खासगी संपत्तीची संकल्पना निर्माण झाल्यामुळे स्त्री गुलाम बनली. तिच्यापुढे अनेक समस्या निर्माण झाल्या. भांडवलशाहीने स्त्रियांच्या समस्यांना आणखी खत पाणीच घातले. असे असले तरी स्त्रीला निर्मितीचा अवकाश उपलब्ध करून देण्याचे श्रेय तथागत गौतम बुद्धांकडेच जाते.[६] त्यांनी स्त्रियांना सर्वप्रथम निर्वाणाची संधी उपलब्ध करून दिली हेच त्यांचे स्त्रीमुक्तीसाठी उचलले पहिले पाऊल होय. मध्ययुगात महानुभव

पंथाने स्त्रियांना विशिष्ट मर्यादेपर्यंत मोकळीक दिली. भारतामध्ये इंग्रजांचे आगमन झाल्यापासून स्त्री प्रश्नाचे स्वरूप उकलून दाखविण्याचा प्रयत्न झाला. भारतात स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय, अत्याचाराविरुद्ध १९ व्या शकतकातील उत्तरार्धात कायदे राबवायला सुरुवात केली. १८ व्या शतकात व्यभिचार हा महत्त्वपूर्ण गुन्हा समजला जात होता. त्याबाबतचे निमय व शिक्षा स्त्री आणि पुरुषांसाठी वेगवेगळ्या होत्या. ब्राह्मण स्त्री व्यभिचारी असेल तर तिच्यावर बहिष्कार टाकणे आणि पुरुषाला ब्राह्मण्याशी प्रतारणा केली म्हणून बहिष्कृत करणे, अशी शिक्षाकेली जात असे. थोडक्यात पुरुषप्रधानता, जात आणि वर्ग ह्यांचे संघटन व संवर्धन करण्यासाठी स्त्रियांवर बंधने घातली गेली.पेशवाईमध्ये पुरुषप्रधान समाजव्यवस्थेमुळे पुरुषाला अधिक महत्त्व प्राप्त होऊन स्त्रियांना उपभोगाची वस्तू मानले गेले. चूल आणि मूल एवढीच किंमत स्त्रीला देऊन तिची अवहेलना केली गेली.

बालविवाह, बालहत्या, सतीची चाल, देवाला सोडणे, केशवपन इ. अनिष्ट प्रथा स्त्रियांच्या वाट्याला आल्याने भारतीय समाजातील अर्धी शक्ती तिच्या विकासापासून वंचित राहिली. ब्रिटिशपूर्व काळापासून स्त्रियांना शिक्षणाची दारे बंद होती. तिला धर्मपत्नी व अर्धांगिनी एवढेच स्थान दिले गेले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विषमतावादी, जातिवादी, कर्मकांडवादी, वर्णवादी आणि स्त्रियांच्या हक्कांच्या विरोधी अशी व्यवस्थेला धरून चालणारी मनुस्मृती महाड येथे दहन केली. अखिल स्त्री वर्गाला आणि बहुजनांना जातीयवादी समाजरचनेतून मुक्त केले.[६अ]सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले ह्यांनी स्त्री दास्य नष्ट करून विषमता, जातिभेद, अज्ञान नष्ट करण्यासाठी शिक्षण हेच प्रमुख साधन मानले. शिक्षणामुळेच नवसमाजनिर्मिती व समाजविकास साधू शकतो, विधवांना न्याय मिळू शकतो,समाजात समानता, मानवता आणता येऊ शकते, याचे महत्त्व पटवून दिले. छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांचे दोघांचेही कार्य फुले दांपत्याप्रमाणे उच्च दर्जाचे होते. स्त्री-पुरुष भेदभाव नष्ट करण्याचा सातत्याने त्यांनी प्रयत्नकेला. सनातनी रूढीच्या कचाट्यात असणाऱ्या माणसाला ह्या समाजसेवकांनी मुक्त

केले. स्त्री शिक्षणामुळेच कुटुंबाचा व समाजाचा विकास होईल हे सूत्र घेऊन महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे आणि ख्रिश्चन मिशनरी या सर्वांनी सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्या विचारातून प्रेरणा घेतली व स्त्री वर्गाला माणूस म्हणून जगण्यासाठी योग्य स्थान मिळवून दिले.

**४.१ मार्क्सवादी दृष्टिकोन आणि स्त्री :**

मार्क्सवादी विचारसरणी एक जीवनदृष्टी आहे. फ्रेडरीक एंगल्सच्या मदतीने मार्क्सने ही विचारसरणी विकसित केली. भांडवलशाहीच्या आर्थिक सिद्धांताबाबत त्यांनी मांडणी केली आहे. समाजात होणारे बदल केवळ आर्थिक कारणांमुळेच होतात तसेच मालक मजूर, वेतन आणि नफा ह्याबाबतचे आकलन होण्यासाठी समाजाच्या ऐतिहासिक भौतिकवादी दृष्टिकोनाची मार्क्सने चर्चा केली. कार्ल्स मार्क्सचे धर्माबाबतचे चिंतन एका वेगळ्या दृष्टिकोनाकडे नेते. आजची परिस्थिती पाहिली तर समाजामध्ये धार्मिक क्षेत्रात समाजधारणेसाठी समजल्या जाणाऱ्या धर्मांनी सामाजिक घडामोडींमध्ये एका अर्थाने विष कालवण्याचे काम केले. धर्माच्या नावाखाली भारतात आणि जगातही बऱ्याच मोठ्या प्रमाणात मानवी संहार झालेला दिसून येतो. मार्क्सने ह्या सर्व घटनांच्या मुळाशी जाऊन आपले विचार मांडले. जग बदलण्याचे कार्य मार्क्सवादी दृष्टिकोनाने प्रामुख्याने केले. समाज बदलण्याच्या प्रक्रियेत वर्ग संघर्ष हा नेहमीच महत्त्वपूर्ण ठरत आला आहे. त्या समस्येचे मूळ शोधण्याचा व अनुमान काढण्याचा सातत्याने प्रयत्न मार्क्सने केला. आजूबाजूच्या देशातील घडामोडींचा अभ्यास करून त्यांनी ह्या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी सातत्याने काम केले.

कार्ल मार्क्सच्या विचारांमुळे जागतिक स्वरूपाची क्रांती झाली. त्यांनी मांडलेल्या विचारांमुळे अनेक देशात घडामोडी झाल्या. त्यातून क्रांतीचे एक नवीन तत्त्वज्ञान उदयास आले. ह्या तत्त्वज्ञानामुळे कार्लमार्क्सने जगातील सर्वात जास्त प्रभाव असलेला तत्त्ववेत्ता म्हणून

मान्यता मिळवली. सोव्हिएट युनियनने १९९१ साली मिखाईल गोर्बाचेव्ह यांच्या काळात मार्क्सवादी तत्त्वज्ञानाबाबत अखिल जगापुढे तत्त्वज्ञानाचा प्रश्न उभा केला.

मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा शेवट झाला व ह्या तत्त्वज्ञानाची आता जगाला गरज उरली नाही, असा भास निर्माण करण्यात आला तर युरोप, अमेरिका, जर्मनी ह्या देशात २००५ च्या सुमारास जी जागतिक मंदी आली यानिमित्ताने मार्क्सवादी दृष्टिकोन आणि तत्त्वज्ञान त्यांचे सिद्धांत पुन्हा अभ्यासाला सुरुवात केली त्यांच्या 'भांडवल' ह्या ग्रंथाने ह्या काळात देशातील माणसामाणसांपर्यंत पोहोचण्याचे काम केले. त्यामुळे मार्क्सवादी दृष्टिकोनाची ओळख गांभीर्याने करून घेण्याची गरज पडली.

**मार्क्सवादी तत्त्वज्ञान व मार्क्सवादी दृष्टिकोन :**

आज जे आहे तेच अंतिम सत्य आहे, असे विज्ञान कधीच सांगत नाही. म्हणूनच असे म्हणता येईल की, उत्पत्ती, विकास, बदल, स्थिती, लय, पुनरुत्पादन ह्याविषयीचे मूलभूत ज्ञान म्हणजे तत्त्वज्ञान. विज्ञान आणि तत्त्वज्ञान यांत फरक आहे. विज्ञानाच्या अनेक शाखा आहेत. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी. ह्या प्रत्येक शास्त्राचे नियम आहेत. विज्ञान हे नियमांवर चालते. ह्या सर्व शास्त्राच्या नियमांत समान काय आहे, ह्याचा शोध घेणे हा तत्त्वज्ञानाचा विषय आहे.[७] जगातील कामगारांवर होणारा अन्याय, त्यांची पिळवणूक, त्यांचे दारिद्र्य, त्यांचे मालकाशी असणारे संबंध, त्यांची आर्थिक, सामाजिक स्थिती बदलण्यासाठी त्यांच्याकडे विशिष्ट दृष्टिकोन हवा असतो. तो दृष्टिकोन तत्त्वज्ञानावर आधारित असला पाहिजे. विचार व दृष्टिकोनाला तत्त्वज्ञानाची जोड मिळाल्यास संपूर्ण जगात क्रांती, बदल सहज शक्य आहे. ह्याच दृष्टिकोनावर आधारित जागतिक क्रांतीचा विचार कार्ल मार्क्सने केला होता. क्रांती होण्यासाठी जागतिक वातावरणाचा विचार मार्क्सने आर्थिक व भौतिकवादी दृष्टिकोनातून केलेला आहे. त्याने जगाच्या अभ्यासात समाजविकासाचे नियम व आपले तत्त्वज्ञान मांडले आहे.

मार्क्सपूर्वीच्या भौतिकवादात आणि मार्क्सच्या भौतिकवादी दृष्टिकोनात आणि तत्त्वज्ञानात फरक होता. त्यांच्या मते, सर्व दु:खाचे कारण आर्थिक आहे. आर्थिक कारणामुळेच जगात शोषण व पिळवणूक होते. ह्या दृष्टिकोनातून कार्ल मार्क्सने पाहिले. समाजातील भौतिक बदलांमागे कार्यकारणभाव शोधतांना मार्क्सची तात्त्विक वैचारिक भूमिका काय होती? म्हणजेच त्यांचा दृष्टिकोन काय होता? हे लक्षात येते.

कम्युनिस्ट मेनिफेस्टो, द होली फॅमिली, दास कॅपिटल, द पॉव्हर्टी ऑफ फिलॉसॉफी, वेज लेबर अँड कॅपिटल, द क्रिटिक ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी इत्यादी ग्रंथांमधून त्याने कामगार वर्गाच्या शोषणामुळे त्यांच्या वाट्याला दु:ख आल्याचे स्पष्ट केले. भांडवलदार व कामगार ह्या संघर्षात भांडवलशाहीचा अंत व वर्गविहीन समाजाची कल्पना निश्चितच दिसून येईल ह्यावर कार्लमार्क्सचा ठाम विश्वास होता. त्याने हेगेल ह्यांच्या आदर्शवादावर कडक टीका करून भांडवलशाही समाजाचे अध:पतन करण्याचा मार्ग स्पष्ट केला. १८६७ मध्ये दास कॅपिटल लिहून भांडवलशाही सिद्धांताचे वर्णन केले. अतिरिक्त मूल्यांच्या सिद्धांताचे स्पष्टीकरण देऊन भांडवलदारांच्या अतिरिक्त नफेखोरीला त्याने चोरी मानले. अशा राज्याचे चित्र ह्या ग्रंथात त्यांनी रेखाटले की, ज्या राज्यात दारिद्र्य, शोषण, बेकारी ह्या गोष्टी राहणार नाहीत. कार्ल मार्क्सचे एक वैशिष्टये असे की, तो आपले लिखाण करून थांबाला नाही तर त्याचे विचार प्रत्यक्षात अंमलबजावणी होण्यासाठी आयुष्यभर झटला. म्हणून असे म्हटले जाते की, तो फक्त विचारवंत नव्हता. तर महान क्रांतिकारी, संघर्षप्रिय व शास्त्रीय विचारवंत होता. फ्रेंच तत्त्वज्ञान, त्यांचा मित्र एंजेल्स, हेगेलच्या 'फिलॉसॉफी ऑफ राईट' ग्रंथाचा वृत्तपत्र व्यवसाय आणि महत्त्वाचे म्हणजे इंग्लडमधील औद्योगिक क्रांतीचा प्रभाव कार्लमार्क्सवर मोठ्या प्रमाणात पडला. ह्या सर्व पार्श्वभूमीवर एकूणच कार्ल मार्क्सच्या विचारात, तत्त्वज्ञानात आणि प्रत्यक्ष क्रांतीमध्ये कोणत्या घटकाचा विचार प्रामुख्याने केला ह्याचे चिकित्सक विश्लेषण करताना मार्क्सने त्याच्या क्रांतीच्या विचारात त्याने अखिल स्त्री वर्गाला गृहीत धरले होते काय? की अखिल स्त्री वर्गाचा त्याने

विचारच केला नाही. ह्याबाबतची चिकित्सा होणे अपेक्षित आहे. कार्ल मार्क्सने द्वद्वांत्मक भौतिकवाद म्हणजेच विरोध विकासवादाचा सिद्धांत मांडताना सर्व परिवर्तनाचा आधार आर्थिक आहे असे म्हटले. ह्याउलट हेगेलने विचारालाच परिवर्तनाचा आधार मानले. हे परिवर्तन समाजाबाबतचे परिवर्तन मानले तर समाजामध्ये स्त्री आणि पुरुष हे दोन्ही घटक असतात, असा उल्लेख दिसून येत नाही. मार्क्सने राजकीय क्रांतीपेक्षा सामाजिक क्रांतीवर अधिक भर दिला. सामाजिक क्रांतीत श्रमिकांचा वाटा मोठा आणि महत्त्वाचा आहे आणि स्त्री श्रमिकांचा विचार ह्या ठिकाणी कार्ल मार्क्स करीत नाहीत. स्त्रीमध्ये नवनिर्मितीची, क्रांतीची शक्ती सर्वाधिक असते ह्याकडे त्याने दुर्लक्ष केले. आदर्शवादी विचार कार्लमार्क्सला मान्य नव्हते. त्याने केवळ कृतीला श्रेष्ठ स्थान दिले. विश्वाचे दान भौतिकवादाच्या आधारावरच होऊ शकते, ह्यावर विश्वास ठेवून वाद, प्रतिवाद आणि संवाद ह्या तीन अवस्था सांगितल्या. मनुष्याच्या अव्यक्त भावनांवर भौतिक परिस्थितीचाच प्रभाव पडतो, अशी मांडणी करून भौतिक दृष्टिकोनातूनच विश्वाच्या सर्वांगीण समस्यांचा मार्क्सने विचार केला. उत्पादनाच्या साधनांचा समाजाच्या जीवनपद्धतीवर परिणाम होतो, परंतु समाजाच्या जीवनपद्धतीमध्ये फक्त पुरुषांचाच विचार केला.

कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान भौतिकवाद, अनुभववाद आणि हेगेलच्या नवचैतन्यवादातून निर्माण झालेले आहे. मार्क्सच्या सुरुवातीपासूनच्या लेखनात व शेवटच्या काळातील लिखाणात सुद्धा एकसारखे तत्त्व दिसते. भांडवलशाही नष्ट करून साम्यवादी समाज स्थापन करण्याचे उद्दिष्ट त्यांनी आपल्या सर्व लिखाणात वेळोवेळी स्पष्ट केले आहे. कामगार वर्गाच्या हुकूमशाहीचा पुरस्कार त्यांनी केला. जगातील शोषण, विषमता ह्यांचा अभ्यास करून ते कसे दूर करता येईल,ह्यासाठी मांडणी केली. मार्क्सच्या मते मनुष्य ही अशी एक विशिष्ट जात आहे, जिचा उद्देश निसर्गाचे मनुष्यीकरण हा आहे. निरनिराळ्या उत्पादनाच्या प्रक्रियेमधून निर्माण झालेली माणसाची जाणीव ही एक प्रकारची सामाजिक जाणीव असते. माणसाचे उद्देश आणि प्राण्याचे उद्देश वेगळे आहेत. माणूस उत्पादनाची क्रिया केवळ गरजांची पूर्ती करण्यासाठीच करीत नाही,

तर आत्म्याच्या आविष्कारासाठी करतो. माणूस सर्वांसाठीच श्रमशक्तीच्या साह्याने उत्पादन करून तो निसर्गाचे मनुष्यीकरण करतो. मार्क्सच्या मते माणूस हा समाजाचा भाग असतो आणि समाजही माणसाच्या व्यक्तिमत्त्वात प्रतिबिंबित होत असतो. माणसाच्या परस्पर सहकार्यातून त्याचा विकास होतो, म्हणून साम्यवाद ही केवळ कल्पना नसून माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा मानवी विकासाच्या प्रक्रियेचा एक भाग आहे. तो म्हणतो, वस्तू उत्पादन प्रक्रियेत कामगारांमध्ये त्या वस्तूबाबत परात्मभाव निर्माण होतो, ती वस्तू कामगारांपासून हिरावून घेतली जाते व कामगार विरोधीच त्याचा वापर केला जातो. भांडवलशाहीत कामगाराने श्रम करून तयार केलेली वस्तू त्याच्या शोषणाचे कारण बनते. मार्क्स पुढे असेही म्हणतो की, मालमत्ता आणि संपत्ती माणसाच्या श्रमातून निर्माण होते व तो आपल्या गरजांच्या पूर्ततेसाठी निर्माण करतो.[८] कार्ल मार्क्सने भारताच्या संदर्भात जे लिखाण केले तेही ह्या ठिकाणी महत्त्वाचे वाटते. मार्क्सनंतर लेनिनने सुद्धा जे लिखाण केले त्या लिखाणावरून भारतातील बऱ्याच घडामोडी दिसून आल्या. भारताबद्दलच्या लिखाणास १५० वर्षापेक्षा जास्त वर्षे झाली असली तरी भारतातील बहुसंख्य कामगार, मजूर, स्त्रिया, लहान मुले ह्या घटकांना पिळवणुकीपासून मुक्तता मिळू शकली नाही. मार्क्सला इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती, त्याही अगोदर जर्मनीतील स्थिती, फ्रेंच राज्यक्रांती ह्या सर्व जागतिक स्वरूपाच्या घडामोडींमुळे त्यांच्या विचारांना एका वेगळ्या प्रकारचा मार्ग मिळाला. ह्या जागतिक पातळीवर घडलेल्या घडामोडींमध्ये भारतातील विषमता, जातीयता, भारताच्या बाबतीत प्रभावी ठरते. कारण मार्क्स कामगारांमध्ये स्त्री कामगार आणि पुरुष कामगार असा भेदभाव करीत नाही त्याचे समतेचे तत्त्वज्ञानही कारखानदार आणि मजूर ह्यांच्यातील समता यावर आधारित आहे. भारतातील समतेच्या विचारामध्ये मात्र अनेक अंतर्गत भेदभाव, होणाऱ्या कारणांचा विचार गृहीत धरला आहे. भारतामध्ये पुरुष वर्गाकडून स्त्री वर्गाची पिळवणूक होते, हा विचार मुख्य मानून त्यावर बरेचसे विचारप्रवाह निर्माण झाले. जागतिक पातळीवर स्त्री-पुरुष कामगार असा फरक मार्क्स करत नाही. कामाच्या ठिकाणी, कारखान्यामध्ये स्त्रियांच्या समस्या व

त्यावर केले गेलेले उपाय भारतामध्ये वेगळ्या स्वरूपाचे आहेत. भारतातील प्रत्येक घडामोडीशी स्त्री पुरुष लिंग भावांचे संबंध फरक करतात. बौद्ध धर्माप्रमाणेच साम्यवाद आणि पर्यायाने मार्क्सवाद हा अतिशय व्यापक विषय आहे. बऱ्याच देशात ह्या विचाराला जीवनमार्ग मानले आहे. मार्क्सला अनेक देश भविष्यकाळातील मुक्तिदाता म्हणतात. साम्यवादाची सुरुवातच मुळात 'पिळवणूक' पासून झालेली आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाचा तो आरंभ बिंदू मानला जातो. त्यावर उपाय म्हणून खासगी मालमत्ता नष्ट करणे सांगितला गेला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध तत्त्वज्ञान आणि मार्क्सचे तत्त्वज्ञान ह्यांची तुलना करताना अनेक मुद्दे सविस्तर स्पष्ट केलेले आहेत. भारत हा लोकशाही देश आहे. उदारमतवादी तत्त्वज्ञान ह्या देशाने स्वीकारले आहे. तसेच संसदीय लोकशाहीचाही स्वीकार केला आहे आणि संसदीय लोकशाहीचा मुख्य आधार व्यक्ती स्वातंत्र्य हा आहे, हे विसरून चालणार नाही. व्यक्तिविकासाच्या तत्त्वज्ञानात स्त्री आणि पुरुष त्यांचा विकास इ. मुद्दे गांभीर्यपूर्वक लक्षात घ्यावे लागतात. स्त्री आणि पुरुषांचे सामाजिक संबंध, सार्वत्रिक आणि वैयक्तिक हितामधील समन्वय, राजकीय, सामाजिक, आर्थिक लाभ हे सर्व घटक विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. भांडवलशाहीचे स्वरूप केवळ राष्ट्रीय नसून ते आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आहे आणि स्त्री पुरुष संबंधाचे स्वरूप लिंग भावावरून मिळणाऱ्या फायद्यांचे मानकावरून भारतामध्ये घडामोडी घडताना सातत्याने दिसून येतात. उदा. मार्क्स म्हणतो, खासगी नफ्यामध्ये कारखानदाराबरोरच मजुरांनाही योग्य तो वाटा द्यायला हवा आणि भारतातील उदारमतवादी संसदीय लोकशाही प्रमाणे मांडणी करावयाची झाल्यास नफा फक्त मजुरांच्या वाट्याला न जाऊ देता मजुरांमधील पुरुषवर्गाच्या बरोबरीनेच स्त्री वर्गाला सुद्धा मिळाला पाहिजे, असा विचार प्रस्तुत आहे. ह्यावरून देखील मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ह्यामध्ये फरक करता येईल.

भारतातील सामाजिक स्थितीचे विश्लेषण करावयाचे झाल्यास कम्युनिस्ट नेते ज्याप्रमाणे साम्यवादाच्या निर्मितीसाठी हिंसेचा मार्ग स्वीकारतात व विरोधकांना अगदी त्याप्रमाणे

भारतातील स्त्रियांना जातिव्यवस्थेच्या आणि पुरुषसत्ताक पद्धतीच्या विरोधात बंड पुकारावे लागते, संघर्ष करावा लागतो. गरज पडली तर ह्या दोघांचाही नायनाट करावा लागतो. तरच स्त्रीवर्गाला सन्मानाने जगता येते. तसेच त्यांना आपला प्रभाव निर्माण करता येतो. भारतामध्ये तर स्त्रियांना जातिप्रथेचे प्रवेशद्वार मानले जाते आणि कार्ल मार्क्सने भारतातील जातींचा, स्त्री पुरुष असमानतेचा विचार फारसा केलेला दिसून येत नाही. तरीही जागतिक क्रांतीचा विचार करताना आशिया खंडातील परिवर्तनावर त्यांनी भर दिला. मार्क्सने आशिया खंडातील भारताच्या इतिहासाचा देखील अभ्यास केला. १८५७ ते ६७ या काळात तो जेव्हा इंग्लडला राहात होता तेथून त्याला भारताबद्दलची सविस्तर माहिती मिळत होती. आशियाची देशातील समाजव्यवस्था विशेषत: भारतीय समाजव्यवस्था त्याने अभ्यासताना भारतीय समाजमत बदल करण्यास फारसे अनुकूल नाही. गेल्या अनेक वर्षापासून जातिव्यवस्था, बलुतेदारी पद्धती, ग्रामीण शेती व्यवस्था ह्याबाबत अलग अलग तुकड्यांत समाजाचे विभाजन झालेले होते. गाव, समाजव्यवस्था, सनातन अचल आणि अपरिवर्तनीय असल्याने विकास प्रक्रियेपासून उदासीन होता. ह्या व्यवस्थेने अंधश्रद्धा, अन्यायी धर्मव्यवस्थांना जन्म दिला आणि यांत प्रामुख्याने कामगार, गरीब, स्त्रिया हे घटक जास्तच भरडले गेले. उत्पादनाच्या साधनांची मालकी जेव्हा जनतेकडे असते तेव्हा त्या देशाची प्रगती लवकर होते. हे कार्ल मार्क्सचे सूत्र भारतातील समाजव्यवस्थेच्या बाबतीत स्वीकारल्यास इंग्रजांनी भारतीय उत्पादन व्यवस्थेवर उत्पादन साधनांच्या मालकीवर ताबा मिळविल्याने त्याचा भारतीय खेड्यांवर जास्तच परिणाम झालेला दिसतो. ग्रामीण भागातील कुटुंब व्यवस्थेमध्ये स्त्री वर्गाची भूमिका विकास करण्याच्या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. इंग्रजांच्या ह्या धोरणामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली छोटे मोठे कुटीरउद्योग बंद पडले. त्याचा परिणाम ग्रामीण कुटुंबसंस्था उद्ध्वस्त झाली. कुटुबसंस्थेची घडी बसविण्याची निसर्गत:च देणगी स्त्री वर्गाला मिळालेली असल्याने ब्रिटिशांच्या ह्या धोरणांचा परिणाम थेट स्त्रियांवरच झाला, असे मार्क्सवादी दृष्टिकोनातून दिसून येते. यावरून असे दिसून येते की, मार्क्स

एका विशिष्ट ऐतिहासिक दृष्टिकोनातून आशियाच्या आणि आशियातील भारताच्या इतिहासाकडे पाहत होता. भारतीय समाजव्यवस्था ही आशियाई दमणव्यवस्थेपेक्षा वेगळी आणि खास अशा उत्पादन व्यवस्थेवर आधारलेली आहे. आशियाई समाज परिवर्तनासाठी फारसा अनुकूल नाही कारण ग्रामीण शेती व्यवस्था, जाती व्यवस्था, बलुतेदार पद्धती व संपत्तीची सामूहिक मालकी ह्यामुळे समाजाचे अलग अलग तुकड्यात विभाजन झाले आहे. भारतीय शासन व्यवस्था प्रामुख्याने तीन कामे करते. उदा. स्वकीय आक्रमणापासून संरक्षण, परकीय आक्रमणापासून संरक्षण आणि जमिनीस मोठ्या प्रमाणात पाणी पुरवठा करण्यासाठी कालवे तयार करणे इ. राजकीय बाबतीत मार्क्सने आशियाई देशांसंबंधी उल्लेख करताना असेही म्हटले की, येथील लोकांना राजकारणात स्वारस्य दिसून येत नाही. असेच मत हेगेलचे सुद्धा होते.[९]

कार्ल मार्क्सच्या भांडवल ह्या ग्रंथातील एका उताऱ्यावरून व त्याच्या डॅनिअलसनला लिहिलेल्या पत्रावरून ह्या सर्व बाबी अधिक स्पष्ट होतात. तसेच एंगेल्स ने कार्ल काउटस्कीला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, भारत कदाचित, नव्हे निश्चितच, क्रांती करेल... परंतु त्यानंतर समाजवादी संघटनेकडे वळण्यापूर्वी त्यांना कोणत्या सामाजिक व राजकीय अवस्थांमधून जावे लागेल ह्याबद्दल मात्र आपण निरर्थक अनुमानेच करू शकतो. यावरून मार्क्स आणि त्याचा मित्र एंगेल्स हे स्पष्टपणे स्त्रियांबद्दल विशिष्ट भूमिका न घेता एकूणच भारतीयांबद्दल, भारतीयांची अर्थव्यवस्था, शेती संबंध व भारताचे उद्योगधंदे आणि ब्रिटिश अर्थव्यवस्था यांच्यातील संबंध ह्याबद्दलची चर्चा करतात. १४ जून १८५३ रोजी मार्क्सने एंगेल्सला लिहिलेले पत्र त्याचा हिंदुस्तानातील ब्रिटिश राजवट व भांडवल (खंड-१) ह्या आणि इतर लिखाणावरून असे समजते की, ग्रामव्यवस्था हा भारताच्या सामाजिक आर्थिक रचनेचा मूलभूत घटक आहे. मार्क्सने हे सर्व लिखाण करताना भारतातील शेती, कायदे, वसाहती ह्यांच्या संदर्भातील वस्तुस्थिती लक्षात घेऊन मांडणी केली. ब्रिटिशांनी भारतीयांवर लादलेल्या राजवटीमुळे भारतीय समाजाला जे हाल सोसावे लागले, त्यामध्ये स्त्रियांची अवस्था काय झाली होती,ह्याबाबतचे लिखाणाचा संदर्भ मात्र दिसून

येत नाही. अर्थात भारतीय समाजव्यवस्था उद्ध्वस्त करण्याचा कट ब्रिटिशांनी केला. त्यामुळे आपोआपच कुटुंबव्यवस्था ज्या स्त्रीवर्गामुळे टिकून आहे ती नष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न ब्रिटिशांनी केला. ह्यांस मार्क्सने दुजोरा दिला असे हिंदुस्तानातील ब्रिटिश राजवट ह्या मार्क्सच्या लेखात दिसून येते. मानवी समाजाच्या विरोध विकासी प्रगतीच्या नियमांच्या आधारावर मार्क्सने भविष्यकाळाच्या रूपरेषेचे भाकित केले. लेनिनने सुद्धा नंतरच्या काळात भारताबाबत, भारतातील सामाजिक, राजकीय, आर्थिक स्थितीबाबत विचार मांडलेले दिसून येतात. कुटिरउद्योगांमध्ये सुतकटाई तसेच हाताने मशागत केलेली शेती ह्यावर आधारित कौटुंबिक समाज इंग्रजांच्या हस्तक्षेपामुळे नष्ट झाला.[९अ]

हिंदुस्थानमध्ये सामाजिक क्रांती वाढवून आणणारा इंग्लड नीच, स्वार्थी हेतूने प्रेरित झालेला होता आणि हे हेतू अंमलात आणण्याची त्यांची पद्धतही मुर्खपणाची होती. पण प्रश्न तो नाही. प्रश्न असा आहे की, आशियाच्या समाजव्यवस्थेत मूलगामी क्रांती घडवून आणल्याशिवाय मानवजातीला तिचे इतिहासदत्त कार्य पार पाडता येईल का? जर येणार नसेल तर इंग्लंडने कोणतेही गुन्हे केलेले असोत ही क्रांती घडवून आणण्यात इंग्लड अजाणतेपणे इतिहासाच्या हातातील हत्यार झाले होते.[१०]

थोडक्यात भारतीय समाजव्यवस्थेचा भौतिक पाया रचण्याचा प्रयत्न दिसून येतो. भारतातील सामाजिक स्थिती, मालक आणि मजूर, नफा-तोटा इ. संकल्पनेशी केवळ संबंधील नसून जात, धर्म, पंथ, भाषा, लिपी, वर्ण, संस्कृती ह्या सर्वच बाबतीत भारत हा देश इतर देशांपेक्षा वेगळा आणि समजून घेण्यास कठीण आहे. डॉ. आंबेडकरांनी भारतीय समाजाचे विश्लेषण प्रामुख्याने जातीयता, अस्पृश्यता, धर्मांधता ह्या दृष्टिकोनातून केलेले दिसते. डॉ. आंबेडकरांच्या लिखाणात स्त्री वर्गाबाबत प्रदीर्घ विश्लेषण केल्याचे दिसून येते. स्त्री वर्गाच्या हाल-अपेष्टा, स्त्री वर्गाची होणारी पिळवणूक आणि स्त्री वर्गाला जातीचे प्रवेशद्वार कसे मानले जाते, अशा आशयाचे विश्लेषण प्रामुख्याने दिसुन येते. भांडवलदार किंवा कारखानदार

कामगारांची पिळवणूक करतात असे असेल तरी स्त्री कामगारांची कामाच्या ठिकाणी प्रत्यक्षात कशी पिळवणूक केली जाते ह्याचे स्पष्टपणे उल्लेख मार्क्सवाद देत नाही. कामगारांची क्रांती होण्यासाठी संघर्ष झाला पाहिजे. कामगारांनी क्रांती केली पाहिजे यात महिला कामगारांनी क्रांती कशी केली पाहिजे ह्यावर उपाययोजना करता आल्या पाहिजेत. मार्क्सवादाने धर्माला अफूची गोळी मानले तर हिंदू धर्माने मात्र त्याला एक जीवन मार्ग म्हणून स्वीकारले. धर्म प्रसारासाठी करण्यात येणाऱ्या कर्मकांडामध्ये स्त्रियांचे प्रमाण अत्यल्प असल्यामुळे त्यांना आपली पिवळणूक होते याचीच कल्पना नसते. ह्यावर मात्र मार्क्सवाद कोणतेही भाष्य करत नाही. गौतम बुद्धांनी सुमारे २५०० वर्षापूर्वी शांततेच्या मार्गाने सर्व काही मिळवता येते. आपला फायदा करून घेण्यासाठी क्रांती करण्याचा मार्ग सुचविला आहे. धर्म ही अफूची गोळी आहे. ह्यावर नंतरच्या काळात डॉ. आंबेडकरांनी प्रखर टीकाही केली आहे. सिव्हिल सोसायटी या संकल्पनेचा वापर सुरुवातीला हेगेलने केला त्यावर मात्र मार्क्सने टीका केली. ह्याचा संदर्भ घेतला तर भारतीय समाजातील स्त्रीमध्ये धार्मिक भावना निसर्गत:च आहे. त्यासाठी तिने कर्मकांड केले तरीही चालेल याला हिंदू समाज सहज मान्यता देतो. परंतु कार्ल मार्क्स मात्र माणसाच्या मनात धार्मिक भावना निसर्गत:च असतात असे मानीत नाही. धर्म वास्तविक परिस्थितीचे एक विकृत आणि अवास्तव प्रतिबिंब आहे. असे मानतो.

इ.स. १८४४ मध्ये लिहिलेल्या 'कॉन्ट्रिब्यूशन टु दी क्रिटिक ऑफ हेगेल फिलॉसॉफी ऑफ राईट'ह्या लेखात 'दास कॅपिटल' च्या पहिल्या खंडात आणि 'दि जर्मन्स आईडोलॉजी'ह्या ग्रंथात त्यांनी आपले धर्मासंबंधीचे विचार मांडलेले आहेत.कार्ल मार्क्सचे धर्माबाबतचे चिंतन पाहण्याचे एकमेव कारण म्हणजे भारतातील स्त्री आणि धर्म ह्यांचे जवळचे नाते निर्माण झालेले आहे. आशियातील देशांचा संदर्भ घेऊन मार्क्सने धर्म सामान्य माणसांना अंधश्रद्धेत ठेवतो. त्यांची पिळवणूक करतो. विज्ञान आणि बुद्धिवाद विसरतो. अशी भूमिका मांडली. भांडवलशाहीच्या वैशिष्टयांमध्ये कार्ल मार्क्सने छोटे छोटे वर्ग विलय पाऊन भांडवलदार आणि कामगार असे परस्पर

विरुद्ध दोन वर्ग ठळकपणे समाजजीवनात निर्माण होतात. संपूर्ण समाजाचा इतिहास हा वर्ग समाजाचा इतिहास आहे, असे मार्क्स सांगतो. या दोन्ही वर्गात कधी सुप्त तर कधी प्रकट संघर्ष सातत्याने चालू असतो. हे मार्क्सवादाचे तत्त्वज्ञान स्थूलमानाने भारतीय स्त्रियांच्या बाबतीत कसे लागू पडते, याविषयीचे चिंतन महत्त्वाचे आहे. भारतातील लिंगभावात्मक स्थिती लक्षात घेता आणि भारतीय समाजाचा इतिहास लक्षात घेता स्त्रियांचा एक स्वतंत्र वर्ग निर्माण झाला आणि ह्या स्त्री वर्गाची पिळवणूक अनेक कारणांसाठी पुरुष वर्गाने सुरू केली. स्त्री पुरुषांतील संघर्षही सातत्याने कधी सुप्त तर कधी उघड स्वरूपाचे झालेले दिसून येतात. कामगार वर्गाला सत्ताधारी बनवण्यासाठी कार्ल मार्क्स आग्रह धरतो. भांडवलदारांच्या हातून राजकीय सत्ता, काढून घेण्यासाठी कामगारांनी उठाव किंवा क्रांती करावी, असे मार्क्स सांगतो. भारतामध्ये मात्र पुरुषवर्गाने स्वत:चे स्थान कमावण्यासाठी, सत्ता प्रस्थापित करण्यासाठी इतर घटकांप्रामणे स्त्री वर्गावर प्रभुत्व मिळविले व आपली सत्ता प्रस्थापित केली. सत्तेचा दुरुपयोग करून स्त्रियांना गुलामगिरीत ठेवले. भारतातील जवळजवळ प्रत्येक जातीधर्मामध्ये पुरुषांनी मार्क्सला अभिप्रेत असलेल्या राज्यकर्त्या वर्गाचे स्थान घेतले. कार्ल मार्क्सने आपल्या तत्त्वज्ञानात भांडवलशाहीतील कामगारांचे स्थान ज्या प्रकारचे आहे त्याच प्रकारचे स्थान भारतीय स्त्रीला भारतीय संस्कृतीमध्ये अनुभवायला मिळत आहे. त्यामुळे कुटुंब त्यानंतर समाज आणि नंतर राष्ट हे निर्माण झाले, तरी ह्यांच्याबद्दल अखिल स्त्री वर्गाला आपुलकी ऐवजी हा समाज दुराव्याचाच वाटतो. स्त्री वर्गात परात्मभावाची भूमिका निर्माण झाली. स्त्रियांच्या प्रश्नाचे स्वरूप आज फक्त राष्ट्रीय असे राहिले नाही, तर आंतरराष्ट्रीय स्वरूप झाले आहे. स्त्री वर्गाच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यामुळे भारतीय समाज व त्यांचे प्रश्न अधिक गुंतागुतीचे बनले आहेत.

पुढील काळातील भांडवलशाहीच्या विकासाचा आराखडा तयार करताना मार्क्स म्हणतो की, भांडवली व्यवस्थेतून काही क्षेत्रात मक्तेदार भांडवलशाही निर्माण होते. यामुळे या व्यवहारात राज्याचा हस्तक्षेप अपरिहार्य ठरतो. त्यातून नवी आर्थिक व्यवहार अभिजनांची टोळी निर्माण

होते. त्यात कोणतेही काम न करणारे ऐषआराम करणारे ऐदी लोक निर्माण होतात व ते कंपनीच्या नावाने लुटमार करतात. भारतीय स्त्रियांचा विचार केला तर वर्षानुवर्षे स्त्रियांना गुलामगिरीत ठेवणारा, पिळवणूक करणारा आणि सतत अन्याय करणारा पुरुषवर्ग निर्माण झाला आणि स्त्रियांवर त्यांनी मक्तेदारी लादली आणि ह्या पिळवणूक, गुलामगिरी इत्यादींना धार्मिक संदर्भ देऊन्न स्त्रियांचे तोंड बंद केले. कोणतेही काम न करता स्त्रियांच्या श्रमशक्तीचा पुरेपूर वापर करून घेऊन्न पुरुषवर्गामध्ये ऐषआराम करणारा एक वर्ग निर्माण झाला. जागतिक पातळीवर कार्ल मार्क्सचे विचार तंतोतंत लागू होत असले तरी तेच विचार भारतासाठी लागू करताना भारतातील स्त्रियांची स्थिती दलितांची स्थिती, जातीयता, धर्मांधता, भाषावाद आदी स्वरूपाची अनेक घटकांमधील विविधता आपणास विचारात घ्यावीच लागते.

एंजल्सने आपल्या ‘Origin of Private Property:Family and State’ या पुस्तकामध्ये खासगी मालकी कशी निर्माण झाली ह्याचे विवेचन केले आहे. त्यांच्या मते जुन्या आदिम समाजात मालमत्ता नसल्यामुळे स्त्री-पुरुष समानता होती. स्त्रियांना सर्व प्रकारचे स्वातंत्र्य होते परंतु समाजाच्या विकासाबरोबर श्रम विभागणी झाली. त्यामधून खासगी मालमत्तेचा उदय झाला आणि ही खासगी मालमत्ता आपल्याकडे ठेवण्यासाठी कुटुंबसंस्थेचा उदय झाला. त्यानंतर स्त्रीवर पुरुषाने आपले वर्चस्व लादले. तो सर्व सत्तेचा मालक झाला. सरंजामशाहीत त्याने आपली पत्नी आणि मुले ह्यांच्यावर अनिर्बंध नियंत्रण प्रस्थापित केले. स्त्री दास्याला धर्म आणि परंपरा ह्यांनी पाठिंबा दिला. भांडवलशाहीत स्त्री हे उत्पादनाचे साधन बनले. तिला खरे स्वातंत्र्य देण्यास भांडवलदार तयार नसतात. कारण भांडवलशाहीत स्त्री लैंगिक शोषणाची बळी असते. तेथे वेश्याव्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो आणि स्त्री एक क्रय वस्तू बनते. स्वत:ची इच्छा असणारी, निसर्गाचे मानुषीकरण करणारी, मानव जातीचाच एक भाग असणारी स्त्री गुलाम बनविली जाते. साम्यवादी क्रांती सर्व प्रकारच्या शोषणाविरुद्धची क्रांती असेल, असे मार्क्सचे मत होते.[११] वरील संदर्भ लक्षात घेता १०० वर्षापूर्वी न्युयॉर्क ट्रिब्यून मधील लेखात इंग्रजांनीच

भारतीय संस्कृती नष्ट केली आहे. सर्व सुधारणा करूनही ब्रिटिश भांडवलदार भारतीय लोकांची परिस्थिती फारशी सुधारू शकले नाहीत. वर्गाचे राज्य होते व ग्रामीण भारतात देखील बलुतेदारी पद्धती होती.[११अ] हजारो वर्षात भारतात फारसा बदल झाला नाही. कोसंबीच्या मते, भारतीय समाज अस्थिर होता. शेतीवर अवलंबून होता. जमीन मालकीतही विविधता होती. लोकसंख्या वाढीबरोबर व्यापार ही वाढला. ह्या सर्व गोष्टींचे विश्लेषण करताना भारताबाबतचे कार्ल मार्क्सचे चिंतन बरोबर नाही प्राध्यापक कोसंबी ह्यांनी भारताच्या इतिहास व संस्कृतीचा अभ्यास करून भारतात आदिम जनजातीच्या विघटनातून वर्गसमाज निर्माण झाला. शेतीचा विकास झाला. बौद्ध धर्माची ह्या विकासात काय भूमिका होती? याबाबत विश्लेषण केले.[११ब] भारतातील सर्वच उत्पादने कारखान्यातून होत नाही हे, असंघटित क्षेत्रात विकेंद्रित स्वरूपात होते. भारतातील जातिव्यवस्था ग्रामव्यवस्थेशी जोडलेली आहे. शेती उत्पादनाची पद्धती मागास आहे. गावातील उत्पादन गावातच वाटले जात होते. परंतु ह्या सर्व प्रकारात अंधश्रद्धा वाढली. चुकीच्या जुन्या अंधश्रद्धांना जीवदान मिळाले. ह्या अंधश्रद्धेमध्ये पुरुष वर्गापेक्षा स्त्री वर्ग मोठ्या प्रमाणावर भरडला गेला. जातीच्या आणि अंधश्रद्धेच्या प्रसारासाठी स्त्रियांचा वापर वाढला. समाजात संकुचितपणा आला. देवता पूजन वाढले. थोडक्यात ग्रामसंस्था मोडीत निघाली तरी जातीचा, स्त्रियांच्या असाहाय्यतेचा आधार आणि वापर राजकारणासाठी केला जातो. भारतातील लोकशाही सुद्धा काही प्रमाणात ह्याला साथ देते असे दिसून येते.

थोडक्यात मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने व मार्क्सवादी विचारांच्या पुरस्कर्त्यांनी भारताकडे पाहताना एक समग्र भारत म्हणून पाहिले. भारताच्या समस्या म्हणजे भारतीय स्त्री पुरुष ह्यांच्या बाबतीत वेगवेगळा विचार गृहीत न धरता चिंतन केले. भारतात बलुतेदारी पद्धती, ग्रामीण अर्थव्यवस्था, सामाजिक समस्या या आणि इतर अनेक बाबतीत पुरुषांपेक्षा स्त्रियांची स्थिती वेगळ्या प्रकारची असलेली दिसून येते. ह्या सर्व गोष्टींवर सूक्ष्म आणि मूल्यमापनात्मक पद्धतीचा आधार घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील सामाजिक स्थितीचा अभ्यास केला.

मार्क्स ह्यांनी मांडलेले विचार जागतिक पातळीवर श्रेष्ठ दर्जाचे आहेच परंतु भारतासंदर्भात, भारतातील विविधतेसंदर्भात त्यांचे विचार तंतोतंत उपयोगी नाही असे प्राध्यापक डी.डी. कोसंबी आणि इतर विचारवंतांनी मांडणी केल्याचे दिसून येते.

## ४.२ आंबेडकरवाद आणि स्त्री :

"Women is the commodity supreme because (as the commentator adds) she is of indispensable utility or because through her bodhisattvas and world rulers take birth."[12]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या Rise and fall of Hindu Womenया शीर्षकाचे महाबोधी मॅगेझिन, कलकत्ता येथे प्रकाशित झालेल्या लेखामध्ये गौतम बुद्धांच्या विचारांचा संदर्भ घेऊन आपले विचार मांडले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, गौतम बुद्धांनी वर्णन केल्याप्रमाणे, नवनिर्मितीची सिद्धता फक्त स्त्री वर्गातच असू शकते. हीच स्त्री जगाला शांततेचा, समतेचा संदेश देणाऱ्या गौतम बुद्धांना जन्म देऊ शकते. ह्यावरून स्त्रीची योग्यता, प्रतिष्ठा, दर्जा, प्रभाव आणि क्षमता येथे सिद्ध केल्याचे आढळून येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रियांबद्दलचे विचार अभ्यासताना भावनिकतेला बाजूला सारून, वास्तविक समस्यांच्या बाबतीत त्यांच्या विचारांचे महत्त्व जाणून घ्यावे लागेल. कारण स्त्री हक्कांच्या संदर्भात जन्माला आलेल्या चळवळी पाश्चात्त्य वळणाच्या आहेत. त्यांनी कनिष्ठस्त्रियांच्या जीवनव्यवहाराकडे दुर्लक्ष केले. उच्चभ्रू जातीतील स्त्री आणि कनिष्ठ समजली जाणारी स्त्री ह्या दोन्हीही गटांचे व्यक्तिमत्त्व आणि संस्कृती वेगवेगळी आहे. स्त्रीवाद ही एक राजकीय जाणीव आहे. त्यामुळे तिला महत्त्व प्राप्त होते. राजकीय घटक हा आर्थिक घटकांच्या पायावर उभा असल्याने आर्थिकतेची चर्चा केल्याशिवाय राजकीय ची चर्चा फोल ठरते. स्त्रीवर्गाच्या अस्मितेच्या अंगाने विचार केल्यास स्त्री ही मुळात प्रेमळ, सर्जनशील, रचनात्मक, वत्सल, अहिंसक, मातृरूपी असते असे मानले गेले. स्त्रीवर्गाची अशी आदर्श प्रतिमा उभी करणे म्हणजे स्त्री प्रश्नाला कोणतेही ध्येय धोरण आणि मूल्य नसलेल्या

चौकटीत बंदिस्त करण्यासारखे आहे. स्वातंत्र्यानंतर पुरुषसत्तेची धर्मवादी, जमातवादी रूप अधिक हिंसक झाल्याची अनेक उदाहरणे पहावयास मिळतात. ९० व्या दशकापासून लोकशाही, लोकशाहीकरण, स्त्री-सक्षमीकरण अशा संकल्पना पुढे आल्या. लोकशाहीकरणासाठी अनेक चळवळी, अनेक सामाजिक संघटना, विविध सामाजिक गट, विविध स्तरातील हितसंबंधी गट पुढे आले व सक्रीय झाले. लोकशाहीकरणाच्या ह्या प्रक्रियेतसर्वांचा सहभाग उत्स्फूर्त राहिला याला स्त्रियाही अपवाद नाहीत. एवढेच नव्हेतर स्त्रियांच्या सहभागामुळेच लोकशाहीकरणाला बळकटी मिळाली. हे सर्व खरे असले तरी स्त्रियांचा प्रश्न घेऊन मात्र स्त्री सक्षमीकरणाकडे, स्त्रियांच्या समस्यांकडे, स्त्रियांच्या प्रतिष्ठेकडे ह्या सर्व गटांनी पाठ फिरविली असे दिसते. स्त्रियांचे प्रश्न मात्र स्त्री वर्गानेच व स्त्रीचळवळीनेच सोडवावेत, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

स्त्रियांच्या राजकीय सक्रीयतेमुळे स्थानिकपासून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील राजकारणाकडे आणि एकूणच सार्वजनिक प्रश्नांकडे पाहण्याचा एक वेगळा परिप्रेक्ष्य निर्माण झाला आहे. संघर्षात्मक राजकारणात सुद्धा स्त्रियांनी आपल्या क्षमता व कर्तबगारी अनेकदा सिद्ध केली आहे. ह्यांचे कौतूकही आपण फक्त उत्सवी स्वरूपातच करतो. आजपर्यंतच्या मंत्रिमंडळात महिला मंत्र्यांचे प्रमाण अत्यल्प राहिले आहे. लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना ह्या महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय पक्षांनी मिळून अवघ्या ७ महिलांना संधी दिली. ह्याचा अर्थ ३३% महिला आरक्षणाची भाषा बोलातांना स्त्रियांना प्रतिनिधित्व देताना मात्र आपण हात आखडता घेतो. आज सार्वजनिक जीवनात स्त्री अत्याचार, लिंगभावात्मक न्याय, स्त्रियांची सुरक्षितता, स्त्री-सक्षमीकरण, स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील वाढता सहभाग, महिला विकास, स्त्रियांचे हक्क, स्त्री-पुरुष समता या विषयांवर राजकीय दृष्टिकोनातून नेमके आणि अचूक काय बोलायचे याचे उत्तर राजकीय पक्षांनी आत्मसात केलेले आहे. स्त्री प्रतिष्ठा, स्त्री इज्जत, Dignity of Women ह्या शब्दांवर जोर देऊन बोलणारी नेतेमंडळी बऱ्याचदा स्त्री इज्जत जपण्याची जबाबदारी पुरुषांची आहे. हे अधोरेखित करत असतात. आणि पुरुषाला स्त्रीचा

संरक्षक म्हणून सादर करतात. ह्याच्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेला संदर्भ उपयुक्त ठरतो. तो असा की, No man can be grateful at the cost of this honour, no women can be grateful at the cost of her chastity and no nation can be grateful at the cost of its liberty.

आयरिश देशभक्त डॅनियल ओ कोनल यांचे प्रसिद्ध वचन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानासंबंधीच्या अखेरच्या भाषणात उद्धृत केले. त्यामध्ये त्यांनी शक्ती, स्त्री आणि राष्ट्र हे प्रतिष्ठा, निष्कलंकता, आणि स्वातंत्र्य याशिवाय कृतज्ञ राहू शकत नाही असे प्रतिपादन केले. स्त्रियांच्या प्रति असलेली डॉ. आंबेडकरांची भूमिका ह्या वाक्यामधून प्रत्ययास येते.[१३]भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, श्रेष्ठ विधिज्ञ, दलितांचे नेते आणि भारतीय संस्कृती, इतिहास, धर्म ह्यांचे महत्त्वाचे भाष्यकार म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपल्याला परिचित आहेत. अनेक विषयांना स्पर्श करणारी त्यांची विद्वत्ता, आपणांस परिचित असली तरी स्त्रियांच्या प्रती असलेली त्यांची भूमिका अभ्यासली तर त्यांच्या विद्वत्तेचा एक नवीन पैलू समोर येतो. डॅनियल ओ कोनल ह्यांच्या वचनाप्रमाणे, व्यक्ती, स्त्री आणि राष्ट्र हे प्रतिष्ठा, निष्कलंकता आणि स्वातंत्र्य ह्याशिवाय कृतज्ञ राहू शकत नाही. ह्या प्रतिपादनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुरोगामी दृष्टिकोनाचा आवाका लक्षात येतो.

भारतीय समाजातली जातिव्यवस्थेची उतरंड, जात शुद्ध ठेवण्यासाठी स्त्रियांच्या लैंगिकतेचे दमण करणारी कठोर बंधने, विषमतेचे स्मरण करणारी मनुस्मृती ह्यातून स्त्रियांना मिळालेलं दुय्यम स्थान यांच्यातल्या परस्पर संबंधातली जाणीव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाच्या मांडणीमध्ये केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक सभांद्वारे स्त्रियांबद्दलची दूरदृष्टी व्यक्त केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना शोषित व पीडित ह्या साच्यातून बाहेर काढून पुरोगामी विचारांचे व बदलाचे नेतृत्व करणारी महत्त्वाची शक्ती मानली जावी ह्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले.म्हणून जातिव्यवस्थेच्या अंताविषयी त्यांनी आपल्या ग्रंथात स्त्रियांच्या

त्यावेळेच्या स्थितीविषयी विचार केलेला आहे. हिंदू समाजात पतीच्या निधनानंतर अतिरिक्त ठरविल्या गेलेल्या स्त्रीसमोर दोनच पर्याय उरतात. एक म्हणजे नवऱ्याबरोबर सती जाणे आणि दुसरे म्हणजे आयुष्यभर वंध्यत्त्वाचे क्लेशदायक जीवन घालविणे. कर्मकांड, अंधश्रद्धा, सनातनी प्रथाह्यांच्या जाचातून प्रत्येक स्त्री-पुरुषाने मुक्त होऊन स्वत:च्या बुद्धीनुसार निर्णय घेतले पाहिजे. सहभोजन तसेच पुनर्विवाह ह्यावर कोणाचीही हरकत नसावी, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वाटत होते. पुरुषाला स्त्रियांपेक्षाश्रेष्ठ ठरविणारे कोणतेच मुद्दे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पचनी पडत नव्हते. भारतीय संविधान तयार करताना हा विचार त्यांनी प्रत्यक्ष उतरविला. दलित, मुले, स्त्रिया ह्यासारख्या वंचित घटकांसाठी विशेष तरतुदींचा घटना समितीत आग्रह धरला. इस्लाम धर्माने स्त्रियांना अतिशय कनिष्ठ स्थान दिले आहे. त्यामुळे मुस्लीम स्त्री ही जगातील सर्वाधिक निराधार मानली जाते. ह्याधर्माने सर्वोच्च निर्बंध लावून स्त्रियांचे अभिव्यक्ती स्वातंत्र्यच हिरावून घेतले. स्त्रियांच्या प्रश्नांबद्दल २० व्या शतकात वसाहत काळात जे काही विचार मांडले गेलेत त्यांचे ४ प्रकार प्रतिमा परदेशी ह्यांच्या विवेचनात मांडलेले आहेत.[१४]

१. ब्राह्मण्यावर आधारित पुनरुज्जीवनवादी यांत टिळक ते आजची राष्ट्रसेविका समिती ह्यांना अंतर्भूत केले.
२. ब्राह्मण सुधारक- यांत लोकहितवादी, आगरकर आणि न्या. रानडे आणि इतरांचा अतंर्भाव आहे.
३. अब्राह्मणी सुधारक- यांत पंडिता रमाबाई, विठ्ठल रमाजी शिंदे इ. येतात.
४. अब्राह्मणी क्रांतिकारी- यांत जोतिबा फुले, ताराबाई शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर इतरांचा समावेश होतो.
५. मार्क्सवादी-यांत जातिव्यवस्था हा वर्गरचनेचा एक भाग आहे असा विचार गृहीत आहे.

जातिअंताचा विचार करताना जातिअंतर्गत होणारे विवाह हे जातिव्यवस्थेचे एक प्रमुख अंग आहे असे डॉ. आंबेडकर म्हणतात आणि जातीच्या अंतर्गत होणाऱ्या विवाहामुळे काही

समस्या निर्माण होतात. उदा. सती जाणे, पुनर्विवाहाला बंदी घालणे, स्त्रीच्या सौंदर्यामुळे पुरुष तिच्याकडे आकर्षित होऊ नये,ह्यासाठी केशवपन करणे ह्याशिवाय स्त्रीच्या आहार, वेशभूषा, संचारयांवर निर्बंध लादणे व्यवहार्य नव्हते. जातिव्यवस्थेवर आधारित नैतिकता अबाधित राखण्याच्या नावाखाली एखाद्या अल्पवयीन मुलीला एखाद्या वयस्क माणसाशी लग्न करायला लावले जाई. जातिव्यवस्थेला मान्यता देणाऱ्या धर्म मार्तंडांनी जातीबाहेर विवाह करायला नेहमीच विरोध केलेला आहे. ४ डिसेंबर २०१० मध्ये लोकसत्ता ह्या दैनिकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रियांचे प्रश्न: एक संकलनमध्ये स्त्रियांच्या प्रश्नांबद्दलची चिकित्सा करताना जातीच्या उतरंडीत आपण जसजसे खाली-खाली जातो तसे हे शोषण अधिक गडद होत जाते. फुले आंबेडकरवादांच्या दृष्टीतून पाहिल्यास सर्वच स्त्रियांचे शोषण एकाच प्रकारचे नसते. सर्वच स्त्रियांना एकाच मापात मोजू नये. हिंदू कोड बिल मांडताना डॉ. आंबेडकरांनी स्त्री प्रश्नांबद्दल केलेली मांडणी महत्त्वाची आहे. लिंग आणि वर्ग आधारित भेदभाव हिंदू समाजाला स्वीकाहार्य आहे. म्हणून असमानता तशीच ठेवून केवळ आर्थिक प्रश्नांना विचारात घेणारे कायदे बनविणे हे धोकादायक आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्रस्तुत आहेत.

१९२७ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना दुर्बल करणाऱ्या, अन्याय करणाऱ्या, विषमतेला पाठबळ देणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले. तसेच १९२९ मध्ये पुण्याच्या पर्वती मंदिरात त्यांनी सत्याग्रह केला. १९३० मध्ये नाशिकच्या काळाराम मंदिराच्या सत्याग्रहात स्त्रियांचा सहभाग पुरुषांच्या मानाने किरकोळ आणि दुय्यम स्वरूपाचा होता परंतु तो डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना महत्त्वाचा वाटत होता. चळवळीच्या उदयानंतर हळूहळू स्त्रियांनी आपल्या मागण्या स्वतंत्रपणे मांडण्यास सुरुवात केली. १९४२ मध्ये अखिल भारतीय दलित महिलांचे एक अधिवेशन नागपूरला झाले. ह्यात २५ हजार महिला सहभागी होत्या. तेथे महिलांसमोर केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कुटुंबनियोजन, शिक्षण, कौटुंबिक जबाबदारी ह्या सर्व मुद्यांचा विचार करून स्त्रियांनी पुरुषांचे गुलाम बनून राहू नये तर बरोबरीच्या नात्याने आणि

शक्य झाल्यास मैत्रीण बनून त्यांच्याबरोबर उभे राहावे असे आव्हान करून स्त्री शिक्षण, मुलांचे संगोपन, स्त्री पुरुष समानता, पुरुषी हिंसाचार आणि त्याविरुद्ध आत्मरक्षा अशा समस्या घेऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्री प्रश्नांच्या मुळाशी घाव घालण्याचा प्रयत्न केला व त्यात ते यशस्वी झाले. तसेच त्यांनी मुस्लीम धर्मातील बुरखा पद्धत बंद करण्यासाठी जागृतीचे काम केले. स्त्री मुक्तीचा विचार करताना स्त्री शक्तीचे स्वरूप राष्ट्राच्या विकासाशी जोडण्याचा सातत्याने प्रयत्न केला. घटना आणि कायद्याच्या माध्यमातून स्त्री-पुरुष समानता प्रत्यक्षात उतरविली. विविध क्षेत्रात स्त्रियांचा प्रवेश ही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाची किमया आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांची पत्नी रमाबाई ह्यांना लिहिलेल्या पत्रात म्हणतात की, "मी स्त्री मुक्तीसाठी व स्त्री उन्नतीसाठी लढणारा एक योद्धा आहे. स्त्रियांची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी केलेल्या संघर्षाचा मला सार्थ अभिमान आहे."ह्यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्त्री विषयक भूमिका अधिक स्पष्ट होते. कुटुंबप्रमुखाची हुकूमशाही आणि स्त्रियांची गुलामगिरी हाच सामाजिक विषमतेला, गुलामगिरीला खतपाणी देणारा आधार आहे. ह्या आधाराला हादरे दिल्याशिवाय कुटुंबात व पर्यायाने समाजातही स्त्री-पुरुष समता येणे अशक्य आहे. असे विश्लेषण त्यांनी केले आहे. संत कबीर, भगवान गौतम बुद्ध या महापुरुषांच्या विचारांचा प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर पडला. संत कबीर यांनी आपल्या दोह्यातून स्त्री-पुरुष समानतेवर भर दिला. भगवान बुद्धांनी भिक्खू संघात स्त्रियांना प्रवेश देऊन समतेची मुहुर्तमेढ रोवली. स्त्री-पुरुषांना एकत्रित जगण्याची संधी उपलब्ध करून देऊन ज्ञान व निर्वाणाचा अधिकार दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नेहमी वाटायचे की, पाश्चात्त्य देशांच्या स्त्रियांप्रमाणे भारतातील स्त्रियांनाही मुक्तता असावी. परंतु येथे पुरुषप्रधान धर्मव्यवस्थेत स्त्रिया पुरुषांच्या गुलाम आहेत.

जोतिराव फुलेंच्या चिंतन व कार्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे वाहक बनले होते. २५ डिसेंबर १९२७ रोजी मनुस्मृती दहनाचा जे सामाजिक कार्य केले त्यावेळी तेथील

स्त्रियांना उद्देशून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, दलित स्त्रीच्या पोटी जन्म घेणे हे पाप का ठरले जावे? व इतर स्त्रियांच्या पोटी जन्म घेणे हे पूण्य का समजले जावे? ह्या प्रश्नांचा विचार गांभीर्याने करण्याची गरज आहे. वरिष्ठ वर्गाच्या बाया ज्या पद्धतीने लुगडी नेसतात, त्याच पद्धतीने तुम्हीही लुगडी नेसण्याची सवय ठेवावी, सुरुवात करावी असे आवाहन त्यांनी केले. चांगल्या कपड्याने शरीराला शोभा येते, म्हणून दागिन्यांपेक्षा कपड्यालाच जास्त महत्त्व आहे. दागिन्यात पैसे खर्च करण्याऐवजी चांगल्या कपड्यात पैसे खर्च करा. दागिना घालायचाच असेल तर तो सोन्याचा घालावा नाहीतर घालूच नये. ह्या मताचा तेथील स्त्री वर्गावर एवढा परिणाम झाला की, दुसऱ्या दिवशी स्त्रियांनी आपली वेशभूषा बदलली. आजूबाजूच्या जगाची स्त्रियांना माहिती व्हावी, त्यांचे प्रबोधन व्हावे, असा छोट्या-छोट्या गोष्टींचीही दखल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यावेळी घेतली. स्त्रियांच्या भावनांचा विचार करून त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांना जोडीदार निवडता यावा. याशिवाय गिरणी मजूर, विडी मजूर, कामकरी स्त्रियांचे वेतन व स्त्रियांना बाळंतपणाची रजा, त्यांच्या मुलांसाठी कामाच्या ठिकाणी पाळणाघरे ह्या सर्वच घटकांचा व त्यांच्या संबंधीचा समस्यांचा बारीक सारीक विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला व तशा प्रकारचे कार्यक्रमही आखले. देशातील पुरुषप्रधान संस्कृतीने नाकारलेले सर्व अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना दिले उदा. घटस्फोटाचा अधिकार, पोटगीचा अधिकार, दत्तक घेण्याचा अधिकार, वडिलांच्या मिळकतीत मुलींना समान अधिकार, वारसा अधिकार, आंतरजातीय विवाह करण्याचा अधिकार इ. अधिकार स्त्रियांना विशेष करून देण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांच्या प्रगतीला शिक्षणाच्या चळवळीचा साथ देऊन परिवर्तनाची अपेक्षा ठेवली. अखिल भारतीय बहिष्कृत हितकारिणी परिषदेत ज्या ज्या ठिकाणी शाळा असेल तेथील लोकांनी मुलामुलींस शिक्षण दिले पाहिजे. असा ठराव मांडण्यात आला होता. ह्यावरून दलित समाजातील स्त्री शिक्षणाचे महत्त्व समजून सांगण्याची तळमळ त्यांची

दिसून येते. मुलीचे वसतिगृह सुरू करावे. मुलींना फ्री-शिप व स्कॉलरशिप द्यावी, असे ठराव स्त्री शिक्षणाला चालना देण्यासाठी त्यांनी महाड आणि इतर परिषदांमध्ये मांडले.

पूर्वी पुराणमतवाद्यांनी नीतिमत्तेच्या नावाखाली सहशिक्षणावर बंदी घातली होती. ह्याबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, स्त्रियांच्यासहवासात राहून जो पुरुष आपले मन ताब्यात ठेवू शकतो व पुरुषांच्या सहवासात जी स्त्री आपले पाऊल वाकडे पडणार नाही,ह्याची खरबरदारी घेते ह्याला नीतिमत्ता म्हटले पाहिजे. १६ जून १९३६ रोजी मुंबईच्या दामोदर हॉलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वेश्या आणि मुरळ्यांसारख्या स्त्रियांची सभा घेतली त्यात त्यांनी स्त्री जात ही समाजाचा अहंकार आहे. प्रत्येक समाज स्त्रियांच्या चारित्र्याला अधिक मान देतो. आपली गृहिणी होणारी स्त्री उत्तम कुळातील असावी, अशी अपेक्षा करतो. वेश्याव्यवसाय सोडून लग्न करून प्रतिष्ठेने जगा असा उपदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला. वाईट कामे करवून घेऊन त्यांच्या जीवावर पोट भरणाऱ्या व्यक्तींची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रचंडचीड होती. पवळाबाईला तमाशाच्या बोर्डावर नाचवून मिळालेला पैसा व पठ्ठे बापुराव ह्यांनी देऊ केलेली मदत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नाकारली होती. स्त्रियांचे हनन करून मिळालेला पैसा मला नको, असे स्पष्ट शब्दात बाबासाहेबांनी सांगितले होते. म्हणजेच पुरुषांइतकीच स्त्रियांना इज्जत असते, हे पटवून देऊन पुढे स्त्री अनुयायांना धम्माची दीक्षा देण्याचा आग्रहधरला. जास्त मुलांना जन्म देऊन त्यांची जबाबदारी समाजावर टाकणार का? असा प्रश्न ते विचारतात. लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी संतती नियंत्रण व्हावे. याचाही ते विचार करतात. अशा प्रकारे डॉ.बाबासाहेबांनी स्त्रियांच्या भावनांचा सूक्ष्मपणे विचार केला.[१५] सामाजिकदृष्ट्या उन्नती होण्याच्या दृष्टीने स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात विकास करू द्यावा, मदत करावी व त्यांना स्वावलंबी बनवावे. समाज व राष्ट्राची प्रगती स्त्रियांच्या प्रगतीवर अवलंबून असतो,ह्यावर त्यांचा ठाम विश्वास होता. स्त्रियांना विश्वासात घेतल्यास समाजाची सुधारणा झाल्याशिवाय राहणार नाही,ह्यावर त्यांचा विश्वास होता. त्यांनी आपल्या सामाजिक आंदोलनात स्त्रियांना सहभागी

करून घेतले होते. त्यांच्या मते स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मोजता येते.

स्त्रियांच्या अवनीतीला बुद्धांची शिकवण कारणीभूत झाली. अशा स्वरूपाचा आरोप इब्ज विकली ह्या साप्ताहिकाच्या अंकात २१ जानेवारी १९५० ला प्रसिद्ध झाला. त्याला महाबोधी मासिकांच्या अंकात लामा गोविंद ह्यांनी मार्च १९५० ला हिंदु धर्म आणि बौद्ध धर्म ह्यांच्यातील हिंदू स्त्रियांचे स्थान हा लेख प्रसिद्ध करून उत्तर दिले.[१६]

आनंद आणि भगवान बुद्ध ह्यांचा महापरिनिर्वाण सुत्तपिटकांत जो स्त्री विषयक संवाद लिहिलेला आहे तो नंतरच्याकाळातील भिक्खूंनी घुसडून दिलेला मजकूर आहे असा उल्लेख सापडतो. आनंद ने स्त्रियांबद्दलचे प्रश्न तथागत बुद्धांना विचारणे शक्यच नव्हते. हे या लेखात स्पष्टपणे पटवून दिले आहे. स्त्रियांनी आनंदला भेटू नये असा कधीही विरोध केला नाही. भिक्खू आणि भिक्खुनी यांचे जेवण संघात एका पंक्तीत होत नसे. तथागत बुद्धांनी ही प्रथा सुरू केलेली होती. तसेच भिक्खुसमोर स्त्रियांसंबंधी तिरस्कार युक्त शब्द कधीही उच्चारलेले नव्हते. स्त्रियांच्या संगतीच्या मोहापासून तुम्ही दूर राहा एवढेच बुद्धांचे भिक्खुंना सांगणे होते.

स्त्रीस-माता, तरुणीला-भगिनी आणि किशोरीला मुलगी मानून त्यांच्याशी शुद्ध भावनेने भिक्खुंनी वागावे असे भगवान बुद्धांनी म्हटलेले होते. स्त्री बुद्धिमत्ता आणि नीतिमत्ता ह्याबाबतीत पुरुषांपेक्षा कमी दर्जाची आहे, असे बुद्ध समजत नव्हते. थोडक्यात विवाहित, अविवाहित, विधवा आणि वेश्या सर्व प्रकारच्या स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य, समता, आत्मविकास ही मानवी जीवनाची सर्व अंगे प्राप्त करून घेता येत होती. स्त्री समाजातील संसारातील अडचणी सोडविण्यामध्ये सक्षमच आहे. अस्पृश्यता निवारण्याचा प्रश्न सुद्धा फक्त स्त्रियांचा अथवा फक्त पुरुषांचा असा नसून तो दोघांचाही आहे. स्त्रिया ह्या जातिव्यवस्थेच्या प्रवेशद्वार आहे, असे प्रतिपादन केलेले असून गटांतर्गत विवाह करणाऱ्या रूढीने स्वगटाबाहेर लग्न करण्याच्या रूढीवर

मिळविलेला विजय म्हणजे जातींची निर्मिती होय. स्त्रिया नेहमी धार्मिक, सामाजिक व आर्थिक नियमांना बळी पडतात. त्यामुळे जातिव्यवस्था अंताचा प्रश्न स्त्री आणि पुरुष दोघांनाही सोडवावा लागत असला तरी जातिव्यवस्थेच्या अंताच्यालढ्यात स्त्रियांचा पुढाकार असलाच पाहिजे, अशी धारणा बाबासाहेबांची होती.

समाजातील धर्माचे अधिष्ठान असलेल्या विषमतेवर आधारित जातिव्यवस्थेमुळे जातीय उतरंडीच्या तळाशी असलेल्या शतकानुशतके जनावरापेक्षाही हीन जीवन वाट्याला आलेल्या महार, मांग व इतर अस्पृश्यांमधील माणूस जागा करणारे त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणारे, त्यांची अन्यायाविरुद्ध प्रतिकारक्षमता वाढवून त्यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देण्याचा आटोकाट प्रयत्न करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे पुढारी नव्हते तर ते स्त्रियांचे कैवारी आणि स्त्री मुक्ती चळवळीचेही प्रेरणादाते होते. स्वतंत्र भारतात पुरुषांप्रमाणे स्त्रियांचाही सर्वांगीण विकास झाला पाहिजे ह्या त्यांच्या विचारप्रणालीमुळे कायदे करताना स्त्री-पुरुष समतेचा आग्रह धरला. मनुस्मृतीने स्वातंत्र्य नाकारलेल्या हिंदू स्त्रियांची दयनीय परिस्थिती त्यांचे कौटुंबिक प्रश्न ह्यांचे तीव्र आकलन त्यांना झाले होते, म्हणूनच त्यांनी सर्व जाती पोटजातीतील हिंदू स्त्रियांसाठी एकच कायदा लागू व्हावा, असा आग्रह धरून हिंदू कोड बिल मांडले. पारंपरिक कुटुंब पद्धतीमध्ये बंदिस्त असलेल्या हिंदू स्त्रीचे जीवन सुधारावे आणि मोकळा श्वास घ्यायला तिला काहीसा अवसर मिळावा हा त्या मागचा त्यांचा उदात्त हेतू होता.[१७]

## ४.३ समकालीन स्त्री प्रश्न आणि भारतीय समाजव्यवस्था:

स्त्रियांनी आजपर्यंत अनेक लढाया लढल्या, पुरुषांचे पौरुषत्व जागते ठेवण्याची सामाजिक भूमिका त्यांनी पार पाडली. खरे तर ही भूमिका सामाजिक ठरविली गेली इथूनच स्त्रियांच्या समस्येचा अंदाज येतो. या भूमिकेत तडजोड म्हणून जे काही बदल करून घेतले तो स्त्रियांचा स्वाभाविक गुणधर्म मानला जाऊ लागला आणि याद्वारेच त्यांना दुय्यम स्थान पत्करावे लागले.[१८]

लेखकाने स्त्रियांचे आत्मभान जागविण्यासाठी अनेकविध पर्याय सुचविले आहेत. अशा आशयाचे विश्लेषण केलेले आहे. ह्या लेखाचा परामर्श घेत असताना आपणास स्त्रियांचे आजच्या काळात जे प्रश्न आहेत ते समजावून घेतले पाहिजे व त्यावर चिंतन, लेखन, साहित्य व कृतिकार्यक्रम ठरविले पाहिजे. स्त्रियांना मालमत्तेतील त्यांची वाटणी देण्याचा प्रश्न, मुलींचे शिक्षण, त्यांचे विवाह ह्याबाबतची समाजाची जागरूकता, सासुरवाशीनिंचा प्रश्न, घटस्फोटीत व परितक्त्यांच्या समस्या तसेच अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रियांचे प्रश्न समाजासमोर व देशासमोर येण्याऐवजी स्त्रियांच्या शृंगार, ललित रूपाची चर्चा समाजासमोर आणली जाते. स्त्रिया म्हणजे उपभोग्य वस्तूची प्रतिमा मांडली जाते. ह्यासाठी अनेक स्त्रिया त्यांच्या चळवळी आणि संघटना निर्माण झाल्या १९४० मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या 'थॉटस् ऑन पाकिस्तान' या ग्रंथात केवळ मुस्लीम नव्हे तर हिंदू स्त्रियांचा देखील विचार करतात. हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती ह्या ग्रंथात तर त्यांनी स्पष्ट केले की, स्त्री कोणत्याही जाती-धर्माची असो ती शोषित वर्गाचेच प्रतिनिधित्व करते.

भारतीय समाजाने स्त्रीला कौटुंबिक पातळीवरही एकटेच पाडले. सामाजिक आणि राजकीय चळवळीतील सहभाग तर दूरच राहिला आहे. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना सन्मानाचे स्थान कुठल्याच क्षेत्रात दिले नाही. घर-प्रपंचाच्या अडचणी आजही स्त्रीला एकटीलाच सोडवाव्या लागतात. अर्थात या समस्या सोडविण्याची नैसर्गिक देणगी पुरुषापेक्षा स्त्रियांनाच जास्त आहे. मात्र ह्याचाच गैर अर्थ स्त्रियांना मानसिक त्रास देण्याच्या हेतूने ही सर्व पुरुषांनी स्त्रियांवर लादलेली आहेत. स्त्रिवर्गाच्या शीलाचा, पतिव्रत्याचा, मनोधैर्याचा प्रश्न तर अधिक गंभीर स्वरूपाचा दिसून येतो. मात्र भारतीय समाजाने जातीयतेचा प्रश्न अधिक गंभीर स्वरूपाचा केलेला दिसतो. उदा. ब्राह्मण स्त्रियांच्या पोटी जन्मलेले बालक का सर्वमान्य व्हावे व इतर वर्णियांच्या पोटी जन्मलेले बालक सर्वच ठिकाणी अवमानिले जाते, ही भारतीय समाजाची वास्तविकता आहे. अस्पृश्यतेचा जणूकाही त्यांच्या कपाळावरच शिक्का मारलेला आहे. डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांच्या मते स्त्रियांच्या प्रश्नांपेक्षा स्त्रियांच्या अधिकारांचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. स्त्रियांना अधिक बंडखोर बनविले जाणे, चांगल्या प्रकारचे शिक्षण तिच्या मुलांना देणे, ४ जुलै १९३६ रोजी डेव्हिडह्यांनी परळच्या दामोदर हॉलमध्ये अस्पृश्य समाजातील वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रियांचा मेळावा घेतला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्या स्त्रियांना वेश्यावृत्तीपासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला होता. ह्याबरोबरच स्त्रियांनी स्वाभिमानाने जगावे ह्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोडबिलाला आपल्या जीवनातील घटना तयार करण्याच्या कार्यापेक्षा अधिक महत्त्वाचे स्थान दिले होते. स्त्रियांच्या उन्नतीत खिळ घालणारे कर्मठ हिंदूवर त्यांनी प्रचंडटीकाकेल्याचे दिसते. हे सर्व अडथळे पार करत करत हिंन्दू स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने न्याय हक्क देण्याची भूमिका समजून येते. इतर देश आणि भारतातील स्त्रियांमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता दिसून येते. ही केवळ स्त्री आणि पुरुषांमधील नाही तर वर्ग, जात आणि धर्म ह्याबाबतीत सुद्धा दिसून येते, आरोग्य, शिक्षण, रोजगार, राजकीय व आर्थिक सहभाग ह्याबाबतीत तर वेगवेगळा दृष्टिकोन दिसून येतो. प्रतिकूल लिंग गुणोत्तर व आणखी वेगळाच विषय आहे. सामाजिक प्रथांमुळे स्त्रियांना जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर विपरीत होते, असे दिसते. स्त्री-पुरुषांच्या साक्षरतेच्या प्रमाणात सुद्धा मोठी तफावत दिसून येते. साक्षरतेच्या संदर्भात आपणास मिळालेल्या यशाचे शाळेमध्ये होणाऱ्या नावनोंदणी मध्ये प्रतिबिंब पडलेले दिसून येते. उदा. १९९९ मध्ये प्राथमिक शाळेतील मुलांची नोंदणी ९४.४% होती. तर मुलींच्या नोंदणीचे प्रमाणे ७५.७% इतके होते. घरादाराच्या उत्पन्न आणि दारिद्र्यावर आर्थिक विकासाचा परिणाम होतो आणि त्यांचा संबंध शाळेतील नावनोंदणी शाळेत टिकून राहणे आणि शैक्षणिक यश ह्याच्याशी असतो. दलितांच्या शिक्षणाबाबत वर्णन करताना शिक्षणक्षेत्रामध्ये असलेल्या सकारात्मक धोरणांमुळे काही वेगळी कौशल्य आत्मसात करून प्रशिक्षित घेऊन्न जाती आधारित व्यवसाय व्यतिरिक्त इतर व्यवसाय करणे शक्य झाले आहे. पण आज उच्च शिक्षणाच्या खासगीकरणामुळे (बिर्ला-अंबानी अहवाल) दलितांचा शैक्षणिक दर्जा आणि माध्यमिक

शिक्षणापुढचे शिक्षण घेण्याच्या संधीवर घाला येत आहे. भारतीय समाजातील पुरुषांबरोबरीने स्त्रियांनी राजकारणात सहभाग घेतला. राज्यकर्त्या बनल्या, राजकीय जाणिवा वाढविल्या तर वरील स्थिती सुधारण्यास हातभार लागेल. भारतातील एकूणच स्त्रियांची राजकीय जाणीव अत्यल्प असल्याने व अशिक्षितपणामुळे राजकारण हे स्त्रियांचे क्षेत्र नाही, असा समज असल्याकारणाने मतदान करणाऱ्या आणि राजकारणात सक्रीय असणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण कमी आहे व त्याचा परिणाम आपोआपच भारतीय समाजावर होतो. संसदेत सुद्धा स्त्रियांचे प्रमाणे साधारणत: ८.८% इतकेच आहे.[१९]

समकालीन भारतीय समाजामध्ये स्त्रियांचे प्रमाणे जसे पुरुषांपेक्षा कमी आहे, तसे राजकारणात सुद्धा स्त्रियांचा सहभाग वाढत चालला असला तरी पुरुषांपेक्षा तो कमीच आहे. महत्त्वाचे म्हणजे अत्यंत महत्त्वाच्या ठिकाणी स्त्रिया जवळजवळ नाहीच. संसदेप्रमाणेच राज्यांच्या कायदेमंडळातही स्त्रियांची संख्या कमी आहे. आर्थिक क्षेत्र अथवा उद्योगधंद्याचा विचार केला तरीही हे प्रमाण विषम दिसते. भारतीय स्त्री पंतप्रधान झाली, राष्ट्रपती झाली. अमेरिकेत आज पर्यंतच्या इतिहासात स्त्री राष्ट्राध्यक्ष होऊ शकली नाही.

राष्ट्रीय श्रम आयोगाच्या अहवालानुसार दलित स्त्रियांपैकी ८५% स्त्रिया शेतमजूर, साफ-सफाईचे काम करतात. स्त्री कामगारांपैकी तर २.५% महिलाच पदवीधर आहे. ह्या निष्कर्षाचीही नोंद घ्यावी लागते. स्त्रियांमध्ये निरक्षरतेचे प्रमाण अतिजास्त आहे. ग्रामीण भागात अनेक लोक शैक्षणिकदृष्ट्या मागासलेले आहेत. लिंगभेदाचे प्रमाण तर टोकाचेच दिसून येतात.कोणतीही स्थिती ही सर्व स्त्रियांसाठी चांगली किंवा वाईट असू शकत नाही. विकास प्रक्रियेमध्ये कोणते व किती फायदे स्त्रियांच्या वाट्याला येतात, हे त्यांच्या जात, धर्म, वर्ग, वंश, प्रदेश यांच्या स्थानावरून ठरते.[२०]ह्यावरून असे स्पष्ट होते की, महिला सक्षमीकरण आणि विकास ही आजही न संपलेली कार्यक्रम पत्रिका आहे. स्त्रियांकरिता असलेल्या विविध धोरण कार्यक्रम आणि आयोगांचा विचार करता गरीब, श्रमिक महिलांच्या समस्या अधिक गुंतागुंतीच्या आहेत.

धक्कादायक वास्तव इतक्या वर्षांनंतरही बदललेले नाही. ह्यातील बरेच अहवाल स्त्रीकेंद्री नाही. अहवालानंतरही स्त्रियांबाबत परिणामकारक धोरणे आखली व राबविली नाहीत. कागदावरील धोरणांचा प्रत्यक्ष परिणाम दिसून येत नाही.[२१]

भारतातील समकालीन स्त्रियांबाबतचा त्यांचा सामाजिक दर्जा, शिक्षण, रोजगार विकासाची गती, रोजगाराचा मोबदला, उच्च शिक्षणात येणाऱ्या समस्या, लोकसंख्या धोरण आणि कुटुंब नियोजनाचे कार्यक्रम आणि एकूणच राष्ट्रउभारणीमध्ये स्त्रियांचा सहभाग, घटस्फोट किंवा विभक्त झाल्यास संपत्तीतील वाटा, कौटुंबिक संघर्ष, समान नागरी कायद्याचा अवलंब, कुमारी मातेचा प्रश्न आणि या सर्व स्थितींबाबतचे प्रसार माध्यमांचे धोरण सुधारणावादी नाही. स्त्रियांच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी योजना बरोबरच स्त्रियांनी सुद्धा ह्याकडे कल्याणकारी दृष्टिकोनातून बघण्यापेक्षा विकासाच्या व्यापक संदर्भात पहावे. सरकारच्या अनेक धोरणांत फसगत झाल्याचे दिसून आल्याने समकालीन स्त्रियांची अशी स्थिती झाली. स्त्रियांच्या आरोग्यासंदर्भातील प्रश्नांची दखल घेतली नाही. उद्योग क्षेत्र, वन, कृषी, गृहनिर्माण, विज्ञान आणि तंत्रज्ञान इ. शी संबंधित अनेक धोरणांचा संबंध स्त्रियांच्या जगण्याशी असतो आणि त्यांच्या हितासाठीचे कार्यक्रम जरी त्यात असले तरी स्त्रिया संबंधीच्या मुद्यांकडे लक्ष दिले जात नाही. ह्या सर्व धोरणांचा केंद्रबिंदू स्त्रीच हवी. लिंगभाव समता प्रस्थापित करून स्त्रियांचा सामाजिक, आर्थिक दर्जा सुधारण्यासाठी विविध धोरणाची व आराखड्याची अंमलबजावणी हवी. विविध कल्याणकारी योजना महिलांपर्यत पोहोचल्या जाव्यात, ह्यासाठी स्त्रियांमधील जागरूकता ही अत्यंत महत्त्वाची आहे.

समकालीन स्त्रियांच्या संदर्भात अनेक अंगांनी चर्चा केल्यानंतर भारतातील स्त्रियांचे वेगळेपण लक्षात येते. स्त्रियांच्या दडपणुकीसाठी पुरुषसत्ता माणसा-माणसांमधील अन्यायी उतरंडी कारणीभूत आहेत. जातिव्यवस्था ही एक श्रेणीबद्ध व्यवस्था असून त्यात उच्च आणि कनिष्ठ ह्यामध्ये द्वैत निर्माण केले आहे. भारतात जात व वर्ण ह्यामध्ये उतरंडीची व्यवस्था आहे.

कर्मकांडाच्या परिप्रेक्षातून जातीची श्रेणी ठरते. ह्यांत ब्राह्मण सर्वात वर आणि दलित जाती सर्वात खाली असा श्रेणीक्रम लावला जातो. वर्ग हा राजकीय व आर्थिक दर्जावरून ठरतो. भारतातील ग्रामीण भागात सर्वात श्रेष्ठ जमीनदार व सर्वात कनिष्ठभूमिहीन मजूर अशी रचना असते. भारतात जाती आणि वर्ग एकमेकांना निर्गमित करतात. एकत्र येऊन एकमेवाद्वितीय अशा असमानता भारतीय समाजात तयार करतात. जातीवर आधारित व्यवसाय हे भारतीय समाजाचे वास्तव आहे. ह्या व्यवसायांचे निरीक्षण केल्यास त्यातून स्त्रियांच्या व खालच्या जातीतल्या लोकांबाबत असमानता व भेदभाव दिसून येतो. भारतात जातिव्यवस्था आणि स्त्रिया ह्यांचा सहसंबध आहे. मनूने स्त्रियांना गुलामीत ठेवण्यासाठी कसे कायदे केले ह्याविषयीचे सविस्तर विश्लेषण त्यांनी केले. जातीला पुनरुत्पादित करण्यामध्ये विवाह नियम परिणामकारक ठरतात आणि विवाह संस्थेमध्ये पुरुषांचा कर्मकांडीय व भौतिक दर्जा हा स्त्रीपेक्षा उच्च राहिला आहे. समकालीन स्त्री प्रश्न आणि भारतीय समाजव्यवस्था ह्यांचे संबंध लक्षात घेता आपल्यासमोर विविध धोकादायक बाबी पुढे येतात. समाजातील विविध लाभांच्या बाबतीत लिंगभेद असणे, मुलींनाच शैक्षणिक संधीपासून वंचित ठेवणे, त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधने लादणे, पुरुषसत्तांक धोरणाची सक्ती करणे, कामाच्या ठिकाणी स्त्रियांचे लैंगिक छळ होणे, स्त्रियांना संपत्तीत वाटा नाकारणे, स्त्रियांना स्वत:च्या जननक्षमतेवर व पुनरुत्पादनावर हक्क नसणे, जातिव्यवस्थेच्या प्रसारासाठी व प्रचारासाठी वापर करून घेणे इत्यादी मार्गाने स्त्रीवर्गाची पिळवणूक व शोषण केले जाते. त्यांना समाजात दुय्यम स्थान दिले जाते. महिला सबलीकरण व संक्षमीकरणाचे अनेक प्रयत्न होऊनही या स्थितीत समाधानकारक सुधारणा झालेली नाही.[२२]

## ४.४समन्वयीपरिप्रेक्ष्यातून स्त्री प्रश्नांची चिकित्सा :

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या दोन्ही विचारवंत व कृतीशील कार्यकर्त्यांच्या कालखंडात मोठे अंतर असून दोघांचेही विचार परस्पर विरोधी आहेत. आंबेडकरी तत्त्वज्ञानावर आधारित आंबेडकरवादी विचारसरणी, मार्क्सवादी तत्त्वज्ञानावर आधारित

मार्क्सवादी विचारसरणीचा जन्म झाला. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ह्या दोन्ही चळवळी आणि तत्त्वज्ञानाच्या बाबतीत समाजामध्ये आज मोठा वैचारिक गोंधळ निर्माण झाला आहे. दोन्ही चळवळींची उद्दिष्टे वेगवेगळी असून त्या आपापल्या विचारांशी एकरूप राहिल्या नाहीत. मार्क्सवादी विचारसरणी वैश्विक पातळीवर मोठा संघर्ष करून औद्योगिक क्रांतीच्या काळात ह्या विचारसरणीने परिस्थितीशी तडजोड केली नाही. मार्क्सने आपल्या विचारांचा पाया वर्ग मानला. जगात पिळवणूक आहे, हे प्रमाण मानूण ह्या सिद्धांतापासून साम्यवादाची सुरुवात झाली. मार्क्सने जडतत्त्वाला प्राधान्य देऊन्न सामाजिक समस्यांच्या मुळाशी तो गेला.

भारताबाबत मार्क्सने असे भाकित केले की, भारतातील जाती केवळ आर्थिक परिवर्तनाने जातील. एक वर्ग दुसऱ्या वर्गाची पिळवणूक करतो. त्यामुळे वर्गमय व्यवस्था नष्ट केली तर कोण-कोणाची पिळवणूक करणार नाही. सर्व समाज एका समान पातळीवर येईल आणि ह्यासाठी मार्क्सने राजकीय क्रांतीपेक्षा सामाजिक क्रांतीवर भर दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार बुद्धवादावर उभे आहेत. हाच गाभाभूत विचार आंबेडकरवादी विचारसरणीचा केंद्रबिंदू आहे. आंबेडकरवादी विचारसरणीचे समर्थक मात्र संभ्रमावस्थेत आहेत. तरीही ह्या विचाराला आधारभूत मानून राजकीय पक्षांची निर्मिती झाली आहे. ह्यांनी आपल्या विचारांचा पाया जात मानला. राज्यकर्ती जमात बनण्याच्या उद्देशाने सामाजिक ऐवजी राजकीय क्रांतीवर भर दिला.

मार्क्सवादी आणि आंबेडकरवादी चळवळींची बौद्धिक पार्श्वभूमी वेगवेगळी आहे. त्यांच्या तत्त्वज्ञानाला पायाभूत मानून ज्या चळवळी आज टिकून आहेत, त्यांची उद्दिष्टे वेगवेगळी आहेत. कडवे मार्क्सवादी अथवा कडवे आंबेडकरवादी आज दिसत नाही. अनुक्रमे त्यांनी वर्ग आणि जातींचा विचार केला दोन्ही विचारांच्या समर्थकांमध्ये एकजीनशीपणाचा अभाव दिसतो हे समर्थक काही तत्त्वे मार्क्सवादी तर काही आंबेडकरवादी घेऊन्न सामाजिक समस्यांची सोडवणूक

करण्याचा प्रयत्न करतात. मात्र त्यात यशस्वीता मिळाली नाही. कार्यकर्ते, समाजसुधारक, नेते, राज्यकर्ते, ह्यांच्या कार्यात अंध:कार निर्माण झाला आहे.

अंध:कारमय परिस्थितीवर उपाय म्हणून दोन्ही विचारांना उघडपणे, निर्भीडपणे एकत्र आणण्याचे काम महाराष्ट्रातील थोर विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे ह्यांनी मार्क्स-आंबेडकरसमन्वयी विचार मांडले. परंतु त्याला सैद्धांतिक पातळीवर साचेबंदपणा आणण्याचे महत्त्वाचे काम कॉ.शरद पाटील ह्यांनी केले. भारतीय समाजजीवनाचा अभ्यास व चिंतन केले तर जातीयता, स्त्रियांचे सामाजिक स्थान, अस्पृश्यता, वर्णव्यवस्था या समस्यांचा विचार करावा लागतो. जागतिकीकरणात हे प्रश्न कळीचे बनले आहेत.

कार्ल मार्क्सने वापरलेला 'पिळवणूक' हा शब्द आणि भगवान गौतम बुद्धांनी वापरलेला 'दु:ख'ह्या दोन्हीही शब्दाच्या मागची भावना लक्षात घेतली तर जगात पिळवणूक आहे ह्या सिद्धांतापासून साम्यवादाची सुरुवात होते तर जगात दु:ख आहे ह्यापासून बुद्धवादाची सुरुवात होते. समकालीन राजकीय व सामाजिक व तसेच आर्थिक क्षेत्रावर भांडवलशाहीचा परिणाम होऊन भांडवलशाहीने एक नवे रूप धारण केले. ह्यावर उपाय म्हणून मार्क्स-आंबेडकर समन्वयवाद उपयुक्त ठरू शकतो. म्हणून समन्वयवादाची चिकित्सा होणे आवश्यक होते. समकालीन युगात मार्क्सवादी व आंबेडकरवादी चळवळीचा आधार विचारात घेऊनजातीयतेचा, अस्पृश्यतेचा, रोजगार, शिक्षण आणि स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी समन्वयी भूमिकांचे आकलन व्हावे लागते.

बुद्ध आणि कार्लमार्क्स ह्या निबंधामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध आणि मार्क्सची तुलना केलेली आहे. ह्यामध्ये एकाने जडतत्त्वाला प्राधान्य दिले, व्यक्तीच्या मृत्यूचा मार्ग सांगितला व लोकशाहीकडे आकर्षित झाला. मानवी मनाचा विविध अंगानी शोध घेऊन कार्ल मार्क्सने आपल्या विचारांचा आधारच जडतत्त्व मानला. व्यक्तीऐवजी समाजमुक्तीचा मार्ग मार्क्सने

सांगितला. लोकशाहीच नव्हे तर राज्याचे अस्तित्वच विसरून जाण्याचे त्यांनी स्वप्न पाहिले आणि धर्माला अफूची गोळी असे म्हटले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते बुद्ध हा मार्क्सपासून वेगळा नाही. त्यांची भाषा जरी वेगळी असली तरी अर्थच मात्र एकच आहे. दलित चळवळीतील नेते जातीच्या किल्ल्यातच सुरक्षित राहणे पसंत करतात. त्यामुळे ते वर्गीय भूमिकेच्या विरुद्ध होते परंतु दलित पँथरची भूमिका नंतरच्या काळात वर्गीय बनली. १९१६ साली जातिसंस्थेचा उदय व विकासासाठी मार्क्सवादी विश्लेषण केले गेले. त्यामुळे आंबेडकर हे मार्क्सवादी होते अशीही टीका झाली. ह्यावर डॉ. कसबेंच्या मते, मार्क्सवादाचे सुप्त आकर्षण आंबेडकरांच्या संपूर्ण जीवनात भारतीय कम्युनिस्टांच्या विरोधात जाऊनही टवटवीत राहिले आहे.

कार्ल मार्क्सने फ्रेडरिक एंजल्सशी केलेल्या पत्रव्यवहारात भारताबाबतचे अनेक संदर्भ आहेत. ह्यावरून भारताबाबत, भारतीय समस्यांबाबत मार्क्सचे मत काय होते हे समजते. भारतातील जातिसंस्थेचे वाहक म्हणून आंबेडकरवादाने स्त्रियांकडे पाहिले. कर्मकांडजोपासणारी स्त्री, पुरुषसत्ताक पद्धतीने गुलाम झालेली स्त्री, जातिव्यवस्था मजबूत करते. ही जातिव्यवस्था, जातिव्यवस्थेची उतरंड घालविण्यासाठी आंबेडकरवादाने अनेक उपाय सांगितले. मात्र भारतातील जाती कवेळ आर्थिक परिवर्तनाने जातील, अशी मांडणी मार्क्सवादाने केली. थोडक्यात कार्लमार्क्सने सांगितलेल्या द्वंद्वात्मक भौतिकवाद हा परिवर्तनाच्या आर्थिक आधारावर उभा आहे. तो म्हणतो, अशी एक सामाजिकव्यवस्थानिर्माण व्हावी. ज्यात शोषणाला थोडादेखील वाव राहणार नाही. त्याचप्रमाणे समाजात कोणतेही वर्ग राहणार नाहीत परंतु भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रीवर्गाविषयी वेगळे असे विचार मांडले नाहीत. कारण भारतीय समाजात समाज आहे व ह्या समाजात समाजाच्याच अनेक उपव्यवस्था आहेत. त्यातीलच एक उपव्यवस्था म्हणजे स्त्री समाज होय. पुरुषवर्ग स्त्रियांचे शोषण करतो, त्यामुळे पिळवणूक करणारा (पुरुषवर्ग) आणि पिळला जाणारा (स्त्रीवर्ग) ह्या दोन्ही वर्गांचे अस्तित्व भारतीय समाजात दिसून येते. त्यामुळे स्त्री-पुरुष वर्गविहीन समाज भारतामध्ये अस्तित्वात येणे

दुरापास्तच आहे. कार्ल मार्क्सने राजकीय क्रांतीपेक्षा सामाजिक क्रांतीवर भर दिला व समाजातील वर्ग, पिळवणूक नष्ट करण्याचा हेतू ठेवला. तर आंबेडकरवादी विचारसरणीने अंतिमत: राज्यकर्ती जमात बनविण्याच्या उद्देशाने सामाजिक ऐवजी राजकीय क्रांतीवर भर दिला. भारतातील जातीनष्ट केल्या की जातींमध्ये जे अनेक वर्ग निर्माण झालेले आहेत त्यांचा आपोआप नायनाट होईल,ह्यामुळे स्त्रीशोषणाचाही नायनाट होईल. अनेक समाजशास्त्रज्ञांच्या मते जात ही वर्गामध्ये परिवर्तीत होते मात्र भारतातील डाव्या चळवळींचे जातीसंदर्भातील विचार लक्षात घेतले तर असे दिसते की, ह्या देशातील अनन्य असे जात-वर्ग हे द्वंद्व हे कम्युनिस्टांच्या ब्राह्मणी प्रवृत्तीमुळे निर्माण झाले आणि त्यांच्या धोरणांमुळेच अजूनही जिवंत आहे. वर्गाबाबतचे विश्लेषण करतांना जाती ह्या भारतीय समाजाचे अंग आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. जातीप्रश्न हा देशाचा प्रश्न आहे. यासारखाच दुसरा प्रश्न स्त्री-पुरुष विषमतेचा आहे. जातिनिहाय जनगणनेच्या निमित्ताने तसेच स्त्री-पुरुषांच्या गणनेच्या निमित्ताने वरील प्रश्न कळीचे बनले. कार्ल मार्क्सच्या विचारसरणीप्रमाणे उत्पादनची साधने गतिशील आणि सतत बदलणारी असतात. उत्पादनाच्या साधनात बदल झाल्यास समाजजीवनाच्या पद्धतीवर परिणाम होतो. म्हणजे उत्पादन पद्धती हे पायाभूत तत्त्व आहे. उत्पादन पद्धतीवर मनुष्याचे समाजातील संबंध आणि क्रिया निश्चित होत असतात. ह्याचे विश्लेषण भारतासंबंधी, भारतातील स्त्री-पुरुषांसंबंधी पडताळून पाहिले तर असे लक्षात येते की, भारतीय समाजात चार वर्ण आहेत. ह्या वर्णव्यवस्थेत अखिल स्त्री जीतीला पुरुष वर्गाने दलित ठरविले आहे. पुरुषांनी स्त्रियांना जाणीवपूर्वक परावलंबी बनविले. संपूर्ण उत्पादनाची साधने पुरुषवर्गाने आपल्याच ताब्यात ठेवले व स्त्रियांची आर्थिक व सामाजिक पिळवणूक सुरू केली. ही पिळवणूक थांबविण्यासाठी आंबेडकरवादाने समतेचे विचार मांडले, स्त्रियांना प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी  गौतम बुद्धांनी कुटुंबातील आर्थिक नियोजन स्त्रीकडे दिल्यास संपूर्ण समाज विकसित होईल असे विचार मांडले. भारतातील स्त्री-पुरुष विषमतेचा, लिंगभेदाचा, भारतातील सामाजिक विषमतेचा विचार पूर्णत्त्वाने केलेला दिसून येत नाही.

भारतीय समाजातधार्मिक रूढी, परंपरा जोपसून त्या जतन करण्याचे प्रमुख काम स्त्री वर्ग करीत आहे. कार्ल मार्क्सने भारतातील धर्मव्यवस्थेतील स्त्री वर्गाच्या भूमिकेकडेच नकारात्मक दृष्टीने पाहीले. मार्क्सच्या मते "धर्म म्हणजे अफूची गोळी आहे." प्राचीन साम्यवादात, आदिम अवस्थेत मनुष्याच्या गरजा फार कमी होत्या. तो प्राण्यांची शिकार करून कंदमुळे खाऊन मनुष्य त्याचा उदरभरणाचा प्रश्न सोडवित असे. पोट भरण्यासाठी तो संग्रह करू शकत नव्हता. परंतु माणसाकडे स्त्रियांमुळे संग्राहक वृत्ती आली. ह्याकडे मार्क्सने दुर्लक्ष केले.

मार्क्सवादी विचाराचे अंतिम स्वप्न साम्यवाद निर्माण करणे असे होते. या साम्यवादात स्त्रियांची स्थिती काय असेल याकडे मार्क्सने आपले लक्ष वेधले नाही. आंबेडकरवादाने मात्र स्त्री-पुरुष समानतेचा विचार मांडून एका वेगळ्या विकासाप्रत पाहोचलेल्या समाजाची अपेक्षा केली. गरीब-श्रीमंत, मालक-मजूर अशी विषमता नष्ट होऊन साम्यवादी व्यवस्था आणण्याच्या हेतूने प्रत्येकाच्या कुवतीप्रमाणे काम आणि त्याच्या गरजेप्रमाणे दाम अशी व्यवस्था पुढे आणली. भारतातील उदारमतवादी लोकशाहीमध्ये समाजातील प्रत्येक व्यक्तीचा, पुरुषाबरोबर स्त्रीचा विचार केला. मार्क्सवादाने स्त्रियांचा वेगळा व स्वतंत्रपणे विचार केलेला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कास्ट इन इंडिया व ॲनहिलेशन ऑफ कास्ट तसेच कार्ल मार्क्सचे कम्युनिस्ट मेनीफेस्टो ह्यांचा तौलनिक अभ्यास केला असता वैचारिक संघर्ष पुढे येतो. कम्युनिस्ट मेनीफेस्टो मध्ये मार्क्स भांडवलशाहीविरुद्ध आक्रमक बनतो. त्याचवेळी भारतातील जातिसंदर्भात त्याची आक्रमकता कमी पडते. मार्क्सवादाच्या मते समाजात दोनच वर्ग असतात. मात्र आंबेडकरवादाच्या मते अनेक जाती व त्यांचे अनेक वर्ग असतात. भारतातील सर्वात मोठा वर्ग हा मध्यम वर्ग आहे. मार्क्सने भारतातील मध्यम वर्ग व स्त्री वर्गाकडे दुर्लक्ष केले. भारतीय राजकारणात स्त्रियांना सत्तेत वाटा देतांना पुरुषवर्गाने पुरुषसत्ता सिद्ध करण्याचा डाव यशस्वी केला. विविध राजकीय पक्ष, त्यांचे नेते स्त्रियांबद्दल आस्था दाखवितात. मात्र प्रत्यक्ष कृती करण्याच्या वेळी त्यांचा निर्णय वेगळाच दिसून येतो.

कार्लमार्क्सने श्रमिकांबद्दलची भूमिका मांडताना अखिल स्त्रीवर्गाला वगळलेले दिसून येते. कामगारांमध्ये फक्त पुरुषच कामगार असेल, असे गृहीत धरून मांडलेले विचार एकाकी स्वरूपाचे आहेत. आर्थिक सिद्धांतापासून भारतीय ‘स्त्री’ विषयक सामाजिक सिद्धांतांना वेगळे करता येणार नाही. एका मर्यादेपर्यंत वेतन व नफा यांचा, श्रमिक व कारखानदार ह्यांचा आर्थिक प्रश्न म्हणून विचार करता येतो. परंतु मालक आणि मजूरवर्गाबाबत विचार करताना भारतातील समाजजीवनात अस्तित्वात असणाऱ्या स्त्री वर्गाचा विचार करून शास्त्रीय दृष्टिकोन मांडायला हवे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे कर्मवीर दादासाहेब गायकवाडह्यांना दलित व श्रमिकांच्या रखरखीत जीवनासंबंधी व त्यांच्या ज्वलंत प्रश्नांबाबत विशेष आस्था व तळमळ होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कोणतीही चर्चा दूरदृष्टी राखून करीत असत. शांतपणे गांभीर्याने विचार करूनच त्यांनी दादासाहेब गायकवाड ह्यांच्याशी विचार विनिमय करून दलित व श्रमिकांच्या प्रश्नांसंबंधी विचार व्यक्त केले.

**४.५भारतीय स्त्री आणि समन्वयी विचार :**

भारतातील स्त्रियांबद्दलची मानसिकता वेगळ्याच प्रकारची असलेली दिसून येते. कारण मार्क्सवादामध्ये स्त्री प्रश्नांची चर्चा केली नाही आंबेडकरवादी विचारसरणीमध्ये जात आणि स्त्री-शोषण ह्यांचा संबंध जोडला समन्वयवादामध्ये स्त्री प्रश्नाची तसेच जातिप्रश्नाची शोषणाची एकत्रित चर्चा केली जाते. ह्यावरून फक्त मार्क्सवाद किंवा फक्त आंबेडकरवाद अशी चर्चा स्त्री प्रश्नाबाबत न करता समन्वयी भूमिकेतून स्त्री प्रश्नाकडे पाहिले गेले तर स्त्रियांच्या मान, सन्मान, प्रतिष्ठा, शोषण ह्यांसारख्या अनेक समस्यांवर उपाय शोधणे सोपे जाईल. उदा. स्त्रीवर बलात्कार होणे ह्या मागची मानसिकता काय? केवळ गरीब आहे म्हणून तिच्यावर बलात्कार होतो एवढेच कारण वरवरचे दिसून येत असले तरी बलात्कारी महिला गरीब का आहे? ह्याचा विचार तत्त्वप्रणालीने केला पाहिजे. मार्क्सवादाने भारतातील स्त्री गरीब आहे एवढाच विचार केला. परंतु गरिबीची कारणे कोणती आहेत? हे आंबेडकरवादाला महत्त्वाचे वाटते. दलित असून शेतावर

काम करायला येत नाही ह्याचा अभ्यास आंबेडकरवाद करेल, मार्क्सवाद तेथे अपुरा पडेल. म्हणजेच शेतावर काम करायला नकार देणे ही एक स्वतंत्रपणे निर्णय घेण्याची मानसिकता दिसून येते. भारतीय समाज तर अगोदरच वर्गीय बनलेला आहे. जातीचा प्रश्न मानसिक स्वरूपाचा आहे. मार्क्सवादाच्या मते भारतात वर्ग हे जातीच्या स्वरूपात दिसून येतात. परंतु वस्तुस्थिती मात्र अशी आहे की, जात वेगळी आणि वर्ग वेगळा असे स्वरूप दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जातीने श्रमाचे व श्रमिकांचे विभाजन केले आहे. जातीची दृष्टी कामगारवर्गाला लावली गेली. संपूर्ण कामगारआणि दलित कामगार अशी कामावरून विभागणी झाली. मार्क्सवादाच्या मते वरील संदर्भीय समस्या कामगारांच्या आहेत. भारतीय स्त्री कामगारांच्या नाहीत. महिलांचे प्रश्न वेगळे नसतात. महिलांच्या प्रश्नांची मांडणी स्वतंत्र नसते आणि औद्योगिकीकरणानंतर महिलांचे प्रश्न आपोआपच सुटतील,असा मार्क्सवादी दृष्टिकोन आहे. मार्क्सवादाने स्त्री प्रश्न, जाती अत्याचार हे प्रश्न घेतलेच नाहीत. ह्याउलट आंबेडकरवादाने गुलामीत असलेल्या स्त्रियांच्या सर्व प्रश्नांकडे सर्व बाजूंनी चिकित्सक पद्धतीने अवलोकन केले. भारतातील मार्क्सवादी दृष्टिकोन समजून घेण्यासाठी आंबेडकरवादी भूमिकांचे अवलोकन करणे महत्त्वाचे ठरते. उत्पादन व्यवस्थेत कोणते व्यवसाय कोणी करावेत, कोणते प्रश्न कशाच्या आधारावर सोडविता येतील, हे ही पाहणे आवश्यक आहे. स्त्री प्रश्नाची समस्यांची सोडवणूक करण्यासाठी क्रांतीचा मार्ग स्वीकारावा की प्रबोधनाचा मार्ग स्वीकारावा हा प्रश्न महत्त्वाचा वाटतो. मार्क्सवादी दृष्टिकोनातून स्त्री प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी क्रांतीचा मार्ग किती मर्यादेपर्यंत उपयुक्त आहे किंवा प्रबोधन करून स्त्री समस्यांवर उपाय योजता येतील काय? ह्याचा सर्वांगीण विचार करताना फक्त आंबेडकरवादी भूमिका स्वीकारून चालणार नाही अथवा फक्त मार्क्सवादी भूमिका स्वीकारून चालणार नाही. तर समन्वयी व्यापक दृष्टीने सर्वसमावेशक पद्धतीने विचार, अभ्यास, अवलोकन करून सोडविले जाणे अपेक्षित आहे. नाचणाऱ्या बायांनी आंबेडकरी चळवळीला लोकांसमोर नाचून पैसे मिळवून हातभार लावण्याचा प्रयत्न म्हणजे नैतिक बळ

चळवळीला न मिळाल्या सारखेच आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, मार्क्सवादी तत्त्वज्ञानानुसार केवळ नफ्यासाठी व्यवहार या तत्त्वाला जबरदस्त धक्का बसतो. म्हणूनच अखिल भारतीय स्त्री वर्गाची उन्नती करण्यासाठी समन्वयी विचारसरणी उपयुक्त ठरेल.

**संदर्भटीपा:**


१. कसबे रावसाहेब, 'मानव आणि धर्मचिंतन', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. पृ.क्र.२५२

२. तत्रैव पृ. क्र. ३४८

३. तत्रैव पृ. क्र. ३७३, ३७४

४. पाटील शरद, 'प्रिमिटिव्ह कम्युनिझम मातृसत्ता', स्त्री सत्ता आणि भारतीय समाजवाद, मावळाई प्रकाशन शिरूर, पुणे २०१२

४अ. परदेशी रणजीत, 'सत्यशोधक जागर', विद्रोही विशेषांक, ऑगस्ट २०१३, वर्ष ६वे, अंक ६६वा, पृ.क्र. ४,५

५. पुरोहित नंदकुमार, 'वेश्याव्यवसाय लैंगिक अत्याचारच आहे'. सुगावा प्रकाशन, पुणे, २००५

५अ. पुरोहित नंदकुमार, 'वेश्याव्यवसाय लैंगिक अत्याचारच आहे', सुगावा प्रकाशन, पुणे, २००५

५ब. साळवे शशिकांत, 'आधुनिक कादंबरी आणि मराठी लेखिका', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, २०१०, पृ. क्र. ०५

६. कीर धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र'.

६ अ. कीर धनंजय, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र'.

७. पानसरे गोविंद, 'मार्क्सवादाची तोंडओळख', श्रमिका प्रतिष्ठान कोल्हापून, २०१२, पृ.क्र. ०९

८. चौसाळकर अशोक, 'मार्क्सवाद-उत्तर मार्क्सवाद', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०१०, पृ.क्र. ३१, ३२, ३३

९. कारखानीस सरला, ‘मार्क्स-एंगेल्स-लेनिन यांचे भारतावरील लेख’, लोकवाङ्मय गृह मुंबई, पृ.क्र. १५

९अ. कार्ल मार्क्स व एंगेल्स, ह्यांचे निवडक लेख संग्रह (इंग्रजी) खंड १, मास्को, १९६९,

१०. कार्ल मार्क्स व एंगेल्स, ह्यांचे निवडक लेख संग्रह (इंग्रजी) खंड १, मास्को, १९६९, पृ.क्र. ४९८ ते ४९३

११. चौसाळकर अशोक, ‘मार्क्सवाद-उत्तर मार्क्सवाद’, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०१०, पृ.क्र. ३९

११अ. डी.डी. कोसंबी, ‘मंथली रिव्हू.’, १९५४

११ब. Kosambi D.D., The culture of civilaztion of ancient India in historical outline.

१२. Dr. Babasaheb Ambedkar, ‘Rise and Fall of Hindu Women’ Mahabodhi Calakatta, 2003, P.No. 18.

१३. डाहाटधनराज, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार खंड - १ स्त्री’, संकेत प्रकाशन नागपूर, डिसेंबर २०११, संपादकीमधून.

१४. परदेशी प्रतिमा, ‘ललितधारा’.

१५. भाषणे (आंबेडकर)

१६. डाहाट धनराज, ‘डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार खंड - १ स्त्री’, संकेत प्रकाशन नागपूर, डिसेंबर २०११, संपादकीमधून.

१७. सबाणे अरुणा (संपा.), ‘बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्री मुक्ती चळवळ’, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, २००७

१८. जोशी शरद, 'स्त्रियांचा प्रश्न: आम्ही मरावं किती?', दै लोकसत्ता वृत्तपत्र, दि. २०/२/२०१३, पृ.क्र. ७

१९. डॉ. आंबेडकर बाबासाहेब, 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती'.

२०. देहाडराय स्वाती व अनघा तांबे, 'भारतातील स्त्रिया एक ओळख', क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ पुणे, मार्च २००९, पृ.क्र. ११

२१. प्रति अहवाल, राष्ट्रीय महिला सबलीकरण धोरण, २००१

२२. आंबेडकर बाबासाहेब, 'हिंदू स्त्रियांची उन्नती आणि अवनती'.

## प्रकरण पाचवे

# मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांच्या दृष्टिकोनातून रोजगारविषयक प्रश्नांची चर्चा

५.० प्रस्तावना

५.१ रोजगार संकल्पना व पार्श्वभूमी

५.२ युरोपीय व भारतीय रोजगार स्थितीची चर्चा

५.३ मार्क्सवाद आणि रोजगार

५.४ कार्ल मार्क्सने श्रमिकांच्या शोषणाबद्दल केलेली मांडणी व विश्लेषण

५.५ आंबेडकरवाद आणि रोजगार

५.६ मार्क्स-आंबेडकर समन्वयीविचारांच्या दृष्टिकोनातून रोजगारविषयक प्रश्नांची चर्चा

प्रकरण पाचवे

# मार्क्स-आंबेडकर समन्वयीविचारांच्या दृष्टिकोनातून रोजगारविषयक प्रश्नांची चर्चा

## ५.० प्रस्तावना :

उत्पादन प्रक्रियेतील घटकांपैकी कामगार ह्या सजीव घटकाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. कामगाराला आपले श्रम विकून त्याचा मोबदला मिळतो. हा मोबदला देताना. कारखानदारांचा उद्देश सहानुभूतीचा नाही, कारण त्यांचे नफा हे उद्दिष्ट असते. कामगारांचा जीवनस्तर उंचावण्यासाठी कामगार चळवळी निर्माण झाल्या. कामगार चळवळींकडे संप हे हत्यार अतिमहत्त्वाचे आहे. संप करून आपला उद्देश ह्या चळवळींनी साध्य करून घ्यावा तसेच राजकीय सत्ता मिळविण्याचा सातत्याने प्रयत्न करावा, हा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. ज्या कामगार चळवळी सत्ता मिळविण्यास नकार दर्शवितात त्या चळवळी भांडवलशाहीला पोषकअसतात.

मुक्त व्यापारी धोरण आणि कामगार चळवळ, जागतिक भांडवलशाही आणि कामगार ह्या दोन्ही मुद्यांच्या विश्लेषणाबरोबरच भारतातील जाती आणि कामगार संघटना, नववसाहतवाद आणि कामगारांची पिळवणूक ह्या सर्व मुद्यांची शास्त्रीय चिकित्सा करणे आवश्यक वाटते.

कार्ल मार्क्सने कामगार म्हणून 'स्त्री'ची दखल घेतली नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगारांचा एक वर्ग मानला आहे. ह्या वर्गाला आपल्या समस्या सोडविण्यासाठी सातत्याने संघर्ष करावा लागत आहे. ह्यावर उपाय म्हणून कार्ल मार्क्सने कामगार क्रांतीचा सिद्धांत मांडला

आहे. अंतिमत: कार्ल मार्क्सने मानवी अधिकारांशी जोडणारा लढा उभा केला आहे. परंतु साम्यवादी विचारसरणीने 'संप'ह्या साधनास विरोध केला आहे.

आंबेडकरवादाने कामगारांमध्ये लिंगभावाचा विचार केलेला आहे. स्त्रियांच्या शोषणाविषयी तसेच अस्पृश्य कामगारांच्या समस्यांविषयी विश्लेषण केलेले आहे. त्यामुळे मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारातून दोन्ही चळवळींचा संयोग होऊन रोजगाराबाबत ठोस धोरण ठरविता येते.

## ५.१ रोजगार संकल्पना व पार्श्वभूमी :

कारखान्यात कोणत्याही प्रकारची वस्तूचे उत्पादन करण्यासाठी भूमी, श्रम, भांडवल व संयोजन ह्या उत्पादन घटकांची आवश्यकता लागते. कार्ल मार्क्सने श्रम किंवा रोजगार विषयक तत्त्वज्ञानाचीमांडणीकेली. "केवळ शारीरिक कष्ट म्हणजे श्रम नव्हे तर अर्थार्जन करण्याच्या उद्देशाने केलेले शारीरिक, बौद्धिक किंवा मानसिक श्रम/कष्ट म्हणजे श्रम होय." भारतापुढील अनेक समस्यांपैकी रोजगारविषयक समस्या अत्यंत वादग्रस्त ठरत चालली आहे. भारतात आणि भारताबाहेर ह्या समस्येवर उपाययोजना करण्यात आल्या. त्यासाठी वैश्विक पातळीवर कार्ल मार्क्सने निश्चित असे सिद्धांत मांडणी व विविध कार्यक्रमांची आखणी करून त्यांची अंमलबजावणी केली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर ही समस्या कमी होण्यास मदत झाली. परंतु संपूर्णत: उपाययोजना होऊ शकली नाही.

जागतिक स्तरावर स्वीकारलेल्या भांडवलशाहीमुळे श्रमिकांचे शोषण होते. मुक्त आर्थिक धोरण स्वीकारल्यामुळे भारतासारख्या देशांचा विकास झाला नाही. त्याऐवजी विकसित देशांचा फायदा झाला. नववसाहतवादी धोरणामुळे कामगार वर्गावर दुष्परिणाम झाला आहे. ह्या सर्व धोरणांचा भारतीय समाजजीवनावर मोठा परिणाम झालेला आहे. कार्ल मार्क्सने रोजगारांविषयी सिद्धांत मांडणी करताना वर्गव्यवस्था ही सामाजिक प्रश्नांच्या मुळाशी कायम असते. अशी मांडणी केली आणि आंबेडकरवादाने रोजगाराला लिंगभेदाचा आणि जातिभेदाचा संदर्भ दिला.

सामाजिक स्थित्यंतर करण्याकरिता मार्क्स वर्गविरहित आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जातविरहित समाज रचनेची आवश्यकता सांगतात. श्रमविभागणीमुळे कामगार वर्गात मार्क्सवादी विचारांनुसार परात्मभाव निर्माण होतो, तर आंबेडकरवादी विचारसरणीनुसार 'माणूस' विभागला जातो.

संघटित कामगार आणि असंघटित कामगारांच्या समस्यांमध्ये मोठा फरक दिसून येतो. अगदी तसाच फरक ग्रामीण आणि शहरी कामगार ह्यांच्यामध्येही दिसतो. औद्योगिकीकरणामुळे कारखान्यांची संख्या वाढली. शहरात कामगारांच्या वस्त्या निर्माण होऊ लागल्या. कारखानदारांना कमी मोबदला देऊन मोठ्या प्रमाणात मजूर वर्ग उपलब्ध होऊ लागला. आंबेडकरवाद ह्या परिस्थितीकडे सामाजिक हेतूने पाहतो. त्यांच्या मते शहरीकरणामुळे कामगारांमध्ये असणारी जातीयता संपण्यास मदत झाली. समाज संक्रमित झाल्याने सामाजिक अभिसरणाची क्रिया वेगाने झाली.

भारतीय अर्थव्यवस्था ग्रामिण आणि शहरी भागावर एकसारखा परिणाम करत नाही. भारतामध्ये आर्थिक लढा आणि जातीचा लढा जोपर्यंत एकत्र लढला जात नाही, तोपर्यंत ही समस्या कायमस्वरूपी सुटणार नाही. चंगळवाद ही एक गंभीर समस्या असून ती भांडवलशाही श्रमिकांच्या प्रश्नांबाबत उदासीन आहे. मार्क्सवाद मात्र दावा करतो की, कामगार क्रांतीनंतर रोजगारासंबंधी महिलांबरोबरच इतर घटकांचेही प्रश्न आपोआपच सुटतील.

### ५.२ युरोपिय व भारतीय रोजगार स्थितीची चर्चा :

युरोपिय देशात १८४८ मध्ये मोठ्या प्रमाणात क्रांत्या झाल्या होत्या. त्यात कामगार वर्गांनी मोठ्या प्रमाणात वाटा उचलला होता. ह्यावेळी कामगारांनी भांडवली समाजाला मान्य न होणाऱ्या मागण्या मांडल्या. परिणामी कामगारांचे बंड मोडून काढले व कामगारांना ह्या सर्व प्रकाराची मोठी किंमत मोजावीलागली होती. त्यांचेबंड मोडून काढले. औद्योगिक क्रांतीमुळे मोठा

कामगार वर्ग निर्माण झाला होता. त्यांची शक्ती वाढू लागली. १८ व्या शतकाच्या सुरुवातीला कामगारांनी एकत्र येऊन आपली संघटना बांधू नये, यासाठी भांडवलदारांचा दबाव वाढत चालला होता. फ्रेंच राज्यक्रांतीनंतरच्या कालखंडात भांडवलदार वर्गाचे तसेच जमीनदार वर्गाचे वर्चस्व वाढले. युरोपमध्ये अनियंत्रित राज्यसत्तेच्या काळात कामगारांवरील अन्यायात सातत्याने वाढ झाली. त्याच वेळी धनिक मध्यम वर्गाने ह्या परिस्थितीत हार पत्करली होती.

युरोपातील औद्योगिकीकरण डोळ्यासमोर ठेवून कार्ल मार्क्सने वर्गाबाबतचे विश्लेषण केले आहे. सिद्धांताचे प्रत्यक्षिकरण मात्र लेनिन माओ यांनी केले होते. युरोपातील कामगारवर्गाला वर्गीय जाणीव सर्वप्रथम कार्ल मार्क्सने करून दिली. मार्क्सचे संपूर्ण सिद्धांत मांडणी युरोपातील कामगार ह्या घटकाला समोर ठेवूनच झाली राजकारणावरही प्रभाव गाजविण्यासाठी कामगारवर्गाची हुकूमशाही तो मान्य करतो. क्रांतीवहन करणारा वर्ग म्हणजे कामगार वर्ग होय. क्रांती घडविणारा घटकच शेवटच्या टप्प्यात वर्ग जाणिवा सोडून देईल असा सिद्धांत कार्ल मार्क्स मांडतो. कार्ल मार्क्सने परात्मभाव, वर्ग संघर्ष, भौतिकवादी विश्लेषण, क्रांतीची भूमिका आणि इतरही सर्व संकल्पना युरोपची रोजगार स्थिती समोर ठेवूनच विकसित केली आहे.

कार्ल मार्क्सने कामगार आणि कारखानदार ह्या वर्गांना केंद्रिभूत मानून जे विचार विकसित केले ते युरोपीय देशांमध्ये काहीप्रमाणात यशस्वी झाले असे म्हटले जात असले तरी कामगारांचे शोषण पूर्णत: थांबलेले नाही. फक्त संघर्षाचे स्वरूप बदललेले आहे. पाश्चिमात्य देशांना गृहीत धरून मार्क्स, एंजेल्स ह्यांनी जागतिक इतिहासाचे कोडे उलगडविण्याचा प्रयत्न केला. भारताच्या दृष्टीनेही मार्क्सने इंग्लंडमध्ये राहून अमेरिकेच्या ‘न्युयॉर्क डेली टिब्यून’ मध्ये लिखाण केले.

युरोपीय गटाच्या सर्वच सदस्य देशांमध्ये कामगार वर्गाचे शोषण कशा प्रकारे होते, हे दाखविले ह्या देशांमध्ये भांडवलशाही व्यवस्था मोठ्या प्रमाणात स्वीकारली. असून मागास देशांतून कच्चा माल विकत घेण्याची स्पर्धा निर्माण झाली. नववसाहतवादी धोरणामुळे कामगार

वर्गावर दृष्परिणाम झाला. शोषणाच्या आणि विषमतेच्या परिस्थितीमध्ये कार्ल मार्क्स, एंजल्स, लेनिन, माओ इत्यादींच्या वैचारिक आणि कृतिशील योगदानामुळे मजूरवर्ग आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा आजही प्रयत्न करत आहे.

कार्ल मार्क्सने श्रमिक जनतेच्या शोषणाचा प्रश्न हाती घेऊन्न तत्कालीन सरकारच्या विरोधात कामगार वर्गाला क्रांतीस प्रवृत्त केले. यासाठी मार्क्सने युरोपातील देशांबरोबरच इतरही देशांच्या समाजव्यवस्थेची जोपासणी केल्याचा संदर्भ आला आहे. युरोपीयन देशांमध्ये क्रांती होऊन्नही हाप्रश्न मोठा तीव्र झाला आहे. सोविएत रशियात १९९१ मध्ये मिखाईल गोर्बाचेव्ह अध्यक्ष असताना मोठी क्रांती झाली. 'पेरेस्त्रोईका' आणि 'ग्लास्तनोस्त'ह्या धोरणांमुळे देशाचे विघटन झाले. ह्याचा अर्थ आपणास साम्यवाद संपला असा घेता येत नाही.

श्रमिक एक मानवी घटक आहे. माणूस म्हणून त्याचा विचार होणे क्रमप्राप्त आहे. कार्ल मार्क्स हा मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता कारण दास कॅपिटलमध्ये तिसऱ्या खंडात ह्याबाबतचे विश्लेषण व मूल्यमापन केलेले दिसून येते. भारतामध्ये मानवतावादी हेतूने कामगारांच्या चळवळींनी त्यांचे प्रश्न घेतले होते. कार्ल मार्क्सच्या दृष्टिकोनातून दैनंदिन चळवळीतून हुकूमशाहीची संकल्पना मार्क्स मांडतो तो म्हणतो उत्पादन पद्धतीमधून वर्ग निर्माण होतात. वर्ग संघर्षाला मार्क्स अनिवार्य मानतो. परंतु दुसऱ्या बाजूला सामाजिक स्थित्यंतराकरिता वर्गविहीन समाजरचना आवश्यक आहे. कामगार वर्गाकडे सत्ता जाऊन्न कामगार वर्गाची निर्णय सत्ता निर्माण होऊन्न देशात त्यांच्याच हिताचे कायदे निर्मिती होईल.

मार्क्सने सिद्धांत प्रस्तुत करताना वर्गीय जाणीव निर्माण करून देण्याच्या अवस्थेचा विचार करावा लागतो. कामगाराला वर्गाची जाणीव करून देण्यासाठी तो कामगाराला राजकीय सत्ता हाती घ्यायला भाग पाडतो. लेनिनने मार्क्सच्या सिद्धांताची अंमलबजावणी करताना जसा अर्थ लावून घेतला, तशी आशियातील भारतात आर्थिक परिस्थितीचा विचार केला तर रोजगार

निर्मितीही शेती क्षेत्रात जास्त प्रमाणात होऊ शकते, म्हणजे भारताच्या संदर्भात औद्योगिक कामगारआणि शेतमजूर असा फरकही लक्षात घेता येतो.

भारतात मजूर वर्गाचे शत्रू कोण आहे, ह्याचे आकलन व्यवस्थित झालेले नाही. एका बाजूला भारतातील मजूर वर्गाला आपल शत्रू ओळखता आले नाही. भारतातील भाकप आणि माकप ह्यांनाही तो उलगडा झाला नाही. भांडवलशाहीमध्ये जात, उच्चभ्रू वर्ग ह्यांपैकी नेमका शत्रू कोण आहे? हे भारतातील मार्क्सवाद्यांना ओळखता आले नाही. जातिव्यवस्था समजून घेतली नाही. युरोपात फक्त श्रीमंत-गरीब हा लढा होता. मात्र भारतात हा लढा जाती संदर्भात उभा करावा लागतो. इथला कामगार जात, धर्म या संस्थांमध्ये इतका अडकून पडला की, त्याला औद्योगिक भांडवलशाही विरुद्ध लढण्यासाठी मार्ग सापडत नाही.

भारतातील कामगाराला भांडायचे कोणाशी हे प्राथम्याने ठरवावे लागते.जात आणि वर्ग ह्या दोन्हींमध्ये वर्गीय व्यवस्था दिसते. ह्यांची सांगड प्रभावीपणे घालण्यासाठी निश्चित यंत्रणा उभी राहिलेली नाही. संघटित क्षेत्रात सुद्धा हिंदूत्ववादी, मुस्लीमवादी आणि इतर सर्व धर्मियांनी आपापल्या विचारांना निश्चित असे स्थान देण्याचा प्रयत्न केला आहे, ह्यावरून कार्ल मार्क्सवर भारतात अशीही टीका केली की, कार्ल मार्क्सने भारतातील जातिव्यवस्थेचा विचार केलेला नाही. ह्या सर्वपरिस्थितीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'राज्यसमाजवाद' हा उपाय सुचवितात.

### ५.३ मार्क्सवाद आणि रोजगार :

मार्क्सवादी विचारांमुळे सोविएत रशिया व इतर देशांमध्ये क्रांती झाली. भारतावरही मार्क्सवादी विचारांचा प्रभाव आहे. त्यांच्या विचारांचा मोठा वर्ग भारतात आहे. तरी जनतेचे शोषण मात्र पूर्णत: थांबलेले दिसून येत नाही. जागतिकीकरणात व भांडवलशाहीशी सुरू असलेल्या संघर्षाचे स्वरूप बदलत गेले. भारताबरोबरच इतर देशांमध्येही ह्या संघर्षास नवे रूप मिळाले. हे नवे स्वरूप समजून घेण्यासाठी कार्ल मार्क्स, एंगल्स व लेनिन ह्यांचे विचार आणि

दृष्टिकोन समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्यांनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानामुळे प्रचंडक्रांती झाली. मार्क्स व एंगल्सने जागतिक इतिहासाच्या विकासाचे कोडे उलगडविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पाश्चिमात्त्य देशांचा अभ्यास करून त्यांनी आपले तत्त्वज्ञान विकसित केले आहे.त्यांनी ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत अखिल मानव जातीचा विकास आदिम, गुलामगिरी, सरंजामशाही व भांडवलशाही ह्या अवस्थांतून झाला, हे स्पष्ट केले. आंतरराष्ट्रीय पातळीवरील वर्ग समजून घेण्यासाठी कार्ल मार्क्स ह्यांनी मांडलेल्या विचारांची चर्चा होणे आवश्यक ठरते.

१८५७-६७ ह्या काळात कार्ल-मार्क्सने भारताचा अभ्यास करून अमेरिकेच्या न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून ह्या होरॅस ग्रिली ह्यांनी संपादित केलेल्या वर्तमानपत्रातून जे लिखाण केले ते भारताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. जागतिक इतिहास अभ्यासताना युरोप हा मार्क्सच्या दृष्टीने महत्त्वाचा होता. त्याने युरोपीय इतिहासाच्या आधारावर ऐतिहासिक नियम विकसित केले. मार्क्सवाद आणि रोजगार ह्याविषयीचे विश्लेषण करताना युरोपमधील घडामोडींचे विश्लेषण करणे अत्यंत महत्त्वाचे मानले.

जागतिक भांडवलशाहीमुळे कामगार वर्गाचे शोषण होते, हे मार्क्सने दाखवून दिले आहे. मुक्त व्यापारी धोरणामुळे विकसित देशांचा फायदा होतो आणि गरीब देशांचे नुकसान होते. विकसित देशांकडे जास्त संपत्ती असल्याने गरिबी व विषमता वाढत जाते. ह्यातून भांडवलशाही व्यवस्था मोठ्या प्रमाणात विकसित होताना दिसते. भांडवलशाही व्यवस्थेमध्ये कामगार वर्गाचे नुकसान होते. मागास देशांतून कच्चा माल विकत घेण्याची स्पर्धा श्रीमंत व भांडवलशाही देशांमध्ये दिसते. ह्यातून नववसाहतवाद निर्माण झालेला दिसतो. ह्या नववसाहतवादी धोरणामुळे कामगार वर्गावर दुष्परिणाम झाला. त्यांच्यावरील अन्याय वाढला. कामगारांची पिळवणूक वाढली. कामगारांविरुद्ध तसेच गरीब देशांविरुद्ध बळाचा वापरही मोठ्या प्रमाणात वाढला. ह्या शोषणाच्या व विषमतेच्या व्यवस्थेत मजूर वर्गाने आपले अस्तित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात फारसे यश आल्याचे दिसून येत नाही. कारण कार्ल मार्क्स, लेनिन, एंगल्स इत्यादी

विचारवंतांनी कामगारांबाबतचे मांडलेले विचार ह्यादृष्टीने उपयुक्त आहेत. ह्या सर्व परिस्थितीचा संबंध जोडून कामगार वर्गाची विशेषत: भारतातील कामगार वर्गाची स्थिती काय आहे ह्याबाबतचे विश्लेषण सरला कारखानीस ह्यांनी केले आहे. भांडवली व्यवस्थेची शास्त्रीय चिकित्सा करण्यासाठी तसेच भांडवलशाही विरुद्ध संघर्षाचे राजकारण करण्यासाठी मार्क्सवाद उदयास आलेला आहे.[३]

कार्ल मार्क्सला त्याच्या तरुणपणीच जर्मनीतून हद्दपार करण्यात आले होते. कारण सरकारच्या विरोधात लोकशाही स्वातंत्र्यासाठी चाललेल्या संघर्षात मार्क्स सामील झाला होता. त्यामुळे मार्क्सला शिक्षाही झाली. मार्क्सवादामध्ये लोकशाहीचा प्रश्न,श्रमिक जनतेच्या शोषणाचा प्रश्न, स्त्रियांच्या अधिकारांचा प्रश्न आणि साम्राज्यवादाचा प्रश्न ह्या प्रश्नांच्या निकषावर मार्क्सवादाने जगातील अनेक देश व तेथील समाजव्यवस्थेची तपासणी केली.[४]श्रमिकांच्या पिळवणुकी विरुद्ध मार्क्सने जगभर संघर्ष केला. असे असूनही श्रमिकांच्या पिळवणुकीचा प्रश्न सुटलेला नाही. भांडवलशाही राष्ट्रांमध्ये तो उलट प्रखरतेने जाणवू लागला आहे. मार्क्सवादी सिद्धांतामध्ये काळानुसार वेगवेगळे बदल होत गेले. मार्क्सवादाच्या प्रभावामुळेअनेक देशात कम्युनिस्ट चळवळी निर्माण झाल्या. ह्या चळवळींमुळे कामगारांच्यासमस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्यात आला. एकूणच कम्युनिस्ट चळवळ आणि दबावामुळे भारत युरोपशी जोडला गेला असेही म्हटले जाते.

‘क्रिटिक ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी’ ह्शा ग्रंथात कार्ल मार्क्सने स्पष्टपणे समाजाचे विश्लेषण केले की, मानवी जीवनाचे सर्वात मूलभूत प्रश्न त्या-त्या समाजाच्या आर्थिक रचनेतूनच सुरू होत असतात आणि उत्पादनाच्या व्यवस्थेत होणाऱ्या बदलांचीही शास्त्रीय पद्धतीने नोंद घेत मोजमाप केले ह्यामुळे माणूस आपल्या प्रश्नाचे उत्तर शोधत असताना त्याला संघर्ष करावा लागतो. युरोपीय कामगारांना चळवळ उभी करताना मार्क्सवादीविचारापासून

चालना मिळाली. १८४८ मध्ये प्रकाशित झालेल्या कार्ल मार्क्सच्या ‘कम्युनिस्ट मेनिफेस्टो’ मध्ये अशाच प्रकारची जग बदलण्याची ताकद होती. ह्यानंतर १८६७ मध्ये कार्लमार्क्सचा ‘दास कॅपिटल’ हा ग्रंथ प्रकाशित झाला. त्यामुळे कामगार वर्गाला क्रांती करण्यासाठी शास्त्रीय स्वरूपाचा पाया मिळाला.

‘दास कॅपिटल’ मधील विश्लेषण भांडवलशाही आणि कामगार क्रांती बद्दल अत्यंत महत्त्वाचे आहे. भांडवलशाहीचा विकास होत असताना कामगारांना काय स्थान आहे, त्यांनी क्रांती कशी करावी, ह्याबद्दलचे समग्र विश्लेषण सैद्धांतिक दृष्टिकोनातून मांडलेले आहे.

कार्ल मार्क्स हा इतिहास आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यासक होता. त्यामुळे मार्क्सने इतिहासाचे विश्लेषण करताना शास्त्रीय दृष्टिकोनाचा आधार घेतला. वर्गव्यवस्था ही सामाजिक प्रश्नांच्या मुळाशी कायम असते. कामगारांच्या पिळवणुकीकडे ऐतिहासिक अर्थव्यवस्थेतील आपले स्थान ओळखावे,ह्यासाठी कार्ल मार्क्स कामगारांच्या प्रश्नांसाठी राजकीय बाजूकडे वळला. कामगारांच्या आणि कामगार संघटनांच्या बरोबर त्यांचा संपर्क आल्याने त्याचे कामगार ह्या वर्गाबद्दलचे तत्त्वज्ञान अधिक घट्ट झाले.

## ५.४ कार्ल मार्क्सने श्रमिकांच्या शोषणाबद्दल केलेली मांडणी व विश्लेषण:

“जिवंत माणसांच्या अंगची शारीरिक व मानसिक कुवत म्हणजे श्रमशक्ती” अशी व्याख्या मार्क्सने आपल्या ‘दास कॅपिटल’ मध्ये केली आहे. ही श्रमशक्ती श्रमिक दुसऱ्याला देऊ शकत नाही. भांडवलदार कारखान्यातून उत्पादन करण्यासाठी कामगारांच्या श्रमशक्तीचा पुरेपूर वापर करून घेतो. म्हणजेच कामगाराकडून तो श्रमशक्ती विकत घेतो. कामगारांनी कारखानदारांना त्याच्याकडे असणारी श्रमशक्ती दिल्याने त्यांच्याकडील श्रमशक्ती नष्ट होते. ती कोणत्याही परिस्थितीत साठवून ठेवता येत नाही. ह्याचाच गैरफायदा भांडवलदार वर्ग घेतो. ती श्रमशक्ती

साठवता न आल्यामुळे कामगार कमी किंमतीलाही भांडवलदारांना विकतो. म्हणजेच भांडवलदार कामगारांकडून कमीतकमी मोबदल्यात जास्तीत जास्त श्रमशक्ती विकत घेतात. ह्या ऐतिहासिक संबंधाचा परिणाम भांडवलशाही-कामगार वर्ग ह्यांच्या संबंधावर होतो. ह्यातून कामगार वर्गाची पिळवणूक सुरू होते. ह्यापिळवणुकीला मर्यादा घालण्यासाठी लढ्याचा मार्ग स्वीकारला जातो. ह्या संघर्षात भांडवलदार आणि कामगार या दोघांचेही उद्दिष्ट वेगवेगळे असते. कामगार त्याला जगण्यासाठी एक माणूस म्हणून काही अधिकारांची मागणी करतो आणि आपले जीवन जगण्यासाठी व सुयोग्य पद्धतीने साकारण्यासाठी काही आवश्यक निकष लावतो. म्हणजेच हक्काच्या दृष्टिकोनातून तो कामाचे तास ठरवून घेतो आणि त्याच्या जगण्याला मानवी माप लावण्यासाठी आग्रह धरतो. याउलट भांडवलदार वर्ग कामगारांना कमीतकमी अधिकार देऊन त्यांच्या बाबतीत मानवी दृष्टिकोनातून विचार करण्याऐवजी संकुचित दृष्टीने विचार करतो. ह्यामुळेच कारखानदार आणि कामगार ह्यांच्यात संघर्षाची ठिणगी पडते. 'दास कॅपिटल' मध्ये कामगारांच्या हिताबद्दल मार्क्स विशिष्ट दृष्टिकोन निर्माण करतो. मार्क्सने कामगारांच्या हितावर लक्ष दिल्याने, त्याच्या कसोटीवर विचार उभा केल्यामुळे त्याचा मानवतावाद संकुचित होतो. ह्याबाबतचे विश्लेषण करताना टीकाकारांचा मानवतावाद आणि मार्क्सचा मानवतावाद ह्यांतील फरक आपोआपच समजून येतो. मार्क्सच्या दृष्टिकोनातून आपल्या दैनंदिन चळवळीतून देखील कामगार वर्ग सर्वसाधारण मानवी हिताचाच लढा पुढे नेतो. कार्ल मार्क्सचा लढा हा एका अर्थाने वैज्ञानिकतेवरआधारलेला आहे. ह्याबरोबरच तो लढा मानवी अधिकारांशी जोडणारा लढा आहे.

कार्ल मार्क्सने 'दास कॅपिटल' च्या तिसऱ्या खंडात मानवी स्वातंत्र्याविषयी विश्लेषण केले आहे. मार्क्स हा मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता म्हणूनच तो श्रमिकांचा एक माणूस म्हणून विचार करत होता. माणसाला अधिक स्वातंत्र्य दिल्याने त्याचे मनुष्यत्व अधिक चांगल्या पद्धतीने सिद्ध करता येते. आणि हेच त्याच्या जीवनाचे उद्दिष्ट असते. अर्थात टीकाकारांच्या मते, मार्क्सचे नैसर्गिक अधिकार हे काल्पनिक आहेत, त्यामुळेच ह्याअधिकारांची अंमलबजावणीही होऊ शकत

नाही. उदारमतवादी, लोकशाहीवादी अभ्यासकांनी केलेली मांडणी आणि आदर्शवादी अभ्यासकांची मांडणी ह्यामध्ये उदारमतवादी व्यवस्थेत तिच्या वर्गीय संबंधामुळे मानवी अधिकारांचा लोकांना उपभोग घेता येत नाही. ह्याउलट समाजात निर्माण झालेले कायदे व राज्याची विविध रूपे आदर्शवादी अभ्यासकांच्या मते, माणसाच्या मनात निर्माण झालेल्या कल्पनांची निष्पत्ती मांडता येत नाही. कारण हे कायदे व राजकीय विचार विशिष्ट अशा सामाजिक व आर्थिक परिस्थितीमधून निर्माण होत असतात. अशा स्वरूपाचा आंतरविरोध दिसून येतो. ह्यावर उपाय म्हणून "कामगार वर्गाच्या हुकूमशाहीची" आवश्यकता आहे काय? ह्याबाबत मार्क्सचा दृष्टिकोन महत्त्वाचा आहे. त्यांच्यामते समाजातील उत्पादन पद्धतीमधून वर्ग निर्माण होतात. वर्गसंघर्ष हे अनिवार्य आहे. परंतु पुढे सामाजिक स्थित्यंतर करण्याकरिता वर्गविहीन समाजरचनेची आवश्यकता आहे. वर्गसंबंधाच्या इतिहासाचे विश्लेषण करताना मार्क्सने भौतिकवादीमीमांसा केली आहे. गुलामगिरी, संरजामशाही, भांडवलशाही अशा अवस्थांचे वर्णन केले. जसजसा भांडवलशाहीचा विकास होतो तसतसा देशातील कामगारांच्या शोषणात वाढ होते. भांडवलशाहीचे स्वरूप राष्ट्रीय नसून ते आंतरराष्ट्रीय आहे. भांडवलशाहीमधील श्रमविभागणीसुद्धा गुंतागुंतीची बनते. कामगारांच्या मनात परात्मभाव निर्माण होतो. कामगारांना जास्त तास काम करायला लावून त्याचा मोबदला कमीतकमी दिला जातो. ह्यातून विषमता निर्माण होते. भांडवलदार हे अधिक श्रीमंत होतात आणि मजूरवर्ग अधिकाधिक गरीब बनत जातो. भांडवलशाहीच्या विकासाचे स्वरूप स्पष्ट करीत असताना कार्ल मार्क्स असे मत व्यक्त करतो की, भांडवली व्यवस्थेतून मक्तेदारी निर्माण होते. यात राज्याचा हस्तक्षेप अनिवार्य ठरतो. राज्याकडूनही श्रमिकांच्या अधिकारांचे रक्षण होण्याऐवजी भांडवलदार वर्गाच्या हिताकडेच राज्यशासन लक्ष देते. राज्याकडून कायदेनिर्मिती होताना कामगारांच्या हिताऐवजी कारखानदार, भांडवलदार ह्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करणारे कायदे निर्माण केले जातील असे होऊ नये यासाठी कामगारांनी क्रांती करावी व राज्याची सत्ता आपल्याकडे घ्यावी असे झाले तर

कामगारवर्गाच्या हाती राज्याची निर्णयसत्ता येऊन त्यांना अनुकूल असणाऱ्या कायद्याची निर्मिती होईल. ह्यातूनच आर्थिक विषमता कमी होईल, खासगी मालकी रद्द करता येईल, प्रत्येकास कुवतीप्रमाणे काम आणि कामाप्रमाणे दाम ह्या तत्त्वाचे पालन होईल व राज्यात गरीब-श्रीमंत असा भेदभाव नष्ट होऊन समाज एकसमान पातळीवर आणता येईल. असे झाले तर राज्य विरून जाईल व खऱ्या अर्थाने समतावादी समाज निर्माण होईल.

१८४९ मध्ये कार्ल मार्क्स त्याचा मित्र एंगल्स बरोबर इंग्लडला गेला त्यावेळी तेथे कामगारवर्गाची अत्यंत दयनीय स्थिती पाहिली. त्यामुळे कार्ल मार्क्सने कामगारवर्गाबद्दलचा दृष्टिकोन पक्का केला असे काही अभ्यासकांचे मत आहे. औद्योगिक क्रांती झपाट्याने होत असताना खेड्यातील उद्योगधंदे बंद पडून लोकांचा शहराकडे ओघ वाढल चालला होता. अशा स्थितीत सामाजिक, आर्थिक स्वरूपाचे जे प्रश्न निर्माण झालेत त्यावर मार्ग काढण्यासाठी त्यांनी कामगारांची संघटना स्थापन केली. ह्यावरून असे दिसते की, कामगारांवर होणाऱ्या अन्यायाची चीड निर्माण होऊन त्यांच्यावरील होणारा अन्याय दूर करण्यासाठी मानवतेच्या दृष्टिकोनातून त्याने कामगारांच्या हिताकडे लक्ष देऊन आपले विचार विकसित केले. कार्ल मार्क्सने केवळ कामगारांच्या हितासाठी विचार मांडून आपले कार्य थांबविले नाही तर ते विचार प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी जगासमोर एक कार्यकर्ता म्हणून ही आपली ओळख सिद्ध केली. फरक एवढाच की, कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान भारतीय आंबेडकरवादी अभ्यासकांच्या मते भारताला तंतोतंत लावता येणार नाही. कारण कार्ल मार्क्सने वाढत्या औद्योगिकीकरणामुळे समाज गरीब आणि श्रीमंत अशा दोन वर्गात विभाजित होतो असे वर्णन केले, म्हणजेच कार्ल मार्क्सने 'वर्गाची' संकल्पना महत्त्वाची मानली. भारतीय समाजातील सर्वात जास्त प्रभावी ठरणाऱ्या 'जात' ह्या घटकाचा विचार केला नाही. कामगारांबद्दलचे मार्क्सचे विचार वैश्विक पातळीवर कदाचित यशस्वी ही होतील. परंतु भारतीय समाजातील जातीचा विचार करता आज प्रत्येक जातीत वर्गीय व्यवस्था निर्माण झाल्याचे चित्र आपणास स्पष्टपणे दिसते. १८४९ मध्ये मार्क्सने 'वेज लेबर अँड

कॅपिटल’ हे पुस्तक लिहून भांडवलशाहीत कामगारांना कोणकोणत्या संघटनांचा सामना करावा लागतो, हे अधिक सविस्तरपणे स्पष्ट केले आहे.[५] उत्पादन व्यवस्थेवर समाजाचे वर्ग अवलंबून असतात आणि वर्ग संघर्षानंतर श्रमिकांचा विजय निश्चित होतो व ह्यातूनच वर्ग विहीन समाजाची निर्मिती होते,ह्यावर विश्वास व्यक्त केला. त्यांनी कामगार वर्गाच्या हितासाठी, आयुष्यभर लढा उभा केला. तो स्वत: एक पत्रकार असल्याने श्रमिक वर्गाच्या परिस्थितीचे पूर्ण आकलन करून तो भौतिकवादाकडेही वळला. हेगेलच्या विचारांचा व हेगेलच्या ‘फिलॉसॉफी ऑफ राईट’ह्या ग्रंथाच्या प्रभावाखाली येऊन त्यांनी द्वंद्ववाद, भौतिकवाद विकसित केला. त्याच्यामते विरोध विकासवाद हा सर्वत्र आढळून येतो. तो म्हणतो, समाज हा नेहमीच वर्गप्रधान राहिला आहे. दोन वर्गात सतत संघर्ष चालू असतो. कारखानदार (शोषकवर्ग) हा मजुरांची (शोषितवर्ग) सतत पिळवणूक करतो. ह्या दोन्ही वर्गामध्ये सातत्याने संघर्ष होतो आणि शोषितवर्गाची संख्या जास्त मोठी असल्याने शोषकवर्ग नष्ट होतो आणि कारखानदार व कामगार ह्यांतील संघर्ष थांबतो. कार्ल मार्क्सने कामगारांच्या कल्याणाची जबाबदारी भांडवलदाराने उचलावी. कामगारांच्या हितासाठी खर्च करावा. आकस्मिकपणे घडणाऱ्या अपघातासाठी कामगाराला मोबदलाद्यावा. श्रमिकांच्या आरोग्याच्या समस्यांवर उपाययोजना करावी. ह्या सर्व गोष्टींमुळे भांडवलदार कामगारांचा तिरस्कार करतो. अशावेळी कामगार ही संघर्ष करून त्यावर मार्ग काढतो. भांडवलशाहीला विरोध करताना मार्क्स म्हणतो, भांडवलशाहीत काहीही गुण नसतात. भांडवलदार हे श्रमिकांच्या श्रमशक्तीबाबतच्या लाचारीचा फायदा उठवतात आणि ह्याद्वारे मजुरांचे शोषण सुरू ठेवतात. ह्यावर उपाय म्हणून कामगारांची हुकूमशाही निर्माण झाली पाहिजे आणि ती केवळ क्रांतीद्वारेच प्रस्थापित होऊ शकते. ह्यावर मार्क्सने भर दिला आहे. म्हणून कम्युनिस्ट कष्टकऱ्यांचा विचार करतात गरिबांची दु:ख दूर करण्यासाठी झटत असतात. असे म्हटले जाते. १८ व्या शतकाच्या मध्यावर शेतमजुराबरोबर कारखान्यातील कामगारांची पिळवणूक प्रचंड वाढली होती. छोटी मुलेही कामगार म्हणून पुढे येऊन त्यांची ही पिळवणूक

झाली. परिणामी समाजामध्ये सरळसरळ दोन वर्गांची निर्मिती झाली श्रीमंत वर्ग आणि कामगारांचा दरिद्री वर्ग, कामगारांकडे मिळकतीसाठी उत्पन्नाचे कोणतेच साधन उरत नाही. त्याने आपल्याकडे असलेले सर्व काही गमावले होते म्हणून तो दु:खात लोटला जात होता. त्यामुळे कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानानुसार कामगाराकडे उठाव किंवा क्रांती करण्यापलीकडे दुसरा मार्ग उरला नव्हता. कामगारांनी उठाव केला तरी कारखानदार तो उठाव मोडून काढण्यासाठी राजकीय सत्ता वापरली जाते. १८३७ मध्ये इंग्लडच्या कामगारांनी आपल्या राजकीय हक्कासांठी जी मोठी चळवळ सुरू केली त्याचे मूळ कारण म्हणजे, आपला राजकीय हक्क प्राप्त करणे होय. परंतु कामगारांनी अशा चळवळी सुरू केल्याने श्रीमंत वर्गाचे नुकसानहोईल ह्यामुळे १८५० मध्ये ही चळवळ चिरडून काढल्याचे उदाहरण इंग्लडमध्ये घडलेले दिसून येते. कारखान्यात काम करणाऱ्या कामगार वर्गाची संख्या प्रचंड असल्याने त्यांचे संघटन हे मजबूत होऊ शकते. त्यांच्या गरिबीला वाचा फोडण्यासाठी, त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी, त्यांचे शोषण थांबविण्यासाठी कार्ल मार्क्सचे तत्त्वज्ञान जन्माला आहे असे म्हटले जाते. कार्ल मार्क्सने सांगितलेल्या कामगार-क्रांतीच्या भीतीने सत्ताधारी वर्गाला हार मानावी लागेल ह्यातून कामगार हा घटक जिंकेल त्यामुळे कामगारांची गुलामगिरी नष्ट होईल अगदी ह्याच कारणांसाठी कामगारांनो एक व्हा अशी हाक कार्ल मार्क्सने दिली. कार्ल मार्क्स हा कामगारांच्या क्रांतीबद्दल अतिशय खात्री बाळगतो. मार्क्सने अखेर एक दिवस हे राज्य कामगारांच्या हाती जाईल. अशी भविष्यवाणी सांगितली.

मार्क्सने लहानपणापासूनच कष्टकऱ्यांची उपासमार व दारिद्र्य हे जवळून पाहिले होते. कामगारांना त्यांचा जिवितार्थ चालविण्यासाठी पुरेसे अन्नधान्य मिळत नव्हते. न्यायासाठी कामगारांना सातत्याने संघर्ष करावा लागत होता. त्यामुळे तत्कालीन जमीनदारी शोषणाच्या विरोधात व सरकारच्या अन्यायाविरोधात आपले विचार मांडायला सुरुवात केली आणि जग बदलण्याचे शास्त्र मार्क्सवादाच्या माध्यमातून विकसित केले. शोषणमुक्त जगाचं स्वप्न अस्तित्वात आणण्यासाठी वर्गसंघर्षाचा शास्त्रीय सिद्धांत मांडला. भांडवलदारांकडून कामगारांना

केल्या जाणाऱ्या शोषणाविरोधात त्याचे तत्त्वज्ञान उभे राहिले. भांडवलदारांचा नफा म्हणजे कामगारांच्या श्रमाची चोरी असते. भांडवली समाजातील आंतरविरोध या दृष्टीने अभ्यासला पाहिजे. भांडवलशाहीमध्ये उत्पादन साधनांची मालकी खासगी तर उत्पादन मात्र सामूहिक हा आंतरविरोध उत्पादनसाधनांची सामूहिक मालकी आणणाऱ्या समाजवादी क्रांतीसाठी कारण ठरेल असे कार्ल मार्क्सने सिद्ध केले.

कामगार हितासाठी सत्ताधाऱ्यांना सत्तेवरून खाली खेचावे लागेल आणि हे काम कामगार वर्गच करेन, केवळ राजकीय क्रांती करूनही हा प्रश्न सुटणार नाही. तर एका नव्या समाजव्यवस्थेची स्थापना करावी लागेल. कामगारांना ह्यासाठी आपले बलिदान द्यावे लागेल. त्यासाठी त्यांना आपली संघटना बांधावी लागेल. जगाचा इतिहास हा दडपशाहीचा इतिहास आहे. संघर्षाचा इतिहास आहे. दडपले जाणारे आणि दडपणाऱ्या संघर्षाचा इतिहास आहे. जो वर्ग सत्तेवर येतो तो पुन्हा गरीब वर्गाची कामगार वर्गाची पिळवणूक करतो. कारखान्याची मालकी मूठभर कारखानदारांकडे असते. त्यांच्या तुलनेने कामगारांची संख्या प्रचंड असते. कार्ल मार्क्स कामगारांबाबतचे तत्त्वज्ञान मांडताना म्हणतात की, कारखान्यात काम करताना कामगारांना कळून चुकते की, त्यांच्या सामूहिक श्रमातून उत्पादन तयार होते व ते खासगी मालकीमुळे हिरावून घेतले जाते. त्यामुळेच खासगी मालकी संपविली पाहिजे. हेच कार्ल मार्क्सच्या कामगार क्रांतीचे ध्येय आहे. त्यामुळे भांडवलशाही व्यवस्था उखडून टाकणे कामगार वर्गाला हे करावेच लागेल. ह्यासाठी कार्ल मार्क्स व एंगल्स प्रयत्नशील होता. सदरची भांडवलशाही उखडून टाकण्यात शहरातील कामगार, खेड्यातील शेतकरी देखील सामील होईल व क्रांती करेन. ह्या दोघांनी आंतरराष्ट्रीय पातळीवरील कामगारवर्गाला एक करण्याचे काम केल्याचे दिसते.

श्रमातून वस्तूला प्राप्त झालेली सर्वच्या सर्व किंमत कामगारांना दिली जाते काय? नाही कामगारांना केवळ मजुरी दिली जाते आणि मजुरी वजा जाता उरलेली रक्कम कारखानदार आपल्या तिजोरीत टाकतो. ह्याचा अर्थ कारखान्यात काम करताना काही तास कामगार स्वत:च्या

मजुरी इतके (सामाजिकदृष्ट्या आवश्यक-मार्क्स) उत्पादन करतो आणि दिवसाचे उरलेले तास तो भांडवलदारांसाठी फुकट काम करून वरकड मूल्य तयार करतो. कामगारांचे अशाप्रकारे कारखानदारीसाठी केलेले फुकट काम म्हणजे कामगारांचे शोषण असते.[६]

यावरून असे दिसून येते की, कार्ल मार्क्सने श्रमिक वर्गाच्या शोषणाबद्दल जे चिंतन केले तेउच्च टोकाचे, शास्त्रीय पद्धतीने, निरीक्षणातून मांडलेले आहे. कामगार हे कारखान्यात जातात, कच्चा मालही कारखान्यात जातो. पक्का माल कारखान्यातून बाहेर येतो. कामगार वर्गही बाहेर येतो. कच्च्या मालाची किंमत बाहेर येताना डबल होते. मात्र कामगार वर्ग बाहेर येताना आपल्याकडील शक्ती गमावून बाहेर येतो त्याने गमावलेल्या शक्तीच्या मोबदल्यात अत्यल्प दाम घेतो म्हणजे येथे कामगार वर्गाचे शोषण होते व ह्या शोषणाला भांडवलशाही व्यवस्था हीच जबाबदार असते, असे कार्ल मार्क्स आपले निरीक्षण नोंदवितो. कारखानदार कामगारांचे कामाचे तास वाढवितो व मजुरी कमी करतो व उत्पादन वाढवितो ह्यात समन्वय न राहिल्याने मजूर वर्ग अधिक दारिद्र्यात जातो.

कारखाने, जमिनी ह्यावरील कारखानदारांची व जमीनदारांची खासगी मालकी हेच कष्टकऱ्यांचे दु:खाचे खरे कारण आहे. भांडवलदार आणि जमीनदार प्रशासन, न्यायालये, पोलिस, सैन्य इ. सत्तेचे भाग काम करतात. त्यामुळे कष्टकऱ्यांच्या दु:ख संपविण्यासाठी खासगी मालकी संपली पाहिजे. ह्यासाठीच कष्टकऱ्यांच्या हातात खरी सत्ता द्यायला हवी असा आग्रह कार्ल मार्क्सने धरला आहे. ह्या जाणिवेतूनच साम्यवादाचे (कम्युनिझमचे) तत्त्वज्ञान उदयास आले आहे. यात हिंसा-अहिंसा, कायदेशीर की बेकायदेशीर ह्याचा विचार केला जात नाही. अशा ह्या भांडवलशाहीतील शोषणाला बळी ठरलेल्या कामगार वर्गासाठी कार्ल मार्क्सने आपले सर्व आयुष्य खर्च केले त्यासाठी शास्त्रशुद्ध विचार करून विश्लेषण केले. हे विश्लेषण 'कॅपिटल'च्यातीनही खंडात दिसून येते कष्टकऱ्याला त्याच्या शोषणापासून मुक्त करण्यासाठी

भांडवलावर आधारित असलेली व्यवस्था ही क्रांती करून नष्ट केली पाहिजे. तरच कामगार वर्ग खऱ्या अर्थाने न्यायाने व सुखकरपणे जीवन जगू शकेल.

### ५.५ आंबेडकरवाद आणि रोजगार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे जे सामाजिक कार्यक्रम आणि उपक्रम हाती घेतले त्या सर्वांचा अंतिम हेतू हाच होता की, भारतीय समाजातील अस्पृश्यता, जातीयता नष्ट करून समाजाला एका अती उच्च पातळीवर घेऊन जाणे व विषमता नष्ट करून समता निर्माण करणे. म. गांधींनी १९२० साली घोषित केले होते की, अस्पृश्यतेला दुय्यम स्थान देता येणार नाही. तो कलंक दूर केल्याशिवाय स्वराज्य हा शब्द निरर्थक होईल. हे होण्यासाठी भारतीय समाजाचे बौद्धिक प्रबोधन होणे आवश्यक आहे. ब्रिटिश अंमल असताना ज्या सामाजिक व राजकीय चळवळी उदयाला आल्या, त्यांच्याही कार्यक्रमात अस्पृश्यता निवारण अशा कार्यक्रमांना विशेष महत्त्व देण्यात आले होते. ब्रिटिशांच्या काळातील रोजगाराच्या संधी कोणाला मिळाल्या ह्याविषयी संशोधन केल्यास असेच दिसून येते की, सरकारी नोकर ब्राह्मण जातीतूनच आले होते आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते ब्राह्मणशाही आणि भांडवलशाही हे कष्टकरी वर्गाचे प्रमुख शत्रू आहेत. त्यामुळे त्यांनी ह्या दोन्हींनाही विरोध केला आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ह्या आधारे समाजाची विभागणी झालेली असून ह्या सर्वांमध्ये सामाईक अस्तित्व दिसते ते जातीचे! अस्पृश्य किंवा दलित ह्यांना तरवर्णच नाही अशी भारतीय समाजाची विभागणी उतरंडीची दिसून येते.

भारतीय समाजाचे मुळात वैशिष्टे असे आहे की, भारतीय माणसाचा जन्म विशिष्ट जातीत होतो. ज्या जातीत ती व्यक्ती जन्मते त्याच जातीत तिला रहावे लागते आणि ह्या जातीतील माणसास सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक परिमाणे असतात. जन्मावर आधारित व्यावसायिक रचना हा तर जाती व्यवस्थेचा मूलाधार आहे. डॉ. मुणगेकरांनी डॉ.

बाबासाहेब आंबेडकरांच्या गुलामगिरी आणि अस्पृश्यता ह्यांच्या तुलनेत गुलामगिरीचे अस्पृश्यतेच्या तुलनेत अधिक लाभ आहेत. ह्यावर लक्ष केंद्रित केले आहे. दारिद्र्य, निरक्षरता, बेकारी आणि विषमता ह्यासारख्या भारताच्या समस्या सोडविण्यातील भांडवलशाहीच्या एक आर्थिक व्यवस्था म्हणून असलेल्या असमर्थतेची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पूर्ण जाणीव होती. त्यांच्या मते उत्पादन साधनांच्या खासगी मालकीवर आणि व्यक्तीची उद्योजकता आणि प्रलोभनांवर आधारित असलेल्या भांडवलशाहीद्वारे आर्थिक वाढ होऊ शकेल.[७] परंतु अंतिमत: अटळपणे त्याचे पर्यवसान ह्या विकासाच्या लाभाच्या विषम वाटपात होईल. ह्या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक धोरणविषयक विचार जाणणे योग्य ठरेल. जी धोरणे त्यांनी लोकशाही राजकीय व्यवस्थेत आर्थिक विकास आणि सामाजिक न्याय ह्या दुहेरी उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी सुचविली होती आणि ती निश्चित करण्यातील आणि अंमलात आणण्यातील राज्यसंस्थेची भूमिकाही स्पष्ट केली.[८]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताच्या आर्थिक धोरणांबाबत कार्यक्रम निश्चित करण्यामध्ये राज्यसंस्था महत्त्वाची मानली. खासगी क्षेत्राला आपले मार्ग बंद न करता उत्पादकतेचे सर्वोच्च टोक गाठले जाईल आणि संपत्तीचे समान वाटप साध्य करता येईल. सामूदायिक पद्धतीच्या शेतीसह कृषीक्षेत्राची मालकी राज्यसंस्थेकडे असावी आणि उद्योगक्षेत्रात सुधारित पद्धतीचा राज्य समाजवाद असावा असे ह्या योजनेत सुचविले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार कल्याणाचे पुरस्कर्ते होते.[९] १९४२ ते १९४६ ह्या काळात व्हाइसरॉयच्या कार्यकारी मंडळात ते कामगारांचे प्रतिनिधी होते. तेव्हा त्यांनी कामगारांना आर्थिक लाभ आणि संरक्षण देऊ करणारे असंख्य उपाय व धोरणे सुचविली होती. जी स्वातंत्र्यानंतर कामगार कल्याण धोरणाचे आधार बनली. २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड सत्याग्रह परिषदेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या भाषणातील संदर्भ पाहिला तर असे दिसून येते की, मजुराला समाज घटकाकडून कशी वागणूक मिळते त्यावरून त्या कामगारांची जडण-घडण होते. त्याला समाजाने

जर गुलामाची वागणूक दिली तर त्याच्यातील गुणांचा विकास कधीच होणार नाही. त्यासाठी त्याला समतेची वागणूक द्यायला हवी. स्पृश्य कामगार हे अस्पृश्य कामगाराला काम शिकविण्यास तयार नाहीत, ह्याबाबतची खंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १६ ऑक्टोबर, १९२९ रोजी मुंबई येथे बहिष्कृत वर्गाच्या जाहीर सभेतील अध्यक्षीय भाषणात व्यक्त केली आहे. त्यांच्या मते स्पृश्य हा एक वर्ग बनला आहे. त्याने केलेल्या प्रत्येक संपात अस्पृश्यांना कोणताच न्याय मिळाला नाही. स्पृश्य कामगार पुढारी नेहमी सांगतात की, कामगारांना जात नाही. परंतु अस्पृशांवर जुलूम हाच जर कामगार चळवळीचा न्याय असेल तर कामगारांना जात नाही म्हणून नेहमी ओरडणाऱ्या स्पृश्य पुढाऱ्यांनी ह्याचा जबाब द्यावा, असा सवाल डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केला आहे. गिरणी कामगारांमध्ये वर्गीय व जातीय वातावरणामुळे बहिष्कृतांस न्याय मिळणार नाही. समानतेची वागणूक मिळणार नाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्टपणे इशारा देतात की, फक्त स्पृश्यांच्या फायद्यासाठी चळवळ चालविली जाणार असेल तर त्या चळवळीशी मला काही कर्तव्य नाही. थोडक्यात देशातील विशिष्ट नोकऱ्या वरिष्ठ जातीतच वाटल्या जात असतील तर समाजव्यवस्थेसाठी तो मोठा धोका असेल. कारण त्यामुळे त्यांच्यात अहंभाव निर्माण होतो. १६ जानेवारी १९३१ च्या गोलमेज परिषदेतच्या पूर्ण अधिवेशनासमक्ष संरक्षणविषयक उपसमिती क्र. ७च्या अहवालावर मत प्रदर्शित करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्टपणे मत नोंदविले की, भारतासाठी नवीन घटना निर्माण करत असताना प्रत्येकाला त्याच्या पात्रतेनुरूप देशातील सरकारी नोकरी करण्याची परवानगी मिळेल याही पुढे जाऊन ते असे म्हणतात की, गाव कामगारास सुद्धा पगारी नोकऱ्या दिल्या पाहिजेत. गावात काम करणाऱ्या माणसास व त्याच्या कामास प्रतिष्ठा मिळवून देण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे मत मांडताना दिसतात. त्यातही भारतातील संपूर्ण कामगार वर्गाला दलित वर्गाचे लोक हे कामगार संघटनांच्या माध्यमातून मोठे योगदान देऊ शकतात. चालनाही देऊ शकतात. कामगारांनी संघ निर्माण करून आपले हक्क अबाधित ठेवले पाहिजेत आपल्या हक्कासाठी,

प्रतिष्ठेसाठी कामगार वर्गाने संप केला तरी त्याचे समर्थन करण्याचीच भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर घेतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा कामगारांच्या एकजुटीवर जास्त विश्वास आहे. कामगाराला अठरा विश्व दारिद्रियास तोंड द्यावे लागते, हे दारिद्र्य नष्ट करण्यासाठीच कामगार वर्गाची एकजूट हवी. त्यांनाही जगण्याचा हक्क आहे. इतरही सर्व प्रकारचे हक्क त्यांना असून त्यांचे दारिद्र्य नष्ट करण्यासाठी ते हक्क संकुचित करता कामा नये. दारिद्र्याचे जिणे नष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगारांच्या एकजुटीवर जास्त लक्ष देतात कामगारांनी एकत्र येऊन आपले हक्क जपावेत ह्यासाठी तर कार्ल मार्क्सनेसुद्धा आवाहन केले होते. हेही ह्या निमित्ताने लक्षात घ्यावे लागेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला होता. तो एकाच जातीकरिता धर्माकरिता नव्हता तर तो अखिल हिंदस्थानातील श्रमजीवी जनतेसाठी होता. राजकीय, सामाजिक, आर्थिक हक्कांच्या लढ्यासाठी हा पक्ष स्थापन केला होता. ह्या पक्षातील प्रवेशाच्या बाबतीत स्पृश्य, अस्पृश्य, ब्राह्मण, ब्राह्मणेत्तर, हिंदू मुसलमान असा भेदभाव नव्हता. औद्योगिक कामगारांना पुरेसा पगार, पगारी सुट्ट्या, कामगार संघांना मालकाकडून मान्यता, कायम नोकरी, आठ तासाचे काम, नोकरीचा व अपघाताचा मालकाकडून विमा, नुकसान भरपाई व इतर कायद्यांची कायदेशीर तरतूद करण्याची चळवळ, आजारीपणा व बेकारीचा भत्ता इ. मिळविण्यासाठी लढा उभारणे, हे स्वतंत्र मजूर पक्षाचे कार्यक्रम होते. ह्यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे श्रमिक व रोजगार क्षेत्राकडे ते किती गांभीर्याने लक्ष होते हे दिसून येते.

सातारा जिल्ह्यातील मेढे ह्या गावी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे भाषण दिले ते ह्या दृष्टीने महत्त्वाचे आहे की, त्यांनी जातीयता व अस्पृश्यतेचा संदर्भ गुलामगिरीशी जोडला आहे. ते म्हणतात की, जोपर्यंत गावात वतन आहे तोपर्यंत गुलाम हे राहणारच. वतन नष्टकेल्याशिवाय खरे स्वातंत्र्य लाभणार नाही. गावोगावचे महारवाडे नष्ट करून टाकण्याची मोहीम हाती घेण्याची गरज आहे. कारण असे महारवाडे खऱ्या अर्थाने अस्पृश्यांचे कोंडवाडे झाले आहेत. मजूर व

शेतकरी हे जातिभेदाने पछाडलेले आहेत आणि हे दोन्ही घटक अस्पृश्यच आहे हे विसरून चालणार नाही. ह्यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता आणि कामगार ह्यातील संबंध पुरते जाणले, अभ्यासले व कृतीत उतरविले होते.

'जनता' ह्या नियतकालिकेत ९ नोव्हेंबर १९४० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे विचार मांडले ह्या विचारांचे चिकित्सक विश्लेषण केल्यास आपणास कामगार, कामगार चळवळ, जात आणि कामगार अस्पृश्यता आणि आर्थिक विकास इत्यादी बाबतच्या संकल्पना अधिक विकसित होतात. ते म्हणतात, जगातील कोणत्याही देशात शेतकरी व कामकरी लोकांचीच बहुसंख्या असल्याने खरी लोकशाही जगात नांदावयाची असल्यास कामगारशाहीचाच उदय व्हावयास हवा, यात शंका नाही. जगातील मानवी समाजात क्रांती यशस्वी व्हावयाची असेल तर खऱ्या लोकशाहीचा म्हणजे अर्थातच कामगारशाहीचा जगात प्रचार व्हावयास हवा आहे. ह्या दृष्टीने पाहता जगात आजवर झालेल्या क्रांत्या फोलच ठरणार आहेत.[१०]

रशियन राज्यक्रांती, इंग्लडमध्ये झालेली क्रांती इत्यादी क्रात्यांचा संदर्भ देत त्यांनी खरी कामगारशाही निर्माण व्हावयाची असल्यास तिचा पाया लोकशाहीच्या तत्त्वावरच रचला गेला पाहिजे यावर भर दिला आहे. इंग्लंडमध्ये झालेल्या क्रांतीची सूत्रेही धनिक वर्गाच्या हातात असल्यामुळेच तेथे खरी लोकशाही अस्तित्वात येऊ शकली नाही. तसेच फ्रेंचमध्ये राज्यक्रांती झाली. समता, स्वातंत्र्य, बंधुता या लोकशाही तत्त्वांची घोषणा केली परंतु भांडवलदारांच्या हातात राज्यसत्ता जाऊन ती फक्त घोषणाच ठरली. रशियन राज्यक्रांतीने मात्र ह्या दोन क्रांत्यांच्या पुढे एक पाऊल टाकले आहे. येथे कामगार वर्गाच्या हातात राज्यसत्ता असली तरी ती जोपर्यंत अधिकारशाही विचारावर आधारित आहे तोपर्यंत त्या देशातहीखरी कामगारशाही निर्माण होणार नाही. म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते खरी कामगारशाही ही लोकशाही विचारावरच उभी असली पाहिजे. मूठभर भांडवलदारांपासून कामगारशाहीने दूरच राहिले पाहिजे. असे असले तरच कामगारवर्गाचे कल्याण होणार आहे. म्हणून ते म्हणतात, जगातील लोकशाही राष्ट्रांनी

आपले भांडवलशाही धोरण सोडावयास हवे व रशियाने आपले सोटेशाही धोरण टाकून द्यावयास हवे. असे झाले तर समाज सत्तावादी रशिया व लोकशाही राष्ट्रे ह्यांच्या संगनमताने जगात नव्या युगाला सुरुवात होईल असे वाटते.[११] ह्यावरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कामगार वर्गाची हुकूमशाही नको होती, त्याऐवजी लोकशाहीचा आधार घेऊनच कामगार वर्गाने आपापले प्रश्न सोडविण्यात पुढाकार घेतला पाहिजे. कामगार वर्ग हा एकत्र असला पाहिजे. कामगार संघटनेत एकजूट असेल तरच ते कामगार सुखी होऊ शकतील. भारतातील कामगार संघापुढे दारिद्रय हे मोठे संकट आहे आणि ह्याला जोड स्पृश्य-अस्पृश्यतेची, जातिभेदाची आहे. त्यामुळे कामगार संघटनाने मानवी जीवनाच्या कसोटीवर त्या सोडविल्या पाहिजेत. मजुरांचे किमान वेतन ठरविण्यास त्यांनी विरोध केला आहे कारण मालकांच्या नफ्याची कमाल मर्यादा काय असावी,ह्याबाबत स्पष्टपणे धोरण ठरविले गेले नव्हते आणि ह्या दृष्टीने राजकीय सत्तेतील कामगार वर्गाचा सहभाग तेवढाच महत्त्वाचा आहे. कारण राजकीय सत्ता असली की कोणत्याही वर्गाला आपली सर्वांगीण प्रगती घडवून आणण्यास मदत होते.

भारतातील कामगार, रोजगार, श्रमिक, शेतकरी, मजूर इत्यादी घटकांविषयी निरीक्षण केले तर अस्पृश्यांचा वडिलोपार्जित व्यवसाय असून तो अस्वच्छ व्यवसायात मोडतो म्हणून कामगार कायद्यांमधून ह्या व्यवसायांना वगळता येणार नाही कारण हे व्यवसाय त्यांच्यावर लादण्यात आलेले आहेत. त्यांनी ते स्वेच्छेने स्वीकारलेले नाहीत. ह्या परिस्थितीत गांधीवाद हा एका सुशिक्षित अस्पृश्याला भंगीकाम करण्याची सक्ती करतो असे आंबेडकरवाद मानतो. त्यामुळे आंबेडकरवाद्यांच्या मते गांधीवादात जातिप्रथा जपण्याचे धोरण आहे, असे मानले जाते. गांधीवाद हा हिंदूत्त्ववाद व तत्सम शास्त्रांचा अधिकार ह्या दृष्टीने मान्य करतो. आंबेडकरवादी विचाराने कामगारांना जगण्यासाठी मानवी हक्कांची अत्यंत जरुरी आहे यावर भर दिला आहे. सरकारची सत्ता मूठभर लोकांच्या हातात असेल तर त्यांची अरेरावी वाढते. कामगार वर्ग दडपला जातो. लढाया संपल्या असल्या तरी कामगार वर्गाची भांडवलदारांविरोधातील लढाई अजून

संपलेली दिसत नाही, हे नष्ट करावयाचे असेल तर कामगार कायद्यांची अंमलबजावणी करण्याचे काम प्रांतांकडे न देता केंद्राने आपल्याकडेच ठेवले पाहिजे. त्याचा सर्वात मोठा धोका भारतासंदर्भात घ्यायला हवा तो असा की भारतातील जातिसंस्था हे केवळ श्रमविभाजन नव्हे तर ते श्रमिकांचे सुद्धा विभाजन करते. ह्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. आंबेडकरवादी विचारसरणी आणि समाजवादी विचारसरणी ह्यांच्यामध्ये कामगार, कामगार चळवळ, तीची विचारसरणी भारतीय कामगारांचे प्रश्न ह्या आणि इतर अनेक प्रश्नांबाबत मतभेद असलेले दिसतात. साम्यवादी पक्षाला कामगारांच्या हुकूमशाही तत्त्वावर आधारलेले संविधान हवे आहे. भारताची राज्यघटना ही संसदीय लोकशाहीवर आधारित असल्यामुळे ते भारताच्या संविधानाचा निषेध करतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्वत: बॅरिस्टर असूनही इंप्रुव्हमेंट ट्रस्टच्या चाळीत राहात होते. अस्पृश्य कामगारांना इतर कामगारांचे हक्क मिळवून देणे हे त्यांनी प्रथम कर्तव्य मानले होते. ८०% कामगारांवरील जुलूम समूळ नष्ट करून त्यांचे जीवन सुखी करणे हेच खरे राजकारण होय आणि ज्या राजवटीत शेतकरी-मजूरास पिळवणारे शेठ-सावकार यांचेच प्राबल्य असते ती राजवट या देशाचे खरे हित कधीच साधू शकणार नाही. शेठ-सावकारांचे स्वातंत्र्य म्हणजे देशाचे स्वातंत्र्य नव्हे ज्यावेळी देश खऱ्या अर्थाने स्वतंत्र होईल. वर्गसंघर्षाच्या सिद्धांताला मान्यता देऊन शेतकरी-मजूर वर्गाच्या हाती सत्ता आणण्याचे उद्दिष्ट ठरविणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या श्रमजीवीविषयी चिंतन्याच्या उत्कर्ष बिंदू मनमाड येथील त्यांच्या प्रसिद्ध भाषणात आढळतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी दि. १३ फेब्रुवारी १९३८ रोजी ‘भारतातील कामगार चळवळीची दशा आणि दिशा’ह्या विषयावर आपले विचार मुद्देसूद पद्धतीने मांडले होते. ह्या त्यांच्या भूमिकेमुळे आंबेडकरवादाचे रोजगाराबाबतचे धोरण नेमके कसे होते हे स्पष्ट होते.[१२]

कामगारांचा लढा हा विशेषत: अस्पृश्य कामगारांचा लढा हा इतर सामाजिक न्यायाच्या लढ्याइतकाच महत्त्वाचा आहे. त्यांच्या मते ब्राह्मण्यशाही आणि भांडवलशाही हे देशातील कामगार वर्गाचे मोठे शत्रू आहेत. भारतातील कामगारांबाबतचे एक परीक्षण त्यांचे अत्यंत महत्त्वाचे मानले जाते ते म्हणजे असे की, भारतातील कामगारांमध्ये जात आणि धर्मामुळे शत्रुत्व निर्माण झाले आहेत. त्यांनी असाही दावा केला की, भारतातील कामगार पुढाऱ्यांमध्येही जरा अडचण दिसून येते ती अशी की, भारतीय कामगार पुढारी भांडवलशाही विरुद्ध धारदारपणे बोलतात, मात्र ब्राह्मणशाहीबद्दल त्यांची तीव्रता लगेच कमी होते आणि महत्त्वाचे म्हणजे अस्पृश्य कामगार वर्गाची चळवळ आणि इतर कामगार वर्गाची चळवळ ह्यांच्या कार्यशैलीत फरक आहे. अस्पृश्य कामगार वर्गाची चळवळ ही मालक धार्जिणी नाही उलट ह्या चळवळीचे अंतिम उद्दिष्ट असे की, कामगार वर्गाचे जीवन स्तर उंचावणे, संप हे कामगार चळवळीचे अंतिम साधन आहे. परंतु साम्यवाद्यांनी ह्या साधनाला कामगारांमध्ये असंतोष निर्माण करण्याचे दैवी साधन मानले आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते येथेच साम्यवाद्यांनी चूक केली. परिणामत: कामगार चळवळीचा नाश झाला. फक्त कामगारांचे प्रश्न सोडवून समाधान न मानता राजकीय सत्ता स्थापन करण्याचेही स्वप्न कामगार चळवळीने पाहिजे पाहिजे. कामगार चळवळीचे प्रथम उद्दिष्ट हेच पाहिजे की समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुभाव प्रस्थापित करणे जी कामगार संघटना आपणास सत्ता नको असे म्हणत असेल अशा संघटनेस आंबेडकरी विचारानुसार भांडवलशाही समर्थक मानले जाते. कामगार वर्गाने अशाच संघटनेत सामील व्हावे की ज्या संघटनेस वर्ग जाणीव आहे. त्यांनी वर्ग संघर्षाचीही तयारी ठेवावी. अशा स्वरूपाची पार्श्वभूमी लक्षात घेऊनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ९ नोव्हेंबर १९४० रोजी च्या 'जनता' च्या अग्रलेखात फ्रेंच क्रांतिपेक्षा रशियन क्रांतीला झुकते माप दिले आहे असे दिसते. दलित वर्गातील कामगारांनी, नेत्यांनी त्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी मोठमोठ्या उद्योगांमध्ये त्यांनी प्रवेश करणे महत्त्वाचे आहे. अन्यथा ते गुलामच राहणार आहेत. त्यांच्या उदरनिवार्हासाठी त्यांना जमिनी कसण्यासाठी द्यायला हव्या.

परंतु ज्यांच्याकडे जमिनी आहेत ते केवळ उदरनिवार्हासाठी नाहीतर भारतात यावरून सामाजिक दर्जा ठरू लागला आहे. ११ फेब्रुवारी १९४९ रोजी केंद्रीय विधिमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मंत्री असताना सक्तीचे श्रम, वेठबिगार विरुद्ध भाषण करताना कायदामंत्री म्हणून जी भूमिका मांडली त्यात वेठबिगाराचे देशाच्या विविध भागात विविध प्रकार कसे आहेत व त्या विरोधात सामाजिक पातळीवर कोणती उपाय योजना करायला हवी. कायद्याची अंमलबजावणी केंद्रीय पातळीवर का ठेवावी, असा विविध मुद्यांच्या आधारे आपली भूमिका स्पष्ट केली.

आंबेडकरवाद आणि रोजगाराचा संबंध अभ्यास करताना कामगार म्हणून लिंगभावाचा विचार केला तर असे दिसून येते की, म. फुलेंनी स्त्री प्रश्नांची मांडणी केली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर स्त्री-पुरुषांना समप्रमाणात महत्त्व दिले. परंतु सर्व स्त्रियांचे शोषणही एकसमान नसते हेही आवर्जून सांगितले. स्त्रिया ह्या जातिव्यवस्थेची प्रवेशद्वारे आहेत. ह्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विश्लेषणातून हेही स्पष्ट होते की, स्त्रियांवरील निर्बंधातून जात टिकविली जाते.जातिव्यवस्था टिकविण्यासाठी स्त्रियांची लैंगिकता व श्रम यांच्यावर नियंत्रण ठेवणे अत्यंत गरजेचे असते. त्यामुळे उच्चवर्णीय स्त्रीवर संचाराचे निर्बंध जास्त कारण त्यांची शुचिता टिकविणे हे जातिव्यवस्थेसाठी कळीचे ठरते. थोडक्यात, पुरुषसत्ता व जातिव्यवस्थाह्या एकमेकांना पूरक व्यवस्था आहेत.

संयुक्त राष्ट्रसंघाने १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीयमहिला वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर रोजगार क्षेत्रात होणाऱ्या स्त्रियांवरील अन्यायाची किंवा एक कामगार स्त्रीच्या उद्धाराची चर्चा सुरू झाली. फक्त एक स्त्री म्हणून विविध घटकांकडून होणाऱ्या अन्यायाची चर्चा एका बाजूला आणि स्त्रीकडे एक कामगार म्हणून पाहात असताना कामगार स्त्रीचे शोषण या अर्थाने अन्यायाची चर्चा करणे हे दुसऱ्या बाजूला महत्त्वाचे ठरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बील आणले. हिंदू कोड बिलाच्या निर्मिती प्रक्रियेत जात-स्त्रीशोषण सहसंबंधावर चर्चा सुरू झाली. ह्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदे मंत्रीपदाचा त्याग केला ह्यावरून डॉ. बाबासाहेब

आंबेडकरांची स्त्री कामगार म्हणून तिच्यावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी त्यांचा दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. जात आणि पुरुषसत्ताक व्यवस्था ह्या भारतीय कामगार स्त्रीवर मोठा अन्याय करणाऱ्या घटकांपैकी एक होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अखिल स्त्रीवर्गाचा विचार करताना स्त्री शोषणाला धार्मिक-सांस्कृतिक स्वरूपाचे जे अधिष्ठान मिळाले ह्याचीही सविस्तर चर्चा केली. भारतातील स्त्रीवादी चळवळीने कामगार स्त्री बाबत आपले धोरण अगदीच स्पष्ट केले नाही आणि जात व पुरुषसत्ता की अन्यायाविरुद्ध पाऊल उचलले नाही. हिंदू कोड बिलाच्या निमित्ताने स्त्री मुक्तीसाठी तर ते महत्त्वाचे आहेच परंतु ह्याच निमित्ताने कामगार स्त्री सुद्धा मुक्त होण्यास मोठा हातभार लागला.

१८ व १९ व्या शतकात स्त्रियांच्या पिळवणुकीबाबत झालेल्या कायद्यांमध्ये १८०२ मध्ये बालहत्या प्रतिबंधक कायदा, १८२९ मध्ये सती बंदीचा कायदा, १८५६ चा विधवा विवाहाचा कायदा, १८७२ चा विशिष्ट विवाहाचा कायदा, १८८१ चा संमती वयाचा कायदा, १८२८ चा वारसा हक्कासंबंधीचा कायदा, १८२९ चा बालविवाह प्रतिबंधक कायदा, १९३७ चा हिंदू स्त्रियांचा मालमत्ता कायदा इत्यादी कायदे झाले. ह्या सर्व कायद्यांमधून उच्चजातीतील स्त्रीचा उद्धार झाला. परंतु बहुजन, पददलीत आणि समाजाने बाहेर टाकलेल्या स्त्री दास्यांचा तसेच पुरुषी संस्कृतीतून बाहेर ढकललेल्या स्त्रीचा तसेच कामगार स्त्री चा विचार हिंदू कोड बिलामुळे पुढे आला.

भारतातील स्त्री कामगाराला 'जात' आहे. कामगार स्त्रीवर जे जे घटक अन्याय करतात, तिची पिळवणूक करतात. कामगार स्त्री वर्गावर पुरुष हा घटक अन्याय करतो. त्यामुळे आंबेडकरवादानुसार कामगार म्हणून स्त्रीला स्थान मिळालेच पाहिजे. तिला कामगार म्हणून तिचे हक्क मिळाले पाहिजे आणि ही कामगार स्त्री ज्या समाजाचा घटक आहे त्या समाजातील पुरुषांकडून होणाऱ्या जाचातूनही मुक्तता मिळाली पाहिजे, अशी भूमिका हिंदू कोड बिलाच्या निमित्ताने पुढे येते.

"स्त्रियांच्या केवळ शरीरावर, मनावर नव्हे तर व्यक्तिमत्त्वावर, स्वत्वावर, अस्तित्वावर, त्यांच्या लैंगिकतेवर जात व पुरुषांचा ताबा विविध माध्यमातून पुढे आला आहे. आज देशात स्त्री-शोषणाचे गंभीर रूप पुढे आहे. 'मंडल' नंतर देशात मोठी धुसळण झाली आणि स्त्री शोषण अधिक तीव्रतर होत चालले आहे. जातजनगणना (२०१०-११) ने पुढे आणलेले लिंग गुणोत्तर, खापपंचायती आणि ऑनर किलिंगचा प्रश्न, तथाकथित एकतर्फी प्रेमातून होणाऱ्या हिंसा, स्त्री गर्भाची हिंसा ही सर्व उदाहरणे स्त्री शोषणाची तीव्रता अधोरेखित करीत आहेत."[१३]

भारतीय स्त्री मुक्तीच्या प्रश्नावर विविध संघटना, राजकीय पक्ष, चळवळी ह्यांनी स्त्री कामगारह्यांचा विचार न करता स्त्री चे राजकारण करण्यावरच भर दिला आहे. आंबेडकरवादी असल्याचा दावा करणाऱ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री मुक्तीविषयक दृष्टिकोन काय आहे हे समजूनच घेतले नाही. कारण मार्क्सवादी कामगाराला जात नसते आणि आंबेडकरवादी कामगाराला मात्र जात चिकटली आहे. तो कामगार जातीच्या बंधनाखाली आहे. तसेच तो कामगार ब्राह्मणी वर्चस्वाखाली सापडला आहे. कामगार स्त्री सुद्धा जात, पुरुष आणि लिंगभेदाचा अन्याय सहन करत आहे. गौतम बुद्धांनीही स्त्रियांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार केला. प्राचीन काळी स्त्री उच्चतम पदी जाऊशकत होती. कॉ. शरद पाटील म्हणतात की, स्त्रिया राज्यकारभारात आघाडीवर होत्या. परंतु स्त्रियांच्या एकूणच अवनतीस मनूच जबाबदार आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संताप व्यक्त केला आहे. आंबेडकरवादाचे सर्वात महत्त्वाचे योगदान असे आहे की, आंबेडकरवादाने स्त्रीला पहिल्यांदा कायद्याच्या कक्षेत आणले. स्त्री-पुरुषांना समानतेच्या चौकटीत बसविले आणि नंतर पुढे रोजगाराबाबतीत उपकायदे निर्माण झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलाला इतर कायद्यांप्रमाणे प्रागतिक कायदे असे संबोधले आहे.

**५.६ मार्क्स-आंबेडकर समन्वयीविचारांच्या दृष्टिकोनातून रोजगारविषयक प्रश्नांची चर्चा :**

मार्क्सवादी दृष्टिकोनातून समाज हा वर्गीय आहे. मार्क्सच्या मते वर्गीय समाजामधील 'नाही रे' वर्गावर 'आहे रे' वर्ग अन्याय करतो, आणि त्यांची पिळवणूक करतो. आहेरे वर्गाकडे सत्ता असते. प्रशासन, पोलीस, सैन्य इ. सर्व बाबींची सर्व सूत्रे तो वर्ग आपल्याकडेच घेतो. खासगी मालकीचे समर्थन करत असताना श्रमिक ह्या वर्गाकडे दुर्लक्ष करतो. मार्क्सवादींच्या मते जातीचा प्रश्न हा मानसिक आहे. कारण अर्थशास्त्राचे अभ्यासक असे विश्लेषण करतात की, भांडवलशाहीचा उगम भारतात ब्रिटिश आल्यानंतर झाला आहे. भारतातील काही अभ्यासकांच्या मते भारतातील वर्ग हे जातींच्या स्वरूपात दिसून येतात. वास्तविक जात आणि वर्ग हे दोन्ही घटक वेगवेगळे आहेत.

आंबेडकरवादी दृष्टीने विचार केल्यास भारतात वर्ग ऐवजी जात प्रभावी दिसून येते. भारतीय समाजाचे स्वरूप हे जातीय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते भारतातील जातीने केवळ श्रमाचे नव्हे तर श्रमिकांचे देखील विभाजन केले आहे. एखाद्या गिरणीत जास्त पगार मिळणारे पद हे फक्त उच्च जातीतील व्यक्तीला होते. तेथे दलितांना काम दिले जात नसे उदा. बॉबीन बनविताना सूत बनवून धागा गुंडाळला जातो. त्यानंतर तो धागा तोडला जातो. ह्या कामासाठी जास्त पैसे मिळत असत, अशा ठिकाणी दलित कामगार दिसून येत नव्हता. कारखान्यात काम करणाऱ्या कामगार वर्गात जात दडलेली होती. जातीचा अनुभव वेळोवेळी दिसून येत होता. म्हणजेच जातीय दृष्टीने कामगार वर्गाकडे पहिले जाते असे आंबेडकरवाद सांगतो ह्यांच्या मते सवर्ण कामगारांचे प्रबोधन करण्याची जबाबदारी ही कम्युनिस्टांनी घेतलेलीच आहे. त्यानंतर आपणास असे दिसते की, कोणती गोष्ट क्रांतीने सोडवायची आणि कोणती गोष्ट प्रबोधनाने सोडवायची ह्याचे रीतसर राजकारण करण्यास सुरुवात झाली. असे असले तरी जाती प्रश्न हा प्रबोधनाने सोडविता येणार नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ह्याला पाया आणि इमला अशा संकल्पना वापरल्या आहेत. जात हा भारतीय समाजाचा पाया आहे. उत्पादन व्यवस्थेत कोणी कोणते व्यवसाय करावेत हे समाजव्यवस्थेने नक्की केले होते. जात हे भौतिक

वास्तव आहे. ती केवळ मानसिकता नाही. उदा. शेतकऱ्याने फक्त उत्पादन करावे, उत्पादन केलेल्या मालावर प्रक्रिया करू नये. असे विभाजन केलेले असल्याने भारतीय समाजात शेतकरी घटक उद्योजक होऊ शकत नाही. जातिधिष्ठित उत्पादन व्यवस्था दिसून येते. शेतकरी वर्ग प्रत्यक्ष शेतीत काम करतो मात्र त्याच्याकडील वकरड मूल्य तो ब्राह्मण वर्गाकडे देतो. महसुलातील काही भाग दक्षिणा म्हणून द्यावी म्हणजे जो घटक श्रम करीत नाही, त्याला (ब्राह्मण) ते मूल्य द्यायचे म्हणजे हे एका अर्थाने भौतिक शोषणच आहे. कार्ल मार्क्स मात्र शेतकऱ्यांबद्दल ठोस भूमिका घेत नाही. ती भूमिका माओनंतर आपणास पहावयास मिळते. त्यावेळी शेतकऱ्यांना घेऊन्न मोठमोठे आंदोलन केले गेले. म्हणून जागतिकीकरणात जातिव्यवस्था ही प्रधान शोषण करणारी व्यवस्था आहे. भांडवलशाहीने जमीनदारशाही नष्ट केली. व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य हे जातिव्यवस्थेमध्येच होते. भारतातील अर्थव्यवस्था सुद्धा ग्रामीण भागावर आणि शहरी भागावर वेगवेगळा परिणाम करते. सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे व्यवसायाचे स्वातंत्र्य नसणाऱ्या देशात विकास कसा होईल? आजही आपणास भारतामध्ये सेवा क्षेत्रामध्ये निरीक्षण केल्यास बहुजन जाती जास्त स्वरूपात कार्यरत आहेत. असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. थोडक्यात असंघटित क्षेत्रात बहुजनजाती दिसतात. इथल्या कम्युनिस्ट चळवळीवरही आरोप केला जातो की, बदलत्या भांडवलशाहीचे स्वरूप लक्षात न घेता आपली साधने बदलली नाही याला पोथीनिष्ठ साम्यवाद म्हटले गेले. लढ्याची तंत्रे त्यांनी बदलली नाहीत. श्रम विभागणी बरोबरच श्रमिकही विभागला. आर्थिक लढ्याबरोबर जोपर्यंत जातीचे लढे लढले जाणार नाहीत तोपर्यंत ही परिस्थिती बदलली जाणार नाही. जसे राममंदिराचा लढा हा कम्युनिस्टांच्या मते भावनिक लढा होता. असेच सेझबाबतच्या लढ्यात गरीब लोकांच्या जमिनी सरकारने काढून घेतल्या व कारखानदारांना दिल्या. वरील दोनही लढ्यांमध्ये भावनिकता दिसून येते. राममंदिराबाबत लोकमत संघटित करण्यासाठी लोकांच्या भावनेला हात घालावा लागला. तसेच सेझबाबतही २३ वर्षांपासून जागतिकीकरण आपण स्वीकारले यात जनतेचा मात्र तोटाच झाला. लोक भावनेचे

राजकारण ह्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झालेले दिसून येते. गोवा सरकारने तर आम्ही सेझ राबविणार नाही असे स्पष्टपणे सांगितले होते. आज जागतिकीकरणाच्या नावाखाली जो विकास दाखविला जातो तसे प्रत्यक्षात होत नाही असे लक्षात आले. धुळे, नंदुरबार सारख्या ठिकाणी पवन उर्जा-वीजनिर्मिती प्रकल्पांची मालकी ही श्रीमंतांची होती व त्यासाठी इथल्या गरीब जनतेचे जगण्याचे साधन मात्र काढून घेतले जात होते. ही सर्व परिस्थिती लक्षात घेतली तर येथून पुढील राजकारणात जो सत्ताधारी पक्ष शेतकरी-असंघटितांच्या बाजूची ध्येयधोरणे राबविल तो पक्ष बहुसंख्य मते घेऊन निवडून येईल.

विविध योजना, उपक्रम राबविताना सरकार कोणत्या बाबीस प्राधान्यक्रम देते ह्यावरून त्यांच्या धोरणांची फलनिश्चिती काय होईल, ह्याबाबतचे भाकीत करता येऊ शकते. उदा. जलनीतीचे धोरणातील प्राधान्यक्रम तसेच धान्यापासून दारू बनविण्याचे धोरण इ. बाबत मूल्यमापन करणे आवश्यक आहे. आज दारूपासून सरकारला २१ हजार कोटी महसूल मिळतो आहे. येथे भ्रष्टाचार सुद्धा भांडवलशाहीच्या व्यवस्थेतूनच आहे, असे दिसते. भांडवलशाहीतून चंगळवादही येतो आणि केवळ नफ्यासाठी व्यवहार करताना भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणावर होतो. एके काळी नाचणाऱ्या बायांनी नाचावे व मला पैसे द्यावे ह्यातून मला बळ मिळणार नाही, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगत असत. चळवळी किंवा लढे उभारण्यामागे मोठे तत्त्वज्ञान दिसून येते. आंबेडकरवादाने स्त्रियांना आंदोलनात सहभागी करून घेतले. मार्क्सवाद्यांनी मात्र क्रांतीनंतर महिलांचे प्रश्न आपोआपच सुटेल, अशी अपेक्षा व्यक्त केली. स्त्रियासुद्धा कामगारच आहेत, त्यांचे प्रश्न वेगळे, स्वतंत्र असे नाही. स्त्रियांच्या जाती अत्याचाराबाबतच्या लढ्याला मार्क्सवाद्यांनी कधी प्राधान्य दिलेच नाही. एवढेच नव्हे तर मार्क्सवादी दृष्टिकोनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे क्रांतिकारक नव्हतेच.

भारतातील कम्युनिस्टांनी गरिबांची चळवळ हाताळली असती तर आंबेडकरवादाचा विरोध असण्याचे काही कारण नव्हते. प्रा. कसबे ह्यांनी असा आरोप केला आहे की,

कम्युनिस्टांना आंबेडकरांचा विरोधा होतो तो कम्युनिस्ट जातिसंस्थेचा विचारच करीत नाहीत म्हणून. शरद पाटील ह्यांची प्रा. कसबे ह्यांच्या लिखाणाचा संदर्भ देऊन भारतात आंबेडकरवाद्यांचा मार्क्सवाद्यांना विरोध का आहे ह्याचे विश्लेषण केले आहे.[१४] निसर्ग, मानवी अस्तित्व, मानवी समाजाची जडण-घडण व मानवाचा इतिहास ह्याबाबतचा उलगडा मार्क्सवादी विचाराने केला आहे. ही बाब मात्र उल्लेखनीय आहे. मार्क्सवादही एक विशिष्ट विचारसरणी असून ती सर्वांना परिचित आहे. खरे तर मार्क्सवादी विचारसरणी ही विशिष्ट प्रकारची असली तरी प्रा. शरदपाटील यांच्या मते ती विचारसरणी इतर विचारसरणीशी समन्वय साधू पाहत नाही. ती मानवी अस्तित्वाविषयी समग्र दर्शन म्हणून अपुरी पडते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलित चळवळीचे विश्लेषण सुरू झाले. यात आंबेडकरांच्या बरोबर कार्ल मार्क्सचे नाव ही पुढे आले. आंबेडकरवादी नेते, कार्यकर्ते आणि समर्थक जातींच्या किल्ल्यातच राहणे पसंत करीत होते. ते वर्गीय भूमिकेच्या विरुद्ध होते. दलित पँथरच्या निमित्ताने आंबेडकरवादी विचारांमध्ये वर्गाचा विचार सुरू झाला. त्यामुळे दलित पँथरचे नेते मार्क्सवादी आहेत का? अशीही टीका झाली. दलित पँथरने कम्युनिस्ट चळवळीबाबत स्वीकारलेली विचारसरणी आंधळी होती, अशीही टीका झाली होती. तत्कालीन परिस्थितीत माणसे माणसाला गुलाम करू शकतात. कारण गुलामगिरीवर उभी असणारी समाजव्यवस्था त्यांच्या पाठीमागे समर्थपणे उभी असते. ह्या वास्तवाला अनुकूल असे दलित साहित्यही निर्माण झाले. ह्या दलित साहित्यामुळे जातीमर्यादांनी कुंठित झालेली चळवळ व्यापक होण्यासाठी मदत झाली. अशा साहित्यिकांना मार्क्सवादी म्हणून छेडले जाऊ लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मृत्यूनंतर पहिल्या १० वर्षात कार्ल मार्क्सचे नाव घेणे पाप मानले जात होते. १९६० ते ७० ह्या दशकात दादासाहेब गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली जनतेने भूमिहीनांचा सत्याग्रह केला. ह्यावरही मोठ्या प्रमाणात टीका झाल्याचे दिसून येते. दलित चळवळीमध्ये मार्क्सवाद आणि मार्क्सचे नाव घेणे अस्पृश्यासारखे असले तरी बाबासाहेबांनी काठमांडू येथे 'बौद्ध धर्म आणि साम्यवाद' ह्या

विषयावर जे भाषण दिले ते नंतर बुद्ध की मार्क्स ह्या नावाने ओळखले जाऊ लागले. १९५६ च्या भाषणाचा संदर्भ त्यांच्या मृत्यूनंतर आजपर्यंत घेतला जातो. आजचे समाजकारण व राजकारण बुद्ध की मार्क्स ह्या विषयाभोवती फिरताना दिसते. खरे तर हा विषय अतिशय व्यापक आहे. डॉ. रावसाहेब कसबेंच्या मते, बौद्ध धर्माच्या विनाशाची प्रक्रिया थांबवण्यासाठी तर त्याला साम्यवाद हा पर्याय असू शकतो, हे पटवून दिले पाहिजे. जगात पिळवणूक आहे ह्या सिद्धांतापासून साम्यवाद सुरू होतो. ह्या जगात श्रीमंत लोक आपल्या संपत्तीच्या साहाय्याने सामान्य जनतेला गुलाम करतात व त्यांची पिळवणूक करतात. गुलामीमुळे सामान्य जनता दु:खी आणि दरिद्री होते,ह्यालाच मार्क्स पिळवणूक असा शब्द वापरतो आणि पिळवणुकीपासूनच मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा आरंभ होतो. खासगी मालमत्ता नष्ट केल्याने ही पिळवणूक थांबेल त्यामुळे कोणालाही खासगी मालमत्ता असू नये, असे मार्क्स म्हणतो.

कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानानुसार श्रमिक अतिरिक्त मूल्य आपल्या श्रमातूनच निर्माण करतात. परंतु त्यावर श्रमिकांची मालकी राहात नाही. त्याऐवजी कारखानदारांची मालकी प्रस्थापित होते. म्हणजेच मजुरांनी आपल्या मजुरीने निर्माण केलेल्या अतिरिक्त किंवा वरकड मूल्यांचा उपयोग मालकच करतो. ती मालकाची खासगी मालमत्ता मानली जाते. ह्यावर उपाय म्हणून संपत्तीची मालकी राज्याची असली पाहिले असे करण्यासाठी राजकीय सत्ता ही श्रमिकांच्या हातात असली पाहिजे. असे कार्ल मार्क्स म्हणतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कार्ल मार्क्सच्या कामागरांच्या आदिसत्तेबाबात अधिक स्पष्टीकरण आपल्या भाषणात केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वरीलप्रमाणे मार्क्स ने मांडलेली आधार सूत्रे ह्याबाबत विचार मांडताना तो कार्ल मार्क्सच्या तत्त्वाज्ञानाचा मुलाधार आहे असे म्हणतात. गौतम बुद्धांनी सुद्धा ह्या जगात दु:ख आहे असे म्हटले मात्र मार्क्सप्रमाणे त्यांनी पिळवणूक शब्द वापरलानाही. बुद्धांचे दु:ख आणि मार्क्सची पिळवणूक ह्या दोन्ही संकल्पना एकाच अर्थाने वापरलेल्या आहेत. दोन्हींचे नवे

रूप उलगडून दाखविण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बुद्ध आणि त्यांचा धम्म ह्या ग्रंथाला विशेष महत्त्व आहे.

वरील दोन्ही विचारवंतांच्या म्हणन्याचा अर्थ अधिक विस्तृत स्वरूपात चिकित्सक पद्धतीने समजून घेतल्यास असे निदर्शनास येते की, कामगारांची पिळवणूक थांबवायची असेल तर उत्पादनाच्या साधनांची मालकी राज्याकडे असली पाहिजे.सर्व कारखाने जमीन आणि संपत्ती राज्याच्या मालकीची असली पाहिजे. असे झाले तरच श्रमिकांनी निर्माण केलेल्या नफ्यात कारखानदारांना वाटा घेता येणार नाही. दुसऱ्या बाजूला बौद्ध संघाने आपल्या भिक्खूंसाठी निर्माण केलेल्या नियमांमध्ये भिक्खूला खासगी मालमत्ता असूनही ती त्यांनी बाळगू नये. यातील खासगी मालमत्ता नाकारणे हे साम्यवादाचे सार असू शकते. मात्र कम्युनिस्ट नेते साम्यवादाच्या निर्मितीसाठी हिंसेचा मार्ग अनुसरतात ह्याच ठिकाणी बुद्ध आणि मार्क्स म्हणजेच आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद ह्यांच्यामध्ये मतभेद आहेत. तसेच कार्ल मार्क्स ने धर्माला अफूची गोळी मानले. मात्र गौतम बुद्धांनी धम्माला विशेष महत्त्व दिले.

भांडवलशाही व्यवस्थेत उत्पादनाची साधने खासगी मालकीची असतात. परिणामी पिळवणूक दिसून येते. भांडवलशाहीमध्ये भांडवलदार आणि कामगार असे परस्पर विरुद्ध दोन वर्ग ठळकपणे दिसून येतात. मार्क्सच्यामते या दोन वर्गात सातत्याने संघर्ष दिसून येतो. कामगाराला स्वत:ची अशी संपत्ती नसते. त्यामुळे तो अधिक दरिद्री होतो. भांडवलदारांच्या हातात पोलीस, सैन्य असल्याने कामगारातील संघर्ष मोडून काढण्याची एक ताकद असते. कामगारांच्या जीवनातील दु:ख, दारिद्र्य कायम ठेवण्याचे एक साधन म्हणून राज्ययंत्रणेचा भांडवलदार वर्ग वापर करून घेतात. त्यामुळे कामगारांना उठाव करावा लागतो. अशी क्रांती करताना हिंसा अटळ असते, असे मार्क्सवादी तत्त्वज्ञान सांगते. आंबेडकरवादी तत्त्वज्ञान आणि मार्क्सवादी तत्त्वज्ञान ह्यांच्या एकमेकांविरुद्धच्या भूमिकेमुळे कामगारवर्गाचे प्रश्न सुटत नाही व त्याचा परिणाम कामगार जीवनावर होतो ही परिस्थिती निर्माण झाली होती. तत्कालीन

परिस्थितीत दलित कामगार आणि दलितेतर कामगार असा फरक केला जात असे. दलित कामागारांच्यासाठी कम्युनिष्ट आणि दलितेतर कामगारांसाठी आंबेडकरी विचारवंत व कार्यकर्ते धावून पुढे येत नव्हते. त्यांच्यातील तेढ कमी होत नव्हती. जोपर्यंत ही तेढ कमी होत नाही, तोपर्यंत कामगारांना न्याय मिळणार नाही.

१९०२ साली प्रकाशित झालेल्या 'दि इकॉनॉमिक इंटरप्रिटेशन ऑफ हिस्टरी'ह्या पुस्तकात लेखक आर. ए. सेलिंग्नम यांनी मार्क्सवादी विचारातील महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकला आहे. त्यांच्या विचारांचा प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरपडला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक प्रवासाची सुरुवात त्यांनी १९१६ साली डॉ. गोल्डन पेझर ह्यांच्या सेमिनारमध्ये वाचलेल्या भारतातील जातिसंस्था, तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास शोधनिबंधापासून झाली. भारतीय इतिहासाच्या दृष्टीने केलेले अतिशय मौलिक मार्क्सवादी भाष्य आहे. संपूर्ण जगाचा इतिहास हा वर्गीय इतिहास आहे आणि भारत त्याला अपवाद नाही. त्यांची बंदिस्त वर्गाची कल्पना, मनुस्मृतीबाबतचे विश्लेषण हे भारताच्या इतिहासाबद्दल मार्क्सवादी आकलन आहे.[१५] भारतातील कामगार वर्ग गरीब आणि श्रीमंत ह्याबरोबरच जातीय भेदभाव पाळतो. श्रीमंत वर्गाच्या विरुद्ध सर्व जातींना एकत्रित आणणारा दुवा कोणता आहे. क्रांती झाली तरी भारतात भारतीय समाजव्यवस्थेने निर्माण केलेल्या जातिव्यवस्था, उच्चनीचता, स्त्री-पुरुष भेदभाव, शुद्ध-अशुद्ध ह्या कल्पना ह्यासारख्या प्रश्नांना तोंड द्यावेच लागेल. हे सामाजिक प्रश्न सोडविल्याशिवाय भारतात क्रांती होऊ शकला नाही.[१६]

समन्वयीदृष्टिकोनातून वरील चर्चेकडे पाहिल्यास आपण आज जी लोकशाही स्वीकारली आहे. ती खासगी उद्योगधंद्यावर उभ्या असणाऱ्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केलेली राज्यव्यवस्था आहे. ह्याबाबत डॉ. कसबे ह्यांनी आपल्या आंबेडकर आणि मार्क्समध्ये उल्लेख केल्याप्रमाणे ह्या राज्यव्यवस्थेत आंबेडकरांच्या मते जमीनदारांना खंड वाढविण्याचे आणि भांडवलदारांना मजुरीचे तास वाढविण्याचे मुक्त स्वातंत्र्य असल्याने सामान्य शेतमजूर आणि कामगार लोकशाहीतील

स्वातंत्र्याला पारखे होतात. स्टेट्स ॲण्ड मायनॉरिटिज मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विवेचनावरून मूलभूत स्वरूपाचे उद्योगधंदे राज्याच्या मालकीचे असावे तसेच अनेक उत्पादन साधनांचा उल्लेख करून ती साधने राज्याच्या मालकीत यावी परंतु ह्याचा एक दुष्परिणाम असा होईल की हुकूमशाही अधिक घट्ट होण्यास मदत होईल म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यसमाजवादाची संकल्पना दिली. तर तसेच कामगारांच्या हुकूमशाहीऐवजी संसदीय लोकशाही पर्याय सुचवितात.

कामगारवर्ग हा जातीच्या मध्ये पूर्णत: गुरफटला गेला आहे. त्याला वर्गजाणीव राहिलीच नाही. त्यांच्या राज्यसमाजवादामध्ये संसदेतील श्रीमंत लोकांकडून अर्थसत्ता काढून घ्यायची होती. लोकशाहीच्यानावाने भांडवलदार जमीनदारांच्या युतीची हुकूमशाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना नको होती. जातीचा आधार घेऊन कामगार चळवळी निर्माण होत असल्याने जाती मोडलेल्या घटकाला त्या आकर्षित करू शकत नाही म्हणून डॉ.कसबेंच्या मते मार्क्सचे विचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची दृष्टी ह्यांच्या समन्वयी शक्तीतून कामगार वर्गाचे प्रश्न सुटतील आणि समाजाची पुनर्रचना होऊ शकते. ह्या पुनर्रचनेच्या चर्चेआधी मार्क्सवादी, आंबेडकरवादी तत्त्वज्ञानांनी रोजगार प्रश्नांची चर्चा केली. मात्र ती मीमांसा किंवा चर्चा अपुरी होते कारण ती वर्गीय दृष्टिकोनातून किंवा जातलक्ष्यी दृष्टिकोनातून केली. रोजगार प्रश्नांची चर्चा करताना ती चर्चा स्त्रीवादी दृष्टिकोनातून तुरळकच झाली. स्त्री कामगाराची चर्चा करताना स्त्रियांचे शोषण जातिव्यवस्था, पुरुषसत्ता, वर्गव्यवस्था ह्यांनी केले व तिहेरी बेड्या स्त्री कामगाराच्या पायात घातल्या गेल्या. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद ह्यांच्या समन्वयी दृष्टिकोनातून स्त्री कामगार वर्गाकडे एका वेगळ्या दृष्टीने पहावयास सुरुवात झाली. रोजगाराची चर्चा करताना भारतातील कामगार वर्गाच्या पायात जखडलेल्या बेड्यांचा कच समन्वयी विचाराने जरा सुटतो. मार्क्सवादाने कामगाराला जात असू शकते ही शक्यता नाकारली. त्याला वर्ग असतो. कारखानदारांचा वर्ग कामगार वर्गावर सातत्याने अन्याय करतो, असे असले तरी कामगार

वर्गामध्ये जाती आहेत. जातींवरून वर्गभेद निर्माण झाले आणि कामगारांमध्येच एकजूट राहिली नाही. जातीजातींवरून निर्माण होणाऱ्या भांडणांमुळे कामगारांत वर्ग निर्माण झाले वर्ग एवढे प्रबळझाले की, एक वर्ग दुसऱ्या वर्गाविरुद्ध धोरण तयार करतो. मार्क्स-आंबेडकरवादी समन्वयी विचाराने कामगारांबाबत उत्पादन प्रक्रियेतील एक पिळला जाणारा घटक, कष्टकरी वर्ग, विशिष्ट जातीचा घटक म्हणून विचार करायला समन्वयी दृष्टिकोनामुळे मार्ग मोकळा झाला. हुकूमशाही मार्गाने श्रमिकांचे प्रश्न सोडवून घेण्याऐवजी संसदीय पद्धतीने त्यावर मार्ग काढला पाहिजे. थोडक्यात रावसाहेब कसबे, शरद पाटील ह्यांनी आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद ह्या दोन तत्त्वज्ञानांचा सुयोग्य मेळ घालून इतर प्रश्नांबरोबर रोजगार प्रश्नांची देखील चर्चा केली. ह्यापूर्वी मार्क्सवादी विचारवंतांनी आंबेडकरवादाकडे केवळ शिष्टाचार म्हणून पाहिले असे दिसते. शरद पाटील ह्यांनी मात्र मार्क्सवाद-फुले आणि आंबेडकरवादाला सबळ पुरावे देऊन एकत्र आणले आणि त्याला एक तात्त्विक स्वरूपाचे अधिष्ठान दिले. मूळची ह्या विचारांना एकत्र आणण्याची संकल्पनातशी सर्वप्रथम डॉ. रावसाहेब कसबे ह्यांचीच होती. परंतु सूत्रबद्ध मांडणी मात्र शरद पाटील ह्यांनी केली.

पारंपरिक अन्वेषण पद्धती मार्क्सवादी आणि आंबेडकरवादाबाबत एक प्रवाही स्वरूपाची दिसून येते. मार्क्सवादामुळे आंबेडकरवादाला एक ऐतिहासिक पद्धतीने अभ्यासता आले. रोजगारा प्रश्नांची चर्चा करताना ऐतिहासिक पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणात झाला. मार्क्सवाद आंबेडकरावादाच्या समन्वयातून जातिअंताच्या प्रश्नाबरोबर रोजगार, अन्याय पिळवणूक ह्या प्रश्नांकडे एका वेगळ्या दृष्टिकोनातून पाहण्याची दृष्टी मिळाली. रोजगाराची चर्चा करताना मार्क्सवादी तत्त्वज्ञानाने कामगारांबाबत, त्यांच्या पिळवणुकीबाबत कामगार, कारखानदार, वरकड मूल्य, ऐतिहासिक भौतिकवादी विश्लेषण, आर्थिक कारणांमुळे होणारी सामाजिक घडोमोड इत्यादी सर्व बाजूंनी विचार करताना त्याला भारतीय समाजाचे वर्ण-जाती, संदर्भ जसे समजून घ्यावयास हवे होते तसे ते मार्क्स-आंबेडकरसमन्वयी तत्त्वज्ञानामुळे खोलवर जाऊन अभ्यासता

आले अगदी कामगारांनी राज्याची सत्ता हातात घ्यायला हवी हे खरे असले तरी ती सत्ता हाती घेताना लोकशाही पद्धतीने हाती घ्यावी असे आंबेडकरवाद सांगतो. कॉ. शरदपाटील स्पष्ट म्हणतात की, स्त्री सत्ताक गणसमाज प्रिमिटिव्ह कम्युनिझमचा पाया आहे. भारतात मार्क्सवादाचा प्रचार प्रथम ब्राह्मणांनी केला. त्यामुळेच तर तो पोथीनिष्ट बनला. भारतीय समाजात वर्ग नव्हे तर जात पायाभूत घटक असल्याने श्रमिकांच्या प्रश्नांकडे पाहताना देखील ह्या परिस्थितीची सतत जाणीव ठेवावी लागते.[१७]

श्रमिकांमधील जातीयता मोडीत काढण्यासाठी मार्क्सवादी विचारवंत, कार्यकर्ते पुढे येत नाही. मार्क्सवाद्यांचे सामाजिक भेदभाव आणि अस्पृश्यता ह्यांच्याविरोधी कारवाया करताना फारसे योगदान नव्हते. परंतु मार्क्स-आंबेडकरांच्या समन्वयामुळे हे शक्य झाले आहे. कामगारांबाबतचे अनुकूल धोरण ठरविणे त्यामुळे शक्य झाले आहे. सर्वंकष परिवर्तन होऊन समन्वयाबाबतची सैद्धांतिक मांडणी आज ह्यामुळेच शक्य झाली आहे. समन्वय साधला गेल्यामुळे कॉ. शरद पाटील ह्यांच्यासारखे ध्येयवादी नेते दलित बांधवांच्या प्रश्नांसाठी तुरुंगात जाऊन आले.

भारतीय समाज वास्तव इतके भीषण आहे की, मार्क्सवादआणि आंबेडकरवाद ह्यांचा मेळ घालून एक नवा विचार समन्वयवाद पुढे आला. ही एक विचारप्रणाली म्हणून अभ्यासली तर रोजगाराबाबतचे प्रश्न सुटल्यास वेळ लागणार नाही. भारताचा इतिहास व समाजव्यवस्था ही केवळ मार्क्सच्या सिद्धांताने समजून घेता येणार नाही तर आंबेडकरवादी दृष्टिकोनातून जातिव्यवस्था समजून घ्यावी लागते. म्हणजेच समन्वयी दृष्टिकोनातून रोजगार प्रश्नाकडे पाहिल्यास सैद्धांतिक चिकित्सा करणे सोपे जाते.

**संदर्भटीपा:**

१. श्रीवास्तव सतीश, भारतीय अर्थव्यवस्था समस्या व भवितव्य, डायमंड पब्लिकेशन, पुणे, जून २०१३ प्रथम आवृत्ती.

२. रणसुभे सूर्यनारायण, मार्क्सवादाचेआजच्या काळातील महत्त्व, पान नं. २४.

३. कारखानीस सरला, (अनु.) मार्क्स-एंगेल्स-लेनिन यांचे भारतावरील लेख, लोकवाङ्मय गृह मुंबई, पृ.क्र. १५.

४. रणसुभे सूर्यनारायण, मार्क्सवादाचे आजच्या काळातील महत्त्व, पान नं. २४.

५. मार्क्स कार्ल, वेज लेबर ॲण्ड कॅपिटल, १८४९ डॉ. रावसाहेब कसबे ह्यांचे संग्रहातून.

६. सावतं प्रसाद, मार्क्सवादाची गोष्ट- भाग १, पुरोगामी शिक्षण मंडळ, प्र.आ. मे. २००७. पृ.क्र. ३०.

७. मुणगेकर भालचंद्र, भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित एक आंबेडकरी दृष्टिकोन, सुगावा प्रकाशन, पुणे, २री आ., मार्च २०१२.

८. मुणगेकर भालचंद्र, भारतातील आर्थिक सुधारणा आणि दलित एक आंबेडकरी दृष्टिकोन, सुगावा प्रकाशन, पुणे, २री आ., मार्च २०१२.

९. तत्रैव पृ. क्र. २१.

१०. डाहाट धनराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार खंड - ३, संकेत प्रकाशन नागपूर, दुसरी आवृत्ती, २००९, संपादकीमधून.

११. तत्रैव पृ. क्र.

१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषण दि. १२ व १३ फेब्रुवारी १९३८, मनमाड कामगार परिषद.

१३. परदेशी प्रतिमा, जात आणि स्त्री शोषण हिंदू कोड बील ते ऑनर किलिंग, कॉ. शदर ढमाले, दिग्नाग प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, डिसेंबर २०१३.

१४. पाटील शरद, मार्क्सवाद व फुले-आंबेडकरवाद, पान नं. १३०.

१५. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ३११.

१६. तत्रैव पृ. क्र. ३११.

17. शरद पाटील, प्रिमिटिव्ह कम्युनिझम, मातृसत्ता,स्त्रीसत्ता, आणि भारतीय समाजवाद, मावळाई प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, २०१२.

प्रकरण सहावे

# मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांच्या परिप्रेक्ष्यातून शिक्षणविषयक प्रश्नांची चिकित्सा

६.० प्रस्तावना

६.१ शिक्षणाचे महत्त्व

६.२ पारंपारिक व भारतीय शिक्षण

६.३ कार्ल मार्क्स आणि शिक्षण

६.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन

६.५ मार्क्स-आंबेडकर समन्वयवादी विचार आणि शिक्षणविषयक समस्यांची चर्चा

प्रकरण सहावे

# मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांच्या परिप्रेक्ष्यातून शिक्षणविषयक प्रश्नांची चिकित्सा

## ६.० प्रस्तावना :

भारतीय शिक्षणाचा इतिहास पाहिल्यास असे दिसून येते की, प्राचीन व मध्ययुगीन काळापासून समाजातील काही घटक शिक्षणापासून वंचित राहिले आहेत. महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलितांच्याआणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी आग्रह धरला होता. अन्याय झालेल्या घटकांना न्याय देण्यासाठी भारतीय स्वातंत्र्यानंतर मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्यात येऊ लागले. विविध आयोगांनी शैक्षणिक सुधारणेसाठी महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. १९९१ साली नेमलेल्या रेड्डी समितीने शिक्षणाचा दर्जा आणि सार्वत्रीकरण ह्यांना गती देणाऱ्या बाबींचा उल्लेख केला होता.

अमेरिका, इंग्लंड व युरोपियन देशांचे लक्ष भारतासारख्या विकसनशील देशांकडे गेले. भारतातील आरक्षण, कल्याणकारी योजना आणि आर्थिक निर्बंध ह्या देशांना अडथळे वाटू लागले. खुल्या आर्थिक धोरणाचा पुरस्कार करून आर्थिक बंधने शिथिल केली व बाजारपेठही सर्वांसाठी खुली केली ह्या परिस्थितीमध्ये शिक्षणामध्येही मोठे फेरबदल केले. ह्याचा परिणाम असा झाला की केंद्रसरकार बरोबरच राज्य सरकारही शिक्षण प्रक्रियेतून बाहेर पडू लागले. आपापली जबाबदारी झटकून द्यायला सुरुवात केली. परिणामी अखिल स्त्री वर्ग, दलित वर्ग, बहुजन समाज, अल्पसंख्यांक वर्ग ह्या उपेक्षित वर्गांची वाताहत सुरू झाली. असे झाल्याने समाजाचा वैचारिक गोंधळ मोठ्या प्रमाणात झाला. एवढेच नव्हे तर कोणती विचारसरणी

स्वीकारावी, आपल्या विकासास अनुकूल कोणता विचार आहे. ह्याबाबत संभ्रमावस्थेत आजचा समाज आहे.

## ६.१ शिक्षणाचे महत्त्व :

भारतीय स्वातंत्र्याच्या ६५ वर्षांनंतरही देशात प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च शिक्षणातही ज्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यातील मुख्य समस्या अशीकी, आज ज्यांच्याकडे पैसा आहे तोच चांगले शिक्षण घेऊ शकतो. भूमिहीन बेरोजगार, मागासवर्गीय समाजाला शिक्षण घेताना कल्पना करता येणार नाही, अशा तीव्रतेने अनंत समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

जागतिकीकरणामुळे शिक्षण क्षेत्राला उद्योगाचे स्वरूप प्राप्त झाले. त्याचा दुष्परिणाम म्हणून शिक्षण आज महाग झाले आहे. सामाजिक बरोबरच आर्थिक क्षेत्रात दुबळा असणारा मागास घटक त्यात सर्व स्त्रियांचाही समावेश होतो, हा घटक शिक्षणपासून अलग होत आहे ही मोठी समस्या आणि आव्हान भारतासारख्या विविधतेने नटलेल्या विकसनशील देशापुढे आहे. भारतात एके काळी स्त्री आणि दलित बहुजन वर्गाला शिक्षण घेण्यास बंदी होती. परंतु संविधान निर्मितीनंतर भारतातील जात, धर्म, भाषा, संस्कृती, लिंग, सामाजिक आर्थिक स्थिती लक्षात न घेता सर्वांना सामूहिक शिक्षण मिळू लागले. अर्थात ह्यातील काही बाबी मात्र व्यवहारात उतरल्या नाही. अजूनही बहुजन समाज पैशाअभावी स्टॅंडर्ड शिक्षण घेऊ शकत नाही. ह्या घटकांना व्यवस्थेपासून दूर ठेवण्याचे हे षड्यंत्र आहे.

ग्रामीण आणि शहरी भागातील समाजाच्या शिक्षणाची अवस्था पाहिली तर ह्या देशात सामाजिक न्याय, समता या संवैधानिक कल्पनांना अर्थ आहे का? हा प्रश्न उद्‌भवतो. तळागाळातील दलित, गरीब, ग्रामीण समाज शिक्षणापासून वंचित राहतो आहे. भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास करत असताना शिक्षण ह्या घटकाला दुय्यम ठरवून ह्या समाजाचा अभ्यास करता येणार नाही. भारतामध्ये दारिद्र्य असण्याच्या सामाजिक कारणांमध्ये एक प्रमुख

कारण सांगता येते, ते म्हणजे समाजाच्या बदलत्या गरजानुसार शिक्षण उपलब्ध होत नाही. भारतात ब्रिटिश राजवटीत सुरू झालेले कारकुनी स्वरूपाचे शिक्षण आजही शिकविले जाते. त्यामुळे दारिद्र्यात असणाऱ्या घटकांची आकडेवारी, टक्केवारी कमी होत नाही. उद्योगक्षेत्रातील कामगार वर्ग तर अतिशय पिळला जात आहे. त्यांना कामगार म्हणून काय अधिकार आहेत ह्याचीच जाणीव कारखानदार होऊ देत नाही व त्यांनाही त्यात उत्सुकता राहिली नाही हे सर्व शिक्षणामुळेच शक्य होईल. शिक्षणामुळेच इथल्या निवडक कामगारांना आपल्याला मिळालेले अधिकारांची जाणीव होते व कारखानदारांच्या अन्यायाची जाणीवही होते. अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाची जाणीव फक्त शिक्षणामुळेच होते. समाजामध्ये शैक्षणिक क्रांती झाली तरच सामाजिक आणि आर्थिक संरचनेत बदल घडून येतील. भारतीय राजकीय व्यवस्थेसमोर प्राचीन काळापासून आणि आधुनिक काळात लोकशाहीसमोर 'शिक्षण'या घटकांबाबत मोठे आव्हान उभे राहिले आहे.

### ६.२ पारंपारिक व भारतीय शिक्षण :

भारतातील चातुवर्ण्य परंपरेत शिक्षण व्यवस्थेवर ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी होती. बहुजन समाज आणि स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कायमची बंद होती. ब्राह्मण वर्गाने अखिल स्त्री वर्गाला गुलामीत ठेवून सुमारे पाच हजार वर्षापासून शिक्षणापासून वंचित ठेवले होते. १९ आणि २० व्या शतकात ही परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणावर झाला मनुस्मृतीच्या काळात ब्राह्मणांखेरीज इतरांनी शिक्षण घेतले तर कठोर शिक्षा करण्यात येत होती. एवढेच नव्हे तर वेद घोष ऐकला तर कानात रस ओतला जात होता. तशा प्रकारचे त्यावेळी कौन्सिलचे ठराव देखील झाले होते. १९ व २० व्या शतकातील प्रबोधन काळात म. फुले, सावित्रीबाई फुले, छ. शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, जे.पी. नाईक इत्यादी समाजसुधारकांच्या प्रयत्नांतून अस्पृश्य वर्गाला आणि स्त्री वर्गाला शिक्षण देण्यास सुरुवात झाली. यांच्या कार्याची प्रेरणा घेऊन मग महर्षी धोंडो केशव कर्वे आणि तत्सम पुरोगामी सुधारकांनी शिक्षण कार्याला महत्त्व दिले. ब्रिटिशांच्या आगमनामुळे मात्र सामाजिक शिक्षण

घेण्याचीसंधी भारतीय समाजाला मिळाली. भारतातील एक स्त्री शिकली तर तिची पुढची पीढी वाचू शकते हे ओळखून समाजातील वाईट प्रथा परंपरा मोडण्याची क्षमता असणाऱ्यांमध्ये फुले दांपत्याचा समावेश होतो. मनुस्मृतीला विरोध करून शिक्षणव्यवस्था आधुनिक बनविण्यासाठी त्यांच्या शैक्षणिक कार्याची उल्लेखनिय दखल घेता येते. समाजातील जातियता नष्ट करून दलित बहुजन समाज शिकला पाहिजे. यासाठी शाहू महाराजांचे कृतीयुक्त उपक्रम व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान उल्लेखनीय आहे.

आधुनिक काळातील शिक्षणपद्धतीमध्ये राष्ट्रीय शिक्षणाच्या नावाखाली चुकीचे ऐतिहासिक संदर्भ देवून हिंदूत्व हेच राष्ट्रियत्व हे सिद्ध करण्याचा प्रयत्न चालू आहे. परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे असे मानल्यास वैचारिक परिवर्तन करण्याचा आटोकाट प्रयत्न सध्याच्या स्थितीत चालू आहे. मात्र तो फसवा आहे. इतर मूलभूत गरजांपेक्षा शैक्षणिक गरज अत्यंत महत्त्वाची आहे. प्रचलित शिक्षण पद्धतीतून जातनिरपेक्ष, धर्मनिरपेक्ष असा समाज शिक्षण होत नसून पूर्वग्रहदूषीत माणूस तयार होत आहे. नागरिकाला जबाबदारी शिकविणारी शिक्षणप्रणाली असावी हे स्वप्न फुले दांपत्यांनी पाहिले होते. मानवी जीवनाची सर्वांगीण प्रगती होण्याच्या दृष्टीने शिक्षणप्रणाली राबविली तर शिक्षणाची फलश्रूती होईल. शिक्षण हा एक उद्योग झाला आहे. पूर्वी कारखान्यांची निर्मिती होत होती आज शिक्षणसंस्थांची निर्मिती होते. गरीब-श्रीमंत भेदभाव नष्ट करून समाज विशिष्ट वैचारिक पातळीवर येऊन जाण्याची क्षमता शिक्षण या घटकात हवी.

जागतिकीकरणामध्ये जे दुष्परिणाम दिसतात त्यांनी शिक्षणक्षेत्राला घेरले आहे. शिक्षणाला पूर्णपणे क्रयवस्तू मानले आहे. शिक्षणाचा उदात्त दृष्टिकोन जाणून घेतल्याशिवाय मार्क्स-आंबेडकर विचारांना पायाभूत मानून निर्माण होणारी नवीन विचारसरणी समन्वयीविचार समजणार नाही आणि समन्वयवादाचा उद्देशही साध्य होणार नाही. थोडक्यात शिक्षणाच्या आधारेच समाजातील कामगारांचे समाजातील जातीयतेने होरपळलेल्या घटकांचे दु:खी कमी होईल.

### ६.३ कार्ल मार्क्स आणि शिक्षण :

२० व्या शतकात मार्क्सवादही प्रमुख राजकीय विचारसरणी होती. ह्याबाबतचे निरीक्षण असे की, ह्या विचारसरणीबाबत अत्यंत खोल असे चिंतन मार्क्सवादी विचारांच्या समर्थकांनी व विचारवंतांनी केले. उत्तर मार्क्सवाद्यांचा विचार सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि शैक्षणिक परिवर्तनाच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. कामगारांनी उत्पादनाचेच काम करावे की कामगार वर्गाची प्रगती होण्याच्या दृष्टीने त्यांनी नवीन पद्धतीचे ज्ञान आत्मसात करावे ह्याबाबतची चिकित्सा महत्त्वाची आहे. मानवी स्वातंत्र्य, स्वातंत्र्याचे स्वरूप, स्वातंत्र्य आणि पिळवणूक ह्यांतील संबंध ह्याबाबतची जागृती फक्त आणि फक्त शिक्षणामुळेच होऊ शकते. शिक्षण औपचारिकबरोबरच अनौपचारिक सुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे ह्याबाबतच्या तपशिलात भिन्नताही असू शकते. मार्क्सवादी आणि उत्तरमार्क्सवादी तत्त्वविचारांची मांडणी होताना शिक्षणाबाबत कार्ल मार्क्सची भूमिका ह्या संकल्पनेचा परिचय महत्त्वाचा आहे. कारण मार्क्सच्या तत्त्वज्ञानावर रशिया व चीन ह्यासारख्या देशाच्या राजकीय व्यवस्था उभ्या राहिल्या आहेत. यामुळे ह्या तत्त्वज्ञानात नवनिर्मितीची शक्ती प्रचंड मोठी आहे, असे दिसते आणि नवनिर्मिती तेव्हाच होऊशकते, जेव्हा त्याबाबतचे ज्ञान असेल आणि शिक्षण घेण्याची वृत्ती असेल तरच ज्ञान प्राप्त होऊ शकते. कामगार, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर ह्या नाहीरे वर्गाला शिक्षण देण्यासाठी काही शिक्षणसंस्था नव्हत्या. कामगारांनी क्रांती कशी करावी हे तत्त्वज्ञान शिकविण्याचे धडे वर्गात बसून घेतले नव्हे तर ते व्यवहारातूनच त्यांना मिळत गेले.

मार्क्सवाद आणि शिक्षण हा विषय गुंतागुंतीचा आहे. कारण मार्क्स समाजवादी क्रांतीचा सिद्धांत मांडतो. ह्या सिद्धांताची मांडणी करताना त्याने मानवाची पिळवणुकीतून मुक्तता करून मानवी स्वातंत्र्याचा व मुक्तीचा विचार मांडला. अखिल कामगार वर्गाला पूर्ण मनुष्यत्त्वाचा लाभ मिळावा त्याने आपली प्रगती करावी, अशी यामागे भूमिका होती. शोषणमुक्त साम्यवादी समाजातच माणसास आपले मनुष्यत्व सिद्ध करण्यासाठी शिक्षण, त्याच्या अधिकाराचीजाणीव

ह्या गोष्टी ज्ञात होणे आवश्यक आहे. २० व्या शतकापर्यंतचा आणि त्यानंतरचा मार्क्सवाद म्हणजे प. युरोप आणि अमेरिकेत १८६० नंतर जे विविध नवमार्क्सवादी विचार मांडण्यात आले त्या विचारांत त्यांना पाश्चात्त्य देशात परिवर्तन हवे होते पण हे परिवर्तन कामगार वर्ग करू शकत नव्हता, असेत्यांचे प्राथमिक मत होते.

१९१७ च्या क्रांतीनंतर जवळजवळ ७५ वर्षांनी सोविएत संघाचे विघटन झाले आणि परिणामी पूर्ण युरोपात कम्युनिस्ट राजवटी कोसळल्या. सोविएत व्यवस्था ही संकटात आहे असे समजूनगोर्बाचेव्ह ह्यांनी पेरेस्त्रोइका आणि ग्लास्तनोस्त ही धोरणे राबवून नव्या सुधारणांचा कार्यक्रम हाती घेतला म्हणजेच त्यांनी नवीन धोरणे राबविताना ही निकड पूर्ण केली. अर्थात कार्ल मार्क्सला जसे आपल्या स्वप्नातील मार्क्सवादी व्यवस्था तंतोतंत अंमलात आणता आली नाही तसेच समाजवादी समाज स्थापन करण्याचे लेनिन, स्टॅलीन आणि माओ-त्से-तुंग ह्यांचेही स्वप्न प्रत्यक्षात उतरली नाहीत. आज जगभरातील कम्युनिस्ट राजवटी पराभवाच्या अवस्थेत आहेत. ह्याचे कारण शिक्षण दिसून येते. शिक्षणाचाच अभाव असल्याने मार्क्सच्या काळापासून आजपर्यंत समाजवाद, साम्यवाद स्थापन करण्यात अनेक अडथळे येतात, असे स्पष्ट होते.

कार्ल मार्क्स असे मानतो की, माणूस ज्यावेळी खऱ्या अर्थाने मुक्त होईल, ज्यावेळी त्यास याचे भान येईल की, आपणास मानवी जीवनाचे तत्त्व, जीवित तत्त्व साध्य करायचे आहे. हा माणूस सजीव प्राणी आहे आणि त्याने आपल्या श्रमाच्या साहाय्याने सभोवतालचे विश्व निर्माण केले आहे. माणसाची जडण-घडण भोवतालच्या भौतिक आणि सामाजिक परिस्थितीत होते. आपल्या श्रमशक्तीच्या साहाय्याने तो त्यात बदल घडवून आणतो. त्यास नवा आकार देतो. म्हणून माणसाची कृती केवळ भौतिक परिस्थितीचे प्रतिबिंब नसते. त्यात माणसाने आपल्या श्रमशक्तीच्या व बुद्धीच्या जोरावर घडवून आणलेल्या परिवर्तनाचा भाग असतो. त्यामुळे हा माणूस निसर्गापासून वेगळा नसतो. तो निसर्गाचाच भाग असतो.[१]

निसर्ग आणि माणूस यात सातत्याने संघर्ष चालू आहे. ह्या घटनेस मोठा इतिहास आहे. माणूस आपल्या बुद्धीच्या जोरावर निसर्गावरमात करण्याचा सातत्याने प्रयत्न करत आला आहे. माणसाकडे इतर प्राणिमात्रापेक्षा बुद्धी हा घटक जास्तीचा आहे. तो आपल्या बुद्धीच्या ताकदीवरनिसर्गाचे नियम सातत्याने मोडण्याचा प्रयत्न करत आहे. मार्क्सने वरील परिस्थितीचे वर्णन केले परंतु ही एक प्रक्रिया आहे. मानवाची शिकण्याची, निसर्ग जाणून घेण्याची ही प्रक्रिया होय. माणसाची जाणीव आणि आत्मभान ज्या प्रक्रियेमधून जागृत होते ती शिक्षणाचीच प्रक्रिया आहे. निसर्गाला शिक्षणाच्या या प्रक्रियेतूनच माणसाने जाणून घेतले व शिक्षणाच्याच प्रक्रियेद्वारे माणूस आणि निसर्ग यात एक प्रकारची एकात्मता निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे.

माणूस एक सजीव प्राणी म्हणून शिक्षणाद्वारे एक स्वत:चे विश्व निर्माण करत असतो. कार्लमार्क्सने हे सर्व शिक्षण प्रक्रियेद्वारे होते असे स्पष्टपणे म्हटले नसले तरी निसर्गाला समजून घेताना तसेच निसर्ग विरुद्ध माणूस ह्या संघर्षामधूनही सर्व परिस्थितीचे आकलन करून घेतले. श्रमाच्या साहाय्याने निसर्गास तो आपले विश्व मानतो आणि या प्रक्रियेतच तो निसर्गाचा भाग बनतो. एवढेच नव्हे तर कार्ल मार्क्स असे मत व्यक्त करतो की, आपल्या शारीरिक आणि बौद्धिक श्रमाच्या जोरावर माणूस निसर्गाचे मानुषीकरण करतो. मार्क्सच्या मते भांडवली अर्थव्यवस्थेत माणूस आपले स्वातंत्र्य गमावतो. तो ज्ञानाचा अभाव असल्यानेच क्रय वस्तूंचा गुलाम बनतो. श्रमविभागणी, अलगीकरण आणि परात्मभाव ह्या बाबी ज्ञानात्मक संकल्पनेनुसार श्रमिक वर्गाला अवगत झाल्या पाहिजे. पुढे मार्क्स असेही सांगतो की, शोषण नष्ट करण्यासाठी उत्पादन साधनांची मालकी राज्यसत्तेकडे असली पाहिजे. जमिनीची मालकी राज्यसत्तेकडे, उद्योगधंदे राज्यसत्तेच्या मालकीचे जेणेकरून खासगी मालकाला कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करता येणार नाही.

आजच्या काळात बुद्धवाद आणि मार्क्सवाद ह्यांचे विषयी अशी टीका केली जाते की, बुद्धवादाने हिंसेला जवळ केले नाही. मात्र मार्क्सवादाने हिंसेला स्वीकारले. ह्याचा परिणाम असा

झाला की, साम्यवाद्यांना त्वरित यश मिळाले. माणसांना ठार मारण्याचा मार्ग एकदा स्वीकारला की, आपल्याला विरोध करायला कोणीच तयार नसते. बौद्धिक, ज्ञानात्मक दृष्टिकोनातून या गोष्टींकडे पाहिल्यास बुद्धांचा मार्ग लांबचा आहे. मजूरवर्ग हिंसेचा मार्ग पत्करून आपली हुकूमशाही स्थापित करतो. अर्थात पोथीनिष्ठ मार्क्सवादी वास्तव हे सर्वसामान्य माणसाला व मजुराला समजू नये ह्याची पुरती दखल घेतात व शिक्षणाचे सर्व मार्ग त्यांचे बंद करून टाकतात. केवळ शिक्षणाचा मार्ग बंद झाल्याने हे संकट ओढवले गेले आहे. थोडक्यात कार्ल मार्क्सने राजकीय क्रांतीचे तत्त्वज्ञान मांडले होते. लेनिनने पुढच्या पिढीला शिक्षणाच्या माध्यमातूनच मार्क्सच्या तत्त्वज्ञानाची ओळख करून दिली. शिक्षणाच्या माध्यमातून मार्क्सचे तत्त्वज्ञान लेनिनने भविष्यकालीन पिढीला दिल्यानेच ह्या तत्त्वज्ञानाला जागतिक मान्यता मिळाली.

मार्क्सने सृष्टी विषयीच्या ज्ञानातून मानवाने आपला विकास साधला आहे. मार्क्सने सृष्टीविषयक ज्ञानाचा विस्तार समाजविषयक ज्ञानापर्यंत केला. त्यामुळे समाजविकासाच्या ज्ञानालाही महत्त्वआहे. त्यातून मार्क्सने ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत मांडला. मानवी ज्ञानात सृष्टी परावृत्त होते आणि सामाजिक ज्ञानात तत्त्वज्ञानिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक आणि तत्सम शिकवण परावृत्त होते.[२]

सृष्टीचे ज्ञान माणसापर्यंत पोहोचले पाहिजे असे म्हणताना ते शिक्षणाशिवाय अशक्य आहे. मग ते भलेही औपचारिक असो वा अनौपचारिक. कार्ल मार्क्सने ऐतिहासिक सिद्धांत मांडला तो समाजविकासाच्या ज्ञानाच्या जोरावरच ह्याबरोबरच वरकड श्रमांमुळे श्रमिकांचे शोषण होते. शोषणरहित समाजव्यवस्था निर्माण करावयाची तर आधी वर्ग नष्ट केले पाहिजे. आणि हे शिक्षण मिळाल्याने व ज्ञानात्मक पातळीवर श्रमिक घटकाने समजून घेतले पाहिजे. कारखानदारांची संख्या कमी असते व श्रमिकांची संख्या जास्त असते. जे संख्येने जास्त असतात, त्यांचाच विजय होतो. मात्र कामगारांना योग्य पद्धतीचे शिक्षण मिळाले. भोवतालच्या परिस्थितीची जाणीव त्यांना करून दिली तर मजुरांची संख्या जास्त असली तरी भांडवलदारांच्या

हातात राजकीय सत्ता असते आणि पोलिसी शक्तीची आधार घेऊन भांडवलदारवर्ग कामगारवर्गाचा लढा मोडीत काढतात, हे समजण्यासाठी श्रमिक वर्गाला योग्य-अयोग्य ज्ञान होणे आवश्यक आहे.

मार्क्सने तत्त्वज्ञानावर लिहिले, राज्यशास्त्र, धर्मशास्त्र तसेच साहित्य इ. विषयांवर लिखाण केले. समाजजीवनाच्या जवळजवळ सर्वच अंगांवर कार्लमार्क्सने जे लिखाण केले ते पुढच्यापिढीला संक्रमित झाले पाहिजे आणि हे ज्ञान पुढील पिढीला शिक्षणाद्वारेच हस्तांतरित होईल. वैचारिक परिपक्वता ही ज्ञानामुळेच अंगी बानली जावू शकते.

तत्त्वज्ञान व इतिहास हे विषय कार्लमार्क्सला आवडत असत. शिक्षणानंतर प्राध्यापक होण्याचे स्वप्नही त्याने पाहिले होते. प्रचंड बुद्धिमत्ता असलेल्या मार्क्सने पुढे विविध विषयांवर लिखाण केले. ज्ञानलालसा आणि अविरत परिश्रम करण्याची धडपड यामुळे भांडवलदार वर्ग आणि उद्योगपती वर्गाने कार्ल मार्क्सची पुरती धास्ती घेतली होती. ज्ञानाच्या जोरावर हे यश मिळविले होते.

'ऱ्हाइन समाचार' ह्या वृत्तपत्राचा कार्लमार्क्स संपादक बनल्यानंतरमात्र समाज जागृतीवर भर दिला. सर्वसामान्य जनतेला आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टींचे ज्ञान देणे. जमीनदारांच्या जुलूमांपासून शेतकऱ्यांना संरक्षण देण्याच्या कामात जर्मन सरकार असमर्थ ठरल्यामुळे सरकार विरोधात जागृत करण्याचे प्रमुख कार्य त्यावेळी सदरच्या वृत्तपत्राने केले. ह्या वृत्तपत्रावर नंतर बंदी आली. जुन्या इतिहासाचा अर्थ काढून संशोधनकरून जगातील कामगारांनो एक व्हा असे आवाहन मार्क्स व एंगल्स ह्यांनी दिले. त्याच्या व त्याच्या मित्राच्या अनेक लेखनांवर बंदी आणली. संघटना गुप्तपणे चालविल्या जात होत्या. हे सर्व असतानाही कामगारांना जागृत करण्याची त्याची तळमळ दिसून येते. जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन मधील पं. जवाहरलाल नेहरू यांनी पृ. क्र. ६४० वर म्हटले आहे की, कार्ल मार्क्स हा काही निव्वळ

तात्त्विक सिद्धांताची बौद्धिक चर्चा करणारा कोणी नुसता गुढवादी तत्त्वज्ञ किंवा पंडित प्राध्यापक नव्हता. तो तत्त्वज्ञ तर होताच, पणतो व्यवहारकुशल कार्यकर्ताही होता. त्याची विशेष पद्धती म्हणजे शास्त्रीय संशोधनाचे तंत्र राजकीय, आर्थिक प्रश्नांचा विचार करतांनाही उपयोगात आणावयाचे आणि जगातील दु:खावर त्या रीतीने उपाय शोधून काढावयाचे. ह्याचा अर्थ ज्ञानलालसा, शिक्षण, नवनवीन शिकण्याची कला ही मार्क्सकडे दिसून येते. ह्याबाबत पं. नेहरूंनी सदरचे कोटेशन प्रस्तुत केले आहे.

कॉ.शरद पाटील. कॉ.गोविंद पानसरे आणि डॉ.रावसाहेब कसबे ह्यासारख्या विचारवंत व कार्यकर्त्यांनी कार्ल मार्क्सच्या धर्मासंबंधी विचारांची चिकित्सा केली. इतरही विचारवंत, लेखकांनी आपापल्या पद्धतीने धर्म संबंधी कार्ल मार्क्सची भूमिका काय होती ह्याबाबतचे विश्लेषण केले.[३] ह्या चिकित्सेचा सारांश लक्षात घेतला तर आपणास कार्ल मार्क्सला जग बदलण्याचे स्वप्न प्रत्यक्ष उतरविताना समाज शिक्षित, जागृत करणे हे गृहित धरले असावे कारण समाजाला सातत्याने जागृत ठेवण्याचे काम फक्त शिक्षण प्रक्रियाच करू शकते. शिक्षण ही एक प्रक्रिया आहे आणि ही प्रक्रिया विविध अंगांनी सातत्याने चालू असते.

धर्म ही अफूची गोळी आहे. असे मानणाऱ्या साम्यवाद्यांवर डॉ. आंबेडकरांनी प्रखर टीका केली. कार्ल मार्क्सने जो भौतिकवाद स्वीकारला तो त्याच्या पूर्वी पाश्चात्त्य देशात जो भौतिकवाद विविध विचारवंतांनी मांडलेला होता तो नव्हे. कार्ल मार्क्सने फायरबाख वरील आपल्या सूत्रात मार्क्सपूर्व अस्तित्वात असलेल्या भौतिकवादातील उणिवा स्पष्ट केल्या आहेत. जुन्या भौतिकवादातील उणिवा स्पष्ट करताना मार्क्स म्हणतो की, हा जुना भौतिकवाद जगातील वस्तूंकडे, वास्तवाकडे, ह्या वास्तवाच्या संवेदनात्मक अनुभवाकडे सदोष दृष्टीने पाहतो. अप्रतिक्रियात्मक मनाने पाहतो. वैचारिक वृत्तीने पाहतो, वस्तूंची वास्तवाची जाणीव ही एक संवेदनात्मक क्रियाशीलता आहे. ह्या दृष्टीने पाहत नाही फायरबाख मानवी संज्ञेला वस्तुगत गोष्टी आणि मनोगत गोष्टी असा फरक जरूर करतो. परंतु मानवी क्रियेकडे एक वस्तुगत क्रिया

वास्तवाशी भिडणारी क्रिया म्हणून तो पाहत नाही. सैद्धांतिक दृष्टिकोन हाच खरा मानवी दृष्टिकोन असे फायरबाख मानतो आणि मानवाच्या क्रियाशील वर्तनाचे-क्रांतिकारक वर्तनाचे महत्त्वच कळत नाही. परिस्थिती बदलण्याविषयी आणि शिक्षणासंबंधी जुन्या भौतिकवादाने मांडलेल्या सिद्धांताविषयी फायरबाख हे विसरतो की, परिस्थिती माणसांनी बदलायची असते आणि माणसे बदलविणाऱ्या शिक्षकांचेही शिक्षण करावे लागते. परिस्थितीतला बदल आणि त्याबरोबर माणसातला बदल ह्यांच्या संयोगाचा अर्थ क्रांतिकारक कृतीनेच कळतो. कार्ल मार्क्सच्या एकूणच लिखाणाकडे पाहिल्यास मार्क्सच्यादृष्टीने संपूर्ण समाजजीवन हे माणसाच्याच कृतिशीलतेशी निगडित असते आणि ह्याच कारणामुळे मार्क्सने जुन्या भौतिकवादावर टीका केली आहे. तो म्हणतो, नव्या भौतिकवादाचा दृष्टिकोन मानवी समाज आणि सामाजिक मानव असा आहे. फायरबाख आणि इतर विचारवंतांनी मांडलेल्या भौतिकवादामध्ये सिव्हिल सोसायटी म्हणजे स्वत:च्या हितसंबंधात मशगूल असलेल्या व्यक्तींचा समूह. ह्या सिव्हील सोसायटीतल्या व्यक्तींनी स्वत:च्या गरजांचाच ध्यास घेतलेला असतो. त्या आत्मनिष्ठ असतात. ह्या स्थितीतून मिळणारे स्वातंत्र्य मात्र फसवे असते. स्वत:च्या पलीकडे जाऊन अशा व्यक्ती समाजाचा विचार करत नाही. स्वाभाविकच अशा व्यक्तींची कृतिशीलता संपुष्टात येते. या कारणामुळेच मार्क्सला जग बदलण्याचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा वाटला. थोडक्यात सिव्हिल सोसायटी मधून सामाजिक मानव मध्ये माणसाचे रूपांतर होणे आवश्यक आहे आणि वरील विवेचनावरून जग बदलण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उरविण्यासाठी माणूस ज्ञानी झाला पाहिजे. उत्तर मार्क्सवाद्यांच्या मते त्याला तसे शिक्षण मिळाले तर तो खऱ्या अर्थाने सामाजिक मानव होईल.

मानवी विकास आणि इतिहासाचा अर्थ लावताना डॉ. रावसाहेब कसबे ह्यांच्या मताप्रमाणे मार्क्सने सामाजिक चेतनेला गौणत्व दिले. त्यामुळेच माणसांना जर विज्ञान, कला आणि तत्त्वचिंतनात प्रगती साधायची असेल तर त्याच्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्या पाहिजे आणि मूलभूत गरजांसाठी त्याने भौतिक साधनांची निर्मिती केली पाहिजे. ही प्रगती समाजव्यवस्थेच्या

आदिम समाज, गुलामगिरी, सरंजामशाही, भांडवलशाही आणि समाजवादाच्या मार्फत केली पाहिजे. एका विकास टप्प्यातून दुसऱ्या विकास टप्प्यात जाण्यासाठी माणसाला पुढच्या टप्प्याने ज्ञान होणे अपेक्षित आहे. काळाच्या ओघात प्रत्येक टप्प्यातील उत्पादनशक्ती मानवाने आपल्या बुद्धीच्या जोरावर विकसित केली. कारखानदारीने सरंजामशाहीत नवे वर्ग निर्माण केलेत. ह्या अवस्थेला भांडवलशाहीची सुरुवात असे म्हटले गेले.

आजच्या भांडवलशाही समाजात परस्परविरोधी दोन वर्ग निर्माण झाले. भांडवलदारांच्या स्वामित्वाखाली आणि गुलामीत असलेला नाहीरे वर्ग मात्र स्वतंत्र होऊ शकला नाही. ह्या वर्गाने श्रमशक्ती विकण्यापलीकडे काहीच केले नाही. त्यामुळेच तर भांडवलशाहीने साम्राज्यवादाचे रूप धारण केले आहे. ह्या ठिकाणी भांडवलशाहीमुळे निर्माण झालेल्या अवस्थेतून कामगारवर्गाने त्याच्या ज्ञानाचा, अनुभवाचा उपयोग करून घेतला असता तर त्याला भांडवलदारांच्या पिळवणुकीला बळी पडावे लागले नसते. मार्क्सवादी दृष्टिकोनाप्रमाणे राज्य हे समाजाच्या अंतरिक विकासातूनच निर्माण झालेले असते. सामाजिक मानव जर जागृत असेल तर आदर्श अशी राज्यव्यवस्था निर्माण झाली असती. त्याचा परिणाम लेनिनने वर्णन केल्याप्रमाणे राज्य हे सत्ता गाजवण्याचे एक यंत्र आहे. राज्यात राजकीय सत्ता नेहमीच उत्पादनांच्या साधनांची मालकी ज्याच्याकडे असते. अशा वर्गाच्या हातात असल्याने कष्टकरी वर्गावर ह्या वर्गाला हुकूमत गाजविता येते. ह्याच ठिकाणी कष्टकरी वर्गाला ह्या बद्दल शिक्षण मिळाले असते तर त्यांच्यावर ही परिस्थिती काही प्रमाणात कमी ओढवली असती. भांडवलशाहीतील अतिरिक्त उत्पादनाचा अंतिम परिणाम कामगार कपातीवर होतो. ह्यांसारख्या सर्व अरिष्ठांमधून बाहेर पडण्याची ताकद फक्त शिक्षण, ज्ञान व त्याबाबतचा अनुभव यातच आहे. कार्ल मार्क्सने समाजवादाच्या प्रस्थापनेतून हे अरिष्ठ नष्ट होऊ शकते, असे म्हटले. भांडवलशाही स्पर्धेवर उभी असल्याने मानवाच्या जीवनात स्पर्धा आली आणि ह्याच स्पर्धेतून माणसाला आपले मनुष्यपण हरवून बसावे लागते. माणसाला माणूस म्हणून असणारा चेहरा गमवावा लागतो. ह्या अवस्थेला मार्क्स

परात्मकता असे म्हणतो, याबाबत १८४४ साली लिहिलेल्या इकॉनॉमिक ॲण्ड फिलॉसॉफीकल मॅन्युस्क्रिप्ट मध्ये तसेच मार्क्सच्या 'दास कॅपिटल'ह्या ग्रंथामध्ये याबाबतचे विश्लेषण पाहावयास मिळते. थोडक्यात कामगार वर्ग आणि भांडवलदार वर्ग ह्यांचे जीवनाच्या सर्वच क्षेत्रातील स्वरूप परस्पर वेगळे असते. ह्यापैकी कामगार वर्गाला आपल्या वाट्याला आलेल्या दारिद्रयातून बाहेर पडण्यासाठी शिक्षण हा मार्ग अनुसरायला पाहिजे. राजकीय सत्ता कामगार वर्गाच्या हातात येण्यासाठी सुद्धा ह्याच घटकाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. भांडवलदार विरुद्ध कामगार ह्या संघर्षातून यश मिळविण्याचे शिक्षण हे भांडवलशाहीत आपोआपच कामगारवर्गालाच मिळते.

**६.४ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा शिक्षणविषयक दृष्टिकोन:**

अ. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक पार्श्वभूमी :

शिक्षण हीच जीवनातील सर्वात महत्त्वाची बाब आहे. प्रगती होण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाकडे पाहिले. ह्यासाठी त्यांनी सिद्धार्थ कॉलेजची स्थापना केली. शिक्षण प्रसारासाठी तर ह्या कॉलेजच्या शाखा इतरत्र सुरू करण्याचा त्यांचा मानस होता. शिक्षणाची प्रेरणा त्यांनी आपल्या वडिलांकडून घेतली. आपली परिस्थिती गरीब असली तरी आपण शिक्षण मात्र सोडता कामा नये ह्या वडिलांच्या विचारामुळे शिक्षणाची आवड निर्माण झाली.

ब. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षणविषयक कार्ये :

२३ नोव्हेंबर १९४० मुंबई येथे दिलेल्या भाषणात ते स्पष्टपणे म्हणतात की, आपल्या शिक्षणाचा फायदा हा स्वत:साठी न करता तो समाजासाठी केला पाहिजे. समाजबांधवांना अज्ञानातून बाहेर काढण्यासाठी शिक्षण हे हत्यार त्यांनी वापरले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे परदेशातून अर्थशास्त्राची उच्च पदवीधारण करणारा पहिला भारतीय माणूस होता. शिक्षण घेऊनही जो माणूस विकला जातो व लोभाला बळी पडतो तो भविष्यात संकट ओढवून घेतो. त्यामुळे ते

म्हणतात की, कर्तृत्ववान माणसे नसली तरी मला चालतील पण निष्ठेची माणसे हवीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: कष्टाने व चिकाटीने शिकले बडोदा सरकारच्या मदतीने परदेशात जाऊन अेनक पदव्या संपादन केल्या. त्या ज्ञानाचा उपयोग त्यांनी समाजाच्या भवितव्यासाठी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना धार्मिक व सामाजिक बंधनामुळे संस्कृत शिक्षण घेता आले नाही.ते पुढे असेही प्रश्न उपस्थित करतात की, तुम्हाला शिक्षण घेऊ देत नाही त्या धर्मात तुम्ही का राहता? कारण हिंदू धर्म हा अशिक्षितांनी अशिक्षितच राहा असा सांगणारा धर्म आहे. मनुस्मृतीमध्ये जो कोणी अस्पृश्य अध्ययन करील त्याची जीभ कापून टाकावी अशा आशयाचा उल्लेख आढळतो. त्या काळात ह्या कोंडमाऱ्यातून बाहेर काढण्यासाठी अस्पृश्य समाजाला त्यांच्यातील संत लोकांनी मोठी कामगिरी केली. गणतंत्र राज्यपद्धती ही बौद्ध काळाचीच देणगी आहे. इंग्रजांच्या काळात पेशव्यांच्या राजवटीत दलितांना शिक्षण पूर्णपणे वर्ज्य होते. ब्रिटिशकालीन हंटर आयोगाच्या शिफारशी दलित समाजासाठी तशा घातकच होत्या. शिक्षणाची दारे ही सर्वांसाठी खुली असावीत असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा आग्रह होता. १२ मार्च १९२७ रोजी विधान परिषदेत शिक्षण अनुदान विधेयकावर मुंबईत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी चर्चा केली ह्या चर्चेत त्यांनी मागासवर्गीयांच्या शिष्यवृत्तीबाबतच्या धोरणाची सविस्तर चर्चा केली.

श्रमिक घटकालाही शिक्षणाचा अधिकार मिळावा कारण ते गरीब आहेत अज्ञानी आहेत. ह्या अंधारातून बाहेर काढण्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती देण्याची आवश्यकता आहे. ह्या शिष्यवृत्तीचे महत्त्व गरीब, मागासवर्गीय मुलांच्या पालकांनाही समजले पाहिजे कारण त्यांचे कुटुंब चालविण्यासाठी शिष्यवृत्ती आहे, असे त्यांना वाटते. सामाजिक, आर्थिक दृष्टीने विचार केला तर कमकुवत, मागसवर्गीय घटकांना शासनाने या सवलती देण्याची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते जगातील प्रत्येक समाजाची प्रतिष्ठा, भवितव्य त्या समाजातील सुशिक्षित

लोक किती आहेत ह्यावर अवलंबून असते. शिक्षणामुळे माणसाला व समाजाला डोळसपणा प्राप्त होतो आणि त्या दृष्टीने पाहता संबंध हिंदुमध्ये जर कोणी खरा डोळस समाज असेल तर तो ब्राह्मण समाज हा एकटाच डोळस आहे. हे नाकबूल करता येणार नाही. ब्राह्मणेत्तर मराठा व तत्सम हे तितके डोळस नाहीत. ह्या बाबतीत ब्राह्मणांची जबाबदारी फार मोठी आहे. परंतु ब्राह्मण जातीची वृत्ती कशी आहे ह्याची तुम्हास बरोबर ओळख झालेली नाही. ब्राह्मणांपुढे तुम्ही कोणताही प्रश्न टाका व त्यावर सर्व समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने काही तोड सूचवा. ती तोड जर ब्राह्मणाच्या वर्चस्वास धक्का देणारी नसेल तर ते झटकन मान्य करतील. पण तुम्ही सुचविलेल्या तोडीमुळे जरा का त्यांच्या ब्राह्मणी वर्चस्वाला थोडाजरी धक्का लागण्याचा संभव असेल तर राष्ट्राचा कितीही मोठा फायदा असेल तरी ती तोड ब्राह्मण समाज कधी हाती घेणार नाही. तेव्हा तो समाज आपल्या अटी पारपाडण्याची जबाबदारी घेईल, अशी आशा करण्यात काहीच अर्थ नाही.[४] समाज आणि शिक्षण ह्यांचा संबंध पाहत असताना शिक्षणाचा फायदा समाजाच्या उन्नतीसाठी होण्याच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मत अतिशय परखड आहे. समाज सुशिक्षित असेल तर तो इतरांची प्रगती करू शकतो त्यात आपल्या स्वफायद्यासाठी ब्राह्मण डावपेचात्मक रीतीने तो इतर समाजाशी संबंध ठेवतो. माणसाला माणूस म्हणून जगत असताना स्वत:चे अस्तित्व सिद्ध करावे लागते. निसर्ग माणसा-माणसांत भेदभाव करत नाही. त्याला जगण्यासाठी हक्क, अधिकार आवश्यकच आहेत. जो माणूस आपली बुद्धी जागृत ठेवून आपले हक्क काय, आपले अधिकार काय व आपले कर्तव्य काय ह्याची जाणीव करून घेतो त्यालाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वतंत्र मनुष्य मानतात. जो माणूस दुसऱ्याच्या हातचे बाहुले बनतो. स्वाभिमान गमावतो तो खऱ्या अर्थाने स्वतंत्र नसतो. कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषदेच्या बैठकीत दि. १९ मार्च १९२७ रोजी दिलेल्या भाषणात त्यांनी मुला-मुलीस शिक्षण दिलेच पाहिजे ह्या अर्थाचा ठराव केला. त्यात अगदी ३० मुले असली तरी गावी शाळा उघडाव्यात आणि मुला-मुलींना सक्तीचे शिक्षण करावे त्यासाठी शिक्षेची तरतूदही करावी इत्यादी अत्यंत महत्त्वाचे

ठराव केले होते. ज्ञान आणि विद्या ह्या दोन्ही गोष्टी केवळ पुरुषांची मक्तेदारी नाही. ह्या गोष्टी स्त्रियांनाही आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर महार जातीतीलच काही जणांकडून ते शिक्षणविषयक कार्य करत नाही अशी टीका केली गेली. परंतु त्यांच्या प्रयत्नाने अनेक विद्यार्थ्यांनी त्यावेळी मोफत शिक्षणाचा फायदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे घेतला होता. मुंबई इलाखा महार परिषदेत ३१ मे १९३६ रोजी त्यांनी नुसत्या धर्मांतराने काय होणार असा प्रश्न उपस्थित केला आणि आर्थिक, शैक्षणिक स्थिती देखील सुधारण्यासाठी शिक्षण अतिशय महत्त्वाची बाब आहे, हे स्पष्टपणे नमूद केले आहे. शिक्षण घेतल्याने मागासवर्गीयांना प्रशासनातील अत्यंत महत्त्वाच्या जागा काबीज करता येतील. ह्यासाठी प्रत्येकाने शिक्षणाकडे प्रामुख्याने उच्चप्रतीच्या शिक्षणाकडे लक्ष देणे आवश्यकच आहे. शिक्षणातील असमानता नष्ट झाली पाहिजे. ह्या शिक्षणाने डावपेच ओळखता येतील. शील आणि शिक्षणाशिवाय जगात काहीच साध्य करता येणार नाही. आपले आचरण शुद्ध ठेवून आपल्या ध्येयासाठी जागरूक राहिले पाहिजे. यासाठी आपल्या विद्यार्थ्यांवर मोठी जबाबदारी आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांनी ४ ऑक्टोबर १९४७ रोजी मुंबईच्या सिद्धार्थ कॉलेजमध्ये दिलेल्या भाषणात सांगितले. मोहाला बळी न पडता गुलामगिरीच्या गर्तेतून बाहेर पडून शील आणि शिक्षण घेतले पाहिजे. चळवळीचे शिक्षण प्रत्येकाला मिळाले पाहिजे तरच बहुजन मुलांना आपले ध्येय ठरविण्यास मदत होईल. परंतु विद्यार्थ्यांनी शिक्षण घेताना राजकारणात भाग घेता कामा नये. अभ्यास सोडून राजकारणात उडी घेणे हेडॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पसंद नाही. अभ्यास करताना ग्रंथ भराभर वाचून काही फायदा नाही. दिवसेंदिवस ज्ञानाच्या कक्षा, रुंदावत चालल्या आहेत. ह्यासाठी विद्यार्थ्यांबरोबरच अद्यापकांनीही ह्याची जाण ठेवली पाहिजे.

सामाजिक न्यायाची जाणीव अगोदरपासूनच त्यांना होती. भारतीय समाजात गरीब-श्रीमंत, स्त्री-पुरुष, कारखानदार-मजूर इत्यादी भेदभाव दिसून येतो. प्रत्येकाला राज्यघटनेने अधिकार प्रदान केलेले आहेत. ह्या हक्कांमध्ये माणुसकीचा हक्क अतिशय महत्त्व प्राप्त करणारा

आहे. केवळ शिक्षणाने ते साध्य करणे शक्य नाही. २६ मे १९२९ रोजी नाशिक येथील स्वाभिमानसरंक्षक परिषदेच्या अधिवेशनात जे अध्यक्षीय भाषण केले त्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्पष्टपणे सांगतात की, जातिभेदाच्या नीतिमुळे हिंदू समाजाने आपला दर्जा हीन ठरविला आहे. हा कलंक धुवून काढण्यासाठी दलित वर्गाचा स्वाभिमान जागृत झाला पाहिजे आणि स्वाभिमान जागृत करण्याचे काम फक्त शिक्षणच करू शकते. ह्यामुळेच व्यक्तिस्वातंत्र्याचेही रक्षण होऊ शकते. ह्यासाठीच तर मागासलेल्या वर्गासाठी शिक्षण अत्यंत आवश्यक बाब बनलेली आहे. उच्च शिक्षणात मागास घटकांसाठी शिक्षण घेता यावे, म्हणून सवलती दिल्या जाव्यात. उच्च शिक्षणापेक्षा प्राथमिक शिक्षणावर अधिक खर्च केला जावा. हा खर्च भागविण्यासाठी मात्र शिक्षणाचे व्यापारीकरण होता कामा नये, म्हणजे शिक्षणावरील खर्च भागविण्यासाठी शिक्षण शूल्क आकारणे म्हणजे व्यापारीकरण होय.

तुमच्या मुलास शिक्षण देण्यास तुमच्याजवळ पैसा नाही, परंतु कायदा होईल तर तुमच्या मुलांच्या शिक्षणाची सर्व सोय लागेल. तुमच्यातील पुष्कळसे लोक बेकार आहेत. सर्व लोकांस काम देणे किंवा काम नसेल त्या वेळेस त्यांना पोसणे हे सरकारचे कर्तव्यच आहे. असा कायदा होईल तर बेकारीत उपाशी मरण्याची पाळी तुमच्यावर येणार नाही.[५] डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ४ मार्च १९३३ रोजी मुंबईत अस्पृश्य वर्गाच्या जाहीर सभेत केलेले भाषण वाचले तर आपणास लक्षात येते की, समाजातील दोन वर्गातील दरी शिक्षणाने कमी होऊ शकते. भारतीय राज्यघटनेतही ह्या संदर्भाची नोंद मार्गदर्शक तत्त्वांमध्ये करून ठेवली आहे. सर्व लोकांना काम देण्याची जबाबदारीही सरकारचीच आहे आणि ज्या वेळी काम नसेल त्यावेळी त्यांचा खर्चही सरकारने सहन केला पाहिजे ह्यामुळेच आजच्या बेकारी भत्त्याचे राजकीयीकरण झाल्याचे दिसून येते. अस्पृश्यांच्या शिक्षणासाठी बजेटमध्ये तरतूद असावी असा संदर्भ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दि. १८,१९ जुलै १९४२ च्या नागपूर येथे केलेल्या भाषणात सापडतो.

रोगराई, दारिद्र्य, गरिबी, अज्ञान इ. रोगांपासून मुक्ती मिळविण्यासाठी श्रीमतांनी खर्च करणे म्हणजे दुष्टपणा ठरेल, तर त्या पैशाचा उपयोग छोटे धंदे, गरीब अनाथ महिला यांसारख्या धंदेवाईक शिक्षणासाठी करावा. राजकीय संस्थेचा जो दर्जा आहे तो दर्जा शिक्षणसंस्थांना मिळावा कारण संपूर्ण समाजाची उन्नती समाजातील बुद्धिमान, होतकरू तरुणांच्या हाती असते. विद्यापीठाचे व महाविद्यालयाचे प्राध्यापक ह्यांच्या विषयी बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, जर महाविद्यालयातील प्राध्यापक आणि विद्यापीठातील प्राध्यापक ह्यांच्यात सलोख्याचे संबंध नसतील तर या यंत्रणा स्वत:च्या आणि व्यापक समाजहिताच्या दृष्टीने आवश्यक संशोधन व ज्ञानप्रवर्तनचे कार्य करूच शकत नाही.[६] थोडक्यात या शिक्षण प्रक्रियेत यांत्रिकता यायला नको. शिक्षकसुद्धा फक्त श्रमाच्या ओझ्याखाली असेल तर त्यांच्या पासून कोणतीही प्रेरणा मिळण्याची अपेक्षा करू नये. तसेच विद्‌वान प्राध्यापकांचा सहवास हा सुद्धा प्रेरणा, विश्वास निर्माण करणारा असतो.

देशातील उच्च शिक्षणातील अनेक गैरप्रकारांची आणि विकृतींची चौकशी करण्याकरिता यशपाल समिती नियुक्त केली गेली होती. ह्या समितीने विद्यापीठांच्या वैचारिक कुपोषणाकडे लक्ष वेधून शिक्षणातील सर्जनशीलता लोप पावते. अकार्यक्षमता व भ्रष्टाचारही मोठ्या प्रमाणात वाढत आहे. ह्यासाठी अभ्यासक्रमात कौशल्य विकास व सैद्धांतिक ज्ञान यांचा समतोल असावा इ. शिफारशी केल्या होत्या. विद्यापीठांच्या स्वायत्ततेचा प्रश्न चर्चेला येतो तेव्हा तत्त्वत: विद्यापीठांना स्वायत्तता असावी ह्याबद्दल मतभेद असाचे कारण नाही. परंतु वर्गीय समाजात स्वायत्तता म्हणजे वरच्या वर्गाची सत्ता असेच स्वायत्ततेचे व्यावहारिक स्वरूप असते व फक्त तोंडी लावण्यासाठी उपेक्षित घटकांबद्दल बोलले जाते. त्यामुळे स्वायत्तता देताना सरकारची भूमिका महत्त्वाची असली पाहिजे. ह्या लेखात सरकारची भूमिका किती महत्त्वाची असते एखाद्या देशातील शिक्षणपद्धती किती चांगली ह्यावरून त्या देशाचे भवितव्य ठरते.[७]

तत्कालीन केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्र्यांनी (कपिल सिब्बल) परदेशी शिक्षण संस्था विधेयक २०१० लोकसभेला सादर केले होते. त्याचा परिणाम भारतीय जातिबद्ध समाजात सामाजिक न्यायासाठी जे आरक्षणाचे धोरण राबविले जाते ते ह्या विधेयकामुळे गुंडाळावे लागणार होते. उच्च शिक्षणात बहुजन जातीतील येणाऱ्या मुलांचे प्रमाण आपोआपच कमी होणार यात शंका नाही. वरील घटना अतिशय छोटी वाटत असली तरी ह्या परिस्थितीतून कमालीची विषमता निर्माण होईल. 'नॉलेज इज पॉवर' असे म्हटले जात असले तरी वरील प्रक्रियेतून बहुजन समाज, स्त्रिया, अल्प संख्यांक, दलित, आदिवासी ह्या घटकांनी शिक्षण प्रक्रियेतून बाहेर ढकलेले जात आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेली शिक्षणपद्धती अंमलात न येता सदरची शिक्षणपद्धती अराजकतेच्या टप्प्यावर आली आहे.

भारतीय चातुवर्ण्य परंपरेत शिक्षण हे ब्राह्मणांची आणि वरच्या जातींची मक्तेदारी होती. स्त्री वर्गाला तर सुमारे ५००० वर्षे शिक्षणापासून वंचित ठेवले गेले. १९ व्या व २० व्या शतकात म. फुले, सावित्रीबाई फुले, शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, जे.पी.नाईक इ. च्या योगदानातून आणि प्रयत्नातून बहुजन समाजाला शिक्षणाची दारे खुली झाली. परंतु तीही अर्धवटच. आज मात्र शैक्षणिक भांडवलशाहीच दिसून येते. उच्च शिक्षणाला भांडवलशाही देशात खासगी वस्तू मानले जाते आणि याचा भार पालकांनाच सहन करावा लागतो. आजच्या भांडवलशाही शिक्षण व्यवस्थेतून सरकार मात्र आपले अंग काढून घेत आहे. आंतरराष्ट्रीय तुलना करता भारतातील उच्च शिक्षणावरचा खर्च सर्वात कमी आहे आणि महत्त्वाचे म्हणजे आर्थिक विकासात शिक्षणाचे महत्त्व राज्यकर्ते व नियोजनकर्ते अमान्य करत नाही. परंतु प्राधान्यही देत नाही. १९९० नंतर 'खाउजा' धोरणामुळे शिक्षणक्षेत्र पुरते ढवळून निघाले. सरकारने शिक्षणक्षेत्रातून आपले श्रीमंतांसाठी आणि गरिबांसाठी अशी ओळख घेऊन जन्माला येतात. ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही.

मनुस्मृतीचा काळ लक्षात घेतला तर ब्राह्मणांखेरीज इतर वर्गाच्या लोकांनी विद्याभास केल्यास त्यांच्या जिव्हा कापण्यात त्यांनी वेदघोष ऐकल्यास त्यांच्या कानात शिस्याचे कढण रस ओतावा, असे कायदे कौन्सिलचे ठराव होते. ह्या ठरावांच्या दिशेनेच की काय सध्या सरकाराचे धोरण आज आहे की काय असा प्रश्न आपल्यासमोर येतो, कारण भांडवलवादी शिक्षणव्यवस्था ह्याच दिशेने जात असल्याचे दिसते. भारताला स्वातंत्र्य मिळून ६० व्या वर्षापेक्षा जास्त काळ झाला. भारताने आपली आर्थिक बाजू काहीशी भक्कम करण्याचा प्रयत्नही केला. आयटी क्षेत्रात देखील भरारी घेतली. हे सर्व असताना आपला भारत देश २०२० साली महासत्ता होणार याची स्वप्न देशातील राज्यकर्ता वर्ग बघतोय आणि हीच स्वप्ने सर्वसामान्य माणसाचीही दिशाभूल करत आहेत. फक्त सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक बाबतीतील बदल म्हणजे विकास नव्हे तर शैक्षणिक क्रांती महत्त्वाची आहे. अन्नधान्याचा प्रश्न आज गंभीर होत आहे. देशात गरिबी, उपासमार, अंधश्रद्धा, जातीय अन्याय, अत्याचार, आरोग्य सोयी-सुविधांचा अभाव, धर्मांधता, भाषावाद, प्रांतवाद, लष्करी दहशतवाद आणि मानसिक दहशतवाद ह्यामुळे देशातील सर्वसामान्य जनतेच्या जीवनातील दिवसेंदिवस असुरक्षितता वाढत आहे. ह्याठिकाणी म्हणून आठवण येते ती, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची, कारण कोणत्याही समाजाची प्रगती ही शिक्षणामुळेच होते असे ह्यांनी म्हटले होते. समाजाच्या प्रगतीचा आधार शिक्षण असून ह्याच क्षेत्राची आज अवस्था निराशाजनक आहे. आजही आपण निरीक्षण केले तर खेड्यातील माणूस शिक्षणापासून वंचितच आहे. आज शिक्षणाचे बाजारीकरण झाले असून शिक्षणाची गुणवत्ता खालावली आहे. शासनाचेही उत्तरोत्तर दुर्लक्षच होत आहे. देशातील सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती ह्यांचा एकत्रित परिणाम म्हणून देशातील विद्यार्थी वर्गाचे भवितव्य अडचणीत सापडले आहे, असे निदर्शनास येते.

आज देशात कामगार कपातीचे धोरण सर्रास राबविले जात आहे. जागतिक मंदीमुळे उद्योगधंदे बंद पडल्याचा हा परिणाम होय. अनेक कामगार बेकार झाले. सरकार जनतेचे मूलभूत

प्रश्न सोडविण्यामध्ये अपयशी झाले आहे. कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांचे जीवन अतिशय खडतर झाले आहे. श्रीमंत, कारखानदार, सावकार मात्र सुखचैनीत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ज्या समाजासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची पाडले तो समाज तर अन्यायाच्या गर्तेत सापडला आहे. भारतीय राज्यघटनेने जरी अधिकारी दिले असले तरी देखील दलित समाजाच्या मूलभूत गरजा अजूनही पूर्ण होताना दिसत नाही. अर्थात शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा याचा अर्थ जे शिकले त्यांनाही समजला नाही. ह्या त्रयींचा विपर्यास मात्र मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. कष्ट करणारा कष्टकरी, शेतात राबणारा शेतमजूर, कारखान्यात काम करणारा कामगार मात्र दु:ख व शोषणाच्या खाईत लोटला गेला मूठभरांचे जीवन झगमगाठात दीपून गेले. बालकांच्या हातात पाटी पेन्सिल येण्याऐवजी हातात कटोरा देण्याचे काम इथल्या शिक्षण व्यवस्थेने केले.

संविधान सभेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारत १० वर्षात संपूर्ण (१००%) साक्षर व्हावा ह्यासाठी शिक्षणाचा मूलभूत अधिकार असावा, असे मत व्यक्त केले होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अगदी अलीकडे त्यावर अनुकूल निर्णय झाला. ह्या घडामोडीस ६३ वर्षांपेक्षा जास्त काळ गेला, हे मोठे दुर्दैव आहे, असे आंबेडकरवादी विचारक व पुरस्कर्ते मानतात. शिक्षणामुळे माणसाला हक्कांची जाणीव होते. ह्याच कारणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाला अतिशय महत्त्व प्राप्त होते. आजच्या समाजापुढे अनेक समस्या आज उभ्या आहेत. ह्याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे आजच्या युवापिढीमध्ये शिक्षणाची ओढ कमी होत आहे. १२ वीपर्यंत पास झालेल्यांची संख्या प्रचंड आहे. परंतु उच्चशिक्षणाचे प्रमाण अत्यल्प असल्याने बेरोजगारी ह्यातून वाढणारी व्यसनाधीनता हे बौद्ध समाजापुढील मोठे आव्हान आहे. शिक्षणाचा सर्वदूर प्रसार होणे तसेच शैक्षणिक अभ्यासक्रमातील ब्राह्मणी विचारांऐवजी समताधिष्ठित फुले-आंबेडकरी विचारांचा स्वीकार होणे आजच्या समाजात अभिप्रेत आहेत. भारतीय साक्षर-निरक्षर विषयक कॉ. शरद पाटील यांनी एके ठिकाणी टिप्पणी करताना म्हटले आहे की, ही निरक्षरता

वर्गीय नसून जातीजमातीय आहे कारण सर्व निरक्षर केवळ आदिवासी दलित, ओबीसी असून साक्षरात आदिवासी १३टक्के, दलित २४ टक्के, स्त्रिया १० टक्के आहेत. दारिद्र्य रेषेखाली असलेले निम्मे भारतीयही आदिवासी दलित व ओबीसी आहेत. ह्या साक्षरातले उच्चजातीयच उच्चशिक्षणापर्यंत जातात आणि त्यामुळे पहिल्या व दुसऱ्या श्रेणीच्या राज्यकर्त्या नोकरशाहीची भरती मुख्यत: उच्च जातीतूनच होते. हे सर्व आकडेवारीने उघडे पडू नये म्हणूनच सेन्सस कमिशनर रजिस्ट्रार जनरल ह्यांनी जातिनिहाय जनगणनेला विरोध केल्यानंतर केंद्र सरकारने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे. म्हणजेच आजचे भारतीय शासन हे ब्राह्मणी बुद्धिजीवी वर्गाच्या हातात आहे. ह्याच जातवर्गानी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रयत्न फलद्रूप होऊ दिला नाही.

**६.५ मार्क्स-आंबेडकर समन्वयवादी विचार आणि शिक्षणविषयक समस्यांची चर्चा :**

सामाजिक जाणीव असल्याशिवाय सामाजिक परिवर्तन होऊ शकत नाही. एक माणूस शिक्षण घेऊन्न पुढे चालला म्हणजे त्यांचे कुटुंब विकासाच्या वाटेवर चालू लागते. म्हणून सामाजिक भान ठेवूनच शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते लोकशाहीला खरा अर्थ मतपेटीद्वारेच येतो. आजच्या संसदीय लोकशाहीमध्ये मतपेढीचे महत्त्व वाढतच चालले आहे. मतपेटी जिंकण्याच्या स्पर्धेमुळे भ्रष्टाचार मोठ्या प्रमाणात वाढला. मतपेटी व सत्ता ह्यांचा जवळीक संबंध आहे. त्याचा परिणाम जसा श्रीमंत माणूस अधिक श्रीमंत होत जातो तसा ह्या व्यवस्थेत अधिकारसंपन्न माणूस अधिक अधिकार संपन्न होतो.

भारतीय समाजातील जातीच्या उतरंडीमुळे जे अरिष्ठ निर्माण होते. भारतीय समाजातील जातीच्या उतरंडीमुळे जे अरिष्ट निर्माण होते. ते बिनतक्रार स्वीकारावे लागत आहे. भारतामध्ये समाजाची प्रतिष्ठा त्याला चिकटलेल्या जातींवर अवलंबून आहे. भारतीय माणसाला जन्मापासून ते मृत्युपर्यंत जातीच्या विळख्यात खितपत पडावे लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा. स्वसामर्थ्यांवर विश्वास ठेवून मानवाच्या प्रतिष्ठेसाठी जगण्याच्या लढाईला प्राधान्य दिले जावे. भारतीय समाजाचे राजकीय, सामाजिक, आर्थिक दृष्टीने

अनेक गटात विभाजन झाले आहे. यावर हिंदू समाज व्यवस्थेचे प्राबल्य दिसून येते. माणसामाणसांत भेदभाव मानणारी समाज व्यवस्था मोडून काढण्यासाठी समाज सुशिक्षित झाला पाहिजे. विषमता, जातिव्यवस्था मोडून काढण्यासाठी ग्रामजीवन सोडून समाज व्यवस्थेला नवीन रूप दिले पाहिजे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले आहे की, आमचे खेडे कुपमंडूक मानसिकता व जातीयवाद ह्यांचे अड्डे बनले आहेत. भारतामध्ये कोणत्याही दिशेला आपण गेलो तरी जातीचा राक्षस उभाच असतो. जातीला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घातकी संस्था, शोषणाचे हत्यार म्हटले आहे. माणसा माणसांत बंधुभावाऐवजी मत्सर, परस्पर द्वेष ह्याच गोष्टी दिसून येतात. ह्या घालविण्यासाठी तसेच अस्पृश्यतेचा कलंक नष्ट करण्यासाठी उपाय योजिले पाहिजेत. जातिभेद नष्ट करून मी प्रथम भारतीय आहे आणि नंतर ही भारतीयच आहे. हे विचार रुजले पाहिजेत आणि हे फक्त समाज जागरूकतेवर अवलंबून आहे. समाज जागरूकता ही देशातील शैक्षणिक व्यवस्थेवर अवलंबून आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, माझे असे मत आहे की, शतकेच्या शतके ह्या अस्पृश्य वर्गाला ज्या अपमानाच्या हीन स्थितीत हिंदू समाजाने ठेवले आहे त्याची भरपायी हिंदू समाजाने कोणतेही प्रायश्चित्त ह्यापुढे घेतले तरीही होणार नाही. नुसत्या जगण्याला त्यांच्यामते काहीच किंमत नाही. मनुष्य इज्जतीने जगतो की नाही ह्याला महत्त्व आहे. आपल्याकडे शिक्षण असेल तर सध्या सर्व सुखाचे आगर कायदा आहे. ज्ञान आणि शिक्षणाच्या जोरावर कायदा करण्याची शक्ती पूर्णपणे हस्तगत करता येते. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजाने जप-तप करण्याची आवश्यकता नाही असा सल्ला देतात.

विकासासाठी आवश्यक असलेले स्थैर्य आणि परस्परातील विश्वासावर आधारलेले सहजीवन आपण आज गमावून बसलो आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेने मनावर घेतले तर समाजाला घातक ठरणाऱ्या सर्व क्षेत्रांना विधायक वळण देण्याची क्षमता शिक्षणामुळे जागरूक करता येते. राष्ट्र उभारणीच्या कार्यात बुद्धी आणि सामर्थ्यांचा उपयोग केला जात नाही. सामाजिक चळवळींपासून आपण सातत्याने अलिप्त राहिल्याने आपल्यात परात्मता निर्माण होऊन त्याचे

शिक्षण व्यवस्थेवर दूरगामी परिणाम होत आहेत. डॉ. रावसाहेब कसबे यांनी अखिल भारतीय समाजवादी अध्यापक सभा स्थापना अधिवेशनात दि.२९/०९/२००२ रोजी नाशिक येथील अध्यक्षीय भाषणात शैक्षणिक आव्हानांची चर्चा करतांना प्रामुख्याने दोन प्रश्नांची चर्चा केली. एक म्हणजे सांस्कृतिक संघर्ष आणि दुसरे म्हणजे जागतिकीकरणामुळे निर्माण झालेल्यासमस्या. आपआपल्या कुवतीचा अंदाज घेऊन्न शिक्षण क्षेत्राशी संबंधित असणाऱ्या सर्व घटकांनी शक्य तेवढे प्रयत्न केले जाण्याची आवश्यकता आहे. तसे प्रतिपादन त्यांनी केले त्यामुळे शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित झाले.

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक प्रभावी साधनआहे. परंतु समाजपरिवर्तनाची दिशा कोणती असावी, निश्चित झाल्याशिवाय त्याचा अचूक आणि परिणामकारक उपयोग करवून घेता येत नसतो. सामाजिक बांधिलकी नसलेल्या दिशाहीन राष्ट्रातील शिक्षण माणसाला स्वार्थी, कुपमंडूक, अहंकारी आणि मुर्ख सुद्धा बनवू शकते. म्हणूनच शिक्षण हे उधारी हत्यार आहे. त्याचा उपयोग समाज विकासाच्या दृष्टीने विधायक मार्गाने करायचा की स्वार्थ साधण्यासाठी विध्वंसक मार्गाने करायचा हे ठरविणारी प्रभावी यंत्रणा राष्ट्राजवळ असली पाहिजे. बर्ट्रांड रसेल ह्यांनी म्हणूनच एकदा अतिशय उद्विग्न होऊन्न अशा स्वार्थी विद्या विभूषितांबद्दल म्हटले होते की, 'Men are born ignorant, not stupid, they are made stupid by education.'[८]मनुष्य आणि पशु प्राणी यांच्याले जे अंतर असते, त्याला आपण ढोबळ मानाने संस्कृती मानतो. मानवी समाजाचे ध्येय्य मनुष्याला सुसंस्कृत जीवनजगण्यासाठी समर्थ करणे हे असावे,ह्यासाठीच डॉ. कसबे ह्यांनी शिक्षणाबद्दलच्या भूमिकेकडे पाहिले आहे. आंबेडकरवाद्यांच्या मते ही समाजाचे परिवर्तन होणे अपेक्षित आहे. हे होताना पुन्हा हिंदू समाजाचे मूळ तसेच वर्णव्यवस्थेचे, जातिव्यवस्थेचे, अस्पृश्यतेचे अस्तित्व मान्य केलेल्या मनुस्मृतीचे अवलोकन केले जात असेल तर हे परिवर्तन कोणत्या दिशेने होणार आहे हे समजते. भारताचा इतिहास हा पराभवाचा इतिहास समजला जातो. हा इतिहास असे सांगतो की, ज्या क्षणी प्राचीन भारतातील विद्या विभूषित वर्ग स्वार्थी

बनला त्याक्षणी भारतातील शिक्षण हे सामाजिक, आर्थिक पिळवणुकीचे साधन बनले. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी देखील मान्य केले की, ब्रिटिश साम्राज्यशाहीने हा देश आधुनिक बनविला व खऱ्या अर्थाने बहुजन समाजाला माणूसपणाची जाणीव करून दिली. भारत सरकारने सन १९८५ साली प्रसिद्ध केलेल्या Challenges of Education ह्या दस्तऐवजात शिक्षण क्षेत्रातील वास्तव परखडपणे मांडताना आपल्या शिक्षण व्यवस्थेची कशी परवड झाली हे मान्य केले आहे. सन २००१ मध्ये भारत सरकारच्या जनगणना अहवालानुसार साक्षरांची टक्केवारी वाढली असून ही निरक्षरांची संख्या मात्र कमी होण्याऐवजी सातत्याने वाढते. अशी अवस्था असेल तर भारतीय लोकशाहीचे यश कसे असेल, हे समजून येते.

भारतामध्ये कम्युनिस्ट चळवळीचा उदय झाल्यापासून भारतीय समाजाच्या शिक्षण क्षेत्रातील यश अपयशाकडे पाठ फिरविली, अशी टीका विरोधकांकडून केली. अस्पृश्यांच्या शिक्षणविषयक प्रगतीवर त्यांनी नेहमी उदासीनताच दाखविली, असे असले तरी ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या काळात शहरात गिरण्या सुरू झाल्या. कामगार वर्ग निर्माण होत होता. हा कामगारवर्ग अज्ञानी आणि अशिक्षित होता. शिक्षणापासून हा घटक वंचित राहिल्या कारणाने तो जातिबद्धतेत अडकत गेलामार्क्सवादी विचारांप्रमाणे कामगार हा फक्त कामगार असतो. मात्र आंबेडकर वादाप्रमाणे हा कामगार भारतामध्ये कोणत्यातरी एका जातीचा असतो. मार्क्सवादाने भारतीय कामगाराला जातीचा संदर्भ असतो,ह्या वस्तुस्थितीचा फारसा विचार केला नाही. तो कामगार जातीच्या उतरंडीप्रमाणे कनिष्ट वर्गातील असेल तर त्याला शिक्षणाचा अधिकार आणि त्यासोबत इतरही अनेक अधिकारांपासून दूर ठेवले गेले. त्यामुळे जातीच्या लढ्यात मार्क्सवादी विचारवंत, कार्यकर्ते ह्यांनी कधी सहभाग घेतला नाही किंवा कम्युनिस्टांच्या लढ्याच्या अजेंड्यामध्ये जातिनिर्मूलन हा विषय नसल्याने आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद हे एकमेकांच्या जवळ आले नाही. अशा परिस्थितीत शिक्षणामुळे हा समज गैरसमज दूर होऊ शकला

असता.आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद ह्यांच्यातील विसंवाद ज्या वेगाने व्हायला हवा तो वेग आपण गाठू शकलो नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक प्रवाहाची सुरुवात खऱ्या अर्थाने १९१६ साली सेमिनार मध्ये वाचलेल्या भारतातील जातिसंस्था, तिची यंत्रणा, उत्पत्ती आणि विकास ह्यांनी विषयावरील शोधनिबंधापासून होते. धनंजय कीर ह्यांनी लिहिलेल्या चरित्रातील विद्येसाठी खडतर तपश्चर्या ह्या प्रकरणात देखील असे संदर्भ आले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जातिसंस्थेवरील शोध निबंध हे भारतीय इतिहासाच्या दृष्टीने केलेले अतिशय मौलिक मार्क्सवादी भाष्य आहे. परंतु शिक्षण व ज्ञानाचा अभाव असल्यामुळे पोथीनिष्ठ मार्क्सवादी आणि आंबेडकरवाद्यांनी सुद्धा त्याचा विपर्यास केला.'Anihilation of Caste'ह्या भाषणात ही भारतातील समाजवादी हे समाजव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करणार की नाही असा प्रश्न उपस्थित केला. सद्यस्थितीत प्रत्यक्ष राजकारण आणिविचारप्रणालीच्या पातळीवर यावरून संभ्रम निर्माण झालेला होता.

भगवान बुद्धांच्या दु:ख ह्या शब्दाचे कार्ल मार्क्स च्या पिळवणूक ह्या शब्दाशी असणारे साम्य हे आपल्या शिक्षण पद्धती, व्यवस्था, जाती व्यवस्था, वर्ग व्यवस्था ह्यांच्या संकुचित वृत्तीमुळे समजून येत नाही. बौद्ध तत्त्वज्ञानातील दु:ख ह्या शब्दाचे विश्लेषण वेगवेगळ्या पद्धतींनी केले. परंतु मानसिक पातळीवर बुद्ध आणि मार्क्स ह्यांचे तत्त्वज्ञान एकत्र आणता येतात. मार्क्सची पिळवणूक म्हणजेच दु:ख आहे हे वैचारिक पातळीवर समजून घेतले तर समन्वयी विचाराचा उदय झाल्याशिवाय राहत नाही. न्यूयॉर्क डेली ट्रिब्यून या नियतकालिकात १८५३ साली भारतापुढील समस्यांचा विचार करणारी आठ लेखांची एक लेखमाला कार्ल मार्क्स ने लिहिली. ह्यामध्ये भारतापुढील प्रश्नांसंबंधीचे अनेक संदर्भ दिसून येतात. मार्क्स ते साम्यवादी विचारांचा प्रसारकरणे आणि क्रांती घडविणे हे जरी उद्दिष्ट मांडले असले तरी मार्क्सचे अर्थशास्त्रीय विचार, सामाजिक विचार, शैक्षणिक विचार, सांस्कृतिक विचार असे सुटे-सुटे विचार करणे योग्य होत

नाही, ते एक एकसंध तत्त्वज्ञान आहे. कारण जग बदल्याण्याचे स्वप्न हे जरी राजकीय असले, आर्थिक असले तरीही ते शैक्षणिक क्रांती झाल्याशिवाय तसेच सामाजिक क्रांती झाल्याशिवाय प्रत्यक्षात उतरवता येत नाही. भारतातील जातींमध्ये अनेक वर्ग निर्माण झाल्याचे चित्र दिसून येते. जात म्हटले की, आंबेडकरवाद आणि वर्ग म्हटले की मार्क्सवाद अशी कप्पेबंद वैचारिक पातळी व्यापक होण्यासाठी शैक्षणिक व सांस्कृतिक क्रांतीच उपाय ठरला आहे. कट्टर आंबेडकरवादाप्रमाणे कामगारांचे सर्व प्रश्न व समस्या जशा सुटणारनाहीत तशाच कट्टर मार्क्सवादाप्रमाणे सर्व दलितांच्या जातीच्या, अस्पृश्यतेच्या समस्यांवर उपाय शोधता येणार नाही. समाजाच्या वैचारिक पातळीवरच हे अवलंबून आहे. समाज शिकला, सुशिक्षित झाला, विचार करायला लागला तर आंबेडकर आणि मार्क्स ह्यांच्या विचारातील समन्वयाचा आग्रह हाच एकमेव उपाय असणार आहे. स्वत:ला कट्टर आंबेडकरवादी म्हणून घेणारे स्वफायद्यासाठी मार्क्सवादाचा विचार जाणीवपूर्वक टाळत आहेत. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या काठमांडूमध्ये केलेल्या भाषणाचा अर्थ स्वफायद्यासाठी करत आहेत. ह्याउलट मार्क्सवाद्यांची (पोथीनिष्ठ) स्थिती फारशी वेगळी नाही.

श्रीमंत आणि गरीब पालकांची मुले एकत्र शिकतील अशा व्यापक उद्देशाने निर्माण झालेल्या शाळांचे जाळे देशभर विणले गेले तर श्रीमंत आणि सुशिक्षित पालकांच्या मुलाशेजारी गरीब आणि अशिक्षित पालकांची मुले बसतील. श्रीमंत आणि सुशिक्षित पालक आपल्यामुलांच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवणारे असल्यामुळे ते अशा शाळेकडे लक्ष देतील व शाळेचा दर्जाही सुधारेल म्हणजेच अशा शिक्षण व्यवस्थेतून गुणवत्ताच दिसून येईल. ते विद्यार्थी कोणत्याही एका जातीचे अथवा एका धर्माचे असणार नाहीत. अशा सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेचा उल्लेख येथून मागच्या काही शिक्षण कमीशनने केला होता परंतु अशी स्थिती अंमलात आली नाही. उलट जात आणि वर्गवार, शाळा, महाविद्यालयांची वर्गवारी झाली.

मार्क्स, बुद्ध आणि आंबेडकर ह्यांचा तौलनिक विचार करताना दु:खाचे समूळ उच्चाटन करण्यासाठी बुद्धाला धार्मिक क्रांती अभिप्रेत होती. वर्गलढ्यातून कामगारांची सत्ता प्रस्थापित होण्यासाठी मार्क्सला राजकीय क्रांती अभिप्रेत होती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना जातीयता व अस्पृश्यता नष्ट करून सामाजिक न्यायाच्या दृष्टीने सामाजिक क्रांती अभिप्रेत होती. मार्क्सने राजकीय क्रांतीचे तत्त्वज्ञान मांडले ह्या तत्त्वज्ञानामुळे रशियात राजकीय क्रांती झाली. राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञानाच्या जागतिक अनुभवातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय तत्त्वज्ञान मांडून सामाजिक लोकशाहीसाठी क्रांती घडवून आणली. मार्क्सवादाला ह्या कारणामुळे वैश्विकता लाभली. तुलनेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा हा सामाजिक असल्यामुळे तेवढी वैश्विकता आंबेडकरवादाला मिळाली नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानावर आधारित अशा लिखाण व विश्लेषण तत्त्वज्ञान्यांची निर्मिती प्रामुख्याने १९६० नंतर झाल्याचे दिसून येते. आंबेडकरवादाच्या उद्गात्यांचा त्यांच्या मृत्यूनंतर लोकांना व त्यांच्या अनुयायांना जणू काही महत्त्व पटायला लावले. शिक्षणामुळे तरुण पिढीला राजकीय व सामाजिक वास्तवाचे भान आले व आंबेडकरवादाची नव्याने मांडणी व्हायला सुरुवात झाली. मार्क्स हा भौतिकवादी होता. त्यांनी कम्युनिस्ट मेनिफेस्टो, कॅपिटल हे ग्रंथ लिहिले. जडवादी भूमिकेतून विश्वाच्या मुळाशी जडतत्त्व आहे की चैतन्य आहे ह्यावरून वाद सुरू झाला. मार्क्सने सृष्टीविषयक ज्ञानाचा विस्तार समाजविषयक ज्ञानापर्यंत नेला. माणसाच्या ज्ञानात समाज परावृत्त होतो असे विचार मांडून मानवी जाणीव ही वस्तूच्या ऐतिहासिक विकासाची निर्मिती आहे, असे विचार प्रस्तुत केले. मार्क्सला अभिप्रेत असलेले शोषण आणि बुद्धांनी सांगितलेले दु:ख यांचा कार्यकारण भावाच्या दृष्टीने विचार केल्यास तसे पाहिले तर शोषण हे दु:खाचे कारण आहे. समाजात शोषक आणि शोषित असे दोन वर्ग असतात. उत्पादनाची सर्व साधने एका वर्गाच्या हातात असतात. दुसरा वर्ग फक्त श्रम करतो. वरकड मूल्य हे भांडवलदारांच्या हातात असल्याने शोषणाची क्रिया थांबत नाही आणि सर्व दु:खांचा उदय हा तृष्णेतून होतो. समाजव्यवस्थेतील

शोषण संपुष्टात आणण्यासाठी मार्क्सने वर्गलढ्याचे उपाय सांगितले. आंबेडकरवादाने मात्र ह्या ठिकाणी मार्क्स नाकारला आणि बुद्ध स्वीकारला. दलितांच्या दु:खाचे आणि सामाजिक अन्यायाचे मूळ जातिव्यवस्थेत आहे. जातिव्यवस्थेचे संपूर्ण उच्चाटन व निर्मूलन केल्याशिवाय नवी समाजरचना निर्माण करता येणार नाही. जातिव्यवस्था ही धर्माधिष्ठित असल्याने धर्मातही सुधारणा केली पाहिजे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतराचा मार्ग स्वीकारला. मार्क्सला मात्र धर्मसुधारणेचा मार्ग फारसा महत्त्वाचा नाही. धर्मसंस्था ही आर्थिक व्यवस्थेच्या पायावरील संरचना आहे. धर्मसुधारण्याऐवजी त्यांच्यामते राजकीय क्रांती व्हायला हवी. राजकीय क्रांतीमुळे समाजवादी समाज निर्माण होईल.

मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद हे दोन्ही तत्त्वज्ञान सूक्ष्मलक्षी दृष्टीने विश्लेषण केल्यास त्यांचा वेगवेगळा विचार करता येत नाही. म्हणून समाजसुधारणेचे मार्क्सची विचारसरणी आणि आंबेडकरांची विचारसरणी दोन्ही मार्ग एकत्रित स्वीकारल्यास समन्वयवाद हा तिसरा वेगळा विचार, वेगळी विचारसरणी निर्माण होईल. ज्ञानात्मक दृष्टीने व शिक्षणाच्या आधाराशिवाय समन्वयी मार्ग कळू शकणार नाही. दलित मागासलेल्या घटकांना शिक्षणातून क्रांती करणे सोपे जाईल. त्याचप्रमाणे श्रमिक व कष्टकऱ्यांना त्यांच्या पिळवणुकीच्या कारणांचे ज्ञान झाल्यास ते क्रांती करतील. म्हणजेच समाजाला शिक्षण मिळाले तर शोषणरहित समाज जसा निर्माण होईल तसा जातिभेद अणि वर्गभेद नसणारा समाज निर्माण करणे हे मार्क्सवाद आणि आंबेडकरवादाचे उद्दिष्ट आहे. दोघांचे मार्ग फक्त वेगळे आहेत. शिक्षणाद्वारे समाजामध्ये संसदीय लोकशाही समाजवादी अर्थरचना निर्माण करून समन्वयी विचार उपयुक्त ठरेल.

जागतिकीकरणामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक जीवनावर दूरगामी परिणाम होत आहेत. जागतिकीकरणाने शिक्षण क्षेत्रालाही स्पर्श केलेला स्पष्टपणे आज जाणवतो आहे. शिक्षण क्षेत्रात व्यापारी दृष्टिकोन आल्याने शिक्षण ही क्रयवस्तू बनली आहे. शिक्षण संस्था, बनल्या आहेत. विद्यार्थी हा ‘कस्टमर’ तर गुरू, शिक्षक हा ‘सेलर’ बनला आणि पदवीधराला तयार माल

म्हणजेच ‘प्रोडक्ट’ अशी नावे दिली गेली. कोणत्याही वस्तूचे मार्केट हे मागणी पुरवठ्याच्या सिद्धांतावर ठरते. भारतातील भांडवलदार उच्च जाती वर्गासाठी वेगवेगळ्याशिक्षण व्यवस्था स्थापन करण्याच्या योजना आखित आहेत. पूर्वीपासून सिने-इंडस्ट्रिजमध्ये पैसे गुंतविले जाई. आज मात्र ही गुंतवणूक शिक्षण क्षेत्रामध्ये करण्यास सुरुवात केलेली दिसून येते. भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांचे जसे स्वागत झाले, तसे शैक्षणिक कारखान्यांचे ही स्वागत केले. विद्यार्थी आणि पालक,माणूस आणि मानवेतर प्राणी यात मूलभूत फरक असा आहे की, माणसाला ही एक प्राणी म्हणून भूक आणि कामवासना भागवाव्याच लागतात. परंतुह्याही पुढे जाऊन माणूस त्यापेक्षा अधिक काही करण्यासाठी जगत असतो. माणूस हा स्वत:च्या जगण्याला सार्थ करणारा आणि सुंदर बनविणारा प्राणी आहे. हे त्याचे वेगळेपण आहे. तो जेव्हा त्याच्या जीवनाला अर्थ देण्याच्या प्रयत्नाला लागतो तेव्हा आपल्या जीवनाला अर्थ देण्याचे काम स्वत:लाच करावे लागेल ह्याची त्याला जाणीव होते. जीवनाला अर्थ दिल्याशिवाय ते सुदंर करता येत नाही हे ही त्याला उमगते. किती दिवस जगायचे ह्यापेक्षा जेवढे जगता येईल तेवढे सार्थ आणि सुंदर जगायचे ह्या निर्णयाप्रत येणारी माणसेच खऱ्या अर्थाने माणूस म्हणून जगत असतात.[९]

शिक्षण क्षेत्रामध्ये ही शिक्षणाचा लाभ घेणाऱ्यांचा वेगवेगळ्यावर्गात समावेश झाला. श्रीमंत वर्ग आणि गरीब वर्ग वेगवेगळे शिक्षण घेताना दिसतात. वर्गव्यवस्था नष्ट करण्याचे स्वप्न मार्क्सने पाहिले होते. आणि गरीब श्रीमंत हा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी आंबेडकरवादाने अहोरात्र परिश्रम केल्याचे दिसून येते. म्हणून शैक्षणिक उद्योगातील ही विषमता सामाजिक भेदभाव आणि वर्ग नष्ट करण्यासाठी समन्वयी तत्त्वज्ञानच फायेदशीर ठरते. समन्वयी विचार मान्य केला की तो आंबेडकरवादी राहत नाही आणि मार्क्सवादीही राहत नाही तर समन्वयी विचाराचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण होते.

सद्यस्थितीतील भांडवलशाही प्रणीत शिक्षण प्रणालीत राष्ट्रीय शिक्षण ह्या गोंडस नावाखाली हिंदुत्त्ववादाचे दृढीकरण दैव, ज्योतिषशास्त्र ह्यांना प्राधान्य दिले जाते. चुकीचे

ऐतिहासिक संदर्भ देऊन्न हिंदूत्व हेच राष्ट्रीयत्व आहे, असा प्रचार केला जात आहे. भारतीय संविधानातील मूलभूत सूत्रांना फाटा देऊन्न घटनात्मक मौलिक तत्त्वामध्ये प्रदूषण निर्माण केले जात आहे. रामजी शिंदे, संत गाडगे महाराज, पंजाबराव देशमुख,धोंडे केशव कर्वे ह्यांसारख्या परिवर्तनवादी विचारवंतांचे शैक्षणिक विचारांचे श्रोत हे विद्यादात्री सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले ह्यांनी सांगितलेल्या व मांडलेल्या शिक्षणविषयक तात्त्विक मांडणीत सापडते. महात्मा फुले 'शेतकऱ्यांचा असूड' ह्या पुस्तकात विद्येचे महत्त्व व विद्येच्या अभावामुळे माणसाचा सर्वनाश कसा झाला हे विस्ताराने विशद करतांना म्हणतात, विद्येविना मती गेली, मतीविना नीति गेली, नीतिविना गती गेली, गतिविना वित्त गेले, वित्ताविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले. ह्याचा अर्थ शिक्षणासारखी महत्त्वाची बाब दुसरीकोणतीही नाही. माणसाला अन्न, वस्त्र, निवाऱ्यापेक्षाही शिक्षणाची आवश्यकता आहे. नागरिकाला नैतिक जबाबदारीची जाणीव निर्माण करून देणारे शिक्षण म्हणजेखरे शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते शिक्षणामुळे शोषणमुक्त समाज निर्माण व्हावा. शिक्षणामुळे माणसाची सर्वांगीण प्रगती व्हावी त्याला जीवन मार्ग सापडावा म्हणून शिक्षण हे प्रभावी साधन मानले जावे. समन्वयी विचारांमधून राज्यघटनेत नमूद केलेली सर्व तत्त्वे अंमलात आणता येतील. म. फुले आणि सावित्रीबाई फुले ह्यांच्या स्वप्नातील विचारांची पेरणी डॉ. आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेत केली.

**संदर्भटीपा:**


१. चौसाळकर अशोक, मार्क्सवाद-उत्तर मार्क्सवाद, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०१०, पृ.क्र. २१

२. कऱ्हाडे सदा, मार्क्सवाद, बुद्धवाद आणि आंबेडकरवाद, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, २री आवृत्ती, मे २०१०

३. कसबे रावसाहेब, आंबेडकर आणि मार्क्स, सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.क्र. २८८

४. डाहाट धनराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार खंड - २ शिक्षण, संकेत प्रकाशन नागपूर, पान नं. ११२

५. डाहाट धनराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे आणि विचार खंड - २ शिक्षण, संकेत प्रकाशन नागपूर, पान नं. १२९

६. घोडेस्वार देविदास (अनु.), (लेख - यशपाल समितीचेयोगदान प्रा. शरद जावडेकर) सत्यशोधक जागर, ऑगस्ट-२०११ अंक ४४

७. परदेशी प्रतिमा (संपा.), (लेख - यशपाल समितीचेयोगदान प्रा. शरद जावडेकर) सत्यशोधक जागर, ऑगस्ट-२०११ अंक ४४

८. कसबे रावसाहेब, शिक्षणाची आव्हाने, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ.ऑक्टो. २००२, पृ.क्र. ३

९. कसबे रावसाहेब, शिक्षणाची आव्हाने, सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. ऑक्टो. २००२, पृ.क्र. १३

प्रकरण सातवे

# निष्कर्ष व शिफारशी

७.० प्रस्तावना

७.१ गृहीतकांची पडताळणी

७.२ निष्कर्ष

७.३ शिफारशी

प्रकरण सातवे

# निष्कर्ष व शिफारशी

## ७.० प्रस्तावना :

'मार्क्स-आंबेडकर विचारांचा समन्वयवाद'ह्या नव्या अन्वेषण पद्धतीमुळे दोन वेगवेगळ्या मार्गाने जाणारे विचारप्रवाह एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे. निवडक विचारवंत आणि कार्यकर्ते वगळल्यास पारंपरिक मार्क्सवादी अथवा आंबेडकरवादी वैचारिक पातळीवरील समन्वय साधण्याच्या प्रयत्नात पडत नाही. आंबेडकरवादाचे कट्टर आणि मार्क्सवादाचे कट्टर पुरस्कर्ते म्हणवून घेणारे विचारवंत, नेते व कार्यकर्तेहे वर्ग आणि जात ह्यावरून पोथीनिष्ठपणाचे ढोंग करताना दिसतात. भारतीय समाजामध्ये दलितांची वर्गवादी कम्युनिस्टांनी आणि कम्युनिस्टांची जातीय दलितांनी कोंडी केली आहे. आंबेडकरवाद आणि मार्क्सवाद ह्या विचारप्रणालीच्या अभ्यासकांचीही अवस्था ह्यापेक्षा वेगळी नाही. ही कोंडी फोडण्याचे महत्त्वाचे कामडॉ. रावसाहेब कसबे, कॉ. शरद पाटील, कॉ. गोविंद पानसरे, बाबुराव बागूल, नानासाहेब गोरे, राम बापट, दादासाहेब रूपवते, प्रा. रणजित परदेशीह्यांनी केले आहे. समन्वययाच्या अनुकूल बाजूनेत्यांच्या योगदानाची दखलघ्यावी लागते.

१९८०-८५ च्या दरम्यान कार्ल मार्क्स, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्या महामानवांना केंद्रिभूत मानून समाजासमोर अनेक लिखाण पुस्तकांच्या, वर्तमानपत्रांच्या माध्यमातून मांडणी झाली आहे. मे. पु. रेगे यांची "मार्क्सवाद आणि फुले आंबेडकरवाद" (१९८०) फेब्रुवारीचा नवभारत वृत्तपत्राचा अंक, तसेच १९८५ मधील डॉ. कसबेंचे 'आंबेडकर आणि मार्क्स',गेल ऑम्वेट ह्यांनी 'नॉन-ब्राह्मण मुव्हमेंट इन वेस्टर्न इंडिया'ह्या पुस्तकात वर्ग व

जाती लढ्यांच्या समन्वयाची मांडणी केली आहे. प्रा. नलिनी पंडित ह्यांनी १९६५ साली 'वर्गवाद आणि जातिवाद' ह्या पुस्तकाद्वारे सुद्धा समन्वयाची मागणी केलेली होती. ह्याही अगोदर कॉ. प्रभाकर वैद्य ह्यांनी समन्वयाची आवश्यकता आहे, असे सुतोवाच केले होते. कॉम्रेड एस. जी. सरदेसाई ह्यांनी 'क्लास स्ट्रगल ॲन्ड कॉन्फ्लिक्ट इन रूरल एरियाज'ह्या पुस्तिकेमध्ये १९७९ ऑगस्ट मध्ये उल्लेख केलेला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट नेते कॉ. एम.एस. नंब्रुद्रिपाद ह्यांनी याबाबत जातिव्यवस्था पाया आहे आणि वर्गव्यवस्था सत्य आहे. त्यांच्या लेखनाचा मोठा परिणाम समाजमनावर झालेला होता,त्यामुळे जातिव्यवस्था, स्त्रीप्रश्न, रोजगार आणि शिक्षण ह्या सर्वच क्षेत्रांसंदर्भात कट्टर आंबेडकरवादी आणि कट्टर मार्क्सवाद्यांपुढे नवनवीन प्रश्न आणि समस्या ह्याबाबत तसेच मोठा वैचारिक संभ्रम निर्माण झाला आहे. स्वत:ला आंबेडकरवादी आणि मार्क्सवादी चळवळीचे कार्यकर्ते म्हणवून घेणाऱ्यांचा प्रत्यक्ष काम करताना कोणत्या तत्त्वज्ञानाप्रमाणे सामाजिक समस्या सोडविल्या पाहिजे ह्याबाबत प्रचंडगोंधळ होताना दिसतो.ह्या सर्व प्रश्नांची उकल आपणास ह्या मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांतून होत असल्याचे दिसून येते.

कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर ह्यांच्यामुळे दोन वेगवेगळ्याप्रत्यक्ष चळवळीची निर्माती झाली. दोन्ही विचारवंतांच्या विचारांना पायाभूत मानून कार्य करणारे व विरोध करणारे अनेक संस्था, संघटना, राजकीय पक्ष निर्माण झाले आहेत व कार्यरत आहेत. त्यामुळे मार्क्स-आंबेडकर ह्यांचा एकत्रित विचार हा दोन्ही विचारांच्या कर्मठ लोकांना न पटणारा भाग आहे. पाश्चात्त्य जगाने मार्क्सला मुक्तिदाता मानले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुद्धा मार्क्सवर टीका केली. परंतु त्यांनी मार्क्सचे वैचारिक व व्यावहारिक योगदान मान्य केले आहे. यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर टीकाही झाली.

आज आंबेडकरवादी संघटना, चळवळी व राजकीय पक्ष ह्यांना आपल्या कार्यात अपयश आले.आजच्या बदलत्या परिस्थितीत कम्युनिस्ट चळवळी अपयशी ठरताना दिसतात. ह्या परिस्थितीत मार्क्स आणि आंबेडकरह्यांच्या विचारांत समन्वय साधने ही काळाची गरज होती व आहे. समन्वयी विचारामुळे दोन्ही विचारवंतांचे नाव एकमेकांबरोबर घेणे अपराधिक वाटू नये, कारण अशा वैचारिक अभिसरणाने सामाजिक गुंतागुंत कमीहोत आहे. समन्वयवाद हा वेगळा विचार निर्माण झाल्यास तो आंबेडकरवाद आणि मार्क्सवादापेक्षा स्वतंत्र विचार म्हणून ओळखला जाईल व त्याप्रमाणे समाजात कृती होईल. समन्वयी विचारामुळे मार्क्सवाद्यांना वर्ग च्या भूमिकेतून आणि आंबेडकरवाद्यांना जातींच्या कोशातून बाहेर येण्यास मदत होईल. सद्यस्थितीतील राजकारणाचा निदानात्मक पद्धतीने अभ्यास करताना जसे डावे आणि उजवे ह्यांच्यातील संघर्षाचे मूळ शोधावे लागते, तसा मार्क्स आणि आंबेडकर ह्या दोन तत्त्वचिंतकांचाही विचार करावाच लागतो. आधुनिक काळात भारतीय समाजव्यवस्था जातीबरोबर वर्गावरही आधारित आहे. ह्यामुळे दोन्ही विचारांच्या समन्वयाची आवश्यकता आहे. आजच्या काळात वास्तवाला तोंड देताना मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचार अत्यंत उपयुक्त ठरतो.

### १.१ गृहीतकांची पडताळणी :

**गृहीतक १ :** मार्क्स-आंबेडकर समन्वयी विचारांना निश्चित अशी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.

